# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

एम. ए. भाग–१ : राज्यशास्त्र

# भारतीय राज्यघटना

**(Indian Constitution)**

**सत्र १ : पेपर ३ (आवश्यक)**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२२–२३ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथम आवृत्ती :** २०१८

द्वितीय आवृत्ती : २०२१

सुधारित आवृत्ती : २०२२

एम. ए. (राज्यशास्त्र) भाग-१ पेपर ३ (आवश्यक)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.
**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-81-8486-680-3

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### सल्लागार समिती

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र**

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**राज्यशास्त्र अभ्यासमंडळ समन्वयक**

**डॉ. प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली  याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूर शिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहि:स्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक एम. ए. भाग एक च्या राज्यशास्त्र विषयाच्या ऐच्छिक पेपर क्रमांक १ सत्र एक साठी 'भारतीय राज्यघटना' हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

भारतीय राज्यघटना यामध्ये भारतीय राज्यघटनेचा विकास, भारतीय राज्यघटनेचे वैचारिक अधिष्ठान, केंद्र सरकार आणि घटनात्मक प्राधिकरणे या घटकांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार. त्याचप्रमाणे राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रकाश पवार, राज्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ मधील प्राध्यापक, डॉ. सुखदेव उंदरे, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य, व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे मी आभार मानतो.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक, केंद्रातील सर्व सहकारी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मन:पूर्वक आभार.

■ **संपादक** ■

**डॉ. रविंद्र भणगे**
प्राध्यापक,
राज्यशास्त्र  अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **प्रा. पांडुरंग विष्णू पाटील**<br>प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर, ता. कोरेगाव, जि. सातारा | १ |
| **डॉ. विजय जालिंदर देठे**<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | २ |
| **डॉ. सूर्यकांत गायकवाड**<br>दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २.३ |
| **डॉ. सचिन पाटील**<br>श्रीमती कुसूमताई राजाराम बापू पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर | ३ |
| **डॉ. रविंद्र भणगे**<br>राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ४ |
| **डॉ. सचिन भोसले**<br>दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ४.२.१.३ |

**■ संपादक ■**

**डॉ. रविंद्र भणगे**
प्राध्यापक,
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | भारतीय राज्यघटनेचा विकास | १ |
| २. | भारतीय राज्यघटनेचे वैचारिक अधिष्ठान | २७ |
| ३. | केंद्र सरकार व राज्य सरकार | ७० |
| ४. | घटनात्मक प्राधीकरणे | १३७ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२२-२३ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## सत्र १ : घटक १

# भारतीय राज्यघटनेचा विकास

(Development of Indian Constitution)

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

  १.२.१ संविधानाचा विकास : प्रमुख घटनात्मक कायदे व घटना समिती

    (अ) मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा-१९०९

    (ब) मॉंटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा कायदा, १९१९

    (क) भारत सरकारविषयक कायदा, १९३५

    (ड) क्रिप्स योजना, १९४२

    (इ) कॅबिनेट मिशन किंवा त्रिमंत्री योजना

    (फ) घटना समिती

    (ग) भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये

  १.२.२ विचारसरणींचा प्रभाव : उदारमतवाद, समाजवाद, गांधीवाद आणि इतर

  १.२.३ संविधान हे सामाजिक, आर्थिक बदलाचे साधन

१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## १.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अध्ययनानंतर आपल्याला -

१. संविधानाद्वारे भारतात झालेले आर्थिक व सामाजिक बदल समजून घेणे.

२. घटनासमितीचे राज्यघटना निर्मितीतील योगदान समजून घेता येईल.

३. भारतीय संविधानावरील वेगवेगळ्या विचारसरणींचा प्रभाव समजून घेणे.

४. भारतीय संविधानाचा घटनात्मक विकास समजून घेणे.

## १.१ प्रास्ताविक

राज्य ही एक संस्था आहे आणि तिच्या कारभारासाठी काही नियम असणे आवश्यक असते. सामान्यत: अशा नियमांच्या संचालाच संविधान म्हटले जाते. संविधानाद्वारे राज्याची आधारभूत तत्त्वे, राज्याचे मूलभूत कायदे स्पष्ट होतात. डॉ. फायनर यांच्या मते, शासनसंस्थेचे कार्य करणारे कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ व न्याय मंडळ या तिन्ही मंडळांची रचना, त्यांचे अधिकार आणि परस्पर संबंध निश्चित करण्यासाठी सार्वभौम सत्तेने निर्माण केलेली विधिनियमांची व संकेतांची पध्दत म्हणजे संविधान होय. राष्ट्राचा एक नागरिक म्हणून प्रत्येक व्यक्तिने राज्यघटनेचे तत्त्वज्ञान समजून घेणे आवश्यक आहे. भारतीय संविधानावर भारतीय समाज जीवनाचे वास्तव आणि जगभरातील विविध राज्यघटनांचा प्रभाव पडलेला आहे. भारतीय राष्ट्रीय चळवळ, विविध विचारसरणींचा प्रभाव, विविध, सुधारणाविषयक कायदे, ब्रिटिश राजवट इ.तून भारतीय संविधानाचा विकास झालेला दिसतो. भारतीय संविधानाचा अभ्यास या घटकात आपण करणार आहोत.

## १.२ विषय विवेचन

### १.२.४ भारतीय संविधानाचा घटनात्मक विकास

ब्रिटिशांच्या भारतातील साम्राज्यविस्ताराबरोबरच येथील संविधानाचाही विकास होत गेल्याचे दिसते. ब्रिटिशांनी आपल्या साम्राज्याचा विस्तार करताना भारतीयांनी त्याला विरोध केला. भारतीय जनतेमधील असंतोष दूर करण्यासाठी वेळोवेळी ब्रिटिशांनी कांही राजकीय सुधारणाही केल्या. त्यातूनच भारताचा घटनात्मक विकास होत गेला. हा घटनात्मक विकास पुढील काही महत्त्वाच्या कायद्याद्वारे झालेला दिसतो.

**(अ) मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा-१९०९**

१८६१ व १८९२ च्या कायद्याचा पुढचा टप्पा म्हणजे हा कायदा होय. १८९२ च्या कायद्याने केंद्रीय व प्रांतीय कायदेमंडळात सरकारी सदस्यांचे निर्णायक बहुमत मान्य केले, परंतु हिंदी जनतेला

पुरेसे प्रतिनिधीत्व दिले नव्हते. राष्ट्रीय सभेने या विरोधात आंदोलने केली. इंग्लंडमध्ये शिष्टमंडळे पाठवून आपली न्याय बाजू मांडली. राष्ट्रीय सभेच्या मागण्या न्याय्य असल्या तरी ब्रिटिश सरकार चालढकल करीत होते. याच काळात लॉर्ड कर्झनची जुलमी राजवट निर्माण झाली. लॉर्ड कर्झनने सत्तेचे केंद्रीकरण, हिंदी लोकांची प्रशासनातून केलेली हकालपट्टी, बंगालची फाळणी इत्यादीमुळे भारतीय जनतेत असंतोष निर्माण झाला. देशी वृत्तपत्रे, राष्ट्रीय चळवळीकडून सुधारणांची मागणी होऊ लागली. याचा ब्रिटिश शासनावर प्रभाव पडून ब्रिटिश शासनाने लिबरल पक्षाचा नेता जॉन मोर्ले याची भारतमंत्री, तर मिंटो यांची गव्हर्नर जनरल म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांनी १९०६ मध्ये कायदा मंजूरीबाबत प्रक्रिया सुरू केली. १९०९ मध्ये त्याबाबतचे विधेयक पार्लमेंटमध्ये मांडले गेले आणि मे १९०९ मध्ये कायदा पास झाला. या कायद्याने काही तरतुदी करण्यात आल्या त्या पुढीलप्रमाणे :-

### १. कायदे मंडळाचा विस्तार :-

१९०९ च्या कायद्याने कायदे मंडळाचा विस्तार करण्यात आला. केंद्रिय कायदे मंडळाची सदस्य संख्या १६ वरून ६० इतकी करण्यात आली. याशिवाय गव्हर्नर जनरल, त्याच्या कौन्सिलचे ७ सदस्य आणि एक असाधारण सदस्य अशी एकूण ६९ इतकी सदस्य संख्या करण्यात आली. त्यापैकी ३७ सरकारी व ३२ बिनसरकारी सदस्य असतील. बिनसरकारी सदस्यामध्येही २७ निर्वाचित व ५ गव्हर्नर जनरलने नेमलेले असतील असे ठरविले. केंद्रिय कायदे मंडळाप्रमाणेच प्रांतिक कायदे मंडळाच्या सदस्य संख्येतही वाढ करण्यात आली. उदा. मुंबई-४७, मद्रास-४७, बंगाल-५२ इत्यादी.

### २. कायदे मंडळाच्या अधिकारात वाढ :-

या कायद्याने केंद्रिय व प्रांतिक कायदे मंडळाच्या अधिकारात वाढ करण्यात आली. केंद्रिय व प्रांतिक कायदे मंडळाच्या सदस्यांना चर्चा करण्याचा व प्रश्न विचारण्याचा अधिकार, परराष्ट्र धोरण इ. विषयावर चर्चा करण्याचा देण्यात आला.

### ३. जमातीय मतदानाला प्रारंभ :-

या कायद्याने मुस्लिमांसाठी स्वतंत्र मतदार संघाची रचना करून जमातीय मतदानाला प्रारंभ केला. मुस्लिमांसाठी राखीव मतदार संघ मंजूर करण्यात आले. राखीव मतदार संघात केवळ मुस्लिम मतदार उमेदवार असतील असे ठरविले.

### ४. निर्वाचन पध्दतीचा अंशत: स्विकार :-

या कायद्याने निर्वाचन तत्त्वाला अंशत: मान्यता दिली असे असले तरी कायदे मंडळातील सर्वच सदस्य निवडणूकीद्वारे निवडून येत नव्हते, तर काही सरकार नियुक्त सदस्य असत.

## ❒ परीक्षण :-

१) या कायद्याने जबाबदार राज्यपध्दती येवू शकली नाही. या कायद्याने केलेल्या सुधारणा राबविताना त्यातील फोलपणा लक्षात येऊ लागला.

२) कायदे मंडळातील ६९ सदस्यापैकी ३७ सरकारी व ३२ बिनसरकारी सदस्य होते. बिनसरकारी सदस्यातही ५ सदस्य गव्हर्नर जनरलने नेमलेले असल्याने ब्रिटिशांना हवा तो ठराव मंजूर करून घेता येणार होता.

३) केंद्रिय कायदे मंडळाप्रमाणेच प्रांतिक कायदे मंडळातीलही सदस्य नियुक्त करण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलला देण्यात आला होता.

४) मुस्लिमांना स्वतंत्र मतदारसंघ देवून हिंदू-मुस्लिमात फूट पाडण्याचा ब्रिटिशांचा डाव यशस्वी झाला. पुढे हिंदू-मुस्लिम हा वाद वाढतच गेला.

५) कायदे मंडळाच्या अधिकारात वाढ करून केवळ चर्चा करण्याचा अधिकार देण्यात आला. परंतु सरकारवर अविश्वास दाखवून सरकार बरखास्त करण्याचा किंवा सरकारवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार नव्हता.

६) या कायद्याने प्रादेशिक प्रतिनिधीत्वापेक्षा जातीय व वर्गीय प्रतिनिधीत्वास महत्त्व दिले. त्यामुळे जमीनदार, व्यापारी इत्यादींना प्रतिनिधीत्व मिळाले.

## (ब) माँटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा कायदा, १९१९

१९०९ च्या कायद्यातील फोलपणा लगेचच लक्षात आला. या कायद्याने मुसलमानांव्यतिरिक्त कोणाचेही समाधान झाले नाही. मुस्लिमांबाबत ब्रिटिशांना वाटत असलेली आपुलकी बेगडी आहे, हे मुस्लिमांच्या लक्षात आले. त्यांनीही पुढे राष्ट्रीय चळवळीत सहभाग घेऊन पुढील काळात आंदोलने केली. १९१९ चा सुधारणा कायदा खालील काही कारणांमुळे करण्यात आला.

१) १९०९ मध्ये करण्यात आलेला मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा अपुरा व असमाधानकारक होता.

२) १९०५ मध्ये ब्रिटिशांनी बंगालची फाळणी करून हिंदू-मुस्लिमांना वेगळे केले, परंतु १९१६ मध्ये 'लखनौ करार' होऊन काँग्रेस-मुस्लिम लीग एकत्र आल्याने राष्ट्रीय चळवळीची ताकद वाढली.

३) १९१६ मध्ये लो. टिळक व डॉ. ॲनी बेझंट यांनी होमरूल चळवळीची स्थापना करून स्वयं-शासनाची मागणी केली. होमरूल चळवळीचे कार्य इतके प्रभावी होते की, ब्रिटिशांना त्याची दखल घ्यावी लागली.

४) आंतरराष्ट्रीय घटनांचा उदा. पहिल्या महायुध्दाचा प्रभावही पडलेला दिसतो.

आदी कारणांमुळे लॉर्ड मॉंटेग्यु यांनी १९१७ मध्ये भारताला साम्राज्यांतर्गत स्वराज्य देणे, जबाबदार शासन पध्दतीचा स्वीकार करणे इ. घोषणा केल्या. या कायद्याद्वारे पुढील काही तरतुदी करण्यात आल्या.

**१. द्विगृही कायदे मंडळ :-**

केंद्रिय कायदेमंडळात (Council of States) हे वरिष्ठ सभागृह आणि (Legislative Assembly) हे कनिष्ठ सभागृह निर्माण करून द्विगृही कायदे मंडळ पध्दती स्वीकारण्यात आली. कनिष्ठ सभागृहात १४५ सदस्य असतील व सभागृहाची मुदत ३ वर्षे असेल तर वरिष्ठ सभागृहात ६० सदस्य व सभागृहाची मुदत ५ वर्षे असेल असे ठरविण्यात आले. कायदे मंडळातील सदस्यांना प्रश्न, उपप्रश्न मांडण्याचा अधिकार होता.

**२. द्विदल शासनपध्दती :-**

या कायद्याने सर्व प्रांतांना समान दर्जा देवून प्रांतात द्विदल शासन पध्दती निर्माण केली. प्रांतांकडे आलेल्या बाबींपैकी राखीव व सोपीव अशी खात्यांची वाटणी करण्यात आली. राखीव खात्यातील कायदा व सुव्यवस्था, पोलीस, महसूल, न्याय इ.बाबतचा कारभार गव्हर्नरकडे तर सोपीव खात्यातील आरोग्य, शिक्षण, स्थानिक स्वराज्य संस्था इ.बाबतचा कारभार लोकप्रतिनिधींच्या मंत्र्यांकडे सापविण्यात आला.

**३. स्वतंत्र मतदारसंघ :-**

१९०९ च्या कायद्याने मुस्लिमांना स्वतंत्र मतदारसंघ दिले गेले. तेच धोरण पुढे ठेवून मुस्लिमांबरोबर शीख, युरोपियन्स, अँग्लो इंडियन्स इत्यादींना स्वतंत्र मतदार संघ देण्यात आले, त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण झाला.

**४. गव्हर्नर जनरलला अमर्याद अधिकार :-**

गव्हर्नर जनरल हा केंद्रिय कार्यकारी मंडळाचा सर्वोच्च अधिकारी होता. केंद्रिय खात्यांचा व प्रांतिक खात्यांचाही अधिकार गव्हर्नर जनरलकडे देण्यात आला होता. याशिवाय प्रांतातील राखीव

खात्यावरही गव्हर्नर जनरलचे पूर्ण नियंत्रण ठेवण्यात आले. म्हणजेच कायदे मंडळावर त्याची पूर्ण सत्ता चालत होती.

### ❒ परीक्षण :-

१९१९ चा सुधारणा कायदा भारताच्या घटनात्मक विकासातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. जबाबदार शासन व्यवस्थेला या कायद्याने तत्त्वत: मान्यता दिली. कायदेमंडळात भारतीय प्रतिनिधींच्या संख्येत वाढ केली असे काही गुण या कायद्याचे असले तरी दोषच जास्त होते.

१) या कायद्याने जबाबदार शासन पध्दतीच्या तत्त्वाचा देखावा केला. गव्हर्नर जनरलला पूर्वीप्रमाणेच सर्वोच्च अधिकार दिले. गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळात भारतीय सदस्य असले तरी ते सरकारकडून नियुक्त केलेले असल्याने सरकारच्या धोरणालाच ते पाठिंबा देत.

२) या कायद्याने द्विगृही कायदे मंडळाची तरतूद केलेली असली तरी कायदे मंडळ अधिकारहीन होते. दोन्ही सभागृहांनी मंजूर केलेले विधेयक गव्हर्नर जनरलच्या मान्यतेसाठी ठेवले जाईल. मात्र कायदे मंडळाने मंजूर केलेले विधेयक गव्हर्नर जनरलने मान्य केलेच पाहिजे असे बंधन नव्हते.

३) या कायद्याने वेगवेगळ्या धर्मांना, जातींना, वर्गांना मतदारसंघ दिले गेल्याने जमातवादाला खतपाणी घातले गेले.

वरील दोष असले तरी राजकीय जागृती करण्याच्यादृष्टीने या कायद्याने एक चांगले व्यासपीठ उपलब्ध करून दिले. द्विदल शासन पध्दतीमुळे हिंदी लोकांना राज्यकारभारात सहभागी करून घेतले गेल्याने या कायद्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

### (क) भारत सरकारविषयक कायदा, १९३५

१९१९ चा कायदा अपुरा व असमाधानकारक असल्याने पुढील काळात राष्ट्रीय सभेने प्रभावीपणे आंदोलनाला सुरुवात केली. लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर (१९२० नंतर) राष्ट्रीय चळवळीची सर्व सूत्रे म. गांधीजी यांचेकडे आली. १९२०-३५ या कालखंडात असहकार चळवळ, स्वराज्य पक्षाची चळवळ, सायमन कमिशनला विरोध, सविनय कायदेभंग, नेहरू अहवाल, गोलमेज परिषदा, जातीय निवाडा इत्यादीतून १९३५ च्या सुधारणा कायद्याची पार्श्वभूमी तयार झाली. १९३३ मध्ये सुधारणा करण्याविषयी एक 'श्वेतपत्रिका' प्रसिध्द केली. ही श्वेतपत्रिका भारतीयांना मान्य नव्हती. तरीही या श्वेतपत्रिकेच्या आधारे १९३५ चा सुधारणा कायदा करण्यात आला. या कायद्यात ३२१ कलमे व १९ परिशिष्टे होती. या कायद्याने पुढील तरतुदी करण्यात आल्या.

## १. संघराज्याची निर्मिती :–

या कायद्याने प्रांत व संस्थानांचे मिळून संघराज्य निर्माण करण्यात आले. प्रांत व संस्थानांचे संघराज्य निर्माण केले असले तरी संघराज्यात सामील होण्याची सक्ती त्यांच्यावर नव्हती. त्यांना फुटून बाहेर पडण्याचा अधिकार होता.

## २. द्विगृही कायदे मंडळ :–

१९१९ च्या कायद्याप्रमाणेच या कायद्यानेही द्विगृही कायदे मंडळ पध्दती स्विकारली. Council of State या वरिष्ठ सभागृहात प्रांताचे १५६ व संस्थानाचे १०४ असे २६० सदस्य तर Federal Assembly या कनिष्ठ सभागृहात प्रांतांचे २५० व संस्थानांचे १२५ असे ३७५ सदस्य असतील असे ठरविले. कनिष्ठ सभागृहाचा कार्यकाल ५ वर्षांचा तर वरिष्ठ सभागृह स्थायी स्वरूपाचे असेल. त्यातील १/३ सदस्य ३ वर्षांनी निवृत्त होतील व तेवढेच नव्याने घेतले जातील. वरिष्ठ सभागृहातील सदस्यांचा कार्यकाल मात्र ९ वर्षांचा असेल असे ठरविले.

## ३. अधिकारांची विभागणी :–

या कायद्याने केंद्रसूची, प्रांतसूची व समवर्ती सूची अशा ३ विषयसूच्या देवून अधिकारांची विभागणी केली. देशाच्या हिताच्यादृष्टीने महत्त्वाचे असणारे विषय केंद्रसूचित ठेवले. उदा. परराष्ट्र व्यवहार, लष्कर, पोस्ट, रेल्वे इ. तर तुलनेने कमी महत्त्वाचे विषय प्रांत सूचित ठेवले. उदा. आरोग्य, शिक्षण, शेती इत्यादी समवर्ती सूचित विवाह, घटस्फोट, छापखाने इ. विषय ठेवले. केंद्रसूचीतील विषयासंबंधी केंद्र सरकार, प्रांतसूचीतील विषयासंबंधी प्रांतातले सरकार तर समवर्ती सूचीतील विषयासंबंधी कायदे करण्याचा अधिकार केंद्र व प्रांत सरकारला देण्यात आला. या कायद्याने शेषाधिकार गव्हर्नर जनरलला देण्यात आला. अधिकारांची विभागणी झालेली असली तरी घटनेत बदल करण्याचा अधिकार मात्र ब्रिटिश संसदेलाच देण्यात आलेला होता.

## ४. केंद्रात द्विदल शासनपध्दती :–

१९१९ च्या कायद्याने प्रांतात सुरू केलेली द्विदल शासनपध्दती बंद करून केंद्र स्तरावर सुरू केली. खात्यांचे राखीव खाती व सोपीव खाती असे वर्गीकरण केले. राखीव खात्याचा कारभार गव्हर्नर जनरलने इतर तीन अधिकाऱ्यांच्यामार्फत पाहावा आणि सोपीव खात्याचा कारभार लोकप्रतिनिधींच्या मंत्रिमंडळाने गव्हर्नर जनरलच्या मार्गदर्शनाखाली पाहावा असे ठरले.

## ५. संघ न्यायालय :–

या कायद्याने संघराज्यासाठी एकसंघीय न्यायालय सुचविले. या न्यायालयात एक मुख्य व इतर ६ उपन्यायाधिश असतील. त्यांच्या नेमणूका राजाकडून होतील. या न्यायालयाचे संघराज्यातील इतर न्यायालयावर नियंत्रण असेल. राज्यघटनेचा अर्थ लावणे, इतर न्यायालयावरील अंतिम निर्णय देणे,

केंद्र-प्रांत किंवा प्रांत-प्रांत यातील वाद मिटविणे इ. कामे सोपविली. या न्यायालयाच्या विरुध्द इंग्लंडच्या प्रिव्ही कौन्सिलकडे अपिल करता येईल.

**६. ब्रिटिश संसदेचे सार्वभौमत्व :-**

हा सुधारणा कायदा ताठर किंवा परिदृढ असा होता. या कायद्यात दुरुस्ती करण्याचा अधिकार भारतातील कायदे मंडळाला नव्हता, त्यात बदल करण्याचा अधिकार फक्त ब्रिटिश संसदेला देण्यात आला होता.

याशिवाय या कायद्याने भारत सरकारचे अधिकार कमी केले. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, केंद्रिय लोकसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली.

### ❒ परीक्षण :-

१) या कायद्याने राज्यघटना बनविण्याचा अगर दुरुस्त करण्याचा अधिकार भारतीयांना न देता तो ब्रिटिश पार्लमेंटला दिलेला होता.

२) संघराज्यातील सामिलीकरण ऐच्छिक होते, त्यामुळे संघराज्यातून फुटून बाहेर पडता येत होते.

३) कायदेमंडळातील सदस्य प्रादेशिक तत्त्वावर निवडले न जाता 'जातीय निवाड्या'प्रमाणे निवडले जाणार होते, त्यामुळे राष्ट्रीय ऐक्यास धोका निर्माण झाला.

४) या कायद्याने अधिकारांची विभागणी केलेली असली तरी महत्त्वाचे विषय व विशेषाधिकार गव्हर्नर जनरलला देऊन एक प्रकारे नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केलेला होता.

वरील कारणांमुळे भारतीय जनतेला या सुधारणाही मान्य झाल्या नाहीत. परंतु यातील काही शिफारशी भारतासाठी उपयोगी ठरल्या, त्यामुळे भारतीय राज्यघटनेच्या विकासात या कायद्याचे अनन्य साधारण असे महत्त्व आहे. पुढे १९५० च्या राज्यघटनेत या कायद्यातील २/३ इतका भाग स्वीकारलेला आहे, म्हणून या कायद्याला राज्यघटनेची 'छोटी प्रत' म्हणूनही ओळखले जाते.

## (ड) क्रिप्स योजना, १९४२

भारतीयांच्या सहकार्याशिवाय भारतीय साम्राज्याचे संरक्षण करता येणार नाही. तेव्हा भारतीयांसाठी काही सुधारणा करून त्यांचा पाठिंबा मिळविण्याच्या उद्देशाने १९४२ मध्ये सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांना भारतात पाठविले गेले. त्यांनी भारतीयांसाठी शिफारशी केल्या त्या पुढीलप्रमाणे :-

१) भारताला वसाहतीचा दर्जा दिला जाईल.

२) दुसरे महायुध्द संपल्यानंतर घटनेच्या निर्मितीसाठी, घटनासमितीची स्थापना करण्यात येईल.

३) घटना समितीत संस्थानिकांचे प्रतिनिधीही असतील.

४) ज्या प्रांतांना किंवा संस्थानांना ही राज्यघटना मंजूर नसेल त्यांना वेगळी राज्यघटना निर्माण करण्याचा अधिकार असेल.

५) जोपर्यंत युध्द सुरू आहे, तोपर्यंत भारताच्या संरक्षणाची जबाबदारी इंग्लंडवरच राहील.

इ. शिफारशी क्रिप्स योजनेने केल्या. क्रिप्स योजनेतही भारताला संपूर्ण स्वातंत्र्य देण्याचा निर्णय नव्हता. प्रांतांना व संस्थानांना स्वतंत्र राहण्याचा अधिकार देण्यात आलेला होता. त्यामुळे काँग्रेसला ही योजना मान्य नव्हती. भारतातील अल्पसंख्यांकांच मुख्यत: मुस्लिमांबाबत कोणतीही गोष्ट स्पष्ट केलेली नव्हती. उदा. पाकिस्तानच्या मागणीचा उल्लेख या योजनेत नसल्याने मुस्लिम लीगलाही ही योजना मान्य नव्हती, त्यामुळे क्रिप्स योजनाही असफल ठरली.

**(इ) कॅबिनेट मिशन किंवा त्रिमंत्री योजना**

'छोडो भारत' चळवळ, राष्ट्रसभेची प्रभावी धोरणे, आझाद हिंद सेनेचे कार्य, अपयशी वेव्हेल योजना, काँग्रेस व मुस्लिम लीग मधील अयशस्वी ठरलेली सिमला परिषद इ.च्या पार्श्वभूमीवर १९४६ मध्ये अॅटलींनी भारताला शक्य तितक्या लवकर पूर्ण स्वातंत्र्य देणे आवश्यक आहे असे सांगितले. त्यांनी आपल्या मंत्रिमंडळातील सर पॅथिक लॉरेन्स, सर स्टॅफोर्ड क्रिप्स व मि. अलेक्झांडर यांना भारतात पाठविले. या त्रिमंत्र्यांनी १६ मे, १९४६ रोजी एक योजना जाहीर केली, ती पुढीलप्रमाणे :-

१) भारताला संपूर्ण स्वातंत्र्य देण्याचा ब्रिटिश सरकारचा विचार असून सत्तांतर सुलभ व्हावे यासाठी शिष्टमंडळाची योजना झालेली आहे.

२) भारताच्या फाळणी समस्येवर काँग्रेस व मुस्लिम लीगचे एकमत न झाल्याने पुढील योजना सादर करीत आहोत.

(अ) ब्रिटिश भारत व संस्थाने यांचे भारतात एक राज्य बनावे. राज्याकडे परराष्ट्र संबंध, संरक्षण, दळणवळण या खात्यांचा कारभार असावा.

(ब) या राज्यात ब्रिटिश भारत व संस्थाने यांच्या प्रतिनिधींचे कार्यकारी मंडळ व कायदे मंडळ असावे.

(क) केंद्राकडचे विषय सोडून इतर सर्व विषय आणि शेषाधिकार प्रांतांना मिळावेत.

(ड) प्रांतांचे तीन गट करावेत. पहिला गट मद्रास,मुंबई, बिहार, मध्य प्रांत, दुसरा गट पंजाब, सरहद्द प्रांत, सिंध यांचा तर तिसरा गट बंगाल व आसाम यांचा असेल. या तीन गटातून घटना समितीवर प्रांतातून २७६ प्रतिनिधी व संस्थानांचे ९३ प्रतिनिधी असतील.

(इ) संस्थानांवरील ब्रिटिश सत्ता नष्ट केली जाईल.

## ❒ परीक्षण :-

१) या योजनेने भारताच्या स्वातंत्र्याची व घटना समितीच्या निर्मितीची भारतीयांची मागणी मान्य केली होती.

२) मुस्लिम लीगच्या पाकिस्तानच्या मागणीस विरोध केला. राजकीय व भौगोलिकदृष्ट्या वेगळे राष्ट्र निर्माण करणे मुस्लिमांच्या हिताचे नाही असे सांगितले.

३) या योजनेने घटना समितीत लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देण्यात आले.

४) या योजनेद्वारे केंद्राचे अधिकार कमी करून प्रांतांना स्वायत्तता मिळणार होती.

वरील योजना काँग्रेस व मुस्लिम लीगने काहीशा अनिच्छेने मान्यता दिली.

वरील सर्व कायद्यांचा भारतीय राज्यघटनेच्या विकासात मोलाचा वाटा आहे.

**स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१**

## ❑ रिकाम्या जागा भरा.

१. ............... या सुधारणा कायद्याने जमातीय मतदानाला प्रारंभ झाला.

२. माँटेग्यु चेम्सफोर्ड सुधारणा कायदा ............... साली करण्यात आला.

३. ............... योजनेद्वारे घटना समिती निर्माण करण्यात आली.

## (फ) घटना समिती

कॅबिनेट मिशन योजनेद्वारे भारतासाठी नवीन राज्यघटना निर्मितीसाठी घटना समितीची व्यवस्था करण्यात आली. घटना समितीत २९६ प्रांतांचे व ९३ संस्थानांचे असे एकूण ३८९ प्रतिनिधी निश्चित करण्यात आले. सर्वसाधारणपणे १० लाख लोकसंख्येला १ प्रतिनिधी असे प्रमाण असावे असे ठरले. घटना समितीच्या प्रांतातील सदस्यांची निवड प्रांतीय विधीमंडळाच्या कनिष्ठ गृहाकडून प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या पध्दतीद्वारे करण्यात येईल. प्रत्येक प्रांताच्या वाट्याला त्या प्रांताच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधी येतील. प्रतिनिधी संख्या प्रांतात वास्तव्य करणाऱ्या

प्रमुख जातींमध्ये त्या जातींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात केली जावी व त्या-त्या जातीच्या सदस्यांनी आपापल्या प्रतिनिधींची निवड करावी असे ठरले. संस्थानांचे प्रतिनिधी लोकसंख्येच्या प्रमाणात ठरवले जावेत. पण त्यांची निवड विशेष सल्लागार समितीच्या सहाय्याने संस्थानिक करतील असे ठरले.

घटना समितीच्या ३८९ प्रतिनिधींसाठी निवडणूका घेण्याचे ठरले. प्रांतातल्या २९६ प्रतिनिधींसाठी (२९२ ब्रिटिश भारतातील व ४ चीफ कमिशनरच्या प्रांतातील प्रतिनिधी) निवडणूका घेतल्या गेल्या. या निवडणूकीत काँग्रेसला २१२, मुस्लिम लीगला ७३ तर इतर पक्षांना ११ जागा मिळाल्या. संस्थानातील ९३ प्रतिनिधींसाठी निवडणूका झाल्या नाहीत. घटना समितीच्या या निवडणूकीत राष्ट्रीय काँग्रेसचेच वर्चस्व राहिल्याने मुस्लिम लीग नाराज झाली. मुस्लिम लीगने घटना समितीच्या कार्यात भाग घेण्यास नकार दिला. त्यावर ९ डिसेंबर १९४६ रोजी डॉ. सच्चिदानंद सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली घटना समितीची पहिली बैठक बोलाविली. या बैठकीला २०७ सदस्य उपस्थित होते. मुस्लिम लीगने या बैठकीवर बहिष्कार टाकला. घटना समितीने पहिल्या बैठकीत घटना समितीचे कायमस्वरूपी अध्यक्ष म्हणून डॉ. राजेंद्र प्रसाद यांची निवड करून कामकाजाचे नियम निश्चित केले. विविध विषयासाठी वेगवेगळ्या समित्या स्थापन केल्या. जगातील विविध राज्यघटनांचा अभ्यास करून भारतीय परिस्थिती विचारात घेऊन जे योग्य आहे, जे उत्तम आहे, ते ते घेण्याचा प्रयत्न केला. उदा. आयर्लंड-राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे, इंग्लंड-संसदीय शासन पध्दती, अमेरिका-लिखित राज्यघटना, मूलभूत अधिकार, न्यायालयीन पुनर्विलोकन इ. ऑस्ट्रेलिया-सामाईक सूची, कॅनडा-प्रबळ केंद्र सरकार. १९३५ च्या सुधारणा कायद्याचा २/३ इतका भागही या राज्यघटनेत स्वीकारला आहे.

१९४७ च्या 'भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्यानुसार' भारताची फाळणी झाली. फाळणीनंतर घटना समितीवर राष्ट्रीय काँग्रेसचे वर्चस्व निर्माण झाले. तत्पूर्वी २६ जुलै, १९४७ रोजी बॅ. जिना यांच्या नेतृत्वाखाली मुस्लिम लीगने पाकिस्तानसाठी वेगळी घटना समिती स्थापन केली. भारतीय घटना समितीत राष्ट्रीय काँग्रेस, मुस्लिम लीग, हिंदू महासभा इ.पक्षाचे नेते होते. त्याचप्रमाणे हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, शिख, अँग्लोइंडियन, पारशी, आदिवासी गटांचे नेतेही होते. घटना समितीत पं. जवाहरलाल नेहरू, के. एम. मुन्शी, पं. हृदयनाथ कुंझरु, एन.जी.अय्यंगार, बॅ. जयकर, डॉ. शामप्रसाद मुखर्जी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डी.पी.खैतान, अल्लादी कृष्णस्वामी अय्यर, टी.टी.कृष्णमाचारी, सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद, डॉ. राधाकृष्णणन, अब्दुल गफार खान, मौलाना आझाद, आचार्य कृपलानी, पट्टाभी सितारमय्या, बाबू जगजीवन राम, मिनू मसानी, सरदार बलदेव सिंग, राजबहादूर, विजयालक्ष्मी पंडित, सरोजिनी नायडू, दुर्गाबाई देशमुख, बेगम रसूल, राजकुमारी अमृता कौर इ. नामवंत व्यक्ती घटना समितीवर घेण्यात आल्या होत्या.

## ❐ घटना समितीचे कामकाज :–

९ डिसेंबर, १९४६ रोजी सुरू झालेले घटनासमितीचे कामकाज २६ नोव्हेंबर, १९४९ पर्यंत चालले. घटनासमितीच्या या कामकाजाला २ वर्षे ११ महिने १८ दिवस इतका कालावधी लागला. या कालावधीत घटना समितीच्या ११ बैठकांना १६५ दिवस लागले. घटनेच्या मसुद्यावर ११४ दिवस चर्चा करणयात येऊन कामकाजासाठी ६३,९६,७२९ रु.खर्च आला. १९४७ च्या भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्यानुसार घटना समितीला अधिकृत समिती म्हणून स्वतंत्र दर्जा प्राप्त झाला. घटनासमितीच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची नियुक्ती करणेत आली. घटना समितीमधील निर्णय हे सर्व संमतीनेच घेतले जात होते. मसुदा समितीने २१ फेब्रुवारी १९४८ रोजी घटनेचा मसुदा घटना समितीकडे पाठविला. घटनेच्या मसुद्यावर जनतेकडून ७६३५ सूचना आल्या. त्यापैकी २४७३ सूचनांवर घटना समितीने चर्चा केली. १४ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबर १९४९ या काळात मसुद्याचे तिसरे वाचन होऊन डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या सहीने घटनेला मंजूरी देण्यात आली. घटना समितीने मंजूर केलेल्या घटनेत ३९५ कलमे व ९ परिशिष्टे आहेत. या राज्यघटनेची अंमलबजावणी २६ जानेवारी, १९५० पासून करण्यात आली.

**स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२**

o **रिकाम्या जागा भरा.**

१. कॅबिनेट मिशनने घटनासमितीवर ............ सदस्य निश्चित केले.

२. घटना समितीचे कामकाज ............ रोजी सुरू झाले.

३. घटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष ............ हे होते.

## (ग) भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये

### १. लिखित राज्यघटना :–

भारतीय राज्यघटना ही लिखित स्वरूपात आहे. राज्यघटनेचा सर्व भाग हा लिखित स्वरूपाचा आहे. राज्यघटनेतील मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्त्वे, संसदीय शासन पध्दती, कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ, न्याय मंडळ इ.बाबी लिखित स्वरूपात स्पष्ट केलेल्या आहेत.

### २. जगातील सर्वात मोठी राज्यघटना :–

भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी लिखित राज्य घटना म्हणून ओळखली जाते. घटनेतील सर्व कलमे व परिशिष्टे ही लिखित स्वरूपात स्पष्ट केल्याने ती विस्तृत झालेली आहे.

### ३. अंशत: ताठर व अंशत: परिवर्तनीय राज्यघटना :-

भारतीय राज्यघटना अंशत: ताठर किंवा परिदृढ आहे व अंशत: परिवर्तनीय आहे असे म्हटले जाते. कारण भारतात काही घटना दुरुस्त्या या साध्या बहुमताने होतात. घटना दुरुस्तीची ही पध्दत सोपी असल्याने राज्यघटना परिवर्तनीय आहे असे म्हटले जाते, तर काही घटनादुरुस्त्या संसदेच्या विशेष बहुमताने आणि संसदेचे विशेष बहुमत व निम्म्यापेक्षा अधिक घटक राज्यांच्या मान्यतेने केल्या जातात. घटना दुरुस्तीची ही पध्दत अवघड असल्याने राज्यघटना अंशत: ताठर आहे असे म्हटले जाते.

### ४. जनतेचे सार्वभौमत्त्व :-

भारतीय राज्यघटनेने जनतेचे सार्वभौमत्व मान्य केलेले आहे. भारतात जनतेच्या हातात सर्व अधिकार असतील. भारतात जनताच सर्वोच्च असेल असे राज्यघटनेने स्पष्ट केलेले आहे.

### ५. एकच राज्यघटना :-

भारतीय घटनाकारांनी मात्र संपूर्ण देशासाठी एकच राज्यघटना निर्माण केलेली आहे. भारतीय संघराज्यातून फुटून बाहेर पडण्याचा अधिकार कोणत्याही घटकराज्याला दिलेला नाही. भारतात कोणत्याही घटक राज्याची वेगळी राज्यघटना नाही (अपवाद जम्मू काश्मीर, कलम ३७०).

### ६. न्यायमंडळाचे स्वातंत्र्य :-

भारतीय घटनेने न्यायालयीन स्वातंत्र्य सुरक्षित ठेवलेले आहे. न्यायाधिकारांच्या नेमणूका, वेतन, भत्ते, कार्यकाल इ.बाबत घटनेत तरतूद केलेली आहे. भारतात एकेरी स्वरूपाची न्यायदान पध्दती आहे. न्यायमंडळाच्या सर्वोच्चपदी सर्वोच्च न्यायालय, त्याच्या खालोखाल उच्च न्यायालये व त्याच्या खाली कनिष्ठ न्यायालये अशी एकेरी व्यवस्था आहे. सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकारही दिलेला आहे.

### ७. अल्पसंख्यांकांना संरक्षण :-

भारतात समता आणण्याच्यादृष्टीने घटनाकारांनी अल्पसंख्यांकांना घटनेद्वारे काही तरतुदी केलेलया आहेत. घटनेने अल्पसंख्यांकांना राखीव जागा, शैक्षणिक सवलती दिलेल्या आहेत. आर्थिक, सामाजिक व राजकीय विकासासाठीही तरतुदी केलेल्या आहेत.

### ८. प्रौढ मताधिकार :-

घटनेने प्रत्येक स्त्री-पुरुष नागरिकाला मतदानाचा अधिकार दिलेला आहे. स्वातंत्र्यानंतर २१ वर्षे पूर्ण असणाऱ्या प्रत्येक प्रौढ व्यक्तीला मतदानाचा अधिकार दिलेला होता. पुढे १९८९ मध्ये ६१

वी घटनादुरुस्ती होऊन मतदाराचे वय २१ वरून १८ वर्षे करण्यात आलेले आहे. देशातील जास्तीत जास्त लोकांना राज्यकारभारात सहभागी करून घेण्याच्या उद्देशाने हा अधिकार देण्यात आलेला आहे.

## ९. संसदीय शासनपध्दती :-

भारतीय घटनेने संसदीय शासन पध्दतीचा पुरस्कार केलेला आहे. इंग्लंडच्या राज्यघटनेवरून भारताने संसदीय शासनपध्दती स्वीकारलेली आहे. परंतु इंग्लंडच्या संसदीय शासनपध्दतीचा तंतोतंत स्वीकार केलेला नाही. राष्ट्रपती, राष्ट्रपतीचे आणिबाणीविषयक अधिकार इत्यादीबाबत भारतीय संसदीय पध्दतीचे वेगळेपण जाणवते.

## १०. इतर देशांच्या राज्यघटनांचा प्रभाव :-

भारतीय राज्यघटनेवर इतर देशांच्या राज्यघटनांचा प्रभाव पडलेला आहे. इतर देशांच्या राज्यघटनेत जे जे चांगले आहे, ते ते भारतीय राज्यघटनेत स्वीकारण्याचा प्रयत्न केलेला आहे. अमेरिकेच्या राज्यघटनेवरून मूलभूत अधिकार, राज्यघटनेची उद्देशपत्रिका, सर्वोच्च न्यायालय, न्यायालयीन पुनर्विलोकन, इंग्लंडच्या राज्यघटनेवरून पार्लमेंट, पंतप्रधान, मंत्रिमंडळाची सामूहिक जबाबदारी, आयर्लंडच्या राज्यघटनेवरून मार्गदर्शक तत्त्वे, ऑस्ट्रेलियाच्या राज्यघटनेवरून सामाईक सूची इत्यादी गोष्टी स्वीकारलेल्या आहेत. परंतु या गोष्टी स्वीकारताना देशाची आर्थिक, राजकीय, सामाजिक परिस्थितीचा विचार केलेला आहे.

## ११. मूलभूत अधिकारांचा समावेश :-

भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या विभागात कलम १२ ते ३५ मध्ये मूलभूत अधिकार स्पष्ट केलेले आहेत. भारतीय घटनेने समतेचा, स्वातंत्र्याचा, पिळवणूकीविरुध्दचा, धार्मिक स्वातंत्र्याचा, शैक्षणिक व सांस्कृतिक मालमत्तेचा आणि घटनात्मक उपाययोजनेचा असे ७ अधिकार दिलेले होते. १९७८ मध्ये ४४ व्या घटनादुरुस्तीने मालमत्तेचा अधिकार मूलभूत अधिकारातून वगळण्यात आलेला आहे, त्यामुळे सध्या घटनेत सहा मूलभूत अधिकार आहेत.

## १२. राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे :-

भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागात कलम ३६ ते ५१ मध्ये राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे स्पष्ट केलेली आहेत. भारतीय राज्यघटनेत आर्थिक, सामाजिक, राजकीय, न्यायालयीन आणि आंतरराष्ट्रीय संबंधविषयक तत्त्वांचा समावेश केलेला आहे. भारताच्या सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शक तत्त्वे उपयुक्त आहेत.

### १३. धर्मातीत राज्य :–

भारतीय राज्यघटनेने धर्मनिरपेक्ष राज्याचा पुरस्कार केलेला आहे. घटनेने कोणत्याही धर्माचा पुरस्कार केलेला नाही. १९७६ मध्ये ४२ वी घटनादुरुस्ती होऊन भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात 'धर्मनिरपेक्ष' हा शब्द घालण्यात आला. सर्व धर्मांना समान मानलेले आहे.

### १४. स्वातंत्र्य, समता व बंधूता :–

भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत स्वातंत्र्य, समता व बंधूता या तत्त्वांचा पुरस्कार केलेला आहे. आर्थिक, राजकीय, सामाजिक समता प्रस्थापित करणे, व्यक्तीस्वातंत्र्य देऊन व्यक्तीच्या सर्वांगीण विकास करणे आणि व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राचे ऐक्य राखणारी बंधूत्वाची भावना नागरिकांत निर्माण करण्याच्या उद्देशाने ही तत्त्वे स्विकारलेली आहेत.

**स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न–३**

❑ **रिकाम्या जागा भरा.**

१. मतदाराचे वय २१ वर्षांवरून १८ वर्षे इतके ................ घटना दुरुस्तीने करण्यात आले.

२. राज्याच्या धोरणाशी मार्गदर्शक तत्त्वे .............. देशाच्या राज्यघटनेवरून स्वीकारलेली आहेत.

३. भारतीय राज्यघटनेने ................ चा पुरस्कार केलेला आहे.

## १.२.२ विचारसरणींचा प्रभाव : उदारमतवाद, समाजवाद, गांधीवाद आणि इतर

भारतीय राज्यघटनेवर वेगवेगळ्या विचारसरणींचा प्रभाव असलेला दिसतो. कारण भारतीय घटना समितीचे जे सदस्य होते ते अनेक विचारसरणींचा पुरस्कार करणारे होते, त्यामुळे त्यांच्या विचारसरणीचे प्रतिबिंब राज्यघटनेवर पडलेले दिसते. भारतीय घटनाकारांनी राज्यघटनेत अनेक आदर्श तत्त्वांचा, विचारसरणींचा समावेश तर केलाच, त्याचबरोबर ती तत्त्वे, विचारसरणीची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी संस्था आणि त्यांच्या कार्यपध्दतीचाही समावेश केला. पुढील काही विचारसरणींचा प्रभाव भारतीय संविधानावर पडलेला दिसतो.

❑ **उदारमतवादाचा प्रभाव :–**

भारतावर जवळजवळ १५० वर्षे ब्रिटिशांनी राज्य केले. त्यामुळे ब्रिटिशांच्या उदारमतवादी धोरणाचा खूप मोठा प्रभाव भारतीय संविधानावर पडलेला दिसतो. त्यांच्या या राजवटीचे जे बरेवाईट परिणाम झाले, त्यांचा भारतीय संविधानाचा एक मूलस्रोत म्हणून विचार करता येईल. ब्रिटिश

कालखंडात भारतीयांना त्यांचे उच्च शिक्षण आणि प्रवास यामधून उदारमतवादी लोकशाहीची भुरळ पडली. जरी त्यांनी पारतंत्र्यातल्या भारतात त्या व्यवस्थेचा पूर्ण अनुभव घेतला नव्हता तरी त्यांच्या मनात त्याविषयी एक प्रकारची बांधिलकी निर्माण झाली होती. त्याचा प्रभाव भारतीय संविधानावर झाला. नव्या शासनप्रणाली, नवी राजकीय मूल्ये आणि राजकीय प्रक्रिया यांची भारतीयांना ओळख झाली.

प्रबोधनकाळानंतर जगात राजकीय, आर्थिक व सामाजिक जीवनात जे नवनवीन विचारप्रवाह येवू लागले, त्यामधील एक म्हणजे उदारमतवाद होय. उदारमतवादात व्यक्ती महत्त्वाची असते. उदारमतवाद व्यक्तीगत हक्क व स्वातंत्र्याचा पुरस्कार करतो. उदारमतवाद्यांच्यामते, व्यक्तीस्वातंत्र्य हेच सर्वोच्च मूल्य मानले पाहिजे व व्यक्तिमत्त्वाचा परिपूर्ण विकास साधणे हे अंतिम ध्येय असले पाहिजे. ढोबळ अर्थाने व्यक्तीस्वातंत्र्य, न्यायालयीन संरक्षण, घटनात्मक राज्य म्हणजे उदारमतवाद म्हणता येईल तर मर्यादित शासन, कायद्याचे राज्य, खाजगी मालमत्ता, निकोप स्पर्धा इ. उदारमतवादाची वैशिष्ट्ये सांगता येतील. उदारमतवाद व्यक्तीच्या/मानवी जीवनाच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रांना प्रभावित करते. भारतात आधुनिक उदारमतवादीची मुळे १९व्या शतकाच्या मध्यापासून सामाजिक सुधारणेच्या चळवळी दरम्यान रुजली गेली. १९व्या शतकात ब्रिटिश व युरोपीय उदारमतवादी तत्त्वज्ञांचा प्रभाव भारतातील बुध्दिवंतांवर पडला. त्यामुळे भारतीय बुद्धिवंतांनी उदारमतवादाचा प्रसार करण्यास सुरुवात केली. राजा राममोहन रॉय, दादाभाई नौरोजी, सर सय्यद अहमद खान इ.वर उदारमतवादी विचारसरणीचा प्रभाव होता. राजा राममोहन रॉय यांनी सती प्रथा, बालविवाह पध्दतीला विरोध केला तर दादाभाई नौरोजी यांनी स्व-शासनाला पाठिंबा देवून उदारमतवादी समाजाची मागणी केली. याबरोबरच गोपाळकृष्ण गोखले यांच्यावर उदारमतवादाचा प्रभाव होता. त्यांचा मुक्त समाज, शिक्षण व राज्याची मर्यादित भूमिका यावर विश्वास होता. राष्ट्रीय सभेनेही यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.

भारतात जातीव्यवस्था, अस्पृश्यता, महिलांना कनिष्ठ दर्जा इ.साठी कायदेशीर मार्ग म्हणजे उदारमतवादी राज्यघटनाच राजकीय एकता आणू शकते असे उदारमतवादी विचारवंतांना वाटत होते. त्याचाच प्रभाव भारतीय संविधानावर पडलेला दिसतो. भारतीय संविधानाने व्यक्तिगत स्वातंत्र्य, समान हक्क, स्वतंत्र न्यायसंस्था या गोष्टींनी नव्या समाजाचा संस्थात्मक पाया घातला. भारतीय संविधानाने केवळ अल्पसंख्यांकांच्या हक्कांचे संरक्षणच केले नाही, तर त्यांच्या हक्कांमध्ये वाढ व्हावी, समाजातल्या मागासलेल्या आणि नाकारण्यात आलेल्या गटांना त्यांची स्थिती सुधारण्याची संधी देणे, दबावाखाली असलेल्या अनुसूचित जाती व भटक्या जमातींवरचा दबाव दूर करण्याची संधी दिलेली आहे. भारतीय राज्यघटनेने व्यक्तीला मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य, धर्म स्वातंत्र्य, नागरी हक्क,

धर्मनिरपेक्ष शासन, स्त्री-पुरुष समानता इत्यादीला पाठिंबा दिलेला आहे. भारतीय राज्यघटनेत पुढील उदारमतवादी तत्त्वांचा समावेश करण्यात आलेला आहे.

भारतीय संविधानाने मूलभूत अधिकार देवून उदारमतवादी तत्त्व स्वीकारले आहे. संविधानाच्या तिसऱ्या विभागात कलम १२ ते ३५ मध्ये सात मूलभूत अधिकार स्वीकारले होते. सध्या मालमत्तेचा अधिकार वगळल्याने सहा अधिकार अस्तीत्वात आहेत.

**१. समतेचा अधिकार :-**

कलम १४ - कायद्यापुढे समानता.

कलम १५ - धर्म, वंश, जात, लिंग या कारणांवरून भेदभाव करण्यास मनाई.

कलम १६ - सार्वजनिक सेवायोजनाच्या बाबींमध्ये समान संधी.

कलम १७ - अस्पृश्यता नष्ट करणे.

कलम १८ - किताब नष्ट करणे.

**२. स्वातंत्र्याचा हक्क :-**

कलम १९ - भाषणस्वातंत्र्य इ.संबंधीच्या विवक्षित हक्कांचे संरक्षण.

कलम २० - अपराधांबद्दलच्या दोष सिध्दीबाबत संरक्षण.

कलम २१ - जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्य यांचे संरक्षण.

कलम २१ क- शिक्षणाचा हक्क.

कलम २२ - विवक्षित प्रकरणी अटक व स्थानबध्दता यापासून संरक्षण.

**३. शोषणाविरुध्दचा हक्क :-**

कलम २३ - माणसांचा अपव्यापार व वेठबिगारी यांना मनाई.

कलम २४ - कारखाने इत्यादीत बालकांना कामाला ठेवण्यास मनाई.

**४. धार्मिक स्वातंत्र्य :-**

कलम २५ - धर्माच्या आचरण व प्रचाराचे स्वातंत्र्य.

कलम २६ - धार्मिक संस्थांच्या व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचे स्वातंत्र्य.

कलम २७ - विशिष्ट धर्माच्या संवर्धनाकरिता कर देण्याबाबत स्वातंत्र्य.

कलम २८ – विवक्षित शैक्षणिक संस्थात धार्मिक शिक्षणाबाबत स्वातंत्र्य.

**५. शैक्षणिक व सांस्कृतिक हक्क :–**

कलम २९ – अल्पसंख्यांक वर्गांच्या हितसंबंधाचे संरक्षण.

कलम ३० – अल्पसंख्यांक वर्गांचा शैक्षणिक संस्था स्थापण्याचा हक्क.

**६. घटनात्मक उपाययोजनेचा हक्क :–**

कलम ३२ – या भागाने प्रदान केलेले हक्क बजावण्याकरिता उपाय.

वरील उदारमतवादी मूलभूत अधिकाराबरोबरच,

कलम ४४ – नागरिकांकरिता एकरूप नागरी संहिता.

कलम ४५ – बालकांकरिता मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद.

कलम ४९ – राष्ट्रीय महत्त्वाची स्मारके व स्थाने आणि वस्तू यांचे संरक्षण.

कलम ५० – न्याय यंत्रणा कार्यकारी यंत्रणेपासून अलग ठेवणे.

कलम ५१ – आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांचे संवर्धन.

अशाप्रकारच्या उदारमतवादी तत्त्वांचा प्रभाव भारतीय संविधानावर पडलेला आहे.

**❒ समाजवादाचा प्रभाव :–**

उदारमतवादाप्रमाणेच भारतीय संविधानावर समाजवादाचाही प्रभाव पडलेला आहे. उदारमतवादात जसा एका व्यक्तीचा विचार केला जातो, त्याप्रमाणे समाजवादात समष्ठीचा म्हणजे संपूर्ण समाजाचा विचार केला जातो. भारतातील बेरोजगारी, गरीबी दूर करण्याचा योग्य मार्ग म्हणजे समाजवाद होय, असे घटनासमितीतील सदस्यांना वाटत होते. समाजवाद हा व्यक्तिवादाला विरोध करतो, त्याचबरोबर तो खाजगी मालमत्ता रद्द करतो. समाजवादात सामुदायिक मालकी आणि उत्पादनाच्या साधनावर, वाटपावर राज्याचे नियंत्रण असते. समाजवादाचा समता आणि सामाजिक न्याय हा पाया आहे.

पं. नेहरूंवर समाजवादाचा प्रभाव होता. त्यामुळे भारतीय संविधानावरही त्याचा परिणाम झाला. भारतीय संविधानाने 'समाजवाद' ही संकल्पना परिभाषित (defined) केलेली नाही. परंतु १९७६ च्या ४२व्या घटनादुरुस्तीने भारतीय संविधानाच्या सरनाम्यात/उद्देशपत्रिकेत (Preamble) समावेश करण्यात आला. भारतीय संविधानाच्या सरनाम्यात समाजवादाच्या उद्दिष्ठांना आदराचे सर्वोच्च स्थान देण्यात आले आहे. समाज घडविण्यासाठी समाजवाद हे नित्य वापरातले राजकारणी तत्त्व आहे तर लोकशाही

व्यवस्था ही आर्थिक समानता आणण्यासाठीचे माध्यम आहे. असा घटनाकारांचा ठाम विश्वास होता. अनेक सदस्यांची समाजवादाशी असलेली बौध्दिक आणि भावनिक बांधिलकी त्यांचा संसदीय पध्दतीवरचा विश्वास दृढ करायला कारणीभूत ठरली. सामाजिक क्रांती घडवून राष्ट्राचे उत्थापन होईल अशी घटना लिहिणे हे घटनासमितीचे काम होते. घटनासमितीने निवडलेला मार्ग हा औद्योगिक अर्थव्यवस्थेवर उभा असलेला परंतु आर्थिक समतेसाठी समाजवादाचा पुरस्कार करणारा मार्ग होता.

भारतात न्यायाची समता, कायद्यापुढे समानता, संधीची समानता, विकासाची समानता हा समाजवादाचा पाया आहे. तर प्रत्येक व्यक्तिला किमान पैसा मिळविण्याची संधी उपलब्ध करून देणे हे समाजवादाचे ध्येय आहे. याअंतर्गत राज्य उत्पादनाच्या साधनांचे समान वाटप करून बेरोजगारी, असुरक्षितता, आर्थिक असमानता दूर करेल. समाजवाद 'कुवतीप्रमाणे काम व गरजेप्रमाणे दाम' (From each according to his abilities to each according to his needs) देवून सामाजिक न्याय प्रस्थापित करतो. भारताच्या संदर्भात समाजवादी तत्त्वांचा समावेश संविधानाच्या मूलभूत अधिकारातील समतेच्या अधिकारात व राज्याच्या धोरणांच्या मार्गदर्शक तत्त्वात करण्यात आलेला आहे तो पुढीलप्रमाणे :-

भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत भारतातील प्रत्येक व्यक्तीला दर्जाची व संधीची समानता दिली जाईल असे सांगितले आहे तर समतेच्या अधिकारात कलम १४-कायद्यापुढे समानता, कलम १५-धर्म, वंश, जात यामध्ये भेदभाव करण्यास मनाई आणि कलम १६ सार्वजनिक सेवायोजनांच्या बाबींमध्ये समान संधी दिली जाईल असे सांगितले आहे. कलम ३१-मालमत्तेचा अधिकार, कलम ३१ क संपदांचे संपादन, कलम ३१ ख विवक्षित अधिनियम व विनियम विधिग्राह्य करणे, कलम ३१ ग-विवक्षित निदेशक तत्त्वे अंमलात आणणाऱ्या कायद्यांची व्यावृत्ती असा मूलभूत अधिकार दिलेला होता. परंतु समाजवादाच्या पुरस्कारासाठी १९७८ मध्ये ४४ वी घटनादुरुस्ती करून मालमत्तेचा अधिकार मूलभूत अधिकारातून वगळण्यात आलेला आहे, त्याचा समावेश प्रकरण ४ मध्ये कायद्याने प्राधिकार दिल्याशिवाय व्यक्तींना मालमत्तेपासून वंचित न करणे अशी तरतूद ३०० क या कलमात केलेली आहे. याबरोबरच भारतीय राज्यघटनेने मार्गदर्शक तत्त्वात पुढील समाजवादी तत्त्वांचा पुरस्कार केलेला आहे.

कलम ३८ - राज्याने लोककल्याणाच्या संवर्धनासाठी समाजव्यवस्था प्रस्थापित करणे.

कलम ३९ - राज्याने अनुसरावयाच्या धोरणाची विवक्षित तत्त्वे यामध्ये.

कलम ३९ क - स्त्री-पुरुष नागरिकांना उपजीविकेचे पुरेसे साधन मिळण्याचा समान अधिकार.

कलम ३९ ख - समाजाच्या हिताला उपकारक होईल असे भौतिक साधनसंपत्तीचे वाटप करणे.

कलम ३९ ग – संपत्ती आणि उत्पादनाच्या साधनांचे केंद्रीकरण होणार नाही हे पाहणे.

कलम ३९ घ – स्त्री-पुरुषांना समान कामासाठी समान वेतन देणे.

कलम ४१ – कामाचा, शिक्षणाचा आणि विवक्षित बाबतीत लोकसहाय्याचा हक्क.

कलम ४२ – कामाबाबत न्याय व मानवीय परिस्थिती आणि प्रसुतीविषयक सहाय्य यांची तरतूद.

कलम ४३ – कामगारांना निर्वाह वेतन इत्यादी.

कलम ४३ क – उद्योगधंद्यांच्या व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग.

कलम ४६ – अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर दुर्बल घटक यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध करणे.

कलम ४७ – पोषणमान व राहणीमान उंचावणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे हे राज्याचे कर्तव्य. इत्यादीद्वारे राज्याच्या धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वात गरीबी दूर करणे, उत्पादकता वाढविणे, अर्थव्यवस्थेत नवीन विचारांचा समावेश करणे, मक्तेदारीला विरोध करणे, वर्ग, जात, धर्म यामधील असमानता कमी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. राज्याच्या धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वात व्यक्त झालेली सामाजिक व आर्थिक न्याय ही संकल्पना महत्त्वाची आहे. राज्यघटनेत समाविष्ट झालेली जमीनदारी पध्दती नष्ट करण्याला उद्युक्त करणारी कलमे, मालमत्तेचे संदर्भ बदलणारी आणि आतापर्यंत मागे पडलेल्या, अन्याय सोसावा लागलेल्या घटकांना शिक्षणात आणि रोजगारात प्राधान्य देणारी कलमे सामाजिक परिवर्तनासाठी महत्त्वाची ठरली.

## ❒ गांधीवादाचा प्रभाव :–

भारतीय राज्यघटनेत गांधीवादी विचारांचाही समावेश करण्यात आलेला आहे. म. गांधीजींच्या सत्य, अहिंसा, सत्याग्रह इ. तत्त्वांचा प्रभाव राज्यघटनेवर पडलेला आहे. मं. गांधीजींनी खेडे हा समाजसंघटनेचा एक स्वयंपूर्ण घटक मानलेला होता. त्या खेड्याची पंचायत आणि त्यात चालविले जाणारे लघुउद्योग हे शासन आणि उपभोक्त्यांना जीवनावश्यक वस्तू आणि तेथील शेती अन्न पुरविल असे गांधीजींचे मत होते. म. गांधीजींनी त्यांचे हे विचार 'हिंदस्वराज्य' या पुस्तकात मांडले आहेत. मं. गांधीजींच्या सत्य, अहिंसा, व्यक्ती स्वातंत्र्य, विकेंद्रीकरण या तत्त्वांचा प्रभाव पडलेला आहे. प्रत्येक गाव प्रजासत्ताक आहे व त्याच्या गरजा गावातच भागल्या पाहिजे असे त्यांचे मत होते. या विचारातूनच पुढे पंचायतराज व्यवस्था स्वीकारली गेली. पंचायतराज व्यवस्था ही सामाजिक व राजकीय बदलासाठी गरजेची आहे. त्याचबरोबर म. गांधीजींच्या 'सर्वोदय' या संकल्पनेचा प्रभाव पडून आर्थिक व सामाजिक विकासात महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. 'सर्वोदय' म्हणजे सर्वांचा

विकास (झीसीर्शीाी ेष रश्रश्र) होय. भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांत गांधीवादी विचार, सत्तेचे विकेंद्रीकरण, दारूबंदी. ग्रामोद्योग, कुटीरोद्योग यातून प्रतिबिंबित झालेले आहेत ते पुढीलप्रमाणे :-

कलम ३९ क : स्त्री-पुरुषांना उपजीविकेचे पुरेसे साधन मिळण्याचा समान अधिकार असावा.

कलम ४० : ग्रामपंचायतीचे संघटन.

कलम ४३ : कामगारांना निर्वाह वेतन इत्यादी.

कलम ४५ : बालकांकरिता मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद.

कलम ४६ : अनुसूचित जाती, जमाती आणि इतर दुर्बल घटक यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन.

कलम ४७ : पोषणमान व राहणीमान उंचावणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे हे राज्याचे कर्तव्य.

कलम ४८ : कृषि व पशुसंवर्धन यांची सुसूत्र व्यवस्था आणणे.

कलम ४८ क : पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे आणि वने व अन्य जीवसृष्टी यांचे रक्षण करणे.

या कलमांवर गांधीवादी विचारांचा प्रभाव पडलेला आहे. सत्तेचे विकेंद्रीकरण करून १९५९ पासून पंचायतराज व्यवस्थेला सुरुवात झालेली आहे. ग्रामोद्योग, कुटिरोद्योगांना प्रोत्साहन दिले जात आहे. म. गांधीजींनी पर्यावरणाबाबतही विचार मांडले आहेत, त्याबाबत ते म्हणतात की, 'पर्यावरणाकडून आपल्याला आपल्या गरजा पूर्ण होण्याइतपत मिळते, परंतु आपली लालसा पूर्ण होण्याइतपत नाही' या विचारांचा प्रभाव राज्यघटनेवर पडलेला आहे.

## स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-४

❑ **गाळलेले शब्द भरून वाक्य पूर्ण करा.**

१. उदारमतवाद व्यक्तीगत हक्क व ............... चा पुरस्कार करतो.

२. समाजवादात ............... चा विचार केला जातो.

३. ............... यांच्या विचारांचा प्रभाव पंचायतराज व्यवस्थेवर पडलेला आहे.

### १.२.३ संविधान हे सामाजिक, आर्थिक बदलाचे साधन

**अ) सामाजिक साधन :-**

भारतातील लोकशाही व्यवस्थेने देशाच्या सामाजिक जीवनात परिवर्तन घडवून आणण्यात फार मोठे योगदान दिले आहे. याचे सर्वस्वी श्रेय हे भारतीय संविधानाला जाते. त्यामुळे भारतीय संविधान सामाजिक परिवर्तनाचे साधन बनले आहे. या विषयी कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. संविधानाने समाजातील उपेक्षित घटकांना म्हणजेच सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गांना विशेष तरतुद करुन त्यांना त्यांचे हक्क मिळवून दिले आहेत. त्या परिणामी या घटकातील लोकांना स्वत:ची जाणीव व जागृती झाली. त्यामुळे आपणास समाजात स्थान असले पाहिजे याची जाणीव या वर्गाला झाली. मागासवर्ग, अनुसूचित जाती व जमाती यांना विकासाच्या प्रवाहात सहभागी करुन घेण्यात संविधानाचा फार मोठा वाटा आहे.

लोकशिक्षणाच्या कार्यामुळे सामाजिक परिवर्तनाला चालना मिळून गती प्राप्त झाली. स्वातंत्र्यापूर्वी कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातीमध्ये स्वातंत्र्योत्तर काळात मोठ्या प्रमाणात जागृती झाली असून या जाती व जमाती भारतीय राजकारणात मुख्य प्रवाहात दिसत आहेत. त्यांच्या जाणीव व जागृतीत अनेक घटक कारणीभूत असले तरी संविधान हे प्रमुख कारण आहे. मतदान करणे, निवडणूकीस उमेदवार म्हणून उभे राहणे, 'एक व्यक्ती एक मत', 'एक मत एक मूल्य'. यामुळे भारतीय समाजाला राजकीय समतेची खऱ्या अर्थाने जाणीव झाली आणि सामाजिक क्षेत्रातही समतेच्या तत्त्वाला काही प्रमाणात मान्यता मिळाली अठरापगड जाती धर्म असताना व त्यांच्या विविध भाषा व संस्कृती असून सुद्धा लोकांच्या सामाजिक दृष्टीकोनात बदल घडवून आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य भारतीय संविधानाने केले.

भारतीय संविधानाने स्त्री-पुरुष समानतेच्या तत्त्वांचा अंगीकार करुन व्यक्तीव्यक्तीमध्ये वंश, धर्म, जात, लिंग असा भेदभाव करता येणार नाही असे स्पष्ट केले आहे. स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क प्राप्त झाल्यामुळे अनेक क्षेत्रात स्त्रीया पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून कार्य करीत असताना दिसत आहेत. स्वातंत्र्यापूर्वीची स्त्री, स्वातंत्र्यानंतरची स्त्री तुलनाकरता निश्चितच भारतीय स्त्रीयांना सामाजिक, राजकीय दर्जा उंचावलेला आपणास पहावयास मिळतो. याचे श्रेय भारतीय संविधानाला जाते.

**ब) आर्थिक साधन :-**

भारतीय संविधान सामाजिक बदलाचे साधन बनले आहे परंतु आर्थिक बदलाचे साधन बनण्यात म्हणावे तेवढे यश संविधानाला प्राप्त झालेले नाही. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी म्हणजे व्यक्तीच्या विकासासाठी राजकीय लोकशाही इतके आर्थिक घटकाला महत्त्व असते.

प्रो. हॅरॉल्ड लास्की यांनी आर्थिक घटकाच्या समर्थनार्थ असे म्हटले आहे की, आर्थिक लोकशाहीच्या अभावी राजकीय लोकशाही अर्थहीन ठरते. राज्यातील सर्व नागरिकांना त्यांच्या जीवनावश्यक गरजांच्या पुर्ततेसाठीची हमी देऊन तशाप्रकारची आर्थिक व्यवस्था निर्माण करणे म्हणजे खऱ्या अर्थाने आर्थिक लोकशाही म्हणता येईल. या वरुन असे म्हणता येईल की भारतात राजकीय व सामाजिक लोकशाही यशस्वी ठरली असली तरी आर्थिक घटकामध्ये समानता किंवा आर्थिक लोकशाही प्रस्थापित झाली नाही.

भारतीय संविधानाने भारतीय नागरिकांना आर्थिक न्यायाची हमी दिली आहे. गेल्या ६६ वर्षापासून विचार केला तर आर्थिक बाबतीत असे म्हणता येईल की दुर्बल घटकांच्या हितसंबंधांकडे सत्तेवरील प्रत्येक सरकारने दुर्लक्ष केले आहे. जरी गरीबी हटाओ ची घोषणा केली असली तरी या घोषणाची यशस्वीता न मोजलेलीच बरी. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सर्व राजकीय पक्षांनी आपल्या जाहिरनाम्यामधून 'गरिबी हटाओ' घोषणा केली असली तरी ही घोषणा काहीप्रमाणात यशस्वी झाली. देशातील दारिद्र्याचे निर्मुलन करणे, गरीब-श्रीमंत अंतर कमी करणे, सर्वांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे, आर्थिक शोषण बंद करणे, जीवनावश्यक गरजांची योग्य प्रकारे पुर्तता करणे इ. बाबींकडे दुर्लक्ष झाल्याचे वास्तव दिसत आहे.

**स्वयं-अध्ययन प्रश्न-५**

❒ **एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. मागास प्रवर्ग, अनुसूचित जाती व जमाती यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात कशामुळे सहभागी होता आले?

२. भारतीय समाजाला संविधानामुळे कशाची प्रखरतेने जाणीव झाली?

३. आर्थिक घटकाच्या समर्थनार्थ प्रो. हॅरॉल्ड लास्की यांचे काय मत आहे?

४. 'गरीबी हटाओ' ही योजना कोणी सुरु केली?

५. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी व व्यक्तीच्या विकासासाठी कोणत्या घटकाला अधिक महत्त्व असते?

## १.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. **सार्वभौमत्व** : सर्वोच्च सत्ता.

२. **स्वायत्तता देणे** : अधिकार देणे.

३. **न्यायालयीन पुनर्विलोकन** : कायदे मंडळाने केलेला कायदा घटनेशी सुसंगत आहे किंवा नाही हे तपासून बघण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा अधिकार.

## १.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ☛ स्वयं–अध्ययन प्रश्न–१ ची उत्तरे

१. मोर्ले–मिंटो.

२. १९१९.

३. त्रिमंत्री.

### ☛ स्वयं–अध्ययन प्रश्न–२ ची उत्तरे

१. ३८९.

२. ९ डिसेंबर, १९४६.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

### ☛ स्वयं–अध्ययन प्रश्न–३ ची उत्तरे

१. ६१ व्या.

२. आयर्लंड.

३. धर्मातीत/धर्मनिरपेक्ष.

### ☛ स्वयं–अध्ययन प्रश्न–४ ची उत्तरे

१. स्वातंत्र्याचा.

२. समष्ठीचा/संपूर्ण समाजाचा.

३. महात्मा गांधी.

### ☛ स्वयं–अध्ययन प्रश्न–५ ची उत्तरे

१. भारतीय संविधानामुळे.

२. सामाजिक, राजकीय व आर्थिक विकासाची.

३. हॅरॉल्ड लास्की यांच्या मते आर्थिक लोकशाहीच्या अभावी राजकीय लोकशाही अर्थहीन आहे.

४. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी

५. राजकीय घटक, आर्थिक व सामाजिक घटकांना महत्त्व असते.

## १.५ सारांश

भारतीय राज्यघटना अस्तित्त्वात येण्यापूर्वी भारतावर ब्रिटिशांचे वर्चस्व होते. त्यामुळे भारतीय जनतेवर व राज्यघटनेवर त्यांच्या शासनपध्दतीचा, वेगवेगळ्या विचारसरणीचा प्रभाव पडलेला दिसतो. भारतीय समाज जीवनाचे वास्तव आणि जगभरातील राज्यघटनांचा अभ्यास या आधारे भारतीय राज्यघटना निर्माण केलेली आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील लोकशाही, समाजवादी व उदारमतवादी विचारधारा, गांधीवादी विचार, डॉ. आंबेडकरांचा समाजसुधारणावाद इत्यादीचा प्रभाव भारतीय घटनेवर पडलेला आहे. म्हणूनच प्रा. ग्रॅनव्हीले ऑस्टीन यांनी भारतीय राज्यघटना ही एक सामाजिक दस्तऐवज आहे असे म्हटले आहे.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

❑ **थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास स्पष्ट करा.

२. भारतीय राज्यघटनेवरील उदारमतवादाचा प्रभाव स्पष्ट करा.

३. भारतीय संविधानाचा घटनात्मक विकास थोडक्यात सांगा.

४. भारतीय घटना समितीचे स्वरूप व कामकाज स्पष्ट करा.

५. भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

❑ **टीपा लिहा.**

१. राष्ट्रीय सभा.

२. राष्ट्रीय चळवळीची कारणे.

३. संविधानावरील समाजवादाचा प्रभाव.

४. १९१९ चा सुधारणा कायदा.

४. कॅबिनेट मिशन.

५. घटना समिती.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **भोळे भा.ल. :** *जून, २००३, ''भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण''*, प्रकाशक-पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

२. **भोळे भा.ल. :** *जुलै, २००४, ''भारतीय शासन आणि राजकारण''*, प्रकाशक-पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

३. **सरदेसाई बी.एन., नलावडे व्ही.एन. :** *ऑक्टोबर, २००४, ''आधुनिक भारताचा इतिहास''*, प्रकाशक-फडके प्रकाशन, कोल्हापूर.

४. **पवार जयसिंगराव :** *मे, २०१२, ''भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास''*, प्रकाशक-फडके प्रकाशन, कोल्हापूर.

५. **पाटील बी.बी., चव्हाण ऊर्मिला :** *डिसेंबर, २००३, ''भारतीय शासन आणि राजकारण''*, प्रकाशक-फडके प्रकाशन, कोल्हापूर.

६. *''प्रबोधन प्रकाशन ज्योती''*, जानेवारी, २००९, २० वे वर्ष, अंक-पहिला.

७. *''भारताचे संविधान''*, भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित, २००६.

८. **कसबे रावसाहेब :** *जून, २०१४, ''डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना''*, प्रकाशक-सुगावा प्रकाशन, पुणे.

९. **Fadia B. L. :** 2007, *"Indian Government & Politics",* Publisher : Sahitya Bhawan Publications, Agra.


❑❑❑

## सत्र १ : घटक २

# भारतीय राज्यघटनेचे वैचारिक अधिष्ठान

(Idological Bases of Indian Constitution)

अनुक्रमणिका


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

 २.२.१ भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रीका

 २.२.२ भाग ३ अंतर्गत मूलभूत अधिकार

 २.२.३ राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे व मूलभूत कर्तव्ये

 २.२.४ अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, बालके व इतर मागासवर्ग यांच्यासाठीच्या भारतीय राज्यघटनेतील तरतूदी

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


## २.० उद्दिष्टे

भारतीय राज्यघटनेचे वैचारीक अधिष्ठान किंवा पार्श्वभूमी या प्रकरणाचा अभ्यास करताना पुढील उद्दिष्टे निश्चीत करण्यात आली. -

- राज्यघटनेमधील सरनामा सविस्तर अभ्यासणे.
- राज्यघटनेमध्ये भारतीय नागरिकांना बहाल केलेल्या मूलभूत अधिकाराचा सखोल अभ्यास करणे.
- राज्यघटनेमध्ये दिलेल्या मूलभूत कर्तव्याचा अभ्यास करणे.
- राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे सविस्तर अभ्यासणे.

## २.१ प्रास्ताविक

भारतीय राज्यघटनेची निर्मिती करताना घटनाकारांना विविध देशांच्या राज्यघटनांचा आणि त्यांच्या शासनपद्धतींचा अभ्यास करावा लागला. विविध राज्यघटनांतील चांगल्या तत्त्वांची व पद्धतीची भारतीय घटनाकारांनी अभ्यासाअंती स्विकृती केल्याचे आपणाला दिसून येते. भारतीय संविधान निर्मितीच्या प्रक्रियेस स्वातंत्र्यलढ्याचा वैभवशाली वारसा लाभला आहे. कारण राज्यघटनेच्या अनेक संकल्पनांचे मूळ जसे ब्रिटिश राजवट आहे तसेच भारतीय स्वातंत्र्याच्या वारसातही आहे. ब्रिटिश राजवट व स्वातंत्र्य चळवळ यांच्यातील आंतरक्रियेतूनच स्वतंत्र भारताच्या संविधानिक चौकटीची रुपरेषा निर्माण झाली आहे. १९२२ च्या एका भाषणातून म. गांधींनी भारतीयांच्या आत्मनिर्णयाचा पुनरुच्चार केला. ते म्हणतात, 'भारतीयांना दिलेले स्वराज्य म्हणजे ब्रिटिश संसदेची भेट नसून भारतीयांच्या आत्मनिर्णयाची म्हणजेच स्वराज्याची घोषणा असेल.' गांधीजींच्या या विधानातून आपणाला भारतीय राज्यघटना कशाप्रकारची असू शकते याची पूर्व कल्पना स्वातंत्र्यापूर्वीच येत होती. असे दिसते. भारतीय राज्यघटनेची उगमस्थाने किंवा आधारस्थानांचा विचार करावयाचा झाल्यास प्रामुख्याने त्यामध्ये पुढील घटकांचा कालानुक्रमे विचार करावा लागेल. भारत देशाचा इतिहास, देशाची राजकिय, सामाजिक परिस्थिती, देशातील नागरिकांची व देशाची आर्थिक स्थिती, विविध देशांच्या राज्यटनांचा प्रभाव, १९०९, १९१९ व १९३५ च्या विविध देशांच्या कायद्याचा प्रभाव, घटनापरिषद आणि मसुदा समिती यांचा प्रभाव इ. तसेच भारतीय घटनेच्या स्विकृतीनंतरच्या काळापासून ते २०१४ पर्यंत भारतीय संसदेने विविध स्वरुपाचे कायदे व घटनादुरुस्त्या करुन घटनेत व उद्देशपत्रिकेत घातलेली भर आणि भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी घटनेतील वादग्रस्त कलमांवर जे निर्णय दिले ते निर्णय घटनेची उगमस्थाने व आधारस्थाने होत.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ भारतीय राज्यघटनेची उद्देशपत्रीका

भारतीय संविधानातून लोकशाही शासनाची चौकट तयार व्हावी, लोकांच्या वाढत्या सहभागाला प्रेरक ठरेल अशी संस्थात्मक उभारणी केली जावी आणि त्याच बरोबर परिवर्तनाच्या प्रक्रियेतून अधिक चांगल्या लोकशाहीकडे जाण्यासाठीच्या वाटा प्रशस्त व्हाव्यात अशी संविधानकारांची अपेक्षा होती हे आपणाला संविधानाच्या उद्देशपत्रिकेतून किंवा सरनाम्यातून दिसून येते. जगातील प्रत्येक संविधानाला निश्चित अशी उद्दिष्टे आणि ध्येये असतात. अर्थात ती उद्दिष्टे व ध्येये संविधानाच्या सुरुवातीला उद्देशपत्रिकेच्या किंवा सरनाम्याच्या रुपाने दिलेली असतात. १३ डिसेंबर १९४६ रोजी घटना परिषदेत पंडित नेहरुंनी ध्येय आणि उद्देशाचा एक ठराव मांडला होता.

नेहरुंच्या या ठरावात थोडा बदल करुन मसुदा समितीने भारत हे सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक असेल हे ध्येय व न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता ही उद्दिष्टे ठरवली. घटनाकारांनी संविधानाद्वारे साध्य करण्यासाठी जे लक्ष्य निश्चित केले होते त्याचा अविष्कार सरनाम्यात पहावयास मिळतो. किंबहुना सरनाम्याद्वारे राज्यघटनेचा गर्भितार्थच व्यक्त होतो. या सरनाम्यातून सामाजिक, आर्थिक व राजकीय तत्त्वज्ञान स्पष्ट होते. तसेच संविधानाची आधारभूत मुल्ये ही स्पष्ट होतात. म्हणून सरनामा म्हणजे संविधाननिर्मिती मागील नेमकी ध्येय व उद्दिष्टे कोणती होती हे जाणून घेण्याची गुरुकिल्ली मानता येईल.

१९७६ साली ४२ व्या घटनादुरुस्तीनुसार ही ध्येये व उद्दिष्टे अधिक व्यापक करण्यात येऊन समाजवादी, धर्मनिरपेक्ष व अखंडता हे शब्द नव्याने सरनाम्यात समाविष्ट करण्यात आले. तो नवा सरनामा किंवा उद्देशपत्रिका पुढील प्रमाणे

## भारताचे संविधान

### प्रास्ताविका

आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य;

दर्जा व संधीची समानता;

निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि अखंडता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन;

आमच्या संविधानसभेत आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करुन स्वत:प्रत अर्पण करत आहोत.

हा सरनामा म्हणजे संविधानाचा सर्वाधिक मौल्यवान भाग आहे. संविधानाचा तो आत्मा आहे. संविधानाच्या पायाभूत मूल्यांची सुस्वरुप मांडणी आहे. लोकशाही राज्यव्यवस्थेची ती सनद आहे. भारत देशाच्या हिताचा संकल्प त्यात व्यक्त झाला आहे. संविधानाच्या भावी वाटचालीचे ते दिशादर्शन आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे संविधान निर्मात्याच्या आंतरिक इराद्यापर्यंत पोहोचण्याची गुरुकिल्ली म्हणजे हा सरनामा आहे. कारण संविधानाची मूलभूत उद्दिष्टे व साध्ये त्यात नमुद केली आहेत. संविधानाचा आशय थोडक्यात स्पष्ट करण्यासाठी उद्देशपत्रिका उपयुक्त ठरते. अशा या प्रास्ताविकेचा किंवा सरनाम्याचा अर्थ पुढील प्रमाणे –

भारतीय संविधानाच्या सरनाम्यावरुन संविधानाचे उगमस्थान राज्यव्यवस्थेचे स्वरुप व राज्यसंस्थेची उद्दिष्टे व ध्येये स्पष्ट होतात. 'आम्ही भारताचे लोक' अशी सरनाम्याची सुरुवात होते. यावरुन राज्यव्यवस्थेची सार्वभौमसत्ता अंतिमत: लोकांच्या हाती आहे. हे संविधान लोकांनी स्वत:हून स्वत:ला अर्पित केले आहे. कुणीही भारतीय जनतेवर लादलेले नाही असे सूचित किंवा स्पष्ट होते. 'आम्ही' या शब्दामधून जाती, धर्म, प्रदेश, भाषा, लिंग इ. भेदभावांना छेडून जाणारे एकात्म भारतीय राष्ट्राचे आत्मभान व्यक्त होते. तसेच प्रगल्भतेचा जाणतेपणाही प्रकट व व्यक्त होतो.

सरनाम्याद्वारे भारतीय राज्यव्यवस्थेचे स्वरुप स्पष्ट होते. भारत हे सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य निर्माण करण्यासाठी भारताच्या सर्व नागरिकांना न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुता व अखंडत्व यांची शाश्वती देण्याचे विचारपूर्वक ठरवलेले आहे. अशाप्रकारची उद्दिष्टे व ध्येये सविस्तरपणे पुढील प्रकारे सांगता येईल –

### ❒ भारतीय राज्यव्यवस्थेचे स्वरुप :

भारतीय संविधानाच्या सरनाम्यात सुरुवातीला सार्वभौम लोकशाही गणराज्य अशी शब्दयोजना होती. १९७६ साली ४२ व्या घटनादुरुस्तीने समाजवादी, धर्मनिरपेक्ष व अखंडत्व हे तीन शब्द नव्याने समावेष्टीत झाले. त्यामुळे सार्वभौम, समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य या उद्दिष्टांचा सविस्तर ऊहापोह पुढील प्रमाणे –

### ❒ सार्वभौम :

भारत ब्रिटिश राजवटीपासून १५ ऑगस्ट १९४७ रोजी मुक्त झालेला आहे. आंतरराष्ट्रीय समुदायात इतर स्वतंत्र राष्ट्रांप्रमाणेच त्यास समान दर्जा प्राप्त झालेला आहे. भारत हा अंतर्गत व बाह्यदृष्ट्या सार्वभौम आहे. ही गोष्ट 'सार्वभौम' या शब्दातून प्रकट होते. भारताने सार्वभौम राष्ट्र निर्माण झाल्यानंतरही ब्रिटिश राष्ट्रकुलातील सदस्यत्व चालू ठेवले आहे. त्यामुळे भारताच्या सार्वभौमत्वाला बाधा येते, असा आक्षेप घेतला जातो. परंतु भारताने राष्ट्रकुलाचे सदस्यत्व स्वेच्छेने व प्रतिकात्मकरीत्या मान्य केले आहे. त्यामुळे भारताच्या सार्वभौमत्वाला कोणत्याही प्रकारची बाधा येत नाही. कारण हे सदस्यत्व भारत कोणत्याही क्षणी नाकारु शकतो. भारत हे एक स्वतंत्र राष्ट्र असून भारतातील जनता देशाच्या अंतर्गत बाबतीत सर्वश्रेष्ठ आहे आणि संविधानाद्वारे स्थापन होत असलेली राज्यव्यवस्था सार्वभौम असते.

### ❒ समाजवादी :

संविधान निर्मितीपासून 'समाजवादी' आशयाचा प्रभाव संविधानात प्रतिबिंबित झाल्याचा दिसून येतो. मात्र खऱ्या अर्थाने 'समाजवादी' या शब्दाला १९७६ सालच्या ४२ व्या घटनादुरुस्तीने

सरनाम्यात स्थान मिळाले. समाजवाद ही राज्यव्यवस्था म्हणून न स्विकारता ती जीवनमार्ग म्हणून स्विकारलेली आहे. म्हणजे दारिद्र, विषमता, शोषण, बेरोजगार यांचे निराकरण व उच्चाटन करुन भारतीय जनतेचे कल्याण होईल यांची जबाबदारी राज्यकर्त्या वर्गाने घ्यावयाची आहे. अशा अर्थाने 'समाजवादी' हा शब्द प्रयोगाचा अर्थ अभिप्रेत आहे. भारताने समाजवादी अर्थव्यवस्था प्रत्यक्षात स्विकारलेली नाही. तसेच भांडवलशाही व्यवस्थाही स्विकारलेली नाही. मात्र दोन्ही व्यवस्थांचा समन्वय म्हणून भारताने मिश्रअर्थव्यवस्थेचा स्विकार केलेला आहे. सरनाम्यातील समाजवादाच्या संकल्पनेत लोकशाही समाजवादावर आधारित कल्याणकारी राज्य अभिप्रेत आहे. 'राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक' किंवा 'नितीनिर्देशक तत्त्वामधून' आणि 'कल्याणकारी राज्य' या संकल्पनेतून समाजवादी या शब्दाचा अर्थबोध होतो. भारतातील जनतेचे राहणीमान सुधारण्यासाठी आर्थिक समता व सामाजिक न्याय प्रस्थापित होणे आवश्यक आहे हे ओळखूनच इंदिरा गांधी सरकारने 'समाजवादी' हा शब्द प्रयोग सरनाम्यात १९७६ साली ४२ व्या घटनादुरुस्तीने समावेश केला.

१९९१ पासून सध्यकालापर्यंत अंगिकारलेल्या 'खाऊजा' च्या धोरणामुळे भारतीय राजकीय व्यवस्थेच्या समाजवादी तत्त्वाला तडा गेला असल्याचे प्रकर्षाने जाणवते कारण कल्याणकारी राज्याच्या भूमिकेत मोठ्याप्रमाणात बदल झालेला पहावयास मिळतो.

### ❒ धर्मनिरपेक्ष :

धर्म ही व्यक्तीगत बाब मानून सर्व धर्मांकडे समानतेच्या भूमिकेतून पाहण्याचा दृष्टिकोन घटनेने स्विकारलेला आहे. धर्मनिरपेक्ष ही संज्ञा ४२ व्या घटनादुरुस्तीने १९७६ साली सरनाम्यात समाविष्ट करण्यात आली. लहान मोठ्या सर्व धर्मांच्या लोकांना समान संधी, समान वर्तणूक व समान दर्जा या राज्यात मिळेल. तसेच राज्यसत्तेचा असा कोणताही धर्म असणार नाही आणि राजकीय प्रक्रियेमध्ये धार्मिक शक्तींना लुडबुड किंवा हस्तक्षेप करता येणार नाही. धर्म हा व्यक्तीच्या खाजगी जीवनापुरता मर्यादित असेल तसेच व्यक्तीला स्वत:च्या आवडी-निवडीनुसार धर्माचा प्रचार प्रसार व आचरण करण्याचे स्वातंत्र्य असेल अशा आशयाचा अर्थ धर्मनिरपेक्ष या शब्दाचा आहे. भारतीय संविधानात कलम २५ ते २८ मध्ये धार्मिक अधिकार स्पष्ट केले आहेत.

घटना समितीमध्ये संविधानाच्या स्वरुपाबद्दल जेव्हा चर्चा झाली तेव्हा 'सेक्यूलर' हे विशेषण सरनाम्यात असावे असे काही सदस्यांना वाटत होते. तसेच प्रा. के. टी. शहा यांनी 'धर्मनिरपेक्ष' व 'समाजवादी' अशी विशेषणे भारतीय संघराज्याला लावावीत अशी दुरुस्तीच सुचविली. त्यावर प्रा. शहा यांच्या दुरुस्तीला डॉ. आंबेडकरांनी विरोध केला आणि म्हटले, ''प्रजासत्ताकाला विशेषणे लावणे म्हणजे लोकशाही नष्ट करण्यासारखे आहे. कारण एका विशिष्ट मतप्रणालीचेच लोक पुढील काळामध्ये सत्तेवर येतील असे नाही. तेव्हा अशा लोकांचा अधिकार मर्यादित करणारी विशेषणे

कशाला ?'' तेव्हा प्रा. शहा यांची दुरुस्ती घटनासमितीत नामंजूर झाली. १९७६ साली ४२ व्या घटनादुरुस्तीने आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधींनी धर्मनिरपेक्ष, समाजवादी व अखंडत्व हे तीन शब्द समावेष्ठित 'धर्मनिरपेक्ष' या शब्दाने व्यक्त होणारी संकल्पना एक नैतिक व्यवस्था आहे.

### ❒ लोकशाही :

भारतीय संविधानाने प्रातिनिधीक व संसदीय लोकशाहीचा स्विकार केलेला आहे. अब्राहम लिंकनने लोकांचे, लोकांच्याकरिता, लोकांकडून चालविलेले राज्य अशी लोकशाहीची व्याख्या केली. त्याच अर्थाने भारतीय संविधान निर्मात्यांना लोकशाही अपेक्षित आहे. जनता व त्यांनी निवडून दिलेले प्रतिनिधी यांच्यातील जबाबदारीचे नाते हा लोकशाही व्यवस्थेचा मूलाधार आहे. लोकशाहीमध्ये लोकांना आपले प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार आहे. त्याच्या बदल्यात प्रतिनिधीनी लोकांच्या हिताची जपणूक करावी असे गृहीत आहे. अशाप्रकारच्या लोकशाहीची सरनाम्यात तरतुद केलेली आहे. सार्वत्रिक प्रौढ मताधिकार, व्यक्तीस्वातंत्र्य, स्वतंत्र न्यायव्यवस्था व मुक्त प्रसारामध्ये ही साधने पुरवली आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे लोकशाही केवळ राजकीय जीवनापुरतीच मर्यादित न राहता सामाजिक व आर्थिक जीवनातही असावी असे संविधान निर्मात्यांची अपेक्षा आहे. राजकीय लोकशाहीतून सामाजिक लोकशाही डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत होती. आंबेडकरांच्या मते स्वातंत्र्य, समता व बंधुता ही तत्त्वे राजकीय लोकशाहीत उतरली असता सामाजिक लोकशाही प्रस्थापित होऊ शकते. थोडक्यात भारतीय राजकारणात आपण समता प्रस्थापित केली आहे परंतु सामाजिक व आर्थिक जीवनात समता निर्माण करु शकलो नाही. याचा परिणाम राजकीय लोकशाही धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही.

### ❒ गणराज्य :

भारतीय संविधानाच्या सरनाम्यात 'गणराज्य' असा शब्द प्रयोग केला आहे. प्रजासत्ताक आणि गणराज्य हे दोन शब्द भिन्न अर्थाने वापरले आहेत. लोकशाही शासनव्यवस्थेत राज्यप्रमुख हा लोकांच्याकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे निवडला जातो त्यास गणराज्य असे म्हणतात. भारत हे प्रजासत्ताक गणराज्य आहे. भारतीय लोकशाही शासनव्यवस्थेत राज्यप्रमुख (राष्ट्रपती) अप्रत्यक्षपणे निवडून येतो. इंग्लंड हे प्रजासत्ताक गणराज्य नाही मात्र प्रजासत्ताक राज्य आहे. कारण इंग्लंडचा सार्वभौम राजा हा वंशपरंपरेनुसार आपले पद ग्रहण करतो. गणराज्य जेथे असते तेथे प्रजासत्ताक शासन असेलच असे नाही. उदा. – चीन. भारतामध्ये प्रजासत्ताक गणराज्याची निर्मिती केल्यामुळे, गव्हर्नर जनरलचे पद नष्ट केले आणि भारताच्या गुलामीचे शेवटचे प्रतिक हलविण्यात येऊन त्याऐवजी राष्ट्रपती पदाची निर्मिती केली. भारतात प्रजासत्ताक गणराज्य पद्धतीचा स्विकार केला असून जनतेचे सार्वभौमत्व मान्य केलेले आहे. असे सरनाम्यात सूचित केले.

## ❀ भारतीय राज्यव्यवस्थेची तत्त्वे :

व्यक्तीप्रमाणे शासनाला ही काही ध्येय असतात. त्या ध्येयाची पूर्तता करण्यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता व अखंडत्व ही पाच उद्दिष्टे भारताच्या सरनाम्यात दिलेली आहेत. ४२ व्या घटना दुरुस्तीने अखंडत्व हे उद्दिष्ट नव्याने सरनाम्यात समाविष्ट केले आहे. भारतीय राज्यघटनेचा सरनामा केवळ राज्यव्यवस्थेचे स्वरुप स्पष्ट करत नाही तर या राज्यसंस्थेद्वारे साध्य करावयाची उद्दिष्टे व तत्त्वे कोणती याचे ही विवरण केले आहे. अशा या तत्त्वाचे विश्लेषणात्मक विवरण पुढीलप्रमाणे पहाता येईल.

### ☛ न्याय (Justice)

न्याय हा भारतीय राज्यव्यवस्थेचा व राज्य संस्थेचा आत्मा आहे. न्यायाचा मुख्य उद्देश समाजाचे जास्तीत जास्त कल्याण करणे हाच आहे. म्हणजेच समाजाचा सर्वांगीण विकास साधने. समाजातील किंवा देशातील सर्व व्यक्तींना विकासाची संधी उपलब्ध करुन देणे म्हणजे न्याय होय. भारतीय संविधानामध्ये संविधान निर्मात्यांनी प्रत्येक नागरीकांस राजकीय सामाजिक व आर्थिक न्यायाची हमी दिलेली आहे.

नागरिकांना राज्यकारभारात  अप्रत्यक्षपणे सहभागी करुन घेणे म्हणजे राजकीय न्याय होय. राजकीय हक्काद्वारे प्रत्येक नागरिक राज्यकारभारात सहभागी होऊ शकतो. नागरिकांना प्रौढ मताधिकार व निवडणूक लढवण्याचा अधिकार दिलेला आहे. यासाठीचे समान न्याय प्रस्थापित करण्यावर भर दिला आहे. देशातील असणारी सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी सामाजिक न्याय स्थापन करण्याच्या हेतुने संविधान निर्मात्यांनी सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचा सरनाम्यात उल्लेख केला आहे. अल्पसंख्याक व अनुसूचित जातीजमातींना विशेष सवलती देऊन सामाजिक न्याय निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. आर्थिक न्याय म्हणजे देशात आर्थिक समता प्रस्थापित करणे होय. नागरिकांना त्यांच्या उपजीविकेची साधने उपलब्ध करुन देणे. देशातील आर्थिक विषमता दूर करणे, बेकारी व दारिद्र्य नष्ट करुन नागरिकांचा राहणीमनाचा दर्जा उंचावणे. एकंदरीत भारतीय संविधानाने नागरिकांना आर्थिक न्याय निर्माण करुन देण्याचे ठरवलेले आहे.

वरील सर्व आशयावरुन असे स्पष्ट होते की भारतीय संविधानाने भारतीय नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय प्रस्थापित करण्याची शाश्वती दिलेली आहे. भारतामध्ये राजकीय न्याय नागरिकांना मिळालेला पहावयास मिळतो परंतु सामाजिक व आर्थिक झालेला नाही. त्यामुळे भारतीय लोकशाही आणखी स्थिर व यशस्वी होण्यासाठी राजकीय न्याया बरोबरच सामाजिक व आर्थिक न्याय निर्माण होणे नितांत गरजेचे आहे.

### ☛ स्वातंत्र्य (Liberty)

भारतीय संविधानाने व्यक्तीच्या सर्वांगिण विकासासाठी स्वातंत्र्याचे अधिकार व्यक्तीला बहाल केलेले आहेत किंवा व्यक्तीस्वातंत्र्याशिवाय व्यक्तीविकास अशक्य आहे. स्वातंत्र्याचा अर्थ स्वैराचार नाही. भारतीय संविधानाने सरनाम्यात नागरिकांना विचार, उच्चार, विश्वास, श्रद्धा, धर्म आणि उपासना ह्याचे समाजहिताला बाधा येणार नाही, अशी दक्षता बाळगून उपभोग घेण्याचे स्वातंत्र्य प्रत्येक व्यक्तीला दिले. संविधानाच्या कलम १९ ते २२ मध्ये भारतीय नागरिकांना स्वातंत्र्याचे व त्याच्या संरक्षणात्मक उपायाचे स्पष्टीकरण दिलेले आहे.

### ☛ समता (Equality)

समता असल्याशिवाय स्वातंत्र्याला अर्थच नाही त्यामुळे दर्जा व संधी याबाबतच्या समतेचे आश्वासण सरनामा देते. कायद्याचे राज्य असल्याने सर्व नागरिकांसाठी एकच कायदा असेल व कायद्या समोर सर्व नागरीक समान असतील आणि सर्वांना सारख्याच संधी उपलब्ध असतील. असाच समतेचा अर्थ अभिप्रेत आहे. संविधानाच्या कलम १४ ते १८ मध्ये क्षमतेचा अधिकार स्पष्ट केलेला आहे. भारतीय संविधानाने सर्व जनतेला विकासाची समान संधी दिलेली असली तरी मागासलेल्या जाती व जमातींच्या लोकांना खास सवलती देण्याची तरतुदही केलेली आहे.

### ☛ बंधुता (Farternity)

व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राचे ऐक्य निर्माण करण्यासाठी बंधुता या उद्दिष्टाचा संविधानाच्या सरनाम्यात उल्लेख केला आहे. भारतामध्ये पूर्वीपासून अनेक जाती धर्मांचे, भाषाचे व प्रांताचे लोक राहत आहेत. त्यामुळे त्याच्यामध्ये राष्ट्रीय ऐक्य व एकात्मता टिकवण्यासाठी बंधुता या तत्त्वाची नितांत आवश्यकता आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता यांच्या पायावर बंधुताची शाश्वती देणे हेच उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून संविधान कर्त्यांनी सरनाम्याची व संविधानाची निर्मिती केली आहे. जेव्हा एक राष्ट्र किंवा एकात्म राष्ट्र असेल तरच बंधुता या भावनेला खरोखर अर्थ प्राप्त होईल.

### ☛ अखंडत्व (Integrity)

भारताने संघराज्य व्यवस्था स्विकारलेली आहे. परंतु संविधानात असा कोठेही उल्लेख आढळत नाही. अशा या संघराज्यातून कोणत्याही घटकराज्याला बाहेर पडता येत नाही. भारताची अखंडता अबाधीत राखली जावी ह्याच दृष्टीने संविधानाने केंद्र सरकार मजबूत केले आहे. वास्तविक पाहता मूळ सरनाम्यात अखंडत्व हा शब्दप्रयोग नाही. १९७६ साली ४२ व्या घटनादुरुस्तीने इंदिरा गांधी सरकारने समाजवादी व धर्मनिरपेक्ष या संकल्पनेबरोबरच 'अखंडत्व' हा शब्द प्रयोग सरनाम्याच्या उद्दिष्टामध्ये केला. या शब्दामुळे स्वातंत्र्योत्तर फाळणीमुळे एकता, एकात्मता व अखंडत्व

याला तडे गेले होते. परंतु ४२ व्या घटनादुरुस्तीने पुन्हा एकदा 'अखंडत्व' या शब्दाच्या समावेशामुळे राष्ट्रीय एकात्मतेला बळ व चालना मिळाली.

## ❐ सरनाम्याविषयी माहिती :

या सरनाम्याविषयी अनेक ग्रंथकारांनी व विचारवंतांनी संविधानातील श्रेष्ठ विचारसरणीचा आणि आदर्श तत्त्वांचा गौरव केला. अर्नेस्ट बार्करने हा सरनामा आपल्या 'Principles of Social & Political Theory' या ग्रंथाच्या सुरुवातीला छापला. याचे कारण सांगताना अर्नेस्ट बार्करने असे म्हटले आहे की, 'मी जे काही ग्रंथात छापले आहे तेच मोजक्या शब्दात सुत्ररुपाने या सरनाम्याने सांगितले आहे. मला आनंद आणि अभिमान वाटतो की, भारताने आपल्या राजकीय जीवनाची सुरुवात अशा राजकीय तत्त्वांनी करावी जी तत्त्वे पाश्चिमात्य लोक आपली आहेत असे म्हणतात. परंतु या सरनाम्यात या तत्त्वांहून अधिक काही आहे.' एम. व्ही. पायली यांच्या मते, ''भारतीय राज्यघटनेचा सरनामा हा जगातील इतर देशांच्या संविधानांच्या सरनाम्याहून उत्कृष्ट व अद्वितीय आहे.'' हा सरनामा ''भारतीय संविधानाची 'गुरु किल्ली' आणि संविधानाचा 'आत्मा' '' अशा शब्दात सरनाम्याचे वर्णन पंडित ठाकूरदास भार्गव यांनी केले. एम. हिदायतुल्ला यांच्या मते, ''सरनामा म्हणजे भारतीय संविधानाचा आत्मा असून तो राजकीय समाजाच्या प्रारुपाचे कथन करतो.'' के. एम. मुन्शी यांच्यामध्ये, ''सरनामा म्हणजे भारतीय घटना जाणून घेण्यासाठी आवश्यक असलेली एक राजकीय दृष्टी पुरवतो.''

कायद्याच्या चौकटीतून पाहिले असता संविधानाच्या सरनाम्यावर काही मर्यादा पडत असल्या तरी घटनेतील एखाद्या कलमाचा अर्थ लावताना सरनाम्याचा आधार घेतला जातो. संविधान निर्मात्यांना एखाद्या कलमाचा कोणता अर्थ अपेक्षित होता हे पाहून न्यायाधीश निर्णय देऊ शकतात. उदा. – न्यायाधीशांनी गोपालन विरुद्ध मद्रास या खटल्यात सरनाम्याचा आधार घेतला. एकंदरीत सरनाम्याचे विश्लेषण व अभ्यास केला असता असे म्हणता येईल की, उदारमतवादी लोकशाही शासन, लोककल्याणकारी राज्य आणि त्यासाठी लोकसहभागाची आवश्यकता या मूलभूत घटकांवरच भारतीय संविधानाची तत्त्ववैचारिक बैठक सिद्ध झाली आहे.

संविधानाच्या सरनाम्यावर काही वेळा टीका केली जाते. ती म्हणजे सरनाम्याला कायदेशीररीत्या महत्त्व नाही. सरनाम्यातील सर्व उद्दिष्टे राज्यावर (पूर्णपणे) बंधनकारक नसतात. याच कारणांमुळे त्यांच्या अंमलबजावणीबाबत न्यायालयात जाता येत नाही किंवा केंद्रसरकार किंवा घटक राज्यसरकार यांना न्यायालयात खेचता येत नाही.

## १.२.२ भाग ३ अंतर्गत मूलभूत अधिकार (Fundamental Rights)

नागरिकांना लोकशाही प्रक्रियेमध्ये सहभागी होता यावे आणि स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगिण विकास करुन घेता यावा यासाठी त्याला मूलभूत हक्कांची आवश्यकता असते. ज्या सरनाम्यात सामाजिक, राजकीय व आर्थिक न्यायाचा संकल्पाचा विचार केला आहे त्याच्या मुळाशी व्यक्तीप्रतिष्ठेची संकल्पना आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे नागरिकांच्या हक्कांशिवाय लोकशाही शासनाची संकल्पनाच मांडता येत नाही. मूलभूत अधिकारात कोणत्या गोष्टींचा समावेश करावा हे संबंधित देशाचा इतिहास आणि परिस्थिती ह्यांच्या अभ्यासावरुन ठरवायचे असते. राज्याचा उदय झाल्यापासून ते आजपर्यंत राज्यशास्त्रासमोर एक प्रश्न उभा राहिलेला आहे. तो म्हणजे व्यक्ती आणि राज्य यांचा संबंध कसा असावा. राज्यशास्त्रातील बरेच सिद्धांत या प्रमुख प्रश्नाभोवती फिरतात. प्रत्येक देशाच्या संविधानात तेथील नागरिकांचे अधिकार आणि राज्याचे क्षेत्र यांची सांगड घातली जाते. लोकशाही, समाजवाद, साम्यवाद, नाझीवाद, फॅसिस्ट इ. वाद आणि त्यातील उपवाद या एकमेव प्रश्नाचे उत्तर शोधीत आहेत. तो म्हणजे राज्यसत्तेचा परीघ किती असावा आणि व्यक्ति स्वातंत्र्याच्या मर्यादा कोणत्या असाव्यात.

व्यक्तीविकास हाच मूलभूत तत्त्वाचा उद्देश नसून नागरिकांना दिलेल्या अधिकारावरुन राज्याचे स्वरुप स्पष्ट होते. या तत्त्वांना अनुसरुन जर नागरिकांच्या जीवनात काही सोयी व व्यक्तिविकासाची निश्चित योजना नसेल तर लोकशाही अस्तित्वात येऊ शकणार नाही. लोकशाहीचे स्वरुप स्पष्ट व्हावे म्हणून मूलभूत हक्कांची तरतूद घटनेत करण्यात आलेली असते.

जगामध्ये मूलभूत हक्कांचा विचार सर्वप्रथम मॅग्नाचार्टा १२१५ मध्ये विचार केला गेला आणि १६२८ पासून इंग्लंडमध्ये हक्कांची एक परंपरा निर्माण व्हायला सुरुवात झाली. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतिकारकांनी राष्ट्रीय सभेत मानवाच्या हक्कांची घोषणा केली. त्यानंतर अमेरिकेत ही मूलभूत हक्कांचे मागणी एका विधेयकाद्वारे झाली. १८९५ साली लोकमान्य टिळकांनी ब्रिटिश राज्यकर्त्यांकडे मूलभूत हक्कांची मागणी केली. १९१८ साली मुंबई-काँग्रेस अधिवेशनात मूलभूत हक्कांचा समावेश राज्यघटनेत करावा व या हक्कांना न्यायालयीन संरक्षण असावे अशी मागणी झाली. १९२८ साली भारतात सर्वपक्षीय संमेलनात मूलभूत हक्कांची मागणी केली होती. १९२८ च्या नेहरु-समितीच्या अहवालामध्ये मूलभूत हक्कांची मागणी करण्यात आली होती. सायमन कमिशन आणि गोलमेज परिषदा यांनी मूलभूत अधिकारांविषयी नकार दर्शविला. २२ जानेवारी, १९४७ रोजी पंडित जवाहरलाल नेहरु यांनी ठरावाद्वारे मूलभूत अधिकारांची मागणी केली. भारताच्या घटनासमितीने मूलभूत अधिकारांच्या संदर्भात घटनापरिषदेने जी उपसमिती नेमली होती त्या समितीच्या अहवालात १६ एप्रिल १९४७ रोजी दोन प्रकारचे अधिकार देण्यात यावेत असे सुचविले ते अधिकार म्हणजे १.

न्यायालयीन संरक्षण असणारे मूलभूत अधिकार २. न्यायालयाच्या कक्षेत न बसणारे नैतिक अधिकार म्हणजे राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे.

मूलभूत हक्काबाबत व या हक्कांच्या आवश्यकतेबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'मूलभूत हक्कांवर नागरिकांना दावा करता यावा म्हणून त्यांना संविधानात स्थान आहे. कोणत्याही प्रकारच्या सत्तेवर मूलभूत हक्कांचे बंधन असावे म्हणून मूलभूत हक्कांना संविधानात सामावून घेतले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे भविष्यकाळात येणाऱ्या शासनाने आपल्या मनाप्रमाणे राज्यकारभार करुन संविधान बदल करुन हक्कात बदल करु नये म्हणूनसुद्धा मूलभूत हक्कांचा समावेश करण्यात आला. त्याबाबत अंतिम निर्णय देण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला देण्यात आला आहे.' १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघातही मानवी हक्काचा विचार करुन मानवी अधिकाराचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. वरील वेगवेगळ्या प्रकारे भारतामध्ये व आंतरराष्ट्रीय पातळीवरती मूलभूत हक्काच्या संदर्भात विचारप्रवाह असलेले पहावयास मिळतात.

## ❒ भारतीय संविधानातील मूलभूत हक्क :

भारतीय संविधानातील तिसऱ्या भागात कलम १२ ते ३५ मध्ये मूलभूत हक्कांची तरतूद केली आहे. संविधानातील मूलभूत हक्क पुढीलप्रमाणे

१. समतेचा अधिकार (Right to Equality) (कलम १४ ते १८)

२. स्वातंत्र्याचा अधिकार (Right to Freedom) (कलम १९ ते २२)

३. शोषणाविरुद्धचा अधिकार (Right Against Exploitation) (कलम २३ ते २४)

४. धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार (Right to Freedom of Religion) (कलम २५ ते २८)

५. संस्कृती व शिक्षणाचा अधिकार (Cultural & Education Rights) (कलम २९ ते ३०)

६. संपत्तीचा/मालमत्तेचा अधिकार (Rights to Property) (४४ व्या घटनादुरुस्तीने १९७८ साली हा अधिकार रद्द केला.) (कलम ३१)

७. घटनात्मक उपाययोजनांचा अधिकार (Rights to Constitutional Remedies) (कलम ३२)

(**टीप :** संपत्तीचा अधिकार (कलम ३१) १९७८ च्या ४४ व्या घटनादुरुस्तीने मूलभूत हक्कातून रद्द बातल ठरवून संपत्तीचा अधिकार हा कायदेशीर करण्यात आला आहे.)

## ❐ मूलभूत हक्कांची वैशिष्ट्ये :–

१. भारतीय संविधानात नागरीकांच्या मूलभूत हक्कांचे स्पष्टीकरण सविस्तरपणे केले आहे जे की, जगातील इतर कोणत्याही देशाच्या संविधानात मूलभूत अधिकाराचे स्पष्टीकरण भारतीय संविधानातील मूलभूत अधिकाराच्या स्पष्टीकरणाएवढे केलेले नाही.

२. जगातील निवडक देशांच्या संविधानातील मूलभूत अधिकारांचा अभ्यास करून भारतीय संविधानात मूलभूत अधिकारांचा विचारपूर्वक समावेश केला आहे.

३. भारतीय संविधानातील मूलभूत हक्क आणीबाणीच्या काळात स्थगित करता येतात.

४. संविधानातील मूलभूत हक्कांना कलम ३२ नुसार न्यायालयीन संरक्षण दिलेले आहे.

५. संविधानामध्ये दोन प्रकारचे मूलभूत हक्क दिले आहेत.

(अ) सकारात्मक स्वरुपाचे मूलभूत हक्क उदा. – स्वातंत्र्याचा, धार्मिक, मालमत्तेचा व सांस्कृतिक अधिकार इ.

(ब) नकारात्मक स्वरुपाचे मूलभूत हक्क उदा. – धर्म, वंश, जात, भाषा व लिंग या कारणास्तव कायद्यासमोरील समानतेची वागणूक नाकारता येत नाही.

६. मूलभूत अधिकार केंद्र सरकार, घटक राज्य सरकार, पंचायत राज्य व्यवस्था, सार्वजनिक संस्था व संघटनांवर बंधनकारक आहेत.

७. संविधानाने मूलभूत हक्काबाबत नागरिक व व्यक्ती असा फरक केला आहे.

८. कलम १२ ते ३५ मध्ये मूलभूत हक्कांची घटनात्मक तरतुद केली आहे.

## ❐ मूलभूत हक्कांची सविस्तर मांडणी :–

### ☛ कलम – १२ :

संविधानातील मूलभूत हक्कांशी संबंधित विविध तरतुदींमध्ये राज्यसंस्था ही संज्ञा वापरण्यात आली आहे. यामुळेच कलम १२ मध्ये राज्यसंस्थेची व्याख्या केली आहे. भारताचे कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ, घटकराज्याचे कायदेमंडळ व कार्यकारीमंडळ, पंचायतराज्य व्यवस्था आणि वैधानिक व बिगर वैधानिक अधिसत्ता अशा प्रकारच्या सर्व घटकांच्या समावेशाची व्याख्या राज्यसंस्थेची केली आहे.

### ☛ कलम – १३ :–

मूलभूत हक्कांच्या तरतुदीशी विसंगत किंवा तिचे हरण करणारा कोणताही कायदा हा अवैध ठरविला जाईल किंवा एखादा कायदा मूलभूत हक्कांच्या विरोधी असेल तर न्यायालये तो कायदा

घटनाविरोधी आणि अवैध घोषित करु शकतात. हा सर्वोच्च न्यायालयाला (कलम ३२) व उच्च न्यायालयाला (कलम २२६) दिलेला आहे.

### १. समतेचा अधिकार/समानतेचा हक्क (Right to Equality) (कलम १४ ते १८) :–

संविधानाच्या कलम १४ ते १८ मध्ये तिसऱ्या भागात समतेचा अधिकार देण्यात आलेला आहे.

**☛ कलम – १४ कायद्यापुढे समानता :**

भारताच्या प्रदेशात राज्य कोणाही व्यक्तीला कायद्याच्या बाबतीत समानता कींवा कायद्याचे समान संरक्षण प्रदान केले जाईल. याचाच अर्थ कायद्यापुढे सर्व नागरिकांना समान दर्जा दिला जाईल व कायद्याचे सर्वांना समान संरक्षण दिले जाईल. या कलमातून कायद्याचे अधिराज्य ही संकल्पना स्पष्ट होते. 'Equality before the Law' ची संकल्पना इंग्लंडच्या संविधानातून घेतली आहे. ती 'Rule of Law' वर आधारित आहे. भारतीय नागरिकांना समानतेचा अधिकार देऊन कायद्याच्या समान संरक्षणाची हमी दिली असली तरी भारताचा राज्यकारभार व्यवस्थित चालवण्यासाठी राष्ट्रपती, राज्यपाल, परराष्ट्र वकील व सैनिक यांना ३६१ नुसार अधिक संरक्षण दिले आहे. परंतु त्यामुळे समानतेच्या तत्वाला बाधा किंवा अडथळा येत नाही. म्हणूनच असे असले तरी भारतीय संविधानाच्या सरनाम्यात समान दर्जा आणि संधी असा स्पष्ट उल्लेख केला आहे. धर्म, वंश, जात लिंग व प्रदेश यावरुन कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही.

**☛ कलम – १५ भेदभावास प्रतिबंध :**

धर्म, वंश, जात, स्त्री–पुरुष, जन्मस्थान, प्रदेश या आधारावर दुकाने, सार्वजनिक उपहारगृहे, हॉटेल्स, करमणुकगृहे येथे कोणासही प्रवेश नाकारता येणार नाही आणि भेदभाव केला जाणार नाही. तसेच विहीरी, तलाव, घाट, रस्ते व सार्वजनिक विश्रांतीची ठिकाणे इ. चा उपयोग करण्यासाठी कोणताही भेदभाव व प्रवेश नाकारला जाणार नाही.

कलम १५ अन्वये स्त्री व मुले यांच्या करीता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही. सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागसलेल्या कोणत्याही वर्गाच्या विकासासाठी किंवा अनूचित जाती व जमाती यांच्यासाठी कोणतीही विशेष तरतूद करण्यास प्रतिबंध होणार नाही. याचा अर्थ वरील सर्व कारणे सोडून इतर कारणावरुन सार्वजनिक स्थळी काही लोकांना प्रतिबंध करता येतो. उदा. – संसर्गजन्य रोगग्रस्त व्यक्ती व मद्यपान केलेल्या व्यक्ती.

**☛ कलम – १६ समान संधी :**

भारतातील प्रत्येक नागरिकाला देशामध्ये आपल्या पात्रतेनुसार नोकरी करण्याचा, एखादे पद ग्रहण करण्याचा समान अधिकार आहे. धर्म, वंश, जात, लिंग, कुळ, जन्मस्थान व निवासस्थान या

आधारावर कोणाला ही नेमणूकीपासून वंचीत ठेवले जाणार नाही. परंतु संसदेला कायदा करुन राज्यातील एखाद्या पदावर नियुक्त केला जाणारा अधिकारी त्याच राज्यातील रहिवासी असला पाहिजे अशी अट घालता येते. तसेच मागासलेल्या जाती व जमातीसाठी राज्यसरकार नोकरीत पुरेसे प्रतिनिधीत्व देण्यासाठी काही जागांची तरतूद करु शकते. एखाद्या धार्मिक किंवा सांप्रदायिक संस्थेचे पद त्याच धर्माच्या अथवा सांप्रदायाच्या व्यक्तिला द्यावे अशी घोषणा किंवा नियुक्ती करते. उदा. - भारतातील हिंदूच्या चार पीठांचा अथवा त्यापैकी एका पीठाचा कारभार सरकार पाहत असेल तर त्या ठिकाणी हिंदू धर्माचाच महाधिपती सरकार नियुक्त करु शकते.

☛ **कलम – १७ अस्पृश्यता निवारण :**

जातीवाद, स्पृश्य-अस्पृश्यवाद नष्ट केल्याशिवाय खऱ्या अर्थाने समता प्रस्थापित होणार नाही. घटनाकारांना यांची जाणीव होती. म्हणूनच संविधानाच्या १७ व्या कलमात अस्पृश्यता निवारणाची तरतूद करुन स्पृश्य-अस्पृश्यता नष्ट केली. कोणत्याही स्वरुपाची अस्पृश्यता पाळणे हा कायद्यानुसार गुन्हा समजून ६ महिन्याची तुरुंगवासाची शिक्षा संबंधित व्यक्तीला ठोठावण्यात येईल. भारतीय समाजव्यवस्थेला वर्षानुवर्षे जातीयतेचा लागलेला कलंक कलम १७ नुसार रद्द केला. सामाजिक विषमता नष्ट करण्याचे महात्मा गांधीचे स्वप्न संविधानकर्त्यांनी साकार केले. 'अस्पृश्यता निवारणाचा कायदा' १९५५ साली करुन अस्पृश्यता पाळणे हा फौजदारी गुन्हा ठरविला आणि लोकशाहीशी विसंगत असणारी ही प्रथा बंद केली.

☛ **कलम – १८ भेदभावात्मक पदव्यांना मनाई :**

व्यक्तीमध्ये असणारा सामाजिक, राजकीय व आर्थिक भेदभाव नष्ट करण्यासाठी १८ व्या कलमाची फार मोठी मदत झाली आहे. कारण पूर्वी सरकारतर्फे रावसाहेब, रावबहादूर, दिवाणसाहेब, दिवाणबहादूर, खानबहादूर इ. प्रकारच्या पदव्या सामाजिक व राजकीय कामगिरी करता व्यक्तींना मिळत होत्या. तसेच या पदव्या प्राप्त व्यक्तींना विशेष अधिकार होते. परिणामी व्यक्तीव्यक्तीमध्ये कृत्रिम भेदभाव निर्माण होऊन समाजव्यवस्था अस्थिर बनत. अशी अस्थिरता व भेदभाव नष्ट करण्यासाठी ह्या पदव्या देणे कायद्याने बंद केले. परंतु भारत सरकारने परमवीरचक्र, महावीर चक्र, वीरचक्र, अशोकचक्र, शौर्यचक्र, कीर्तिचक्र अशा लष्करी पदव्या तसेच भारतरत्न, पद्मभूषण, पद्मविभूषण, पद्मश्री यासारख्या बहुमानसूचक पदव्या देण्याची प्रथा १९५४ साली सुरु केली. १९७८ साली जनतापक्षाच्या राजवटीत ही पदव्याची पद्धत बंद केली. परंतु पुन्हा काँग्रेसच्या राजवटीत इंदिरा गांधीनी या पदव्या देणे सुरु केले. भारत सरकारकडून या पदव्या नव्हे तर पदके म्हणून दिल्या जातात. समाजात आणि लष्करात विशेष कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करणे शासनाचे कर्तव्य आहे.

वरील वेगवेगळ्या प्रकारे समता प्रस्थापित झाल्याशिवाय इतर अधिकारांना काहीच अर्थ राहत नाही म्हणून वरील वेगवेगळ्या पाच प्रकारे कलम १४ ते १८ मध्ये समतेचे अधिकार दिलेले आहेत.

## २. स्वातंत्र्याचा अधिकार (Right to Freedom) (कलम १९ ते २२) :–

भारतीय संविधानातील कलम १९ ते २२ मध्ये स्वातंत्र्याचे अधिकार भारतीय जनतेला बहाल केले आहेत ते सविस्तरपणे पुढील प्रकारे अभ्यासता येतील.

### ☛ कलम – १९ नुसार :

स्वातंत्र्याच्या हक्कातील सर्वात महत्त्वाचे असून या कलमाने सात प्रकारची स्वातंत्र्ये दिली आहेत. मात्र क्र. – ६ चे स्वातंत्र्य १९७८ च्या ४४ व्या घटनादुरुस्तीने रद्द करण्यात आले.

१. भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य.

२. शांततापूर्वक मार्गाने आणि निशस्त्र एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य.

३. संस्था, संघ व सहकारी संस्था स्थापन करण्याचे स्वातंत्र्य.

४. भारतीय भू–प्रदेशात मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य.

५. भारताच्या कोणत्याही प्रदेशात राहण्याचे व स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य.

६. मालमत्ता मिळविण्याचा, धारण करण्याचा व तिचा विनियोग करण्याचे स्वातंत्र्य (४४ व्या घटनादुरुस्तीने हे स्वातंत्र्य रद्द करण्यात आले.)

७. कोणताही धंदा व व्यवसाय किंवा व्यापार करण्याचे स्वातंत्र्य :

(१) भाषणाद्वारे व्यक्ती आपले विचार व्यक्त करते आणि खुली चर्चा करुन विचारांची देवाणघेवाण करते. भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्यामध्ये लेखन किंवा वृत्तपत्र स्वातंत्र्य असा उल्लेख नसला तरी हे स्वातंत्र्य अभिप्रेत आहे. या विषयी भाष्य करताना डॉ. आंबेडकर म्हणाले की, ''वृत्तपत्राचा संपादक ही एक व्यक्ती आहे. त्यामुळे संबंधित वृत्तपत्रातील त्याचे विचार म्हणजे त्याचे विचारस्वातंत्र्याची अभिव्यक्तीच होय.'' देशाचे सार्वभौमत्व व अखंडत्व टिकवून ठेवण्यासाठी, राज्याची सुरक्षितता, परकिय राष्ट्रांशी मित्रत्वाचे संबंध, न्यायालयाचा अवमान इ. बाबतीत भाषण व अविष्कार स्वातंत्र्यावर बंधने घालता येतात. (१६ व्या घटनादुरुस्तीद्वारे १९६३ मध्ये तरतूद.)

(२) भारताच्या नागरिकाला शांततापूर्वक आणि शस्त्राशिवाय सभा घेण्याचे स्वातंत्र्य प्राप्त झालेले आहे. हा अधिकार जर भारतीय नागरिकांना दिला नाही तर भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा काहीच उपयोग होत नाही. कारण आपले विचार, दुसऱ्याला पटवून

सांगण्यासाठी सभा घेवून एकत्र येण्याचा अधिकार पाहिजे. अशा प्रकारे शांततापूर्वक आणि निशस्त्र एकत्र जमण्याच्या स्वातंत्र्यामुळे लोकशाही प्रस्थापित होते. सार्वजनिक सुव्यवस्था, सार्वभौमत्व आणि राष्ट्रीय ऐक्य यांना धोका पोहोचणार नाही या अनुशंगाने सभा स्वातंत्र्यावर बंधने घालण्याचा अधिकार शासनाला देण्यात आलेला आहे. परंतु घातलेली बंधने योग्य की अयोग्य हे ठरवण्याचा अधिकार न्यायव्यवस्थेला आहे.

(३) भारतीय संविधानाने नागरिकांना संस्था व संघ स्थापन करण्याचा अधिकार दिलेला आहे. व्यक्तीच्या विकासासाठी व सामाजिक विकासासाठी अशा गोष्टीची गरज असते. पाश्चिमात्य देशामध्ये हा अधिकार मिळण्यासाठी नागरिकांना फार संघर्ष करावा लागला. मात्र भारतामध्ये तो मूलभूत अधिकार म्हणून व्यक्तीला मिळाला. सार्वजनिक सुव्यवस्था आणि नितीमता या दृष्टीने नागरिकांकडून या हक्काचा गैरवापर होऊ नये म्हणून सरकारकडून काही बंधने घातली जातात. सहकारी संस्था काढण्याचा व्यक्तीला अधिकार आहे अशी तरतूद ९७ व्या घटनादुरुस्तीने २०११ साली केली. राजकीय पक्ष, सांस्कृतिक मंडळे, व्यापारी संघटना, कामगार संघटना, भागीदारी संस्था व कंपन्या इ. प्रकारच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक संघटना स्थापण्याचा अधिकार भारतीय नागरिकांना आहे.

(४) भारतीय नागरिकांना भारताच्या कोणत्याही प्रदेशात मुक्तपणे संचार, करण्याचे म्हणजेच हिंडण्या-फिरण्याचे स्वातंत्र्य बहाल केलेले आहे. या अधिकारामुळेच व्यक्तीस्वातंत्र्याची प्रचिती आपणाला येते. हा अधिकार मर्यादित आहे. जनहिताच्या व मागसलेल्या जातींच्या हिताच्या दृष्टीने शासन काही बंधने घालू शकते. उदा. - संसर्गजन्य रोग्याला संचार करण्यापासून शासन बंधन घालू शकते. तसेच वन्य जाती जमातीच्या प्रदेशामध्ये जावुन त्या लोकांची फसवणूक होऊ नये म्हणून सरकार बंधने निर्माण करु शकते.

(५) भारताच्या राज्यक्षेत्राच्या कोणत्याही भागात राहण्याचा व स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य कलम १९(इ) नुसार दिलेले आहे. परंतु या अधिकारावरही बंधने घालता येतात. उदा. - एक म्हणजे सर्वसाधारणपणे सार्वजनिक हितांच्या वृद्धीसाठी तसेच अनुसूचित जाती-जमातीच्या हितासाठी या अधिकारावर बंधने सरकार घालु शकते. दुसरे म्हणजे जम्मू-काश्मिर, नागालँड व मिझोरम तसेच वन्यजाती प्रदेशात निवारासंबंधी बंधने आहेत.

(६) कोणताही व्यवसाय, व्यापार, धंदा करण्याचे स्वातंत्र्य संविधानाने जनतेला बहाल केले आहे. मात्र साधारण जनतेच्या हिताच्या दृष्टीने या अधिकारावर ही काही बंधने येतात. उदा. - (अ) एखाद्या व्यवसायासाठी तांत्रिक किंवा व्यावसायिक पात्रता लादता येते.

(ब) धंदा, व्यवसाय सार्वजनिक दृष्ट्या महत्त्वाचा असेल तर शासनाला अंशत: किंवा पूर्णता एकाधिकार प्राप्त करता येतात. मोतीलाल विरुद्ध उत्तर प्रदेश या केसच्या निर्णयावरुन संविधान संशोधन करुन सरकारने उद्योगधंदे स्वत:कडे घेण्याचा कायदा केला, त्यामुळेच मोटार वाहतूक, बॉक्साईड, वीज, खाणी वगैरे उद्योगांचे राष्ट्रीयकरण झाले.

वरील वेगवेगळ्या प्रकारे कलम मध्ये व्यक्तीला स्वातंत्र्ये व त्यावर काही प्रमाणात बंधने घालण्यात आली.

संविधानाच्या कलम २०, २१ व २२ नुसार १९ व्या कलमात सांगितलेल्या ६ स्वातंत्र्याचे संरक्षण नागरिकांना बहाल केले आहेत.

☛ **कलम २० नुसार :**

जोपर्यंत प्रचलित कायद्यानुसार गुन्हा झाला आहे. असे सिद्ध होत नाही. तो पर्यंत व्यक्तीला अपराधी म्हणून शिक्षा देता येणार नाही. एकाच गुन्ह्यासाठी एकच शिक्षा दिली जाईल जादा वेळा शिक्षा दिली जाणार नाही. कोणत्याही व्यक्तीवर स्वत: विरुद्ध साक्ष देण्याची जबरदस्ती करता येणार नाही. प्रचलीत कायद्याने सांगितलेल्या शिक्षेपेक्षा जास्त शिक्षा व्यक्तीला देता येत नाही.

☛ **कलम २१ नुसार :**

संविधानाने किंवा कायद्याने ठरवून दिलेल्या पद्धतीशिवाय कोणाही व्यक्तीचे जीवन स्वातंत्र्य किंवा वैयक्तिक स्वातंत्र्य अन्य तऱ्हेने हिरावून घेतले जाणार नाही. जपान व अमेरिका या देशातील संविधानाच्या आधारावरुन ही तरतूद भारतीय संविधानात घेतली आहे.

☛ **कलम २२ नुसार :**

प्रतिबंधक स्थानबद्धता कायद्याची तरतूद केली आहे. प्रतिबंधक स्थानबद्धता कायदा सर्वसाधारण आणि संकटकालीन परिस्थितीत लागू करण्यात येतो. जगात इतर ठिकाणी असा कायदा नाही. इंग्रजी राजवटीमध्ये व्यक्तीला कारण न दाखविता स्थानबद्ध केले जाई. 'जाणून बुजून असंवैधानिक मार्गाचा वापर करणाऱ्या व्यक्तींना स्थानबद्ध करण्यासाठीच हा कायदा आवश्यक ठरतो.' असे मत मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर यांनी व्यक्त केले. १९५० साली संसदेने तेलंगणमधील आंदोलन आणि तेथील अस्थिर परिस्थिती विचारात घेऊन प्रतिबंधक स्थानबद्धतेचा कायदा केला. व्यक्ती स्वातंत्र्याच्या दृष्टीकोनातून विचार करता हा कायदा अतिशय घातक आहे. ब्रिटिश राजवटीमधील हा कायदा तसाच चालु ठेवणे चुकीचे आहे. परंतु कोणत्याही गोष्टीचा आपण दोन्ही दृष्टीकोनातून विचार केला पाहिजे. जर जाणूनबुजून असंवैधानिक मार्गाचा अवलंब करणाऱ्या व्यक्तींना स्थानबद्ध करण्यासाठीच हा कायदा आवश्यक ठरतो.

### ३. शोषणाविरुद्ध / पिळवणुकीविरुद्ध हक्क (Right Against Exploitation) (कलम २३, २४) :

संविधानातील कलम २३ नुसार : मानवांची विक्री आणि वेठबिगार बंदी घातली आहे. भारतामध्ये फार पूर्वीपासून वेठबिगारी व देवदासी पद्धती होती. अशा पद्धतीमुळे दलित व मागासवर्गीय जाती-जमातींच्या लोकांचे आर्थिक व सामाजिक शोषण होत असे. अशा प्रकारच्या पद्धती बंद करण्यासाठीच हा कायदा करण्यात आला. गुलामगिरीच्या प्रथेबरोबरच वेश्याव्यवसायालाही या कलमामुळे पायबंद झाला.

☛ **कलम २४ नुसार :**

१४ वर्षाच्या आतील मुलामुलींना खाणी किंवा धोक्याच्या ठिकाणी काम करण्यास बंदी घातली.

सार्वजनिक कार्यासाठी किंवा देशसेवेसाठी नागरिकांकडून राज्य सक्तीने काम करवून घेऊ शकते. भारतात खऱ्या अर्थाने, लोकशाही राज्य नागरिकांकडून सक्तीने काम करवून घेऊ शकते. भारतामध्ये चांगल्या प्रकारची लोकशाही निर्माण करण्यासाठी राज्य नागरिकांना सक्तीने काही सेवा करण्यास भाग पाडेल. शोषणाविरुद्धच्या किंवा पिळवणूकी विरुद्धचा हक्क भारतात कल्याणकारी व समतेचे राज्य निर्माण करण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे.

### ४. धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क (Right to Freedom of Religion) (कलम २५ ते २८) :-

भारतीय संविधानातील कलम २५ ते २८ मध्ये व्यक्तीच्या धार्मिक स्वातंत्र्याची तरतूद केली आहे.

☛ **कलम २५ नुसार :**

सदसद् विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य आणि धर्माचे मुक्त प्रकटीकरण आचरण व प्रचार करण्याचे स्वातंत्र्य आहे. या प्रमाणे सर्व व्यक्तींना सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमता व शांतता कायम राहील अशा प्रकारे धर्माचरण करण्याचा मुलभूत हक्क आहे. धर्मामुळे लोकांमधील ऐक्य लोप पावते ह्याची जाणीव संविधानकर्त्यांना होती. कारण पाकिस्तानची निर्मिती धर्मावर आधारित झाली म्हणून त्यांनी धर्म ही व्यक्तीची वैयक्तिक बाब ठरविली. सामाजिक कल्याणाच्या दृष्टिकोनातून समाजसुधारणेचे कायदे सरकार करु शकते. उदा. - हिंदूंची देवालये सर्व जाती आणि जमातींच्या लोकांसाठी खुली केली.

☛ **कलम २६ नुसार :**

सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता व शांतता यांचा भंग होणार नाही अशा प्रकारे धर्मसंस्थेला किंवा धार्मिक विभागांना संस्था स्थापन करुन चालण्याचा, धार्मिक बाबतीत आपल्या व्यवहारांची

व्यवस्था राखण्याचा व स्थावर व बिगर स्थावर संपत्ती मिळवण्याचा व मालकी हक्क प्रस्थापित करण्याचा आणि कायद्याप्रमाणे त्याची व्यवस्था राखण्याचा अधिकार आहे.

☛ **कलम २७ नुसार :**

कोणत्याही धर्माच्या प्रचारासाठी सक्तीने पैसे गोळा करण्यावर कायद्याने बंदी आहे. असे या कलमात स्पष्ट केले आहे.

☛ **कलम २८ नुसार :**

संपूर्णपणे सरकारी अनुदानातून चालणाऱ्या शिक्षणसंस्थेत कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही कोणत्याही प्रकारचे सरकारचे अनुदान नसणाऱ्या शिक्षण संस्थांमधून धार्मिक शिक्षण देण्यास कोणतीही हरकत नाही. मात्र असे शिक्षण घेतले पाहिजे अशी सक्ती कोणावरही करता येणार नाही.

धर्मनिरपेक्ष राज्य हे उद्दिष्ट संविधानाने मान्य केल्यामुळे राज्याकडून धार्मिक स्वातंत्र्यावर मर्यादा घालण्यात आलेल्या आहेत.

## ५. सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क (Cultural & Educational Right) (कलम २९ ते ३०) :-

भारतीय संविधानातील कलम २९ व ३० मध्ये भारतातील प्रत्येक व्यक्तीला व व्यक्तीसमुहाला सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क बहाल करण्यात आले आहेत. ते पुढील प्रमाणे -

☛ **कलम २९ नुसार :**

भारताच्या कोणत्याही प्रदेशात राहणाऱ्या समुहाला स्वत:ची विशिष्ट भाषा, लिपी, संस्कृती असेल तर ती जतन करण्याचा हक्क आहे. त्याच्यावर दुसरी संस्कृती लादता येणार नाही. वंश, जात, भाषा यावरुन कोणासही शासकीय अनुदानित शैक्षणिक संस्थातून प्रवेश नाकारला जाणार नाही. याचा अर्थ कलम २९ अल्पसंख्यांक वर्गाच्या हिताचे संरक्षण करीत आहे.

☛ **कलम ३० नुसार :**

धार्मिक व भाषिक अल्पसंख्यांकांना त्याच्या आवडीप्रमाणे शिक्षणसंस्था स्थापन करुन त्यांचे प्रशासन चालवण्याचा अधिकार आहे. अशा शिक्षणसंस्था भाषिक किंवा धार्मिक अल्पसंख्यांकांच्या आहेत म्हणून राज्य त्यांना अनुदान नाकारणार नाही.

भारतात अनेक स्वरुपाचे अल्पसंख्यांकांचे समुह आहेत. त्यांचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी संविधानाने सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क दिलेले आहेत. त्यामुळेच वैशिष्टपूर्ण वेगळेपण सुरक्षित ठेवून आपल्या संस्कृतीची जोपासना करु शकतात.

शिक्षण संस्थामध्ये प्रवेश देताना लिंगावर आधारित भेदभाव करणे संविधान विरोधी कृत्य नाही. शिस्तीच्या आधारावर एखाद्या विद्यार्थ्याला प्रवेश नाकारता येतो. असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने 'शांताबाई विरुद्ध मद्रास विद्यापीठ' या खटल्यात दिला.

## ६. घटनात्मक उपायांचा हक्क (सनदशीर इलाजांचा अधिकार) (Right to Constitutional Remedies) (कलम –३२) :–

भारतातील प्रत्येक नागरिकाला वरील प्रकारचे जे मूलभूत अधिकार देण्यात आले आहेत त्याचे संरक्षण करण्यासाठी घटनात्मक उपायययोजनेचा मूलभूत अधिकारांची कलम ३२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाला आणि २२६ कलमाप्रमाणे उच्च न्यायालयांना मूलभूत हक्कावर गदा किंवा आक्रमण होत असेल तर नागरिकांच्या हक्कांसाठी नागरिक जेव्हा न्यायव्यवस्थेकडे अर्ज करते त्यावेळी न्यायालयाला पाच प्रकारचे आदेश काढता येतात.

### (अ) बंदी प्रत्यक्षीकरण (Habeas Corpus) :-

कोणत्याही व्यक्तीला बेकायदेशीरपणे अटक झाली असेल तर आपल्या अटकेच्या कारणासंबंधी विचारणा करण्याचा अर्ज ती व्यक्ती स्वत: अगर त्याच व्यक्तीचे नातलग किंवा मित्र करु शकतात. हा अर्ज उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयाकडे करता येतो त्यास बंदी प्रत्यक्षीकरण असे म्हणतात. 'हेबियस कॉर्पस' हा लॅटिन शब्द आहे. त्याचा अर्थ शरीराने हजर रहा असा होतो. हा कायदा इंग्लंडमध्ये १६७९ साली करण्यात आला व त्यानंतर अमेरिकेत हा कायदा करण्यात आला.

बंदी प्रत्यक्षीकरण हा अर्ज न्यायालयाने मान्य केल्यास अटक झालेल्या व्यक्तीला २४ तासाच्या आत न्यायालयासमोर हजर करावे लागते. व्यक्तीची अटक बेकायदेशीर आहे असे न्यायालयाद्वारे सिद्ध झाल्यास व्यक्तीची तात्काळ सुटका करण्याचा आदेश न्यायालय देते. थोडक्यात बंदी प्रत्यक्षीकरणाच्या अर्जामुळे व्यक्तीला सरकारकडून बेकायदेशीररित्या अटक करुन ठेवता येत नाही.

### (ब) परमादेश (Mandamus) :-

'मॅडमस' हा लॅटिन शब्द असून 'आम्ही आज्ञा देतो' असा त्याचा अर्थ आहे. शासन, संस्था किंवा व्यक्ती आपल्या कर्तव्याचे पालन करीत नसेल आणि त्यामुळे व्यक्तीवर अन्याय झाला असेल तर त्या अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी अन्यायग्रस्थाला असा अर्ज सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयाकडे करावयाचा असतो. हा अर्ज न्यायालयाला मान्य झाल्यास तो अन्याय ताबडतोब नाहीसा करावा असा आदेश न्यायालय शासन, संस्था किंवा व्यक्तीला देते. यालाच परमादेश असे म्हणतात. या आदेशाचा उपयोग सार्वजनिक कर्तव्य पार पाडण्यासाठी केला जातो.

**(क) प्रतिषेध (Prohibition) :-**

एखादा खटला कनिष्ठ न्यायालयात चालू असताना काही अनियमित कारणामुळे निर्णय घेणे इष्ट वाटत नसल्यास किंवा त्या न्यायालयात तो खटला चालविण्याचा कायदेशीर अधिकार नसल्यास, अशा खटल्यासंबंधीची सुनावणी तहकुब करावी असा विनंती अर्ज वरिष्ठ न्यायालयाकडे व्यक्तीला करता येतो. अशा अर्जाचा वरिष्ठ न्यायालय विचार करते. जर तो खटला कनिष्ठ न्यायालाच्या अधिकार कक्षेबाहेरचा आहे अशी वरिष्ठ न्यायालयाची खात्री झाल्यास कनिष्ठ न्यायालयातील तो खटला व त्याची सुनावणी बंद करा असा आदेश वरिष्ठ न्यायालय देते. त्याला प्रतिषेध असे म्हणतात.

कनिष्ठ न्यायालयाने त्याच खटल्यावरील आपला निर्णय बदलविला असेल किंवा रद्द केला असेल तर प्रतिषेध अर्ज करता येतो. तसेच संबंधित खटल्यामध्ये न्यायाधिशाचे हितसंबंध (वादी किंवा प्रतिवादी नातेवाईक असल्यास) गुतले असतील तरीही प्रतिषेध अर्ज व्यक्तीला करता येतो.

**(ड) अधिकार पृच्छा (Quo-Warranto) :-**

सरकारी अथवा सार्वजनिक पदावर एखादी व्यक्ती अधिकार नसताना ते पद भूषवित असेल तर त्याविरुद्ध व्यक्तीला उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयाकडे अर्ज करता येतो. आपण कोणत्या कायद्यानुसार अधिकारपदावर आहात? अशी विचारणा न्यायालय करते. न्यायालय अशा अर्जाच्या बाबतीत संपूर्ण चौकशी करुनच आदेश काढू शकते. खाजगी व्यक्ती किंवा खाजगी संस्था यांच्या बाबतीत अधिकारपृच्छा हा अर्ज करता येत नाही. तसेच अर्जदार व्यक्तीचा त्या पदाशी हितसंबंध असला पाहिजे.

**(इ) उत्प्रेषण (Certiorari) :-**

जेव्हा एखादा खटला कनिष्ठ न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राबाहेरचा असतानाही तो खटला त्या न्यायालयात चालवला जातो त्यावेळी वरीष्ठ न्यायालय कनिष्ठ न्यायालयाला आदेश काढून खटल्याच्या संदर्भातील कागदपत्रे व पुरावे वरिष्ठ न्यायालयाकडे पाठवून द्यावीत असा आदेश वरिष्ठ न्यायालय देते. यालाच 'उत्प्रेषण किंवा प्राकर्षण' असे म्हणतात.

प्रतिषेध व उत्प्रेषण हे दोन्ही अर्ज खटल्यांच्या हस्तांतरणासाठी उपयोगात आणले जात असले तरी उत्प्रेषणाचा अर्ज खटल्याचा निर्णय देण्यात आल्यानंतर उपयोजनात आणता येतो. तर प्रतिषेध हा अर्ज खटला प्रलंबित असतांना उपयोजनात आणता येतो.

'घटनात्मक उपाययोजनेचा अधिकार' हा संविधानाचा 'आत्मा व हृदय' आहे असा उल्लेख डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला. कारण कायदेमंडळ किंवा कार्यकारीमंडळ यांच्याकडून व्यक्तीच्या अधिकारावर आक्रमण झाल्यास न्यायालयात त्याच्या विरुद्ध दाद मागण्याची तरतुद कलम

३२ मध्ये आहे. भारतीय संविधानाने घटनात्मक उपाययोजना अधिकार सर्वोच्च व उच्च न्यायालयाला दिलेला आहे.

☛ **कलम ३३ नुसार :**

गुप्तचर यंत्रणा, सशस्त्र दले, निमलष्करी दले, पोलिस दले इत्यादींना मूलभूत हक्क लागू करताना त्यामध्ये फेरबदल करण्याचा अधिकार संसदेला आहे. लष्करी कायदा (१९५०), हवाई दल कायदा (१९५०), नौदल कायदा (१९५०), पोलिस दल कायदा (१९६६) व सीमासुरक्षा दल कायदा असे कायदे निर्माण करुन वरील दलांच्या सदस्यांना प्राप्त असलेल्या मूलभूत हक्कांवर निर्बंध लादण्याचे किंवा त्यांना मर्यादित करण्याचा अधिकार कलम ३३ नुसार संसदेला आहे. मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसंदर्भात सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांच्या आदेशांपासून कोर्ट मार्शललादेखील कलम ३३ नुसार संसदेच्या कायद्यासंदर्भात वगळले जाऊ शकते.

☛ **कलम ३४ नुसार :**

भारतातील कोणत्याही भूप्रदेशात मार्शल-लॉ कार्यवाहीत असेल तर कलम ३४ नुसार त्या ठिकाणच्या नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर निर्बंध येतात. एखाद्या भूप्रदेशातील कायदा आणि सुव्यवस्था पुनर्स्थापित करण्यासाठी मार्शल-लॉ कायदा घोषित केला जातो. मार्शल-लॉ फक्त त्या प्रदेशातील नागरिकांच्या मूलभूत हक्कावर परिणाम करतो. शासन आणि सामान्य कायदा न्यायालये तहकुब होतात. ब्रिटिश कॉमन-लॉ यावरुन भारताने मार्शल-लॉ ही संकल्पना घेतली आहे. भारतीय संविधानात मार्शल-लॉ ची व्याख्या नाही परंतु मार्शल-लॉ म्हणजे 'लष्करी राजवट' होय.

☛ **कलम ३५ नुसार :**

काही विशिष्ट मूलभूत हक्कांना परिणामकारकता देण्यासाठी कायदा करण्याचा अधिकार घटकराज्य विधिमंडळाला नसून तो संसदेला आहे. यामुळे संबंधित मूलभूत हक्कांच्या स्वरुपाबाबत आणि त्यांच्या उल्लंघनाबाबतची शिक्षा किंवा दंड याबाबतीत संपूर्ण देशात एकवाक्यता निर्माण होण्याची हमी मिळते. कलम ३५ मध्ये या संदर्भात तरतुदी आहेत :-

(१) घटकराज्य, केंद्रशासित प्रदेश, पंचायतराज व्यवस्था व इतर अधिसत्तेतील विशिष्ट रोजगार व नियुक्त्यांसाठी 'रहिवास' ही अट बंधनकारक करणे (कलम १६) मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसाठी आदेश निर्देश व सर्व प्रकारचे घटनात्मक उपायाचे अर्ज जारी करण्याबाबत सर्वोच्च व उच्च न्यायालयाबरोबरच इतर कनिष्ठ न्यायालयांना सक्षम बनविणे.

(२) भारतीय नागरिकांना दिलेल्या मूलभूत हक्कांतर्गत गुन्हा म्हणून जाहिर केलेल्या कृतींबाबत शिक्षा नमूद करण्यासाठी फक्त संसदेला कायदा करण्याचा अधिकार आहे.

वरील विषयांपैकी काही विषय राज्य सूचीमध्ये येत असले तरीसुद्धा त्याबाबतीत कायदा करण्याचा अधिकार कलम ३५ नुसार संसदेला आहे.

## ❒ मूलभूत हक्कांचे मूल्यमापन :–

व्यक्तीच्या सर्वांगिण विकासासाठी आणि लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी संविधानाने नागरिकांना दिलेले मूलभूत हक्क आवश्यक व उपयुक्त ठरतात. या मूलभूत हक्कांनी देशामध्ये लोकशाही व्यवस्थेचा पाया पक्का केला आहे. समाजातील अल्पसंख्यांक आणि दुर्बल समुहांच्या हितसंबंधाचे संरक्षण करुन. भारतात 'कायद्याचे राज्य' निर्माण करण्यासाठी सहाय्यक ठरतात. मूलभूत हक्क व्यक्तीप्रतिष्ठा व सन्मान यांची हमी देऊन व्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षक बनतात. भारतात विविध जाती धर्म असले तरी धर्मनिरपेक्ष तत्त्वामुळे भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र अशी भारताची प्रतिमा आहे. लोकांच्या राजकीय आणि प्रशासकीय प्रक्रियेमधील सहभागाला मूलभूत हक्क सुकर बनवितात. तसेच शासनाच्या सर्वकषवादी अधिसत्तेवर नियंत्रण ठेवतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सामाजिक समता व सामाजिक न्यायाची आधारशीला निर्माण करण्याचे कार्य मूलभूत हक्क करतात.

वरील प्रकारे मूलभूत हक्क चांगल्या प्रकारे व्यक्ती विकास साधन असले तरी काही महत्त्वाच्या हक्कांचा समावेश केला नाही. उदा.– काम मिळवण्याचा हक्क, उपजिविकेचा हक्क, बेकारी, वृद्धापकाळ, आजारीपण, अपंगत्व अशा परिस्थित मदत मिळविण्याचा हक्क. परंतु यातील काही हक्कांचा समावेश राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये केलेला आहे. मूलभूत अधिकारांवर मोठ्या प्रमाणात बंधने व मर्यादा घातलेल्या आहेत. परिणामी मूलभूत हक्कांचे स्वरुपच बदलून गेले आहे. डॉ. एम. व्ही. पायली यांच्यामते ''मूलभूत हक्कांच्या प्रकरणाला मूलभूत अधिकारावरील मर्यादा'' असे शिर्षक देणे योग्य ठरेल. आणीबाणीच्या काळात मूलभूत अधिकार स्थगित होतात. परिणामी मूलभूत हक्कांच्या संरक्षणाबाबत व्यक्तीला न्यायालयात जाता येत नाही. आणीबाणीच्या तरतुदीमुळे आपण हुकूमशाही निर्माण करुन नागरिकांचे हक्क व स्वातंत्र्य धोक्यात आणीत आहोत असे ह. वि. कामथ यांनी घटनासमितीची चर्चा चालू असताना म्हटले.

मूलभूत हक्कांच्या संदर्भात पंडित नेहरुंनी असे म्हटले की, 'कोणत्याही तात्पुरत्या अडचणींच्या दृष्टीकोनातून मूलभूत अधिकारांचा विचार करता कामा नये. या अधिकारांना संविधानात शाश्वत स्थान मिळेल या दृष्टीकोनातून त्यांच्याकडे पाहिले पाहिजे.' डॉ. आंबेडकरांनी मूलभूत हक्कांच्या संदर्भात म्हटले की, 'मानवी हक्कांचा जाहीरनामा हा आपल्या विचारांचा एक अविभाज्य भाग बनवलेला आहे. त्या जाहिरनाम्यातील तत्त्वे आपल्या दृष्टीकोनात रुजून शाश्वत बनलेली आहेत.' कल्याणकारी

राज्याच्या निर्मितीसाठी मूलभूत हक्कांची आवश्यकता असते. व्यक्तीमत्त्वाचा विकास आणि समाजहित या दोन्ही गोष्टी मूलभूत अधिकारांमुळे साध्य होऊ शकतात.

### स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१

❒ **एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. कोणत्या दिवशी पंडित नेहरुंनी घटनापरिषदेत ध्येय आणि उद्देशाचा ठराव मांडला?

२. कोणत्या साली ४२ वी घटना दुरुस्ती झाली?

३. ४२ व्या घटनादुरुस्तीने कोणती दोन उद्दिष्टे नव्याने सरनाम्यात समाविष्ट केली?

४. सध्या भारतीय संविधानातील मूलभूत हक्क किती आहेत?

५. कोणत्या कलमानुसार धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार भारतीय नागरिकांना दिला आहे?

६. घटनात्मक उपायाचा अधिकार हा संविधानाचा आत्मा आहे असे कोण म्हटले?

७. नागरिकांच्या मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी न्यायालय किती प्रकारचे आदेश काढते?

## २.२.३ राज्यांच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे (Directive Principles of State Policy) (कलम ३६ ते ५१)

भारतीय संविधानातील चौथ्या भागात कलम ३६ ते ५१ मध्ये राज्यांच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे/नितिनिर्देशक तत्त्वे यांची तरतुद केली आहे. मार्गदर्शक तत्त्वांना नीतिनिर्देशक तत्त्वे म्हणूनही ओळखले जाते. राज्याचा सर्वांगिण विकास होण्यासाठी शासनकर्त्यासमोर निश्चित व आदर्श असे ध्येयधोरण असावे लागते. कल्याणकारी राज्याच्या निर्मितीसाठी राज्याने कोणत्या मार्गाचा अवलंब करावा हे सांगण्याचे कार्य मार्गदर्शक तत्त्वे करतात. राज्याचे धोरण ठरवताना योग्य मार्ग कोणता आहे हे सांगण्याचे महत्त्वपूर्ण कार्य मार्गदर्शक तत्त्वे करतात. मूलभूत हक्कांप्रमाणेच मार्गदर्शक तत्त्वे ही नागरिकांच्या विकासासाठी आवश्यक व महत्त्वाची मानली जातात. संविधान निर्मात्यांनी नागरिकांच्या हक्कांची तरतुद करताना मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे असा फरक केला. मूलभूत हक्क न्यायप्रविष्ट तर मार्गदर्शक तत्त्वे न्याय प्रविष्ट नाहीत म्हणजेच वैकल्पिक आहेत. गांधी विचारसरणी, समाजवादी विचारसरणी व उदारमतवाद यांचा मार्गदर्शक तत्त्वावर प्रभाव पडलेला दिसतो.

भारतासारख्या सामाजिक व आर्थिक विषमता असलेल्या समाजात नागरिकांना केवळ हक्क बहाल करणारी राजकीय व औपचारिक नोकरशाही व्यवस्था अर्थपूर्ण ठरणार नाही याचे भान संविधानकर्त्यांना होते. व्यक्तीच्या सर्वांगिण विकासासाठी जसे मूलभूत हक्क महत्त्वाचे त्याचप्रकारे समाजहित, दुर्बल घटक व मागासलेले समुह यांच्याही हिताची हमी देणारी व वेळ पडल्यास व्यक्ती

स्वातंत्र्यावर काही मर्यादा घालणारी मार्गदर्शक तत्त्वे संविधानात नमुद करण्यात आली. आयर्लंडच्या संविधानातून चांगल्या तत्त्वाला भारताच्या संविधानात मार्गदर्शक तत्त्वांचा स्विकार करण्यात आला. असे असले तरी भारतीय समाजवास्तवाचे तितकेच महत्त्वाचे होते.

मार्गदर्शक तत्त्वांच्या स्वरुपाविषयी घटनासमितीत भाषण करताना डॉ. आंबेडकर असे म्हणतात की, ''१९३५ च्या कायद्यानुसार गव्हर्नर जनरल आणि प्रांतांचे गव्हर्नर ह्यांना ब्रिटिश सरकारतर्फे जे सूचनापत्र पाठविले जात असे त्याचेच दुसरे नाव म्हणजे 'मार्गदर्शक तत्त्वे' होय. यामध्ये फरक एवढाच आहे की, त्यावेळी सूचनापत्र कार्यकारी सत्तेला उद्देशून पाठविण्यात येत असे, तर आज ते सूचनापत्र कार्यकारी मंडळ आणि विधिमंडळ या दोहोंना उद्देशून सांगण्यात आले आहे.'' भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्त्वे पुढील प्रमाणे आहेत.

## १. आर्थिक तत्त्वे :-

☛ **कलम ३७ नुसार :**

राज्याने लोककल्याणाच्या संवर्धनासाठी समाजव्यवस्था प्रस्थापित करणे. (४४ वी घटनादुरुस्ती)

☛ **कलम ३९ नुसार :**

पुरुष व स्त्री नागरिकांना उपजीविकेचे पुरेसे साधन मिळवण्याचा समान अधिकार असावा. जनहिताला उपकारक अशा पद्धतीने भौतिक साधनसंपत्तीचे अधिकार निमंत्रण व वाटप व्हावे. स्त्री-पुरुष यांना समान कामासाठी समान वेतन मिळावे. तसेच नागरिकांना आर्थिक गरजेपोटी त्याच्या वयाचा व ताकदीचा विचार करुनच त्यांना काम देण्यात यावे.

☛ **कलम ४१ नुसार :**

नागरिकांना कामाचा शिक्षणाचा, बेकारी वार्धक्य, आजार व अपंगता अशा पीडित लोकांना सरकारी मदतीचा अधिकार मिळावा.

☛ **कलम ४२ नुसार :**

कामाबाबत न्याय व माणुसकीची परिस्थिती यासारखे वातावरण राहावे तसेच प्रसूतिसाहाय्यासाठी सरकारने योग्य व्यवस्था निर्माण करावी.

☛ **कलम ४३ नुसार :**

शेती, उद्योगधंदे व इतर क्षेत्रातील कामगारांना काम व निर्वाह वेतन मिळवून देण्यासाठी राज्याने कायदा करावा. तसेच ग्रामीण भागात वैयक्तिक किंवा सहकारी तत्त्वावर पुढील कुटिरोद्योगांचे संवर्धन यासाठी सरकार प्रयत्नशिल राहिल.

☛ **कलम ४३ (क) नुसार :**

उद्योग धंद्याच्या व्यवसायात कामगारांना सहभागी होता यावे या करता राज्य योग्य ते कायदे करील.

☛ **कलम ४८ नुसार :**

नवनविन व शास्त्रीय पद्धतीने शेती व पशुपालन यांची चांगल्याप्रकारे व्यवस्था करण्यासाठी सरकार प्रयत्नशील राहिल. गाईवासरे यांची चांगल्याप्रकारची पैदास जतन करुन त्यांच्या कत्तलीस बंदी घालणे यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सरकार करील.

☛ **कलम ४८ (क) नुसार :**

पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे आणि वने व वन्य जीवसृष्टी यांचे रक्षण करणे (४२ वी घटनादुरुस्ती)

## २. सामाजिक तत्त्वे :-

☛ **कलम ४५ नुसार :**

सहा वर्षापेक्षा कमी वयाच्या बालकांची प्रारंभिक बाल्यावस्थेतील देखभाल आणि त्याच्या शिक्षणाची तरतुद केली. (८६ वी घटनादुरुस्ती - २००२ साल)

☛ **कलम ४६ नुसार :**

अनुसूचित जाती व जमाती आणि दुर्बल घटक यांना शिक्षण उपलब्ध करुन देणे व त्यांच्या आर्थिक हितसंबंधाचे रक्षण करणे.

☛ **कलम ४७ नुसार :**

पोषणमान व राहणीमान उंचावून सार्वजनिक आरोग्य सुधारणे हे राज्याचे आद्यकर्तव्य आहे.

☛ **कलम ४९ नुसार :**

संसदेच्या कायद्याप्रमाणे राष्ट्रीय महत्त्वाची म्हणून जाहिर केलेली स्मारके, स्थाने व वास्तू यांचे संरक्षण करणे.

## ३. राजकीय तत्त्वे :-

☛ **कलम ४० नुसार :**

सरकार ग्रामपंचायतीची स्थापना करेल व ती ग्रामपंचायत स्वत:चा राज्यकारभार पाहता येईल अशी व्यवस्था निर्माण करेल.

☛ **कलम ५० नुसार :**

देशांचा विकास करण्यासाठी न्याययंत्रणा किंवा न्यायव्यवस्था शासनयंत्रणा किंवा कार्यकारी यंत्रणेपासून अलग ठेवणे.

## ४. न्यायालयीन तत्त्वे :–

☛ **कलम ३९ (क) नुसार :**

समान न्याय व मोफत कायदेविषयक सहाय्य सरकार उपलब्ध करुन देईल.

☛ **कलम ४४ नुसार :**

भारतातील सर्व नागरिकांकरिता समान नागरी कायदा असावा यासाठी सरकार प्रयत्न करील.

## ५. आंतरराष्ट्रीय संबंध विषयक तत्त्वे :–

राष्ट्राराष्ट्रांमध्ये शांतता व परस्परांविषयी आदर बाळगावा आणि यासर्वांचे संवर्धन व्हावे अशी कलम ५१ मध्ये तरतूद केली आहे.

## ❒ मार्गदर्शक तत्त्वाचे मूल्यमापन :–

### ❀ समर्थन :–

१. ध्येय धोरणासाठी राज्यांना उपयुक्त – सरकारला ध्येयधोरण निश्चित करण्यासाठी उपयुक्त आहेत.

२. मार्गदर्शक तत्त्वांना जनतेचे पाठबळ – मार्गदर्शक तत्त्वांना कायदेशीर मान्यता नसल्यामुळे निरर्थक व निरुपयोगी आहेत असे म्हणणे चुकीचे आहे कारण कोणत्याही कायद्याचा मूलाधार लोकमत हा असतो. त्यामुळे मार्गदर्शक तत्त्वाचा पाया जनता हा आहे.

३. सरकार दुर्लक्षीत करु शकत नाही – संविधानिक तरतुदीनुसार मार्गदर्शक तत्त्वे सरकारवर बंधनकारक नसली तरी सरकार त्याकडे दुर्लक्ष करु शकत नाही कारण – दर पाच वर्षांनी सरकारला मतदानाच्या प्रक्रियेतून निवडून यावे लागते.

४. सरकारी कार्याचे मूल्यमापन करणारी मोजपट्टी म्हणून मार्गदर्शक तत्त्वांना ओळखले जाते.

५. संविधानातील मार्गदर्शक तत्त्वे खऱ्याखुऱ्या लोकशाहीची जनतेला खात्री देतात.

६. शासन व न्यायव्यवस्था यांना स्वतंत्र स्थान निर्माण झाले.

७. मार्गदर्शक तत्त्वांमुळे न्यायालयांना मार्गदर्शन मिळते. त्यामुळे बऱ्याच वेळा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामध्ये मार्गदर्शक तत्त्वांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली आहे.

जमीन सुधारणा कायदा, मागास घटकांसाठी तरतुदी, दुर्बलासाठी कार्य, बालकांचे हक्क, कामगारासाठी कायदे, ग्रामीण विकासासाठी मदत, प्राथमिक शिक्षण मूलभूत हक्क, पर्यावरण संरक्षण कायदा व विकेंद्रीकरण इ. मध्ये मार्गदर्शक तत्त्वांची भूमिका मार्गदर्शक ठरली आहे.

### आक्षेप :–

१. काही टीकाकारांच्या मते कायदेशीर शक्तीचा अभाव असल्यामुळे मार्गदर्शक तत्त्वांचे पालन न झाल्यास न्यायालयात दाद मागता येत नाही.

२. निवडणूकीच्या वेळी भरपूर आश्वासने देऊन जनतेची मते प्राप्त करण्याचा उत्कृष्ट मार्ग आहे.

३. मार्गदर्शक तत्त्वांची सक्ती शासनावर नसल्यामुळे सरकारच्या सोयीनुसार या तत्त्वांचा वापर केला जातो.

४. मार्गदर्शक तत्त्वांमुळे सार्वभौम सत्तेला विरोध होतो. कारण सार्वभौमसत्ता ही श्रेष्ठ असते. त्यामुळे सार्वभौम सत्तेला मार्गदर्शनाची गरज नसते तर तीच स्वत: मार्गदर्शक असते.

५. कायदेशीर दृष्ट्या विचार केल्यास मूलभूत हक्काच्या तुलनेत कमी दर्जाची असतात. असे असले तरी मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वे या दोहोंच्यामुळे नागरिकांचा सर्वांगीण विकास होतो. डॉ. आंबेडकर घटनासमितीत म्हणाले की, ''मार्गदर्शक तत्त्वे राज्याकर्त्यांनी पायदळी तुडवली तर लोक त्यांना पुन्हा राज्यकर्ते म्हणून निवडून देणार नाहीत.'' न्यायमूर्ती छगला म्हणतात, ''मार्गदर्शक तत्त्वांचे पूर्णपणे पालन झाले तर भारत देश पृथ्वीतलावरील स्वर्ग होईल, भारतीय संविधानकर्त्यांचे ते एक स्वप्न होते; म्हणून त्यांचा त्याग करता येणार नाही कारण भारतीयांच्या आशाआकांक्षा सफल करावयाच्या असतील तर मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन होणे आवश्यक आहे.''

## मूलभूत कर्तव्ये (Fundamental Duties) (कलम – ५१ (क) :–

भारताच्या मूळ संविधानात मूलभूत कर्तव्याचा समावेश लिखित स्वरुपात नव्हता. ४२ व्या घटनादुरुस्तीने १९७६ साली मूलभूत कर्तव्याचा समावेश करण्यात आला. हक्क व कर्तव्य एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हक्क हा व्यक्तीचा शासनावर व समाजावर दावा आहे. त्याचप्रमाणे कर्तव्य हा समाजाचा व शासनाचा व्यक्तीवरील दावा आहे. कारण व्यक्तीच्या प्रत्येक हक्कामागे कर्तव्य असते. ४२ व्या घटनादुरुस्तीने १९७६ साली १० मूलभूत कर्तव्यांची कलम ५१ (क) मध्ये

तरतुद केली होती. त्यानंतर २००२ साली ८६ व्या घटनादुरुस्तीने ११ व्या कर्तव्याची ५१ (क) मध्ये तरतुद केली आहे. संविधानातील मूलभूत कर्तव्ये पुढीलप्रमाणे–

१. संविधान, राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीत यांचा मान/आदर राखणे.

२. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील प्रेरक ठरलेल्या उदात्त आदर्शाचे जतन आणि पालन करणे.

३. भारताचे सार्वभौमत्त्व, एकता आणि एकात्मता ह्यांचा सन्मान करणे आणि त्यांचे संरक्षण करणे.

४. देशाचे संरक्षण करणे आणि आवाहन केले जाताच त्याला प्रतिसाद देऊन राष्ट्राची सेवा करणे.

५. भारतामध्ये वर्गविरहित आणि भेदाभेदविरहित बंधुत्व भावना निर्माण करणे आणि स्त्रीयांच्या प्रतिष्ठेला बाधक अशा प्रथा मोडणे.

६. आपल्या देशाची एकात्म संस्कृती आणि गौरवशाली परंपरेचे संरक्षण करणे.

७. जंगले, सरोवरे, नद्या, वन्यपशू या नैसर्गिक संपत्तीचे रक्षण आणि संवर्धन करणे व सजीव प्राण्याबद्दल दयाबुद्धी बाळगणे.

८. वैज्ञानिक दृष्टीकोन, मानवतावाद, ज्ञानार्जन आणि प्रगतीच्या भावनेचा विकास करणे.

९. सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे व हिंसाचारापासून दूर राहणे.

१०. व्यक्तीगत आणि सामुदायिक उत्कर्षाकडे वाटचाल करणे जेणेकरुन राष्ट्राची प्रगती उत्तरोत्तर वाढेल असाच प्रयत्न करणे.

११. पालकाने सहा ते चौदा वयोगटातील आपल्या पाल्याला/अपत्याला शिक्षणाच्या संधी देणे.

❀ **मूल्यमापन :–**

आणीबाणीच्या काळात मूलभूत अधिकार स्थगित होतात तसे मूलभूत कर्तव्य स्थगित होऊ शकतील काय? याचे संविधानामध्ये व घटनादुरुस्तीने उत्तर दिले नाही. मूलभूत कर्तव्याचे स्वरुप मोघम आहे. त्याचा भंग झाला हे निश्चितपणे सांगता येत नाही. देशातील सुमारे ३०% लोक निरक्षर असताना त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्विकार करावा ही अपेक्षा काल्पनिक वाटते. ही मूलभूत कर्तव्याची यादी अपुरी वाटते कारण कर देणे यासारखी नागरिकांची कर्तव्य या यादीत नाही. नागरिकांच्याच कर्तव्यांचा समावेश केला असून राज्याच्या कर्तव्याकडे दुर्लक्ष केले आहे. ४२ व्या घटनादुरुस्तीने मार्गदर्शक तत्त्वांचा राजकीय कार्यासाठी उपयोग करुन मूलभूत अधिकारांचे स्वरुप

अगोदरच संकुचित केले. त्यातच मूलभूत कर्तव्याची भर घालून मूलभूत हक्कांचे उच्चाटन करण्याचा सरकार प्रयत्न करीत आहे असे टिकाकारांचे म्हणणे आहे. अशा पद्धतीने मूलभूत कर्तव्यामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांचा निकाल भविष्यकाळच ठरवेल.

### स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२

❒ **रिकाम्या जागा भरा.**

१. ................ कलमानुसार राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वाचा समावेश केला आहे.

२. ................. नुसार स्त्री-पुरुष यांना समान कामासाठी समान वेतन देण्यात येते.

३. समान नागरी कायदा ................. कलमामध्ये समावेष्ठित केला आहे.

४. मूलभूत कर्तव्याचा समावेश .................. कलमात करण्यात आला आहे.

५. सध्या मूलभूत कर्तव्यामध्ये .................. कर्तव्य आहेत.

## २.२.४ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, बालके व इतर मागास वर्ग यांच्यासाठीच्या भारतीय राज्यघटनेतील तरतुदी

भारतीय राज्यघटनेनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, बालके व इतर मागास वर्ग यासर्व घटकांसाठी अनेक तरतुदी केल्या आहेत. त्याची चर्चा खालीलप्रमाणे करता येईल.

### अ) अनुसूचित जाती व जमाती संदर्भातील तरतुदी

भारतीय संविधानातील कलम १४, १५, १६, ३७, ४०, २७५, ३२४, ३३०, ३३१, ३३४, ३३५, ३३९, ३४०, ३४१ व ३४२ मार्गदर्शक तत्वातील कलम ४६ यामध्ये अनुसूचित जाती व जमातीबाबत आरक्षणाच्या धोरणाच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. या तरतुदीच्या आधारे अनुसूचित जाती-जमातीचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकास व्हावा व समताधिष्ठीत समाजरचना निर्माण व्हावी हा उद्देश आहे.

कलम १४ नुसार कायद्यापुढे सर्व जन समान आहेत. कलम १५ भेदभाव करण्यास मनाई आहे. कलम १६ नुसार सार्वजनिक सेवा व योजनामध्ये समान संधी दिली जाईल, परंतु १९५६ ला सातव्या घटनादुरुस्तीने प्रत्येक घटक राज्याला राज्यक्षेत्रात वास्तव्याच्या आधारे ठराविक जाती-जमातींना स्वतंत्र आरक्षण देण्यासाठी कायदा करू शकते. राज्याच्या सेवामध्ये ज्या नागरिकांना मागासप्रवर्गांना पर्याप्त प्रतिनिधीत्व नाही, अशा वर्गासाठी नियुक्ती किंवा पदे राखून ठेवण्यासाठी तरतूद करू शकते. राज्याच्या नियंत्रणाखालील क्षेत्रामध्ये अनुसूचित जाती-जमातींना पर्याप्त प्रतिनिधीत्व देण्यात आलेले

नसेल तर पदोन्नती देण्यासंदर्भात आरक्षण देऊ शकते. तसेच एखाद्या वर्षी आरक्षित ठेवलेल्या जागा भरल्या न गेल्यास त्या पुढीलवर्षी भरल्या जातील. कलम ३७ मध्ये सामाजिक न्यायासाठी राज्याने पार पाडावयाचे कर्तव्य सांगितले आहे तर कलम ३८ नुसार राज्य लोककल्याणासाठी संवर्धनासाठी प्रयत्नशील असेल. कलम ४७ नुसार राज्यास अनुसूचित जाती व जमातीचे राहणीमान व पोषणमान उंचावण्यासाठी आरक्षणाची स्वतंत्र तरतूद करता येऊ शकेल. कलम ३३० नुसार लोकसभेध्ये अनुसूचित जाती- जमातीसाठी जागा राखून ठेवण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. कलम ३३२ नुसार विधानसभेत जागा राखून ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे. कलम ३३० व ३३२ नुसार लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसूचित जाती व जमाती यांना राजकीय आरक्षण घटनात्मक प्राप्त झाले आहे. कलम ३३५ नुसार संघराज्यातील सर्व सेवा व पदावर हक्क सांगण्याचा अधिकार अनुसूचित जाती-जमातींना प्राप्त झाला आहे. तर कलम ३३८ व ३३९ नुसार अनुसूचित जाती-जमातीसाठी राष्ट्रीय आयोग स्थापण्याची जबाबदारी राष्ट्रपतींना दिलेली आहे व ३४० कलमानुसार हा आयोग भारताच्या राज्यक्षेत्रातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाच्या स्थितीच्या अन्वेषनाचे कार्य करेल व आपला अहवाल राष्ट्रपतींना सादर करेल. राष्ट्रपती तो संसदेच्या दोन्ही सभागृहासमोर ठेवण्याची व्यवस्था करेल.संविधानातील तरतूदी, महत्वपुर्ण कायदे व योजना.

कलम ३४१ :

(१) राष्ट्रपतीला कोणत्याही राज्याच्या किंवा संघराज्यक्षेत्राच्या बाबतीत आणि ते राज्य असेल तर त्यांच्या राज्यपालाचा विचार घेतल्यानंतर जाहीर अधिसूचनेद्वारे त्या राज्यात किंवा प्रकरणपरत्वे, संघराज्यक्षेत्रात या संविधानाच्या प्रयोजनार्थ अनुसूचित जाती म्हणून मानल्या जातील त्या जाती, वंश किंवा जनजाती अथवा जाती, वंश किंवा जनजाती यांचे भाग किंवा गट विनिर्दिष्ट करता येतील.

(२) संसदेला कायद्याद्वारे कोणतीही जात, वंश किंवा जनजाती अथवा कोणतीही जात, वंश किंवा जनजाती यांचा भाग किंवा त्यातील गट खंड (१) खाली काढलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या अनुसूचित जातींच्या सूचीत समाविष्ट करता येईल किंवा त्यामधून वगळता येईल, पण उक्त खंडाखाली काढलेल्या अधिसूचनेत नंतरच्या कोणत्याही अधिसूचनेद्वारे पूर्वोक्तानुसार असेल त्याहून अन्यथा रद्द केला जाणार नाही.

कलम ३४२ :

(१) राष्ट्रपती कोणत्याही राज्याच्या किंवा संघराज्यक्षेत्राच्या बाबतीत आणि ते राज्य असेल तर त्याच्या राज्यपालाचा विचार घेतल्यानंतर जाहीर अधिसूचनेद्वारे, त्या राज्यात किंवा प्रकरणपरत्वे, संघक्षेत्रात या संविधानाच्या प्रयोजनार्थ अनुसूचित जनजाती म्हणून मानल्या जातील त्या जनजाती

किंवा जनजाती–समाज अथवा जनजाती किंवा जनजाती समाज यांचे भाग किंवा त्यातील गटत विनिदिर्ष्ट करता येतील.

(२) संसदेला कायद्याद्वारे कोणतीही जनजाती किंवा जनजाती समाज अथवा कोणतीही जनजाती किंवा जनजाती समाज यांचा भाग किंवा त्यातील गट खंड (१) खाली काढलेल्या अधिसूचनेत निनिदिर्ष्ट केलेल्या अनुसूचित जनजातीच्या सूचीत समाविष्ट करता येईल किंवा ती मधून वगळता येईल. पण उक्त खंडाखाली काढलेल्या अधिसूचनेत नंतरच्या कोणत्याही अधिसूचनेद्वारे पूर्वोक्तानुसार असेल त्याहून अन्यथा रड़क केला जाणार नाही.

कलम २४३ (डी) :

(१) प्रत्येक पंचायतीमध्ये–

क) अनुसूचित जातींसाठी आणि;

ख) अनुसूचित जमातींसाठी जागा राखून ठेवण्यात येतील आणि अशाप्रकारे राखून ठेवण्यात आलेल्या जागांच्या संख्येचे त्या पंचायतीमध्ये थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येशी असलेले प्रमाण हे शक्य होईल तेथवर, त्या पंचायत क्षेत्रामधील अनुसूचित जातींच्या किंवा त्या पंचायत क्षेत्रातील अनुसूचित जनजातींच्या लोकसंख्येचे त्या क्षेत्रामधील एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल तेच असेल आणि पंचायतीमधील विविध मतदार संघामध्ये आळीपाळीने अशा जागांचे वाटप करण्यात येईल;

(२) खंड (१) खाली राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या एक तृतीयांपेक्षा कमी नसतील एवढ्या जागा अनुसूचित जातींच्या, किंवा प्रकरणपरत्वे, अनुसूचित जनजातींच्या महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील.

(३) प्रत्येक पंचायतीमध्ये थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या एक तृतीयांशापेक्षा कमी नसतील एवढ्या जागा अनुसूचित जातींच्या व अनुसूचित जनजातींच्या महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील आणि पंचायतीमधील विविध मतदारसंघामध्ये आळीपाळीने अशा जागांचे वाटप करण्यात येईल.

(४) ग्राम किंवा अन्य कोणत्याही पातळीवरील पंचायतीमधील सभापतीची पदे, राज्य विधानमंडळ कायद्याद्वारे उपबंधित करील अशा रीतीने अनुसूचित जातीं, अनुसूचित जनजातीं आणि महिला यांच्यासाठी राखून ठेवण्यात येतील.

परंतु कोणत्याही राज्यामधील प्रत्येक पातळीवरील पंचायतीमधील अनुसूचित जाती, अनुसूचित जनजातींसाठी राखून ठेवलेल्या सभापतींच्या पदांच्या संख्येचे प्रत्येक पातळीवरील पंचायतीमधील

अशा पदांच्या एकूण संख्येशी असलेले प्रमाण हे, शक्य होईल तेथवर, राज्यामधील अनुसूचित जातींच्या किंवा राज्यामधील अनुसूचित जनजातींच्या लोकसंख्येचे राज्याच्या एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल त्याच प्रमाणाएवढे असेल.

परंतु आणखी असे की, प्रत्येक पातळीवरील पंचायतीमधील सभापतीच्या पदांच्या एकूण संख्येच्या एक तृतीयांशापेक्षा कमी नसतील एवढी पदे महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील. तसेच या खंडाखाली राखून ठेवलेल्या या पदांचे, प्रत्येक पातळीवरील विविध पंचायतीमध्ये आळीपाळीने वाटप करण्यात येईल.

(५) खंड (१) आणि (२) खालील जागांचे आरक्षण आणि खंड (४) खालील सभापतीच्या पदाचे आरक्षण हे (महिलांसाठी असलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त) कलम ३३४ मध्ये विनिदिर्ष्ट केलेला कालावधी समाप्त झाल्यावर परिणामक असल्याचे बंद होईल.

(६) या भागातील कोणत्याही गोष्टीमुळे, कोणत्याही राज्याच्या विधानमंडळास, मागासवर्गीय नागरिकांसाठी कोणत्याही पंचायतीमध्ये जागा राखून ठेवण्याकरिता किंवा कोणत्याही पातळीवरील पंचायतीमधील सभापतीची पदे राखून ठेवण्याकरिता कोणताही उपबंध करण्यास प्रतिबंध होणार नाही

कलम २४३ (न/टी) :

(१) प्रत्येक नगरपालिकांध्ये अनुसूचित जातीसाठी आणि अनुसूचित जनजातीसाठी जागा राखून ठेवण्यात येतील आणि अशाप्रकारे राखून ठेवण्यात आलेल्या जागांच्या संख्येचे त्या नगरपालिकेमध्ये थेट निवडणूकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येशी असलेले प्रमाण हे शक्य होईल तोवर, त्या नगरपालिका क्षेत्रामधील अनुसूचित जातीच्या किंवा त्या नगरपालिका क्षेत्रातील अनुसूचित जनजातीच्या लोकसंख्येचे त्या क्षेत्रातील एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल तेच असेल आणि नगरपालिकेतील विविध मतदार संघामध्ये आळीपाळीने अशा जागांचे वाटप करण्यात येईल.

(२) खंड (१) खाली राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या एक तृतीयांपेक्षा कमी नसतील एवढ्या जागा अनुसूचित जातींच्या, किंवा प्रकरणपरत्वे, अनुसूचित जनजातींच्या महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील.

(३) प्रत्येक नगरपालिकेमधील थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या एक तृतीयांशापेक्षा कमी नसतील एवढ्या जागा (अनुसूचित जातींच्या व अनुसूचित जनजातींच्या महिलांसाठी राखून ठेवलेल्या जागा धरून) महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील आणि नगरपालिकेतील विविध मतदारसंघामध्ये आळीपाळीने अशा जागांचे वाटप करण्यात येईल.

(४) नगरपालिकांधील सभापतीची पदे, राज्य विधान मंडळ कायद्याद्वारे उपबंधित करील अशा रीतीने अनुसूचित जातीं, अनुसूचित जनजातीं आणि महिला यांच्यासाठी राखून ठेवण्यात येतील.

(५) खंड (१) आणि (२) खालील जागांचे आरक्षण आणि खंड (४) खालील सभापतींच्या पदाचे आरक्षण हे (महिलांसाठी असलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त) कलम ३३४ मध्ये विनिदिर्ष्ट केलेला कालावधी समाप्त झाल्यावर परिणामकारकता बंद होईल.

(६) या भागातील कोणत्याही गोष्टीमुळे कोणत्याही राज्याच्या विधानमंडळास, मागासवर्गीय नागरिकांसाठी कोणत्याही नगरपालिकेमध्ये जागा राखून ठेवण्याकरिता किंवा सभापतीची पदे राखून ठेवण्यासाठी कोणताही उपबंध करण्यास प्रतिबंध होणार नाही.

**ब) महिला संदर्भातील तरतुदी**

महिलांच्या विकासासाठी भारतीय घटनेत अनेक तरतुदी केल्या आहेत ते पुढील प्रमाणे.

कलम १४ – महिला व पुरुष यांच्यामध्ये कायद्याने समानता व समान संरक्षण असेल .

कलम १५(२) केवळ धर्म, वंश, जात, लिंग यावरुन सार्वजनिक स्थाने व जागा यांचा वापर करण्यास कुठल्याही भारतीय नागरिकाला इतर भारतीय नागरिकाशी भेदभाव करता येणार नाही.

कलम १५(३) – राज्य शासन महिला व बालकांसाठी विशेष तरतूद करू शकते .

कलम १६ – सेवा योजन, पदनियुक्ती, नोकरी यामध्ये धर्म, वंश, जात, लिंग यावरुन भेदभाव न करता येणार नाही महिला व मुलींना समान संधी मिळेल.

कलम १७ – महिला व पुरुषांसोबत असलेली अस्पृश्यता नष्ट करण्यात आलेली आहे.

कलम १९ – भाषण स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शांततेने व विना शस्त्र एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य, संघटना बनविण्याचे स्वातंत्र्य, भारताच्या कुठल्याही क्षेत्रात मुक्तपणे संचार करण्याचे, राहण्याचे व स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य. कोणताही पेशा आचरण्याचे, कोणताही व्यवसाय, व्यापार किंवा धंदा चालविण्याचा हक्क असेल.

कलम २१ – कायद्याच्या प्रक्रियेशिवाय व्यक्तीच्या जीवित व स्वातंत्र्याच्या हक्काचा संकोच करता येणार नाही.

कलम २३ – शोषणाविरुद्ध अधिकार आहे. मानवाचा व्यापार अथवा वेठ बिगारीस प्रतिबंध करण्यात आला आहे.

कलम २५ – सद्सद्विवेकबुद्धिचे स्वातंत्र्य आणि धर्माचे मुक्त प्रकटीकरण, आचरण व प्रचार करता येईल.

कलम ३९ – स्त्री –पुरुष दोघांना समान वेतन मिळेल.

कलम ४२ – कामाच्या ठिकाणी न्याय्य व सुरक्षितता आणि प्रसुती सहाय्य देण्याची सोय असेल.

कलम ५१ – स्त्रियांच्या प्रतिमेला हानी पोहचविणाऱ्या प्रथा बंद करणे

११० घटनादुरुस्तीनुसार महिलांना ५० % आरक्षण देण्यात आले आहे.

एकूणच संविधानातील तरतुदींच्या अमंलबजावणी करिता महिलासाठी विविध कायदे व योजना निर्माण करण्यात आले आहेत. त्यामध्ये विवाहासंबंधी कायदे मालमत्ता संबंधी कायदे फौजदारी कायदे कामगार स्रियांचे अधिकार विषयक कायदे इत्यादी अनेक कायदे महिलांच्या संरक्षणासाठी केले आहेत.

**क) भारतीय राज्यघटनेतील बालकांचे हक्क**

भारतीय राज्यघटनेत नमुद मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्वे आणि इतर कलमात बाल हक्कांना संरक्षण दिले आहे. ज्यात खालील कलमांचा उल्लेख करता येईल.

कलम १४ नुसार राज्य कोणत्याही व्यक्तीला कायद्यासमोर समान आणि भारताच्या भौगोलीक क्षेत्रांतर्गत कायद्याचे समान संरक्षण प्रदान केले जाईल.

कलम १५ नुसार राज्य कोणासोबतही भेदभाव करणार नाही. तसेच स्त्री व मुले यांच्या करिता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

कलम २१ नुसार कोणत्या व्यक्तीला जीवन आणि व्यक्ती स्वातंत्र्याच्या हक्कापासून वंचित ठेवले जाणार नाही जोपर्यंत कायद्याद्वारा स्थापित प्रक्रियेनुसार तसे करणे अपेक्षित नसेल. कलम २१ क नुसार राज्याच्या कायद्या मार्फत निर्धारित केलेल्या ६ ते १४ वर्षातील बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण दिले जावे.

कलम २३ मानवाचा अनैतिक व्यापार, वेठबिगारी यावर बंदी घातली आहे. तो कायद्यानुसार अपराध आहे.

कलम २४ नुसार १४ पेक्षा कमी वयाच्या बालकास कारखाने, खाणी आणि अन्य इतर जोखीमयुक्त व्यवसायात काम करण्यास कामावर ठेवता येणार नाही.

कलम ३९ ( च) नुसार बालकांच्या बाल्यावस्थेचा दुरुपयोग होणार नाही आणि आर्थिक गरजेपोटी त्यांना रोजगार करण्यास भाग पडू नये. कलम ३९ (छ) नुसार राज्याद्वारे हे निश्चित करावे की. बालकांना स्वतंत्र व सन्मानजनक वातावरण आरोग्य व विकासाच्या सुविधा संधी उपलब्ध होतील. त्याचे शोषण होणार नाही.

कलम ४५ नुसार सहा वर्षांपर्यंतच्या सर्व बालकांचे बालवस्थेतील देखभाल आणि शिक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.

कलम ५१ क मध्ये पालकाने सहा ते चौदा वयोगटातील आपल्या मुलास किवा मुलीस शिक्षणाच्या संधी द्याव्यात अशी तरतूद केली आहे.

कलम ४४३ घ नुसार अनुसूची II शिक्षण, कुटुंब कल्याण, आरोग्य, स्वच्छता आणि बालकल्याणास प्रभावित करणाऱ्या मुद्याशिवाय महिला व बाल विकास कार्यक्रमांना पंचायतींना सोपवेल.

२०१४ च्या नरेंद्र मोदी शासनाने बाल विकास आणि बाल अधिकाराच्या हितासाठी महत्त्वपूर्ण धोरण आखले. या शासनाने शाळेत मुलींसाठी शौचालय बांधणे, बेटी बचाव बेटी पढाव, सुकन्या समृद्धी योजना, बाल स्वच्छता अभियान, हरवलेल्या मुलांसाठी खोया पाया वेबसाईट लसीकरण करण्यासाठी मिशन इंद्रधनुष्य सारख्या योजना प्रारंभ केल्या आहेत. एकूणच सर्व बालकांचे हक्क संरक्षण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**ड) इतर मागास वर्गासाठीच्या तरतुदी**

कलम ३४० :

(१) भारताच्या राज्यक्षेत्रातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांच्या स्थितीचे व त्यांना ज्या अडचणी सोसाव्या लागतात त्यांचे अन्वेषण करणे आणि अशा अडचणी दूर करण्यासाठी व त्यांची स्थिती सुधारण्यासाठी संघराज्याने किंवा कोणत्याही राज्याने कोणत्या उपाय योजना कराव्या त्यासंबंधी व त्या प्रयोजनाकरता संघराज्याने किंवा कोणत्याही राज्याने कोणती अनुदाने द्यावीत व कोणत्या शर्तीच्या अधीनतेने अशी अनुदाने द्यावीत, त्यासंबंधी शिफारशी करणे याकरिता राष्ट्रपतीला त्यास योग्य वाटतील अशा व्यक्ती मिळून बनलेला आयोग आदेशाद्वारे नियुक्त करता येईल आणि असा आयोग नियुक्त करता येईल आणि असा आयोग नियुक्त करणाऱ्या आदेशाद्वारे आयोगाने अनुसरावयाची कार्यपध्दती निश्चित करण्यात येईल.

(२) याप्रमाणे नियुक्त केलेला आयोग त्याच्याकडे निर्देशिलेल्या बाबींचे अन्वेषण करील आणि त्यास आढळून येईल अशी वस्तुस्थिती मांडणारा व त्याला उचित वाटतील अशा शिफारशी करणारा अहवाल राष्ट्रपतीस सादर करील.

(३) राष्ट्रपती याप्रमाणे सादर केलेल्या अहवालाची प्रत, त्यावर केलेल्या कारवाईचे स्पष्टीकरण करणाऱ्या निवेदनासहित, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्याची व्यवस्था करील.

भारतीय संविधानाच्या ३४० व्या कलमान्वये आणि राष्ट्रपतींच्या आदेशाने भारतातील पहिला मागासवर्गीय आयोग ज्येष्ठ गांधीवादी अभ्यासक, विचारवंत काका कालेलकर (दत्तात्रय बाळकृष्ण

कालेलकर) यांच्या नेतृत्त्वाखाली नेमण्यात आला. स्वातंत्र्यानंतरचा हा पहिलाच मागासवर्गीय आयोग यादृष्टीने या आयोगाच्या शिफारशी भारतीय समाज आणि राजकीय प्रक्रियेमध्ये उल्लेखनीय ठरल्या. भारतीय संसदेचे सदस्य असलेल्या काका कालेलकर यांच्या नेतृत्वाखाली २९ जानेवारी १९५३ रोजी पहिला मागासवर्गीय आयोग स्थापन झाला.

कालेलकर आयोगाने २३९९ जाती मागास ठरविल्या. त्यातील ८३७ जाती अतिमागास ठरविल्या. या सर्व जातीतील एकूण लोकसंख्या ७०% होत होती. तसेच सर्व स्त्रियांचा समावेश मागासवर्गात केला. कालेलकर आयोगाने मागासवर्गीयांची नेमकी ओळख होण्याच्या दृष्टीने अतिशय अभ्यासपूर्ण आणि शास्त्रीय स्वरूपाच्या कसोट्या तयार केल्या. मागासवर्गीयांची सामाजिक स्थिती, शिक्षणाचे प्रमाण, नोकरीतील प्रतिनिधित्व, व्यापार, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधित्व, राहणीमान, आरोग्य अशा अत्यंत शास्त्रोक्त आणि प्रमाणशीर कसोट्यांचा वापर करून त्यांनी निष्कर्ष काढले आणि महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या त्या पुढीलप्रमाणे :-

काका कालेलकर आयोगाच्या शिफारशी:-

१) १९६१ च्या जनगणनेमध्ये जातिविषयक नोंदीची गणना करावी.

२) पारंपरिक जातिव्यवस्थेच्या उतरंडीचा सामाजिक मागासलेपणा व जातीला देण्यात आलेले खालचे स्थान यांचा संबंध आहे.

३) सर्व स्त्रियांना मागासवर्गीय वर्गात टाकण्यात यावे.

४) मागास जातीतील योग्य उमेदवारासाठी तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणसंस्थांध्ये ७०% जागा आरक्षित ठेवण्यात याव्यात.

५) सरकारी सेवेध्ये पुढील वर्ग रचनेनुसार मागासवर्गीयांसाठी आरक्षण असावे, प्रथम श्रेणीत २५% दुसऱ्या श्रेणीत ३३.५% आणि तिसऱ्या व चौथ्या श्रेणीत ४०% आरक्षण असावे.

वरीलप्रमाणे काका कालेलकर आयोगाने आरक्षणाच्या बाबतीत शिफारशी केल्या, त्याचबरोबर आयोगाने मागासवर्गीयांकरिता आर्थिक आणि राजकीय क्षेत्रातदेखील प्रयत्न करण्याचे प्रांजळ मत मांडले.

ग्रामीण अर्थव्यवस्था, शेती आणि शेतीपूरक व्यवसायांना बळ देवून ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करावी. त्यांचे राहणीमान, जीवनमान व आरोग्याच्या बाबींकडे लक्ष द्यावे असे व्यापक विचार अहवालाच्या अनुषंगाने मांडले. कालेलकर आयोगाने १९५५ साली आपला अहवाल सादर केला. ३ सप्टेंबर १९५६ साली संसदेच्या पटलावर हा अहवाल ठेवण्यात आला. परंतु या अहवालावर अनेक आक्षेप, त्रूटी असल्याचे सांगून हा कालेलकर आयोगाचा अहवाल संसदेत फेटाळण्यात आला.

## मंडल आयोगाच्या शिफारशी आणि त्याची अंमलबजावणी

मंडल आयोग हा भारताच्या सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेवर चिरस्थायी परिणाम घडवून आणणारा ठरला. पहिला मागासवर्गीय कालेलकर आयोगाचा अहवाल रद्दबातल ठरविल्यामुळे इतर मागासवर्गीय समाज समूहांध्ये अस्वस्थता निर्माण झाली होती. ओ.बी.सी. च्या हक्कांसाठी संपूर्ण देशभर लढे उभे राहिले होते. प्रा. श्रावण देवरे, पेरियार रामस्वामी नायकार, श्री. शब्बीर अन्सारी इत्यादींनी मोठ्या प्रमाणात लढे उभे केले. जनजागृती केली. त्याचा परिणाम म्हणून २० डिसेंबर १९७८ साली ज्या बिंदेश्वरी प्रसाद मंडल यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा मागासवर्गीय आयोग स्थापन करण्यात आला त्यालाच मंडल आयोग असे म्हणतात.

घटनेचा कलम ३४०(१) नुसार राष्ट्रपतींनी हा आयोग इतर मागासवर्गीयांचा म्हणजे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात मागासलेल्या समाजाचा अभ्यास करण्यासाठी नेमला. या बहुसदस्यीय आयोगामध्ये न्या. मंडल यांचेबरोबर न्या. आर. आर. भोळे, दिवाण मोहनलाल, एल. आर. नाईक, के. सुब्रम्हण्यम, एस.एस.गिल असे नामवंत, अभ्यासू सदस्य होते. या आयोगाकडे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेपणाची कारणे शोधून त्यांच्या उन्नतीसाठी उपाय सुचविणे, केंद्र व राज्य सरकारच्या नोकऱ्यात उचित आरक्षणाची तरतूद करणे इ. कामे सोपवलेली होती.

मंडल आयोगाने आपला अहवाल तयार करण्यासाठी अतिशय व्यापक असा अभ्यास, संशोधन, अन्वेषण केले. ८१ प्रश्नांची प्रश्नावली बनवली. ती प्रश्नावली १ लाख ११ हजार ८७२ लोकांनी भरून पाठवली. केंद्र सरकार, राज्य सरकार, जिल्हा परिषदा, शहरे, खेडी इ.कडून माहिती संकलित करण्यात आली. देशातील ४०५ जिल्ह्यातील दोन खेडे व एक शहर निवडून १००% नमुना पाहणी केली.

आयोगाच्या १७१ औपचारिक बैठकी झाल्या. २६३८ समाजसेवी संस्थांची निवेदने स्वीकारली. टाटा समाज विज्ञान संस्था, भारतीय मानव विज्ञान संस्था, भारतीय समाजविज्ञान व संशोधन परिषद, श्रम ब्युरो, राष्ट्रीय श्रम संस्था, आर्थिक विकास संस्था, दिल्ली विद्यापीठ यांच्या अथक प्रयत्नाने मंडल आयोगाचा अहवाल तयार करण्यात आला.

मंडल आयोगाने वस्तुनिष्ठ अभ्यास व्हावा म्हणून तीन प्रकारचे निकष किंवा कसोट्या ठरविल्या.

सामाजिक निकष, शैक्षणिक निकष, आर्थिक निकष. या कसोट्यांच्या माध्यमातून अत्यंत सूक्ष्म आणि अभ्यासपूर्ण अहवाल तयार केला व इतर मागासवर्गीयांकरिता पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या.

१. सरकारी व अनुदानित सेवांमध्ये आरक्षण :-

शासकीय, निमशासकीय व सरकारकडून प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत, अनुदान घेणाऱ्या सेवांध्ये इतर मागासवर्गीयांना आरक्षण द्यावे. बिगर हिंदूसह अन्य मागासवर्गीयांचे लोकसंख्येतील प्रमाण ५२% आहे. वरील सर्व क्षेत्रांध्ये या समाजाला २७% आरक्षण द्यावे.

२. शैक्षणिक क्षेत्राविषयी शिफारस :-

शासकीय, निमशासकीय नोकऱ्यांबरोबरच शैक्षणिक क्षेत्रात सुध्दा इतर मागासवर्गीयांना आरक्षण द्यावे. शैक्षणिक पात्रता मिळवूनसुध्दा काहीवेळा नोकरी मिळत नाही. तेव्हा या विद्यार्थ्यांना व्यावसायिक, तांत्रिक व कारागिरांचे शिक्षणसुध्दा द्यावे. त्यासाठी सर्व शैक्षणिक संस्थांध्ये २७% आरक्षण ठेवावे.

३. राजकीय क्षेत्राविषयी शिफारशी:-

राजकीय क्षेत्र हे मंडल आयोगाचे अभ्यास क्षेत्र नव्हते; परंतु आयोगाच्या अभ्यासाला वर्ज्य देखील नव्हते. सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्र अंतर्गत गुंतागुंतीचे असते. मागास समाजाला राजकीय अस्तित्व, अस्मिता मिळाल्यास त्यांचा राजकीय सहभाग वाढतो. राजकीय क्षेत्रातसुध्दा प्रतिष्ठा मिळते. त्यांच्यातील अस्वस्थता, नैराश्य, औदासीन्य नष्ट होवून ते राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात येतात. त्यांना राजकीय आरक्षण नसल्यामुळे त्यांचे प्रतिनिधीत्व अत्यल्प आहे. त्यासाठी मंडल आयोगाने राखीव मतदारसंघाची शिफारस केली आहे.

४. इतर क्षेत्राविषयी शिफारशी:-

मंडल आयोगाच्या अभ्यासाची व्याप्ती प्रचंड होती. आयोगाने ऌड़ संघटित क्षेत्रापुरत्याच शिफारशी केल्या नाहीत तर असंघटित क्षेत्रासाठी देखील शिफारशी केल्या. मागासवर्गीय विकास महामंडळाची स्थापना करावी, त्यांच्यासाठी स्वतंत्र खाते निर्माण करावे, केंद्र व राज्याने त्यांच्या विकासासाठी विविध योजना तयार करून त्यांना पुरेसा निधी द्यावा, सहकारी गृह निर्माण संस्था स्थापन करण्यासाठी भूखंड आणि अल्पव्याज दराने कर्जे द्यावीत, नगरपालिका व इतर संस्थांनी बांधलेल्या शॉपींग सेंटरमध्ये अन्य मागासवर्गीयांसाठी जागा राखून ठेवाव्यात, त्यांचा सामाजिक स्तर, प्रतिष्ठा, त्यांचे राहणीमान, जीवनमान, आरोग्य, त्यांचे स्थैर्य या बाबतीत देखील मंडल आयोगाने शिफारशी केल्या.

अशा प्रकारे मंडल आयोगाने अत्यंत व्यापक प्रमाणात शिफारशी केल्या. केंद्र सरकारने जरी मंडल आयोगाच्या शिफारशी स्विकारल्या तरी त्याची संपूर्णपणे अंलबजावणी करणे अत्यंत क्लिष्ट आणि गुंतागुंतीचे होते. परंतु तरीसुध्दा पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांनी आयोगाने शिफारस केलेल्या

सर्वच क्षेत्रात तातडीने २७% आरक्षण घोषित केले व त्याची अंलबजावणी त्वरित चालू केली. या व्यतिरिक्त इतर ज्या शिफारशी केल्या होत्या, त्यांची अंलबजावणी हळूहळू केंद्र आणि राज्य सरकारे करताना दिसत आहेत.

७३ वी व ७४ वी घटना दुरुस्ती या एकाचवेळी झालेल्या घटनादुरुस्त्या आहेत. २२ डिसेंबर १९९२ रोजी लोकसभेने व २३ डिसेंबर १९९२ रोजी राज्यसभेने त्यास मंजूरी दिली व २४ एप्रिल १९९३ पासून त्यांची अंलबजावणी सुरू झाली. ७३ व्या घटनादुरुस्तीने ग्रामीण भारतातील तर ७४ व्या घटना दुरुस्तीने नागरी भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये असलेल्या आरक्षणात आमूलाग्र बदल घडवून आणला. या दोन्ही घटना दुरुस्त्यांचा अभ्यास अत्यंत व्यापक आहे. या दुरुस्तीमुळे घटनेत नव्याने नववे परिशिष्ट जोडण्यात आले. या नवव्या परिशिष्टातील कलम नं. २४३ (घ/डी) व २४३ (न/टी) नुसार सर्व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय तसेच महिलांसाठीचे आरक्षण निश्चित असे सार्वत्रिक स्वरूपाचे आरक्षण प्राप्त झाले. या दोन्ही घटनादुरुस्त्यांचा भारताच्या आरक्षण मागणीच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटना आहेत.

एकूणच भारतीय राज्यघटनेनुसार अनुसूचित जाती, जमाती, महिला, बालके व इतर मागास वर्ग इत्यादींच्या विकासासाठी वेगवेगळ्या कलमामध्ये तरतुदी करण्यात आले आहेत.

## २.३ सारांश

मूलभूत अधिकार व राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे लोकशाही कल्याणकारी राज्याचा आधारभूत पाया आहे. आर्थिक, सामाजिक व राजकीय लोकशाही स्थापन करणे हा त्यांचा मुख्य उद्देश आहे. ही तत्त्वे म्हणजे भारतातील लोकशाहीची सर्वात मोठी हमी आहे. आर्थिक व सामाजिक जीवनात क्रांतिकारक स्थित्यंतरे याचाच आमूलाग्र बदल आणि याचाच अर्थ आर्थिक आणि सामाजिक जीवनात जी विषमता आहे तिचे उच्चाटन करायला हवे आणि ते उच्चाटन लोकशाही तत्वानुसारच केले पाहिजे म्हणजेच आर्थिक व सामाजिक लोकशाही प्रस्थापित केली पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे की, ''ज्या शासनपद्धतीत लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारक स्थित्यंतरे रक्तपाताशिवाय घडवून आणण्यात येतात ती म्हणजे लोकशाही होय.''

स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी पंडित नेहरु म्हणाले होते की; स्वातंत्र्य मिळाले याचा अर्थ राजकीय स्वातंत्र्य मिळाले, म्हणजे राज्य चालविण्याची सत्ता आपल्या हाती आली. परंतु आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्याशिवाय राजकीय स्वातंत्र्य अपूर्णच राहिल त्यामुळे असे म्हणता येईल की, गेली ७५ वर्षे होऊन ही राजकीय स्वातंत्र्य अपूर्णच आहे. कारण आर्थिक व सामाजिक लोकशाही आपण निर्माण करु शकलो नाही. भारत सरकारने आपल्या नव्या आर्थिक धोरणात मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार

केला आहे. या व्यवस्थेमध्ये कल्याणकारी राज्याची आपली जबाबदारी झटकून टाकली आहे. कारण आर्थिक वाटचालीची दिशा बदलून लोकांच्या हितसंबंधांना गौण स्थान प्राप्त झाले आहे. यापरिणामी आर्थिक व सामाजिक परिवर्तनाच्या निर्धारित उद्दिष्टांपासून आपण दिवसेंदिवस दूर जात आहे. असे असले तरी जागतिकीकरणाच्या परिस्थितीत जग आर्थिक महामंदित असताना सुद्धा भारताला त्यांची झळ लागली नाही. यांचे सर्व श्रेय संविधानाला देता येईल कारण स्वातंत्र्यापूर्वीचा अभ्यास करुन तत्कालिन परिस्थितीचा अभ्यास करुन भविष्यकाळात हे संविधान भारतात जास्तीतजास्त कसे फळदायी ठरेल याचाच सखोल व सविस्तर विचार संविधान निर्मात्यांनी केला. यावरुन असे म्हणता येईल की, भारतासाठी एक उत्कृष्ठ आणि आदर्श संविधान घटनासमितीने स्विकारले.

## २.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

- **सरनामा :** प्रस्तावना.
- **नाझीवाद, फॅसिस्ट, साम्यवाद :** विचारसरणी आहेत.
- **मानवी हक्क :** मानवाचे अधिकार.
- **शोषण :** पिळवणूक.
- **मॅडमस :** आज्ञा देणे.
- **हेबियस कॉर्पस :** बंदिप्रत्यक्षीकरण

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ☛ स्वयं–अध्ययन प्रश्न–१ ची उत्तरे

१. १३ डिसेंबर १९४६ रोजी.

२. १९७६ साली.

३. समाजवादी व धर्मनिरपेक्ष.

४. सहा.

५. कलम–२५ ते २८.

६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

७. पाच प्रकारचे आदेश.

☛ **स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे**

१. कलम - ३६ ते ५१.

२. कलम - ३९.

३. कलम - ४४.

४. कलम - ५१ (क).

५. ११ तत्त्वे.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

### ❒ अ) दीर्घोत्तरी प्रश्न.

१. भारतीय राज्यघटनेतील उद्दिष्टे व तत्त्वे स्पष्ट करा.

२. मूलभूत अधिकार स्पष्ट करा.

३. राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वांची चर्चा करा.

४. भारतीय राज्यघटना आर्थिक व सामाजिक बदलाचे साधन चर्चा करा.

### ❒ ब) टीपा लिहा.

१. सरनामा.

२. मूलभूत कर्तव्य.

३. मूलभूत हक्कांची वैशिष्ट्ये.

४. समतेचा हक्क.

५. स्वातंत्र्याचा हक्क.

६. धार्मिक हक्क.

७. सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क.

८. घटनात्मक उपाय योजना.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ किंवा पुस्तके


१. **D. D. Basu** : *"An Introduction to Indian Constitution"*, New Delhi, Prentice Hall, 2005.

२. **M. V. Pylee** : *"An Introduction to Constitution of India"*, Vikas, New Delhi - 1998

३. **Granville Austin** : *"Indian Constitution Cornerstone of a Nation"*, Oxford University Press - 1966.

४. **ग्रॅनव्हिल ऑस्टिन :** (मराठी अनुवाद-भारती केळकर) *''भारतीय राज्यघटना राष्ट्राची कोनशीला''*, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे - २०१३.

५. **प्रा. चिं. ग. घांगरेकर, प्रा. पु. गो. कवठाळकर :** *''भारतीय राजकीय व्यवस्था''*, दत्तसन्स, नागपूर - १९९६.


❑❑❑

**सत्र १ : घटक ३**

# केंद्र सरकार व राज्यसरकार

(Union Government & State Government)

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

    ३.२.१ केंद्र सरकार

        ३.२.१.१ कायदेमंडळ

        अ) लोकसभा

        ब) राज्यसभा

        ३.२.१.२ कार्यकारी मंडळ

        अ) राष्ट्रपती

        ब) उप-राष्ट्रपती

        क) पंतप्रधान व त्याचे मंत्रीमंडळ

        ३.२.१.३ न्यायमंडळ

        अ) सर्वोच्च न्यायालय

    ३.२.२ घटक राज्य सरकार

        ३.२.२.१ कायदेमंडळ

        ३.२.२.२ कार्यकारी मंडळ

        ३.२.२.३ न्यायमंडळ

    ३.२.३ अ) न्यायालयीन पुनर्विलोकन

        ब) न्यायालयीन सक्रियता

        क) जनहित याचिका

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

## ३.० उद्दिष्ट्ये

- भारताच्या कायदेमंडळाची दोन सभागृहे : लोकसभा व राज्यसभा : यांची रचना, कार्यकाल, अधिकार व कार्ये समजावून घेणे.
- भारताचे कार्यकारी मंडळ राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान व मंत्रिमंडळ यांची कार्ये, रचना, भूमिका यांची माहिती घेणे.
- न्यायपालिका रचना, कार्ये, न्यायालयीन पुनर्विलोकन, न्यायालयीन सक्रियता यांची माहिती घेणे.

## ३.१ प्रास्ताविक

भारताने इंग्लंडप्रमाणे संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. आपल्या संविधानानुसार कायदेमंडळात राष्ट्रपती, लोकसभा व राज्यसभा यांचा समावेश होतो. भारतीय घटनेच्या पाचव्या भागात प्रकरण दोन मध्ये कलम ७९ ते १२२ भारतीय संसदेची तरतुद केली आहे. भारताने द्विगृहात्मक कायदेमंडळ पद्धती स्वीकारलेली आहे. यामध्ये 'राज्यसभा' हे वरिष्ठ गृह असून 'लोकसभा' हे कनिष्ठ गृह आहे. राज्यसभेत घटकराज्यांचे प्रतिनिधी असतात तर लोकसभेमध्ये जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी असतात.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ केंद्र सरकार

भारतात संघराज्यात्मक स्वरूपाची शासन व्यवस्था स्विकारलेली असल्यामुळे केंद्र सरकार व राज्य सरकार अशा दोन स्तरावर सत्तेची विभागणी करण्यात आली आहे. केंद्रसरकारकडे देशाचा राज्याकारभार करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची खाती सोपवण्यात आली आहेत. राज्यघटनेतील तरतुदीनुसार दोहोचे अधीकार क्षेत्र व जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत.

#### ३.२.१.१ कायदे मंडळ

### अ) लोकसभा (House of the People) :-

लोकसभा हे भारतीय संसदेचे कनिष्ठ गृह आहे. त्याल संसदेचे प्रथम सभागृह असे म्हणतात. या सभागृहामध्ये जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी काम करित असतात.

**❀ लोकसभेची रचना :–**

लोकसभेतील सदस्यांची संख्या लोकसंख्येवर आधारित असते. घटनेच्या ८१ व्या कलमात लोकसभेची सदस्य संख्या निश्चित केली आहे. सध्या लोकसभेची सदस्य संख्या ५४५ इतकी आहे.

यातील ५२५ सदस्य घटक राज्याच्या मतदार संघातून निवडले जातात तर बाकीचे २० सदस्य केंद्रशासीत प्रदेशातून निवडले जातात. तसेच राष्ट्रपती लोकसभेत दोन अँग्लोइंडियन सदस्यांची नेमणूक करु शकतो.

१९५१ च्या कायद्यानुसार ५ ते ७ लाख लोकसंख्येला एक प्रतिनिधी या पद्धतीने देशात लोकसभेचे मतदार संघ पाडले जातात. दर दहा वर्षांनी देशाची शिरगणती किंवा जनगणना होऊन मतदार संघाची फेररचना करण्यात येते. हा अधिकार संसदेला दिलेला आहे. वय वर्षे १८ पूर्ण करणारे सर्व स्त्री-पुरुष नागरिकांना मतदान करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. प्रत्येक मतदार संघातून एकच प्रतिनिधी निवडला जातो.

❀ **लोकसभेच्या सदस्यासाठी पात्रता :-**

भारतीय घटनेच्या कलम ८४ मध्ये लोकसभेच्या सदस्यासाठीची पात्रता सांगीतली आहे ती पुढील प्रमाणे आहेत.

१. ती व्यक्ती भारताचा नागरिक असली पाहिजे.

२. तिने वयाची २५ वर्षे पूर्ण केली असली पाहिजे.

३. संसदेने ठरवून दिलेल्या अटी तिने वेळोवेळी पूर्ण केल्या पाहिजे.

४. तिचे नाव संसदेच्या मतदार संघाच्या मतदार यादीत समाविष्ठ असले पाहिजे.

५. राखीव मतदार संघातून निवडणूक लढविणारी व्यक्ती अनुसूचित जाती जमातीची सदस्य असली पाहिजे.

६. ती व्यक्ती वेडी, भ्रष्टाचारी, सरकारी नोकर असू नये.

❀ **कार्यकाल :-**

लोकसभेचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो. हा कार्यकाल संपण्याआधी लोकसभा विसर्जीत करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे. भारताचा राष्ट्रपती पंतप्रधानाच्या विनंतीनुसार किंवा राजकीय अस्थिरतेमुळे लोकसभा विसर्जीत करु शकतो. लोकसभेचा प्रतिनिधी आपल्या पदाचा केंव्हाही राजीनामा देऊ शकतो. तसा अर्ज सभापतीकडे द्यावा लागतो. एखादा सदस्य लोकसभेच्या परवानगी शिवाय सलग ६० दिवस गैरहजर राहिल्यास त्याचे सदस्यत्व रद्द होते. कोणत्याही सदस्याला एकाचवेळी लोकसभा व राज्यसभा या दोन्ही सभागृहाचे एकाचवेळी सभासद राहता येत नाही.

❀ **सभापती व उपसभापती :-**

भारतीय घटनेच्या कलम ९३ ते ९७ मध्ये सभापती व उपसभापती यांची तरतुद केली आहे. लोकसभेच्या निवडणुकीनंतर पहिल्या अधिवेशनात लोकसभेचे सदस्य आपल्यातून एकाची सभापती

आणि एकाची उपसभापती म्हणून निवड करतात. सभापतीच्या गैरहजेरीत उपसभापती सभागृहाचे कामकाज पाहतो. सभापतीचा कार्यकाल लोकसभेच्या कार्यकाला एवढाच म्हणजे पाच वर्षाचा असतो. सभापतीचे पद पुढील कारणांमुळे रद्द होऊ शकते. (१) त्यांनी स्वत: राजीनामा दिल्यास (२) लोकसभेच्या सदस्यत्वाचा त्यांनी राजीनामा दिल्यास किंवा त्याचे सदस्यत्व काढून घेतले असल्यास. (३) लोकसभेने त्यांच्यावर अविश्वास ठराव आणल्यास. अर्थात तशा प्रकारची लेखी सूचना १४ दिवस आधी लोकसभेला द्यावी लागते. लोकसभा विसर्जीत झाल्यानंतरदेखील नवीन लोकसभेचा अध्यक्ष नियुक्त होईपर्यंत तो अध्यक्ष कार्यरत असतो.

लोकसभेचा सभापती व उपसभापती एकाचवेळी रिक्त झाल्यास राष्ट्रपती सभागृहातील एका सदस्याची हंगामी अध्यक्ष म्हणून नेमणूक करु शकतो.

### ❀ वेतन व भत्ते :–

लोकसभेच्या सभापतीला दर महिन्याला १ लाख २५ हजार रुपये वेतन मिळते शिवाय अतिथी भत्ता, निवास, फोन, प्रवास, निवृत्ती वेतन इ. सवलती दिल्या जातात.

### ❀ सभापतीचे अधिकार :–

संसदीय शासनप्रणालीत लोकसभा अध्यक्षाचे स्थान फार महत्त्वाचे आहे. सभागृहाचे कामकाज कायदेशीर पद्धतीने चालवण्यासाठी सभापतीला महत्त्वपूर्ण भूमिका बजावावी लागते. सभापतीचे अधिकार पुढील प्रमाणे आहेत.

१. सभागृहात शांतता व शिस्त ठेवणे व सभागृहातील सर्व सदस्यांवर नियंत्रण ठेवणे.

२. सभापती सभागृहातील नेत्यांशी चर्चा विचार विनीमय करुन निरनिराळ्या विषयांवर चर्चेचा वेळ व कार्यक्रम निश्चित करतो.

३. सभापतीच्या परवाणगी शिवाय कोणत्याही सदस्याला सभागृहात भाषण करता येत नाही.

४. सभागृहाची प्रतिष्ठा न राखणे, सभागृहात गोंधळ, असंसदीय भाषा, असभ्य वर्तन याला आळा घालणे.

५. लोकसभेच्या सदस्यांचे अधिकार, सवलती व सन्मान सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी अध्यक्षाची असते.

६. एखादा सदस्य सभागृहाचे आदेश मानीत नसेल, नियम पाळीत नसेल तर सभापती त्याला सभागृहाबाहेर घालवू शकतो. सभागृहाचा अवमान करणाऱ्या, असंसदीय भाषा वापरणाऱ्या सदस्याला शिक्षा करण्याचा अधिकार सभापतीला आहे.

७. एखादे विधेयक धन विधेयक आहे की नाही ठरविण्याचा अधिकार सभापतीला आहे.

८. एखादा प्रश्न सभापतीने नाकारल्यास किंवा अमान्य केल्यास त्याचा निर्णय अंतीम स्वरुपाचा मानण्यात येतो.

९. एखाद्या विधेयकावर समसमान मते पडल्यास सभापती हा निर्णायक मत देतो.

१०. गोंधळामुळे सभागृहाचे कामकाज चालविणे अशक्य झाल्यास सभापती काही काळाकरिता सभागृहाचे कामकाज तहकुब करु शकतो.

**❀ गणसंख्या :–**

लोकसभेचे कामकाज सुरु होण्यासाठी तिच्या एकूण सभासद संख्येच्या १/१० ही सदस्य संख्या आवश्यक आहे. १/१० सदस्य सभागृहात उपस्थित असतील तर त्याची खात्री करून घेऊन सभापती कामकाजाला सुरुवात करतो. लोकसभेचे अधिवेशन बोलवण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे. वर्षातून किमान दोन वेळा अधिवेशन बोलावले जाते.

**❀ लोकसभेचे सभापती व त्यांचा कार्यकाल :–**

| **लोकसभा** | **सभापती** | **कार्यकाल** |
|---|---|---|
| पहिली लोकसभा | जी. व्ही. मावळणकर | १९५२–१९५६ |
| दुसरी लोकसभा | एम. ए. अय्यंगार | १९५७–१९६२ |
| तिसरी लोकसभा | हुकूमसिंग | १९६२–१९६७ |
| चौथी लोकसभा | नीलम संजीव रेड्डी | १९६७–१९६९ |
| | जी. एस. धिल्लाँ | १९६९–१९७१ |
| पाचवी लोकसभा | जी. एस. धिल्लाँ | १९७१–१९७५ |
| | बळीराम भगत | १९७६–१९७७ |
| सहावी लोकसभा | नीलम संजीव रेड्डी | मार्च १९७७–जुलै १९७७ |
| | के. एस. हेगडे | १९७७–१९८० |
| सातवी लोकसभा | बलराम जाखर | १९८०–१९८५ |
| आठवी लोकसभा | बलराम जाखर | १९८५–१९८९ |
| नववी लोकसभा | रवी रे | १९८९–१९९१ |
| दहावी लोकसभा | शिवराज पाटील | १९९१–१९९६ |
| अकरावी लोकसभा | पूर्णो अभितोक संगमा | १९९६–१९९८ |
| बारावी लोकसभा | जी. एम. सी. बालयोगी | १९९८–१९९९ |

| | | |
|---|---|---|
| तेरावी लोकसभा | जी. एम. सी. बालयोगी | १९९९-२००२ |
| | मनोहर जोशी | २००२-२००४ |
| चौदावी लोकसभा | सोमनाथ चटर्जी | २००४-२००९ |
| पंधरावी लोकसभा | मीराकुमार | २००९-२०१४ |
| सोळावी लोकसभा | सुमित्रा महाजन | २०१४-२०१९ |
| सतरावी लोकसभा | ओम बिर्ला | २०१९ पासून |

## ❒ लोकसभेचे अधिकार व कार्ये :

### १. कायदे विषयक अधिकार :-

संपूर्ण संघराज्यासाठी कायदे तयार करणे हे लोकसभेचे अतिशय महत्त्वाचे कार्य आहे. लोकसभा केंद्रसूचीतील सर्व विषयावर कायदे करु शकते. समवर्ती सुचीतील विषयावर कायदे करण्याचा अधिकार संसदेला आहे. समवर्ती सुचीतील एखाद्या विषयावर केंद्राचे व घटकराज्याचे परस्पर विरोधी कायदे झाल्यास घटक राज्य सरकारचा हा कायदा रद्द होतो. आवश्यकतेनुसार लोकसभा नवीन कायदे निर्माण करते, जुन्या कायद्यात दुरुस्ती करते तसेच अनावश्यक कायदे रद्द करते.

कायदा तयार करण्यासंबंधीचे विधेयक सुरवातीला लोकसभा अथवा राज्यसभेतही मांडता येते. लोकसभेत संमत झालेले विधेयक संमतीसाठी राज्यसभेत जाते. राज्यसभेने मान्यता दिल्यानंतर ते विधेयक अंतिम मान्यतेसाठी राष्ट्रपतीकडे जाते म्हणजेच लोकसभेच्या कायदा तयार करण्याच्या अधिकारावर राज्यसभा व राष्ट्रपती यांच्या मर्यादा आहेत.

विधेयक मंजूरीवरुन लोकसभा व राज्यसभा या दोहोंत जर मतभेद निर्माण झाले तर लोकसभा व राज्यसभा यांचे संयुक्त अधिवेशन बोलाविले जाते व संघर्षाचा मुद्दा बहुमताने सोडवीला जातो. लोकसभेची सदस्य संख्या (५४५) ही राज्यसभेतील सदस्यांपेक्षा (२५०) जास्त असल्याने लोकसभेच्या बाजूने निर्णय होतो.

### २. आर्थिक अधिकार :-

आर्थिक विधेयकाबाबत म्हणजेच धनविधेयकाबाबत मंजुरी देण्याचा अधिकार लोकसभेला राज्यसभेपेक्षा जास्त आहे. धनविधेयक प्रथम लोकसभेतच मांडले जाते. एखादे विधेयक धनविधेयक आहे किंवा नाही याचा निर्णय लोकसभेचा सभापती घेतो. अर्थ विधेयकाची सुरवात राज्यसभेत होत नाही. लोकसभेत संमत झालेले धनविधेयक पुढील मान्यतेसाठी राज्यसभेकडे पाठविले जाते.

लोकसभेने पाठवीलेले धनविधेयक राज्यसभेला १४ दिवसांच्या आत मंजूर किंवा नामंजूर करुन पाठवावे लागते. १४ दिवसांच्या आत या विधेयकाबाबत काही कळवीले नाही, तर ते विधेयक राज्यसभेला मंजुर आहे असे समजले जाते. राज्यसभेने सुचविलेल्या दुरुस्त्या लोकसभेने मानल्याच पाहिजेत असे बंधन लोकसभेला नाही. धनविधेयकाबाबत दोन्ही सभागृहांत मतभेद झाले तर त्यासाठी संयुक्त अधिवेशन बोलविले जात नाही.

(१) आकस्मिक निधी निर्माण करणे, एखादा खर्च संचित निधीतून खर्च करण्यास संमती देणे. (२) संघसरकारच्या संपत्तीवर कर तसेच संघसरकारला नियंत्रणात असलेल्या विजेवर वा तिच्या वापरावर कर इ. (३) आर्थिक व्यवहाराच्या कार्यविधीचे नियमन (४) वित्त आयोगाच्या सभासदांच्या पात्रता व अधिकार ठरविणे वगैरे. या संदर्भात सर्व तो अधिकार लोकसभेला आहे.

## ३. कार्यकारी अधिकार :–

संसदीय शासन पद्धतीत मंत्रीमंडळ लोकसभेला जबाबदार असते. त्यामुळे लोकसभेला कार्यकारी विषयक अधिकार प्राप्त झाले आहेत. घटनेप्रमाणे मंत्रिमंडळ लोकसभेला जबाबदार असते. म्हणजेच लोकसभेचा विश्वास गमाविल्यास मंत्रीमंडळाला राजीनामा द्यावा लागतो. लोकसभा खालील साधनांचा वापर करुन मंत्रीमंडळावर नियंत्रण ठेवीत असते.

१. लोकसभेचे सभासद मंत्रीमंडळाच्या सदस्याला प्रश्न व उपप्रश्न विचारून शासना संबंधी माहिती प्राप्त करून घेतात व शासनाच्या चुका कनिष्ठ गृहापुढे व जनतेपुढे आणतात.

२. शासनाला प्रश्न उपप्रश्न विचारुन एखाद्या महत्त्वाच्या प्रश्नावर काम स्थगन प्रस्ताव आणून शासनाचे लक्ष वेधून घेतात.

३. अंदाजपत्रकाला मान्यता देत असताना व खात्याच्या मागण्या मंजूर करताना खात्यातील भ्रष्टाचारावर व गैरकारभारावर टिका करण्याची संधी लोकसभा सदस्यांना प्राप्त होते.

४. अविश्वासाचा ठराव आणून सरकार बदलण्याचा अधिकार सुद्धा लोकसभेला आहे.

## ४. इतर अधिकार :–

लोकसभेला वरील अधिकाराप्रमाणेच पुढील काही अधिकार प्राप्त झाले आहेत.

१. भारताचा राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकीत लोकसभा सदस्य मतदान करतात.

२. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, वरिष्ठ न्यायाधीश, निवडणूक अधिकारी इ. केलेल्या घटनाविरोधी वर्तनाची चौकशी करणे.

३. संसदेच्या विश्रांतीच्या काळात राष्ट्रपतीने काढलेल्या वटहुकुमांना मंजुरी देण्याचे कार्य लोकसभेला करावे लागते.

४. राज्य घटनेत दुरुस्ती सुचविण्याचा अधिकार संसदेला आहे. लोकसभेने सुचविलेल्या घटना दुरुस्तीला लोकसभेचीही मंजुरी आवश्यक आहे.

## ब) राज्यसभा :–

राज्यसभा हे संसदेचे वरिष्ठ सभागृह आहे. त्याला द्वितीय सदन असेही म्हणतात. भारतीय घटनेच्या कलम ७९ ते ९२ मध्ये राज्यसभेची रचना, स्वरुप याविषयी मांडणी केली आहे. एखाद्यावेळी लोकप्रिय प्रगतिशील पण सरकारला न रुचणारे विधेयक संमत झाले तर त्याला यशस्वीरित्या द्वितीय सभागृहात अमान्य करता यावे या दृष्टीने या गृहाला महत्त्व प्राप्त होते. भारतातील विविधी राज्यात लोकसंख्येचे प्रमाण कमी अधिक आहे. त्यामुळे सर्व राज्यांना समान न्याय मिळावा, समान प्रतिनिधीत्व मिळावे या हेतूने लोकसंख्येच्या प्रमाणात राज्यांना प्रतिनीधीत्व मिळावे या हेतूने लोकसंख्येच्या प्रमाणात राज्यांना प्रतिनीधीत्व देण्यात आलेले आहे.

### ❀ रचना :–

राज्यसभा हे संसदेचे द्वीतीय सभागृह आहे. राज्यघटनेच्या ८० व्या कलमाप्रमाणे राज्यसभेत २५० सदस्य असतील. त्यापैकी २३८ सदस्य घटक राज्यांच्या विधानसभांकडून निवडले जातात. उरलेल्या १२ सदस्यांची नियुक्ती राष्ट्रपती करतो. हे १२ सदस्य साहित्य, कला, विज्ञान, समाजसेवा, मनोरंजन इ. क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती असतात. प्रत्येक घटक राज्याच्या राज्यसभेतील सदस्य संख्या भिन्न आहे. उदा. उत्तर प्रदेश – ३१, महाराष्ट्र – १९, ओरिसा – १०, पंजाब – ७, मिझोराम – १ इ.

### ❀ सदस्यांची पात्रता :–

घटनेच्या ८४ व्या कलमानुसार राज्यसभेची निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारासाठी पुढील पात्रता आहे.

१. तो भारताचा नागरिक असावा

२. त्याचे वय ३० वर्षे पूर्ण असावे.

३. संसदेने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी त्याने पूर्ण केल्या पाहिजेत.

४. ज्या घटक राज्यातून तो निवडणूक लढविणार आहे त्या घटक राज्यांच्या संसदीय मतदार संघात त्याचे नाव असले पाहिजे.

सरकारी नोकर, वेडी, तुरुंगवासाची शिक्षा भोगलेली, परकीय, निवडणूकीत भ्रष्टाचारी ठरवलेला उमेदवार राज्यसभेच्या निवडणुकीस अपात्र ठरविला जातो. एकाचवेळी राज्यसभा व लोकसभा आणि घटक राज्याच्या विधीमंडळाचे सदस्य राहता येत नाही. राज्यसभेवर नियुक्ती झाल्यास त्या प्रतिनिधीला इतर पदे सोडावी लागतात.

❀ **कार्यकाल :–**

द्वितीय सभागृह स्थायी ठेवण्याची पद्धत इतर देशाप्रमाणेच भारतानेही स्विकारलेली आहे. राज्यसभा हे स्थायी सभागृह आहे. ते कायमस्वरुपी सभागृह असल्यामुळे ते कधीही बरखास्त केले जात नाही. याचा फायदा असा होतो, की लोकसभा विसर्जीत झाल्यानंतर राज्यप्रमुखाला महत्त्वाच्या कायदेविषयक बाबींवर सल्ला देण्याचे कार्य राज्यसभा करु शकते. राज्यसभा हे कधीही बरखास्त होत नाही त्यातील १/३ सदस्य दर दोन वर्षांनी निवृत्त होतात आणि त्या जागी तेवढेच सदस्य नव्याने निवडले जातात. राज्यसभेतील प्रत्येक सदस्याला आपल्या पदावर सहा वर्षे राहता येते. राज्यसभेचे सदस्य एकाच वेळी निवृत्त होत नसल्यामुळे जुने–नवे सदस्य एकत्रित काम करताना दिसतात. जुन्या सदस्यांचा अनुभव आणि नव्या सदस्यांचा उत्साह यामुळे राज्यसभेचे कामकाज उत्साहाने, जबाबदारीने व कार्यक्षमतेने चालते.

❀ **निवडणुक पद्धत :–**

राज्यसभेतील २३८ सदस्यांची निवड घटक राज्याच्या विधानसभेतील सदस्यांकडून होत असते. राज्यसभेतील सभासद निवडीचा अधिकार प्रत्यक्ष जनतेला दिलेला नसून, प्रत्येक घटक राज्यातील विधानसभेत निवडून आलेल्या आमदारांना हा अधिकार दिलेला आहे. राज्यसभेतील सदस्यांची निवडणुक गुप्त मतदान व एकल संक्रमणीय क्रमदेय मतदान पद्धतीने होते. या पद्धतीमुळे घटक राज्यातील विविध राजकीय पक्षांना आपल्या सदस्य संख्येवर आधारीत राज्यसभेत आपले प्रतिनिधी पाठविण्याची संधी मिळते.

❀ **राज्यसभेचा सभापती :–**

भारतीय राज्यघटनेच्या कलम ८९ नुसार भारताचा उपराष्ट्रपती हा राज्यसभेचा पदसिद्ध सभापती असतो त्याचा कार्यकाल पाच वर्षांचा आहे. सभापतीच्या गैरहजेरीत राज्यसभेचे कामकाज उपसभापती पाहतो. राज्यसभेतील सदस्यांकडून उपसभापतीची निवड केली जाते. राज्यसभेचा सभापती व उपसभापती यांना स्वमर्जीने आपल्या पदाचा राजीनामा देता येतो. सभापती व उपसभापती ही दोन्ही पदे एकाच वेळी रिकामी झाल्यास सभागृहातील जेष्ठ नेत्यांची सभापती म्हणून राष्ट्रपती निवड करतो.

राज्यसभेच्या सभापतीला पदावरुन दूर करण्याचा अधिकार राज्यसभेला नाही, असा अधिकार संसदेला आहे.

राज्यसभेच्या सभापतीला राज्यसभेतील सदस्यांवर नियंत्रण ठेवून सभागृहाचे कामकाज व्यवस्थित चालवावे लागते, सभागृहातील कामकाजाचे विषय ठरविणे, सदस्यांना भाषण करण्याचा अधिकार सभागृहातील चर्चेचे प्रश्न, स्थगन प्रस्ताव, विधेयकावरील चर्चा व मतदान घेणे, सभागृहातील नियम, पद्धती यांचे पालन करणे सभागृहात शांतता व शिस्त राखणे, एखाद्या विधेयकावर समसमान मते पडल्यास निर्णायक मत देणे इ. कामे सभापतीला करावी लागतात.

❀ **गणसंख्या :–**

सभागृहाचे कामकाज चालू करण्यासाठी १/१० सदस्य सभागृहात हजर असावे लागतात. राज्यसभेतील २५० सदस्यांपैकी किमान २५ सदस्य सभागृहात हजर असावे लागतात.

## ❒ राज्यसभेचे अधिकार व कार्ये :

### १. कायदेविषयक अधिकार :–

राज्यसभेला लोकसभे इतकेच कायदेविषयक अधिकार देण्यात आलेले आहेत. अर्थविधेयक सोडून इतर सर्व विधेयके राज्यसभेत मांडता येतात. विधेयकावर चर्चा, विचार–विनीमय होऊन विधेयके बहुमताने मंजुर किंवा नामंजुर केली जातात. राज्यसभेने मंजूर केलेले विधेयक लोकसभेकडे मंजुरीसाठी किंवा लोकसभेने मंजुर केलेले विधेयक राज्यसभेकडे मंजुरीसाठी पाठविली जातात. एखाद्या विधेयकाबाबत दोन्ही गृहात मतभेद निर्माण झाल्यास दोन्ही गृहाची संयुक्त बैठक बोलाविली जाते. राष्ट्रपतीच्या अध्यक्षतेखाली ही संयुक्त बैठक होते. त्या विधेयकाबाबत बहुमताने निर्णय होतो. त्यामध्ये लोकसभेची सदस्य संख्या अधिक असल्याने लोकसभेचाच प्रभाव पडतो. सामाईक यादीतील विषयावर कायदा करण्याचा अधिकार लोकसभेप्रमाणे राज्यसभेलाही आहे. नवीन कायदे करणे, जुन्या कायद्यात दुरुस्त्या करणे, अनावश्यक कायदे रद्द करणे अशा स्वरुपाची कार्ये राज्यसभा करीत असते.

### २. अर्थविषयक अधिकार :–

आर्थिक बाबतीत भारताच्या राज्यसभेला गौण स्थान प्राप्त झाले आहे. अर्थविषयक विधेयक प्रथम लोकसभा या कनिष्ठ गृहात मांडली जातात. अर्थविधेयक प्रथम लोकसभेत मंजुर होतात व नंतर ती केवल मंजुरीसाठी राज्यसभेकडे पाठवतात. लोकसभेकडून राज्यसभेकडे आलेल्या अर्थविधेयकावर सूचना शिफारशी करुन १४ दिवसांच्या आत लोकसभेकडे परत पाठविणे राज्यसभेला बंधनकारक आहे. राज्यसभेने १४ दिवसांच्या आत संबंधित विधेयक परत पाठविले नाही तर ते राज्यसभेला मंजूर आहे, असे समजून लोकसभा ते विधेयक अंतिम मान्यतेसाठी राष्ट्रपतीकडे पाठविते. राज्यसभेने

पाठविलेल्या सूचना व शिफारशी लोकसभेवर बंधनकारक नसतात. अर्थविधेयका बाबतीत दोन्ही गृहात मतभेद झाल्यास संयुक्त अधिवेशन बोलविण्याची तरतुद नाही.

## ३. कार्यकारी अधिकार :–

भारतात संसदीय शासन पद्धती असल्यामुळे मंत्रीमंडळ लोकसभेला जबाबदार असते. मंत्रीमंडळावर खरे नियंत्रण लोकसभेचे असते. मंत्रीमंडळाविरुद्ध अविश्वासाचा ठराव लोकसभेतच मांडला जातो. पण मंत्र्यांना प्रश्न, उपप्रश्न विचारुन त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचे काम राज्यसभा करीत असते. राज्यसभा लोकमत जागृत करण्याचे काम करु शकते. एखाद्या महत्त्वाच्या प्रश्नासंबंधी राज्यसभेत 'काम रोको' प्रस्ताव (स्थगन प्रस्ताव) आणता येतो. एखादे विधेयक राज्यसभा नामंजूर करुन मंत्रीमंडळाच्या कार्याबाबत नापसंती व्यक्त करु शकते.

## ४. घटनादुरुस्तीचा अधिकार :–

भारतीय घटनेने लोकसभेप्रमाणेच राज्यसभेला घटनादुरुस्तीचा अधिकार दिलेला आहे. घटनादुरुस्ती विधेयकाला राज्यसभेची मंजूरी लागते. एखाद्या दुरुस्तीला राज्यसभेने मंजूरी न दिल्यास घटना दुरुस्ती होऊ शकत नाही.

## ५. इतर अधिकार :–

१. राष्ट्रपती व उपराष्ट्रपती निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार राज्यसभेतील सदस्यांना आहे.

२. अधिवेशन सुरु करताना राष्ट्रपती जे वटहुकूम काढतो त्यांना लोकसभा व राज्यसभा यांची मंजुरी घ्यावी लागते.

३. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, महालेखा परिक्षक, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांनी केलेल्या घटनाबाह्य वर्तनाबद्दल त्यांना पदच्युत करण्याचा अधिकार राज्यसभेला आहे.

४. राज्यसुचीतील एखादा विषय महत्त्वाचा आहे असा ठराव राज्यसभा पास करु शकते. अशा ठरावानुसार कायदा करण्याचा अधिकार संसदेला आहे. अशा ठरावाचा कालावधी एक वर्षाचा असतो.

५. राष्ट्रपतीने आणीबाणी घोषीत केल्यावर त्यास लोकसभा व राज्यसभेची मंजुरी लागते.

६. राज्यसभा २/३ बहुमताने ठराव मान्य करुन अखिल भारतीय सेवा निर्माण करण्याची सूचना करु शकते.

## स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न–१

❒ **खालील प्रश्नांची एक–दोन वाक्यात उत्तर द्या.**

१. लोकसभा सदस्यत्वासाठी वयोमर्यादा किती आहे?

२. लोकसभेचे कामकाज सुरु करण्यासाठी किती गणसंख्या आवश्यक आहे?

३. राज्यसभा हे कसले सभागृह आहे?

४. अर्थविधेयक प्रथम कोणत्या गृहात मांडले जाते?

### ३.२.१.२ कार्यकारी मंडळ (Executive) :-

भारताने इंग्लंडप्रमाणे संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. संसदीय शासन पद्धतीमुळे भारतीय राज्यव्यवस्थेत घटनात्मक व वास्तववादी असे दोन सत्ताप्रमुख तयार झालेले आहेत. राष्ट्रपतीचे स्थान घटनात्मक स्वरुपाचे आहे. तर पंतप्रधान हा वास्तववादी सत्ताप्रमुख म्हणून काम पाहतो. भारताने इंग्लंडप्रमाणे संसदीय शासन पद्धती स्विकारली असली तरी इंग्लंडची संसदीय शासन पद्धती जशीच्या तशी स्वीकारलेली नाही. भारतातील सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतीक रचनेनुसार योग्य त्या बदलानुसार बदल करुन स्वीकार केलेला आहे. भारताने संसदीय लोकशाही स्विकारण्याचे प्रमुख कारण म्हणजे कार्यकारीमंडळ व न्यायमंडळ यांच्यात आवश्यक ते सहकार्य, सौहार्दाचे वातावरण निर्माण व्हावे. न्यायमंडळ व कार्यकारी मंडळ यांची कामे परस्परांच्या सहकार्यावरच अवलंबुन असतात. संसदीय शासन पद्धती नुसार भारतातील शासन व्यवस्थेचा कारभार चालु आहे.

भारतीय घटनेच्या कलम ५२ ते ७८ मध्ये केंद्रीय कार्यकारी मंडळाची तरतुद केलेली आहे.

### अ) राष्ट्रपती (President) :-

भारताचा राष्ट्रपती भारताच्या राजकीय व्यवस्थेचा घटनात्मक प्रमुख म्हणून काम पाहतो. भारत हे गणराज्य असल्यामुळे निर्वाचीत, नाममात्र प्रमुखाची व्यवस्था घटनेत करण्यात आली आहे. राष्ट्रपती घटनात्मक प्रमुख म्हणून काम पाहतो तर पंतप्रधान व त्याचे मंत्रीमंडळ वास्तववादी सत्ताप्रमुख म्हणून काम पाहतो. भारताचा राज्यकारभार राष्ट्रपतीच्या नावाने चालतो, परंतु प्रत्यक्षात सत्ता मात्र पंतप्रधानाकडे असते. राष्ट्रपती हे पद आपण इंग्लंडच्या व्यवस्थेकडून स्वीकारलेले आहे. इंग्लंडच्या राजा किंवा राणीकडे हे पद असते. इंग्लंडचा राजा किंवा राणी प्रमाणे भारताच्या राष्ट्रपतीचे पद असले तरी यामध्ये फरक आहे. उदा. राजा किंवा राणी हे पद अनुवंशिक आहे. पण भारताच्या राष्ट्रपतीचे पद निर्वाचीत आहे. पाच वर्षाच्या कालावधीनंतर त्यांना पदावरुन दूर व्हावे लागते.

घटनेच्या कलम ५२ ते ६२ मध्ये राष्ट्रपतीच्या पदासंबंधी तरतुद आहे. 'भारताला एक राष्ट्रपती असेल' असे कलम ५२ मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. राष्ट्रपती हा भारताचा प्रथम नागरिक असतो. तिन्ही दलाचा तो सरसेनापती असतो. भारतीय संघराज्याची सर्व कार्यकारी सत्ता त्याच्या हाती एकवटलेली असते. राष्ट्रपती पेक्षा घटनात्मक दृष्ट्या सर्वश्रेष्ठ असे कोणीही नाही. सामाजिक, राजकीय व सांस्कृतीक क्षेत्रात राष्ट्रपतीला मानाचे स्थान आहे.

❀ **पात्रता :–**

भारतीय घटनेच्या कलम ५८ मध्ये राष्ट्रपती पदासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारासाठी खालील पात्रता आहे.

१. ती व्यक्ती भारताचा नागरिक असावी.

२. त्या व्यक्तीचे वय ३५ वर्षे पूर्ण असावे.

३. लोकसभेचा सदस्य म्हणून निवडून येण्यास ती व्यक्ती पात्र असावी.

४. राष्ट्रपतीच्या निवडणुकीसाठी, निवडणुक लढविणारी व्यक्ती केंद्र किंवा घटक राज्याच्या नोकरीत नसावी. असल्यास राजीनामा देऊन निवडणुक लढवीता येते.

५. राष्ट्रपती पदाची निवडणुक लढवीणारी व्यक्ती संसदेचा किंवा विधीमंडळाचा सदस्य नसावा.

❀ **वेतन :–**

भारताच्या राष्ट्रपतीला संसदेने वेळोवेळी ठरविलेले वेतन दिले जाते. याशिवाय इतर भत्ते व सुखसोयींनी सज्ज असे राष्ट्रपतीभवन राष्ट्रपतीसाठी असते. निवृत्तीनंतर त्यांना निवृत्तीवेतन दिले जाते.

❀ **कार्यकाल :–**

राष्ट्रपतीचा कार्यकाल त्याने पद धारण केल्यापासून (कलम ५६) पाच वर्षाचा असतो. ज्या दिवशी तो राष्ट्रपती पदाची सुत्रे हाती घेतो त्या दिवसापासून पाच वर्षे मोजण्यात येतात. पाच वर्षे संपल्यानंतरही नवीन राष्ट्रपती निवडून येईपर्यंत तोच कारभार पाहतो. राष्ट्रपती पदावर असणारी व्यक्ती कितीही वेळा निवडणूक लढवू शकते. मुदतीपूर्वी तो आपला राजीनामा देऊ शकतो. आपला राजीनामा तो उपराष्ट्रपतीकडे देतो. राष्ट्रपतीला पदच्युत केल्यामुळे किंवा त्यांच्या राजीनाम्यामुळे किंवा मृत्युने राष्ट्रपतीचे पद रिकामे झाल्यास उपराष्ट्रपती हंगामी राष्ट्रपती म्हणून कामकाज पाहतो.

## ❀ निवडणुक पद्धत :–

भारतातील राष्ट्रपतीची निवडणूक अतिशय गुंतागुंतीची व किचकट आहे. राष्ट्रपतीची निवड प्रत्यक्ष जनतेद्वारे होत नाही तर त्यांची निवडणुक जनतेच्या निर्वाचीत प्रतिनीधींच्या मार्फत अप्रत्यक्षपणे होते. राष्ट्रपतीची निवडणूक अप्रत्यक्ष, गुप्त मतदान व एकलसंक्रमणीय पद्धतीने होते. राष्ट्रपतीच्या निवडणूकीकरता एक निर्वाचन मंडळ असते. या निर्वाचन मंडळात

१. भारतीय संसदेच्या दोन्ही सभागृहातील म्हणजे लोकसभा व राज्यसभेतील निर्वाचीत सदस्य

२. घटक राज्यातील विधानसभांतील निर्वाचीत सदस्य यांचा समावेश होतो.

राष्ट्रपती हा संघराज्याचा प्रमुख असल्याने त्यांची निवड करताना पुढील दोन तत्त्वांचा अवलंब केला जातो.

१. राष्ट्रपतीच्या निवडणुकीत शक्यतो सर्व राज्यांना राष्ट्रपतीच्या निवडणुकीत समान मते मिळावीत.

२. सर्व राज्यांचे महत्त्व संघराज्याशी समतुल्य असावे.

वरील तत्त्वांची मिमांसा केल्यास संघराज्यातील सर्व राज्यांना समान लेखण्यात यावे, हे संघराज्याचे आवश्यक तत्त्व असल्याने संघराज्याचा प्रमुख निवडताना प्रत्येक राज्याला समान महत्त्व असावे. दुसऱ्या तत्त्वाप्रमाणे घटकराज्य व संघराज्य यांच्यात समानता राखणे इष्ट ठरेल. कारण संघराज्य सर्व राज्यांचे मिळून बनलेले असते, ही दोन्ही तत्त्वे राष्ट्रपतीच्या निवडणुकीत लागू केल्यामुळे राष्ट्रपतीची निवडणूक बरीच गुंतागुंतीची बनली आहे. त्यामुळे प्रत्येक मतदाराला एकच मत प्राप्त न होता वेगवेगळ्या संख्येत मत प्राप्त होते.

## ❀ मतांची किंमत ठरविणारी सुत्रे :–

घटकराज्यातील विधानसभेतील प्रत्येक सदस्याच्या मताचे मूल्य किती मते असावे याचा स्पष्ट उल्लेख भारतीय संविधानाच्या कलम ५५ मध्ये केला आहे.

**सुत्र १ :** पहिल्या तत्त्वाप्रमाणे सर्व घटकराज्यांना शक्यतो समान मते असावीत असे सांगण्यात आले आहे. पण प्रत्येक राज्याच्या विधानसभेच्या आमदारांची संख्या कमी, जास्त असल्यामुळे एका निश्चित प्रमाणात मते प्राप्त होऊ शकत नाहीत. यासाठी तोडगा म्हणून खालील सुत्र सांगण्यात आलेली आहेत.

$$\text{राज्यातील निर्वाचित विधानसभा सदस्यांच्या मताची किंमत} = \frac{\text{त्या राज्याची लोकसंख्या}}{\text{त्या राज्याच्या विधानसभेच्या निर्वाचीत सदस्यांची संख्या}} \times \frac{१}{१००}$$

वरील सुत्रामुळे राज्याची लोकसंख्या अधिक असो अथवा विधानसभा सदस्य संख्येने कितीही असोत प्रत्येक सदस्याच्या मताचे मुल्य समप्रमाणात येते.

**सुत्र २ :** दुसरे तत्त्व अंमलात आणण्यासाठी संसद सदस्यांच्या प्रत्येक निर्वाचीत सदस्याची मताची किंमत पुढील सुत्राप्रमाणे ठरवितात.

$$\text{संसदेच्या निर्वाचित सदस्याला प्राप्त होणारी मते} = \frac{\text{सर्व राज्यातील विधानसभा सदस्यांना मिळणारी एकूण मते}}{\text{लोकसभा व राज्यसभा यांतील निर्वाचीत सदस्यांची संख्या}}$$

### ❀ मतदान व मतमोजणी :–

वरील सुत्रानुसार विधानसभा सदस्यांचे व संसद सदस्यांच्या मताचे मूल्य निश्चित केल्यानंतर राष्ट्रपतीच्या निवडणुकीस प्रारंभ होतो. राष्ट्रपतीची निवडणूक 'एकल संक्रमणीय' क्रमदेय व गुप्त मतदान पद्धतीने होते या पद्धतीमुळे मते वाया जात नाहीत. प्रत्येक मतदाराला भिन्न संख्येत मते द्यावयाची असली तरी प्रत्यक्षात त्याला एकच मतपत्रिका देण्यात येते. मतदान करतानाही तो एकच मत देतो. मतमोजणी वेळी एक मत न मोजता मतदाराला जितकी मते प्राप्त झाली आहेत तितकी मते प्राप्त होतात.

राष्ट्रपतीच्या निवडणुकीकरता एकल संक्रमणीय पद्धती स्विकारलेली आहे. राष्ट्रपती पदाकरीता असलेल्या उमेदवाराच्या नावापुढे पसंतीक्रम द्यावयाचा असतो. सर्वप्रथम राष्ट्रपतीच्या निवडणुकीसाठी उभे राहिलेल्या उमेदवाराच्या नावापुढील प्रथम क्रमांकाची मते मोजली जातात. यामध्ये बहुमत प्राप्त झाल्यास ती व्यक्ती राष्ट्रपती म्हणून घोषीत केली जाते. बहुमत प्राप्त न झाल्यास सर्वात कमी प्रथम क्रमांकाची मते मोजली जातात व इतरांच्या प्रथम पसंतीच्या मतात मिळविण्यात येतात. दोन्ही मते मिळून बहुमत प्राप्त झाल्यास संबंधीत व्यक्तीला राष्ट्रपती म्हणून घोषित केले जाते. यातून ही बहुमत न मिळाल्यास तिसऱ्या क्रमांकाची मते मोजून मुळच्या मतात मिळविली जातात. ही प्रक्रिया बहुमत मिळेपर्यंत सुरु राहते. ही पद्धत बरीच गुंतागुंतीची वाटत असली तरी व्यवहारात फक्त मतमोजणीच्या वेळी गणितीय गुंतागुंत आहे. विजयासाठी खालील कोटा पद्धत वापरली जाते. या पद्धतीला हेर पद्धत असेही म्हणतात.

$$\text{राष्ट्रपतीला विजयासाठी आवश्यक मते} = \frac{\text{एकूण झालेले मतदान}}{\text{राष्ट्रपती निवडावयाची संख्या} + १} + १$$

अशा रितीने भारताच्या राष्ट्रपती पदासाठी निवडणूक घेतली जाते. राष्ट्रपती होणारी व्यक्ती देशाचे प्रतिनिधीत्व करते. अशाप्रकारे जनतेच्या प्रतिनिधीद्वारे अप्रत्यक्षरित्या राष्ट्रपतीची निवड केली जाते.

### ❀ आत्तापर्यंत झालेले राष्ट्रपती व त्यांचा कार्यकाल :–

| क्रम | नांव | कार्यकाल |
|---|---|---|
| पहिले राष्ट्रपती | डॉ. बाबू राजेंद्रप्रसाद | १९५२–१९५७ |
| दुसरे राष्ट्रपती | डॉ. बाबू राजेंद्रप्रसाद | १९५७–१९६२ |
| तिसरे राष्ट्रपती | डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन | १९६२–१९६७ |
| चौथे राष्ट्रपती | डॉ. झाकीर हुसेन | १९६७–१९६९ |
| पाचवे राष्ट्रपती | व्ही. व्ही. गिरी | १९६९–१९७४ |
| सहावे राष्ट्रपती | फक्रुद्दिन अली अहमद | १९७४–१९७७ |
| सातवे राष्ट्रपती | नीलम संजीव रेड्डी | १९७७–१९८२ |
| आठवे राष्ट्रपती | ग्यानी झैलसिंग | १९८२–१९८७ |
| नववे राष्ट्रपती | आर. व्यंकटरामन | १९८७–१९९२ |
| दहावे राष्ट्रपती | डॉ. शंकर दयाल शर्मा | १९९२–१९९७ |
| अकरावे राष्ट्रपती | के. आर. नारायणन | १९९७–२००२ |
| बारावे राष्ट्रपती | डॉ ए.पी.जी. अब्दुल कलाम | २००२–२००७ |
| तेरावे राष्ट्रपती | श्रीमती प्रतिभाताई पाटील | २००७–२०१२ |
| चौदावे राष्ट्रपती | प्रणव मुखर्जी | २०१२–२०१७ |
| पंधरावे राष्ट्रपती | रामनाथ कोविंद | २०१७–२०२२ |
| सोळावे राष्ट्रपती | श्रीमती द्रौपदी मुर्मु | २०२२ पासून |

### ❀ राष्ट्रपतीवरील महाभियोग :–

राष्ट्रपती आपला कार्यकाल संपण्यापूर्वी स्वेच्छेने राजीनामा उपराष्ट्रपतीकडे देऊ शकतो. आजपर्यंत स्वेच्छेने कोणत्याही राष्ट्रपतीने राजीनामा दिल्याचे उदाहरण नाही. राष्ट्रपतीने घटना विरोधी वर्तन केले तर त्याला पदावरुन दूर केले जाते. राष्ट्रपतीला पदावरुन दूर करण्याची प्रक्रिया घटनेतील

कलम ६१ मध्ये नमुद केलेली आहे. यास 'महाभियोग' खटला असे म्हणतात. भ्रष्टाचार, राष्ट्रविरोधी कृत्ये इ. गंभीर आरोपावरुन भारताच्या राष्ट्रपतीला महाभियोगाद्वारे काढून टाकले जाते. राष्ट्रपतीला पदावरुन कमी करण्यासंबंधीचे आरोप पत्र संसदेच्या कोणत्याही एका गृहाने सादर केले पाहिजे. आरोपपत्राला सभागृहाच्या एकूण सभासद संख्येच्या २/३ सदस्यांनी मंजूरी द्यायला हवी. नंतर ही आरोपपत्रिका दुसऱ्या गृहाकडे पाठविली जाते. या ठिकाणी राष्ट्रपतीला आपली बाजू मांडता येते. चौकशी झाल्यानंतर २/३ मतांनी आरोपपत्र मान्य झाल्यास राष्ट्रपतीला आपला पदत्याग करावा लागतो. आजपर्यंतच्या इतिहासात महाभियोगाच्या खटल्याद्वारे राष्ट्रपतीला काढून टाकल्याचे उदाहरण भारतात घडलेले नाही.

मृत्यू, राजीनामा किंवा महाभियोगाच्या खटल्याद्वारे राष्ट्रपतीचे पद रिक्त झाल्यास राष्ट्रपतीचे काम उपराष्ट्रपती पाहतो. लगेच नव्याने राष्ट्रपतीची निवडणूक घेतली जाते. पण उपराष्ट्रपती हा राष्ट्रपती बनत नाही. राष्ट्रपती व उपराष्ट्रपती ही दोन्ही पदे एकाच वेळी रिक्त झाल्यास राष्ट्रपतीचे कामकाज सर्वोच्च न्यायालयाचा सरन्यायाधिश पाहतो. तो हंगामी राष्ट्रपती असतो.

## ❒ राष्ट्रपतीचे अधिकार व कार्ये :–

भारताच्या राष्ट्रपतीला इतर देशाच्या राजप्रमुखाप्रमाणेच घटनेने अत्यंत व्यापक अधिकार दिले आहेत. हे अधिकार नाममात्र स्वरुपाचे असून प्रत्यक्ष काम करताना पंतप्रधान व त्याचे मंत्रीमंडळ यांचा सल्ला व मार्गदर्शन घेऊनच अधिकारांचा वापर करावा लागतो.

### १. कार्यकारी अधिकार (Executive or Administrative Powers) :-

१. राष्ट्रपती पंतप्रधानाची नेमणूक करतो तसेच पंतप्रधानाच्या सल्ल्याने तो मंत्रीमंडळातील इतर मंत्र्यांची नियुक्ती करतो.

२. संसदेने केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करण्याचे महत्त्वपूर्ण काम राष्ट्रपतीला करावे लागते. सरकारचे सर्व वटहुकुम राष्ट्रपतीच्या नावाने निघतात.

३. राष्ट्रपती प्रशासनातील वरिष्ठ व महत्त्वपूर्ण अशा अधिकाऱ्यांच्या नेमणूका करतो. यामध्ये भारताचा महालेखा परिक्षक, भारताचा महान्यायवादी, केंद्रीय लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष व सदस्य राज्यपाल, नायब राज्यपाल, परराष्ट्रात पाठवायचे दूत व प्रतिनिधी, मुख्य निवडणूक आयुक्त, रिझर्व्ह बँकेचा गव्हर्नर, अनुसूचीत जाती-जमातींच्या विकासासाठी आयुक्त, केंद्रशासित प्रदेशासाठी चीफ कमीशनर इ. नेमणूका राष्ट्रपती करतो. त्याबरोबरच निवडणूक मंडळ, नियोजन मंडळ, वित्त मंडळ, भाषा आयोग इ. नियुक्त्या राष्ट्रपती करतो.

४. भारताचा राष्ट्रपती ह तिन्ही सैनिक दलांचा सरसेनापती आहे. त्यामुळे राष्ट्रपतीला हवाईदल, आरमार आणि नाविक दलाचे सेनापती आणि इतर प्रमुख अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याचा अधिकार आहे. राष्ट्रीय संरक्षण समितीचा तो अध्यक्ष असतो, राष्ट्रप्रमुख या नात्याने तो युद्ध जाहीर करतो, परराष्ट्राशी तह, करार, संधी आणि मैत्री करण्याचा अधिकार आहे.

५. राष्ट्रपतीला राजनैतिक कामे करावी लागतात. यामध्ये परराष्ट्रातील वकिलांची अधिकारपत्रे स्विकारणे, परराष्ट्रीय पाहुण्यांचे स्वागत करणे, आंतरराष्ट्रीय सभा-संमेलनाला हजर राहून तो आपल्या देशाचे प्रतिनिधीत्व करतो, परराष्ट्राशी राजनैतिक, आर्थिक आणि सांस्कृतीक संबंध प्रस्थापित करावे लागतात.

६. केंद्रशासीत प्रदेशातील चीफ कमिशनरची नेमणूक करुन त्यांच्यामार्फत त्या प्रदेशाचा शासन, कारभार राष्ट्रपतीला करावा लागतो.

७. देशातील सर्व प्रकारच्या राजकीय, सामाजिक उत्सवाच्या प्रसंगी राष्ट्रपतीला महत्त्वपूर्ण व मानाचे स्थान देण्यात येते.

वरील सर्व अधिकार जरी राष्ट्रपतीला देण्यात आले असले तरी हे सर्व अधिकार पंतप्रधानाच्या सल्ल्यानुसार वापरले जातात.

**२. कायदेविषयक अधिकार (Legislative Powers) :-**

कलम ७९ नुसार 'राष्ट्रपती, लोकसभा व राज्यसभा' यांची मिळून संसद तयार होते. म्हणजेच भारताचा राष्ट्रपती संसदेचे एक अंग आहे. परंतु तो संसदेच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्य नसतो. राष्ट्रपतीला पुढील प्रमाणे कायदेविषयक अधिकार प्राप्त झाले आहेत.

१. भारताच्या राष्ट्रपतीने संसदेची वर्षातून कमीत कमी दोन अधिवेशने बोलावणे गरजेचे आहे. संबंधीत अधिवेशने तहकुब करणे, आवश्यकता वाटल्यास लोकसभा बरखास्त करणे, हे अधिकार राष्ट्रपतीला आहेत.

२. लोकसभा व राज्यसभा यांच्यात संघर्ष निर्माण झाल्यास राष्ट्रपतीला या दोन गृहाचे संयुक्त अधिवेशन बोलावण्याचा अधिकार आहे. परंतू असे संयुक्त अधिवेशन धनविधेयकाबाबत बोलवू शकत नाही.

३. राष्ट्रपती संसदेच्या एका किंवा दोन्ही गृहांच्या संयुक्त बैठकी अभिभाषण देतो. असे अभिभाषण प्रत्येक वर्षाच्या होणाऱ्या पहिल्या अधिवेशनाच्या आरंभ करतो.

४. संसदेच्या दोन्ही सभागृहात तज्ज्ञ व्यक्तींची नेमणूक करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे. राष्ट्रपती, साहित्य, कला, विज्ञान, संस्कृती, शिक्षण अशा क्षेत्रातील १२ तज्ज्ञ व्यक्तींची नेमणूक करतो. तसेच लोकसभेत अँग्लो इंडियन जमातीला पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले नसेल तर राष्ट्रपती त्यांच्यातील दोन प्रतिनिधी लोकसभेवर नेमतो.

५. संसदेने संमत केलेल्या प्रत्येक विधेयकाला राष्ट्रपतीची संमती घ्यावी लागते. संसदेने मान्य केलेल्या विधेयकावर राष्ट्रपतीची संमतीदर्शक सही झाल्यानंतरच त्या विधेयकाचे कायद्यात रुपातंर होते. विधेयक नाकारण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे. परंतू नाकारलेले विधेयक परत पाठविले जाते. तेव्हा संसदेत राष्ट्रपतीने सुचविलेल्या सुचनांवर विचारविनिमय होऊ शकते. पण राष्ट्रपतीच्या सुचना स्वीकारल्याच पाहिजेत असे बंधन संसदेवर नसते. संसदेने हे विधेयक दुसऱ्यावेळी संमत करुन राष्ट्रपतीकडे पाठविल्यास राष्ट्रपतींना त्याला मंजुरी द्यावीच लागते. विधेयक नाकारण्याचा मर्यादीत अधिकार राष्ट्रपतीला दिलेला आहे. राज्यपालाकडून घटकराज्याची काही विधेयके राष्ट्रपतीच्या मंजुरीसाठी येतात, त्या विधेयकांना राष्ट्रपती संमती देऊ शकतो किंवा नाकारु शकतो. अर्थविधेयक नाकारण्याचा अधिकार राष्ट्रपतीला नाही कारण अर्थविधेयक त्याच्या मान्यतेनेच मांडले जाते.

६. भारतीय घटनेच्या १२३ नुसार राष्ट्रपतीला वटहुकूम किंवा अध्यादेश काढण्याचा अधिकार आहे. संसदेचे अधिवेशन चालू नसताना गंभीर परिस्थितीमुळे विशेष कायद्याची आवश्यकता असेल तेव्हा राष्ट्रपती वटहुकुम काढू शकतो. मात्र अशा वटहुकुमांना संसदेचे अधिवेशन चालू होताच सहा आठवड्यांच्या आत मंजुरी घ्यावी लागते. संसदेने मंजुर केलेल्या वटहुकुमांचे रुपांतर कायद्यात होते. वटहुकुम रद्द करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे.

७. घटक राज्याच्या सीमा बदलणारे, त्याचे नांव रचना बदलविणारे विधेयक, अर्थविधेयक आणि संचित निधीतून खर्च करण्याबाबतचे विधेयक इ. विधेयके राष्ट्रपतीच्या पूर्व संमतीशिवाय संसदेत मांडली जाऊ शकत नाहीत.

८. महालेखापरिक्षक, लोकसेवा आयोग, वित्त अयोग इ. यंत्रणेकडे आलेले अहवाल राष्ट्रपती संसदेपुढे ठेवतो.

९. घटकराज्यांचे आंतरजातीय व्यापार, आयात, निर्यात विषयक विधेयकांना राष्ट्रपतीची पूर्व संमती घ्यावी लागते.

## ३. न्यायविषयक अधिकार (Judicial Powers) :-

१. न्यायालयाने एखाद्या व्यक्तीला प्राणदंडाची शिक्षा दिली असेल आणि त्या व्यक्तीने राष्ट्रपतीकडे क्षमायाचनेचा अर्ज केला तर राष्ट्रपती त्या व्यक्तीच्या शिक्षेत सूट देऊ शकतो किंवा ती शिक्षा माफ करु शकतो. पण या अधिकाराचा वापर करताना राष्ट्रपती मंत्रीमंडळाशी सल्लामसलत करतो.

२. केंद्रसरकार व राज्यसरकार यांच्यात वाद निर्माण झाल्यास त्यासंबंधी सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला विचारण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे.

३. सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकाऱ्यांच्या व नोकरवर्गाच्या बाबतीत पगार, भत्ता, सुटी आणि निवृत्ती यासंबंधी नियम करताना प्रधान न्यायाधीशाला राष्ट्रपतीची संमती घ्यावी लागते.

## ४. आणीबाणीविषयक अधिकार (Emergency Powers) :-

असाधारण परिस्थिती निर्माण झाल्यास संविधानाने राष्ट्रपतीला विशेष अधिकार दिले आहेत. १८ व्या भागात ३५२ ते ३६० कलमामध्ये राष्ट्रपतीचे आणीबाणी विषयक अधिकार सांगीतले आहेत. जेंव्हा देशात नेहमीच्या शासनपद्धतीनुसार राज्यकारभार करणे अशक्य झाल्यास राष्ट्रपतीला आणीबाणी जाहीर करण्याचा अधिकार आहे. अशावेळी राष्ट्रपतीच्या अधिकारात वाढ होते. भारतीय घटनेने पुढील तीन प्रकारच्या आणीबाणी नमुद केल्या आहेत.

### १. युद्ध, बाह्य आक्रमण तसेच अंतर्गत अशांततेमुळे राज्याच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाल्यास :–

भारतीय घटनेच्या ३५२ व्या कलमानुसार राष्ट्रपतीला आणीबाणी घोषित करण्याचा अधिकार आहे. युद्ध किंवा बाह्य आक्रमण तसेच अंतर्गत अशांततेमुळे राज्याच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाल्यास व राष्ट्रपतीला त्याची खात्री पटल्यास तो आणीबाणी जाहीर करतो. आणीबाणीची घोषणा एक महिने अमलात राहते. परंतु एक महिन्याच्या आत या घोषणेला संसदेची मंजुरी घ्यावी लागते. संसद ठरवेल तेवढ्या कालावधीपर्यंत या घोषणेचा अंमल राहतो. अशी घोषणा करतेवेळी लोकसभा विसर्जीत झाली असेल आणि त्या घोषणेला राज्यसभेत मंजुरी दिलेली असेल तर नवीन लोकसभेची पहिली बैठक सुरु झालेल्या दिवसापासून तीस दिवसांच्या आत त्या घोषणेवर लोकसभेची मंजुरी घ्यावी लागते.

आणीबाणीच्या काळात राष्ट्रपतीला काही अधिकार प्राप्त होतात यामध्ये राज्ययादीतील विषयांवर कायदे करण्याचा अधिकार राज्यसरकारने आपल्या कार्यकारी सत्तेचा वापर कशा प्रकारे करावा याविषयी आदेश देतो, नागरिकांच्या मुलभूत अधिकारावर मर्यादा येतात किंवा तहकुब केले

जातात, केंद्र सरकार व राज्यसरकार यांच्यातील आर्थिक संबंधांच्या तरतुदीत बदल करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला होतो.

घटनेच्या ३५२ कलमानुसार डॉ. राधाकृष्णन यांनी १९६२ साली भारत-चीन युद्धाच्या वेळी, १९७१ बांगलादेश युद्धा वेळी १९७५ साली राष्ट्रपती फक्रुदीन अली अहमद यांनी अंतर्गत अशांततेच्या कारणाखाली आणीबाणी जाहीर केली होती. १९७६ साली ४२ व्या घटनादुरुस्तीनुसार देशातील विशिष्ठ प्रदेशांकरीता आणीबाणी घोषीत करण्याची तरतुद केली आहे.

**२. एखाद्या घटक राज्यात राजकीय अस्थिरता किंवा घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झाल्यास :-**

दुसऱ्या प्रकारची आणीबाणी घटक राज्यात घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झाल्यास लावण्यात येते किंवा राज्यपालाने तशी सूचना राष्ट्रपतीला केल्यास राष्ट्रपती संबंधीत घटक राज्यात कलम ३५६ नुसार आणीबाणी जाहीर करु शकतो. आणीबाणी जाहीर झाल्यास पुढील प्रकारे परिणाम होतात.

१. राष्ट्रपती घटक राज्याच्या कारभाराची सर्व सुत्रे स्वत:कडे घेऊन राज्यपालामार्फत तेथील राज्यकारभार चालवतो.

२. घटकराज्य विधीमंडळाचे कायदेविषयक अधिकार राष्ट्रपती संसदेला देतो.

३. आणीबाणीच्या घोषणेचा हेतू सफल करण्यासाठी राष्ट्रपती आवश्यक त्या तरतुदी करु शकतो.

राष्ट्रपतीने घटक राज्यात आणीबाणी जाहीर केल्यानंतर दोन महिन्याच्या आत संसदेची मान्यता घ्यावी लागते. जर या घोषणेच्या वेळी लोकसभा विसर्जीत झाली असेल तर नव्या लोकसभेच्या पहिल्या बैठकी पासून ३० दिवसांच्या आत त्या घोषणेला मंजुरी घ्यावी लागते. १९८४ च्या ४८ व्या घटनादुरुस्तीने सहा महिन्याऐवजी एक वर्ष मुदत करण्यात आली आहे. १९५१ ते २०१० या काळात ३५६ कलमा अंतर्गत बऱ्याच वेळा गैरवापर केला आहे. म्हणून या कलमाचा वापर करताना राष्ट्रपतीने सदसद्विवेकबुद्धीचा वापर करावा, असे एस. आर. बोम्मई खटल्याच्या निकालात सर्वोच्च न्यायालयाने सुचविले आहे.

**३. संपूर्ण देशात किंवा कोणत्याही घटक राज्यात आर्थिक अस्थिरता निर्माण झाल्यास :-**

भारतीय घटनेच्या ३६० व्या कलमानुसार भारताच्या किंवा एखाद्या भागाचे आर्थिक स्थैर्य यांना धोका निर्माण झाला असल्यास राष्ट्रपती आर्थिक आणीबाणी घोषीत करु शकतो. या आणीबाणीची मुदत दोन महिने असते. मात्र संसदेला ती वाढविता येते. आणीबाणी घोषीत झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत या घोषणेला संसदेची मंजुरी घ्यावी लागते. या आणीबाणीच्या वेळी राष्ट्रपतीला पुढील अधिकार प्राप्त होतात.

१. राष्ट्रपती व केंद्रसरकार हे घटक राज्यांना आर्थिक बाबतीत आवश्यक ते आदेश व सूचना देऊ शकते.

२. घटक राज्याच्या कायदेमंडळानी संमत केलेली सर्व आर्थिक विधेयके राष्ट्रपती परत मागवू शकतो.

३. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांपासून ते चतुर्थ श्रेणीच्या कनिष्ठ नोकरवर्गापर्यंतच्या सर्व नोकरांचे पगार व भत्ते यात कपात करण्याचा आदेश राष्ट्रपती देऊ शकतो.

४. चालु आर्थिक वर्षातील महसूल उत्पन्नाच्या वाटणीसंबंधी राष्ट्रपतीला सुधारणा व तरतुदी करण्याचा अधिकार प्राप्त होतो.

## ब) भारताचा उपराष्ट्रपती (Vice President of India) :-

भारताच्या राष्ट्रपतीच्या गैरहजेरीत त्याचे काम पाहण्यासाठी उपराष्ट्रपती पदाची तरतुद केली आहे. भारतीय घटनेच्या कलम ६३ नुसार उपराष्ट्रपती पदाची तरतुद केली आहे. भारताचा उपराष्ट्रपती हा राज्यसभेचा पदसिद्ध सभापती असतो. राष्ट्रपतीची गैरहजेरी, मृत्यू किंवा त्याने राजीनामा दिल्यास तसेच महाभियोगाच्या खटल्याद्वारे राष्ट्रपतीला पदावरुन दूर केल्यास काही काळ ते पद उपराष्ट्रपती सांभाळतो. राष्ट्रपतीला दिले जाणारे वेतन, भत्ते, सवलती उपराष्ट्रपतीला कलम ६५ नुसार मिळतात अशावेळी त्याला राज्यसभेचे अध्यक्षपद स्विकारता येत नाही.

### ❀ पात्रता :–

उपराष्ट्रपती पदाची निवडणूक लढविणाऱ्या व्यक्ती घटनेच्या कलम ६६ नुसार पुढील पात्रता आहेत.

१. ती व्यक्ती भारताची नागरिक असावी.

२. त्याने वयाची ३५ वर्षे पूर्ण केली असावीत.

३. ती व्यक्ती राज्यसभेवर निवडून येण्याच्या पात्रतेची असावी.

४. ती व्यक्ती सरकारी नोकर नसावा.

५. निवडून आल्यानंतर त्याला कोणत्याही गृहाचे सभासद राहता येत नाही.

### ❀ निवडणूक :–

भारताच्या उपराष्ट्रपतीची निवडणूक लोकसभा व राज्यसभा म्हणजे संसदेच्या सभासदाकडून होते. उपराष्ट्रपतीची निवडणूक प्रमाणशीर प्रतिनिधीच्या पद्धतीनुसार एकल संक्रमणीय क्रमदेय पद्धतीद्वारे

होते. निर्वाचन मंडळाचे मतदार उमेदवाराच्या नावापुढे पंसतीक्रम लिहतात. जो उमेदवार सर्वात जास्त प्रथम क्रमांकाची मते मिळवेल तो उपराष्ट्रपती बनतो.

### ❀ कार्यकाल :–

उपराष्ट्रपतीचा कार्यकाल त्याने पद ग्रहण केल्यापासून ५ वर्षाचा असतो. मुदतीपूर्वी स्वमर्जीने तो आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतो. भ्रष्टाचार, लाचलूचपत इ. कारणावरुन उपराष्ट्रपतीला पदावरुन काढून टाकण्याची तरतुद आहे. मात्र यासाठी राज्यसभा व लोकसभा यांच्यात बहुमताची आवश्यकता असते. उपराष्ट्रपती स्वमर्जीने आपला राजीनामा राष्ट्रापतीकडे देऊ शकतो.

### ❀ अधिकार व कार्ये :–

भारतीय राज्यघटनेने उपराष्ट्रपतीला उपराष्ट्रपती म्हणून कोणतेही अधिकार दिलेले नाहीत. परंतू तो राज्यसभेचा पदसिद्ध अध्यक्ष असल्यामुळे त्याला काही अधिकार प्राप्त झाले आहेत. राज्यसभेच्या कामकाजावर नियंत्रण ठेवून विविध ठराव संमत करुन घेण्याचे कार्य उपराष्ट्रपती करतो. राज्यसभेत एखाद्या विधेयकावर समसमान मते पडल्यास तो निर्णायक मत देतो. राज्यसभेतील सर्व विधेयके त्याच्या संमतीने संमत होतात.

राष्ट्रपतीच्या गैरहजेरीत जेंव्हा उपराष्ट्रपती काम पाहतो तेंव्हा त्याला राष्ट्रपतीचे सर्व अधिकार प्राप्त होतात. राष्ट्रपतीचे पद रिक्त झाल्यास तो राष्ट्रपतीचे काम पाहतो. पण सहा महिन्याच्या आत नविन राष्ट्रपतीची निवड झालीच पाहिजे असे घटनेचे बंधन आहे.

**❀ भारताचे उपराष्ट्रपती ❀**

| नाव | कार्यकाल |
|---|---|
| डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन | १९५२–१९६३ |
| डॉ. झाकीर हुसेन | १९६३–१९६७ |
| वराहगिरी व्यंकटगिरी | १९६७–१९६९ |
| गोपालस्वरुप पाठक | १९६९–१९७४ |
| बी. डी. जत्ती | १९७४–१९७९ |
| एम. हिदायुतुल्ला | १९७९–१९८४ |
| आर. व्यंकटरामन | १९८४–१९८७ |
| डॉ. शंकर दयाल शर्मा | १९८७–१९९२ |
| के. आर. नारायणन | १९९२–१९९७ |

| | |
|---|---|
| कृष्णकांत | १९९७–२००२ |
| भैरवसिंह शेखावत | २००२–२०१२ |
| हमीद अन्सारी | २००७–२०१२ |
| हमीद अन्सारी | २०१२–२०१७ |
| व्यंकय्या नायडू | २०१७–२०२२ |
| जगदीप धनकड | २०२२ पासून |

### स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न–२

❒ **खालील प्रश्नांची एक–दोन वाक्यात उत्तर द्या.**

१. कोणत्या कलमानुसार राष्ट्रपती पदासाठीची पात्रता सांगितली आहे ?

२. राष्ट्रपतीच्या निवडणुकीत कोण मतदान करतात ?

३. भारताचे पहिले राष्ट्रपती कोण ?

४. उपराष्ट्रपतीचा कार्यकाल किती वर्षाचा आहे ?

## क) पंतप्रधान व त्याचे मंत्रिमंडळ (Prime Minister and Council of Minister) :-

भारताने इंग्लंडप्रमाणे संसदीय शासन पद्धती स्विकारलेली आहे. या शासन पद्धतीत वास्तविक शासन पंतप्रधान असतो व नाममात्र शासक राष्ट्रपती असतो. भारतातील पंतप्रधान पद इंग्लंडसारखे योगायोग किंवा परिस्थितीचे अपत्य नव्हे. या पदाची निर्मिती संविधानानुसार करण्यात आली आहे.

पंतप्रधान व त्याचे मंत्रिमंडळ याबाबत घटनेच्या कलम ७४ व ७५ मध्ये तरतुद केली आहे.

**कलम ७४ :** ''राष्ट्रपतीने आपली कामे करताना त्याला मदत व सल्ला देण्यास प्रधानमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली एक मंत्रीमंडळ असते.''

**कलम ७५ :** ''प्रधानमंत्र्याची नेमणूक राष्ट्रपती करेल व इतर मंत्र्यांची नेमणूक पंतप्रधानाच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपती करेल. राष्ट्रपतीची इच्छा असे पर्यंत मंत्रीमंडळ आपल्या पदावर राहील.''

### ❒ पंतप्रधान व मंत्रीमंडळाची निर्मिती :–

घटनेनुसार पंतप्रधानाची नेमणूक राष्ट्रपती करतो परंतु पंतप्रधानाच्या नियुक्तीबाबत राष्ट्रपतीचा हा अधिकार औपचारिक आहे. राष्ट्रपती हा घटनात्मक प्रमुख असला तरी खरी सत्ता पंतप्रधान व त्याच्या मंत्रीमंडळाच्या हाती असते. संसदीय शासन पद्धतीच्या तत्त्वानुसार लोकसभेत बहुमत प्राप्त

पक्षाच्या नेत्याला पंतप्रधानपद द्यावे लागते. राष्ट्रपती बहुमत प्राप्त पक्षाच्या नेत्याला पाचारण करतो. पंतप्रधान आपल्या पक्षातील प्रतिनिधींची मंत्री म्हणून निवड करतो व या नेमणुकांना राष्ट्रपतीची औपचारीक मान्यता घेतो.

मंत्रीमंडळातील मंत्र्यांची नेमणूक करताना प्रधानमंत्र्याला विशेष काळजी घ्यावी लागते. पंतप्रधान व मंत्रीमंडळ हे संयुक्तरित्या लोकसभेला जबाबदार असते. तसेच लोकसभेचा पाठींबा असेपर्यंत मंत्रीमंडळ आपल्या अधिकारावर राहते. त्यामुळे पंतप्रधान आपल्या सदस्यांची किंवा सहकार्याची नियुक्ती काळजीपूर्वक करीत असतो. त्याला आपल्या पक्षातील ज्येष्ठ व महत्त्वपूर्ण नेत्यांना मंत्रीमंडळात सहभागी करुन घ्यावे लागते. तसेच देशातील सर्व घटकराज्यांतील प्रतिनिधींना योग्य त्या पद्धतीने प्रतिनिधीत्व मिळेल याची काळजी घ्यावी लागते. संसदेचा सदस्य नसणाऱ्या एखाद्या व्यक्तीची मंत्री म्हणून नियुक्ती झाल्यानंतर त्या व्यक्तीला सहा महिन्यांच्या आत कोणत्याही एक गृहात निवडून यावे लागते. अन्यथा त्याला मंत्रिपद सोडावे लागते. पंतप्रधान पदी नियुक्त होणारी व्यक्ती लोकसभा किंवा राज्यसभेची सदस्य असावी लागते. दोन्ही गृहाची सदस्य नसल्यास पंतप्रधान झाल्यापासून सहा महिन्याच्या आत एका गृहातून निवडून यावे लागते.

### ❀ कार्यकाल :–

पंतप्रधानाचा कार्यकाल ५ वर्षाचा आहे. परंतू संसदेचा विश्वास असेपर्यंत त्याला पंतप्रधानपदी राहता येते लोकसभेतील बहुमत गमावले किंवा अविश्वासाचा ठराव आल्यास त्याला राजीनामा द्यावा लागतो.

### ❒ मंत्र्यांचे प्रकार :–

मंत्रीमंडळात तीन प्रकारचे मंत्री असतात. ते पुढील प्रमाणे :-

### १. कॅबिनेट मंत्री :–

कॅबिनेट मंत्री हे प्रथम दर्जाचे मंत्री मानले जातात. पंतप्रधान आपल्या पक्षातील ज्येष्ठ, अनुभवी सदस्यांची कॅबिनेट मंत्री म्हणून नेमणूक करतो. कॅबिनेट मंत्र्यांची संख्या १० ते २० च्या आसपास असते. पंतप्रधानाच्या मर्जीवर ही संख्या ठरते. कॅबिनेट मंत्र्यांच्या वेळोवेळी बैठका घेतल्या जातात. मंत्रीपरिषदेचा अध्यक्ष पंतप्रधान असतो.

### २. राज्यमंत्री :–

राज्यमंत्री हे दुसऱ्या क्रमांकाच्या दर्जाचे मंत्री असतात. कॅबिनेट मंत्र्याच्या कारभारातील कामाचा ताण कमी करण्यासाठी त्यांची निवड केली जाते. राज्यमंत्र्यांना कॅबिनेट मंत्र्यांएवढेच वेतन,

भत्ते, मिळतात. परंतू राज्यमंत्र्यांना मंत्रीमंडळाच्या बैठकींना उपस्थित राहता येत नाही. पंतप्रधानाने त्यांना आमंत्रण दिले तरच ते मंत्रिमंडळाच्या परिषदेला हजर राहतात. राज्यमंत्री खात्याच्या कॅबिनेट मंत्र्याला मदतनीस म्हणून कार्य करतात. काही वेळा त्यांच्याकडे स्वतंत्र खात्याचा कार्यभार सोपवीला जातो.

### ३. उपमंत्री :–

उपमंत्री हे मंत्रीमंडळातील तिसऱ्या दर्जाचे मंत्री असतात. त्यांच्याकडे कोणतेही स्वतंत्र खाते नसते. कॅबिनेट व राज्यमंत्री यांना मदत करण्यासाठी म्हणून उपमंत्र्यांची नियुक्ती केली जाते.

केंद्रीय मंत्रीमंडळातील मंत्र्यांची संख्या ही लोकसभेतील सदस्यसंख्येच्या १५% असावी अशी ९७ वी घटना दुरुस्ती केली आहे.

## ❒ मंत्रीमंडळाचे अधिकार व कार्ये :–

भारतामध्ये संसदीय शासनपद्धती असल्यामुळे राष्ट्रपती हा नामधारी प्रमुख आहे तर वास्तववादी सत्ताप्रमुख पंतप्रधान असतो. त्यामुळे पंतप्रधान व त्याचे मंत्रीमंडळ यांच्या माध्यमातून राज्यकारभार चालतो. मंत्रीमंडळाला पुढील कामे पार पाडावी लागतात.

### १. ध्येयधोरणे ठरविणे :–

शासनाची ध्येयधोरणे ठरविणे हे मंत्रीमंडळाचे प्रमुख कार्य आहे. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाला कोणती कामे करावयाची आहेत हे ठरविण्याचे काम मंत्रीमंडळ करित असते. ठरविलेल्या योजना, काम, निश्चित वेळेत पूर्ण करण्यासाठी त्याचा पाठपुरावा करणे व उपाययोजना सुचविणे. थोडक्यात, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय धोरण ठरविण्याचे कार्य मंत्री मंडळाला करावे लागते.

### २. अंमलबजावणीचे कार्य :–

पंतप्रधान व मंत्रिमंडळ तसेच कॅबिनेट सचिवालयाकडून जी राष्ट्रीय धोरणे व कार्यक्रम ठरवीले जातात त्यांच्या अंमलबजावणीचे काम मंत्रिमंडळाला करावे लागते. पंतप्रधान आपल्या मंत्रिमंडळातील सर्व मंत्र्यांना विविध खात्यांचे वाटप करुन त्या खात्याच्या मंत्र्याकडून धोरणे ठरविली जातात. विविध खात्यांच्या कार्यात समन्वय साधून परस्परांच्या सहकार्याने प्रशासनाचे कार्य यशस्वी केले जाते. प्रशासकीय कार्याच्या यशस्वीतेवरच मंत्रीमंडळाचे भवितव्य अवलंबून असते.

### ३. कायदेविषयक कार्य :–

कायदे निर्मितीचे काम संसद करित असले तरी मंत्रीमंडळाला काही प्रमाणात आपली जबाबदारी पार पाडावी लागते. महत्त्वाची विधेयके संबंधित खात्याच्या मंत्र्यांकडून कायदे मंडळात मांडली जातात. मंत्रीमंडळ हे बहुमत प्राप्त पक्षाचे असल्यामुळे मंत्र्यांनी मांडलेली विधेयके संमत

होण्यास फारशी अडचण येत नाही. मंत्रीमंडळाला आपला कारभार चांगल्या प्रकारे करता यावा व ध्येयधोरणे यशस्वीपणे राबविता यावीत या दृष्टीने कायदे निर्माण करते व संसदेकडून त्यांची मंजुरी मिळविते. संसदेतील नव्वद टक्के विधेयके सरकारी असतात. लोकसभा व राज्यसभेच्या प्रश्नोत्तराच्या तासावेळी संबंधीत खात्याच्या मंत्र्यांना प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतात.

**४. आर्थिक कार्ये :–**

देशाचे वार्षिक अंदाजपत्रक तयार करण्याची कामगिरी अर्थखात्याची असते. अर्थमंत्री इतर खात्यांच्या मंत्र्याकडून प्रस्तावित व मागील खर्चाची माहिती मागवतो व त्याद्वारे देशाचे अंदाजपत्रक तयार करतो व ते अंदाजपत्रक संसदेत मांडून संसदेकडून मान्यता घेतली जाते. अंदाजपत्रकास मान्यता मिळाल्याशिवाय मंत्रीमंडळाला पैसा खर्च करता येत नाही. अर्थविधेयकाबाबत संसदेने अविश्वासाचा ठराव मंजुर केला तर मंत्रीमंडळाला राजीनामा द्यावा लागतो.

**५. नियुक्ती अधिकार :–**

भारताच्या राष्ट्रपतीला प्रशासकीय व राजकीय क्षेत्रातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेमणूका करण्याचा अधिकार असला तरी वास्तविक पंतप्रधान व त्याचे मंत्रिमंडळ हा अधिकार वापरते. राज्यपाल, राजदूत, परराष्ट्रात पाठवावयाचे प्रतिनिधी, सेनाअधिकारी, न्यायाधिश, विविध महामंडळे, सदस्य इ. नेमणुका राष्ट्रपती करतो. पण खरा सुत्रधार पंतप्रधान असतो.

**६. शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे :–**

देशात शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याचे कार्य मंत्रिमंडळात करावे लागते. राष्ट्राचे बाह्य व परकीय आक्रमणापासून संरक्षण करणे, परराष्ट्राशी तह, करार, मैत्री इ. कार्ये ही पंतप्रधान व संबंधित परराष्ट्रमंत्री, संरक्षण मंत्री यांना करावी लागतात. विविध उपाय योजना करुन देशात कायद्याचे राज्य निर्माण करण्याचे काम मंत्रीमंडळाला पार पाडावे लागते. ज्या ज्या वेळी देशात धार्मिक, जातीय, भाषीक संघर्ष निर्माण होतात, तेव्हा असे वाद शांततेच्या मार्गाने मिटविण्याचे काम मंत्रीमंडळाला करावे लागते. देशातील सर्वसामान्य जनतेच्या प्राथमिक गरजा पूर्ण होण्यासाठी व त्यांचे हीत साधण्यासाठी पंतप्रधान व त्याचे मंत्रिमंडळ कार्यरत असते.

**❒ मंत्रीमंडळाची वैशिष्ट्ये :–**

**१. संयुक्त जबाबदारीचे तत्त्व :–**

संसदीय शासन पद्धतीत मंत्रीमंडळाचे काम संयुक्त जबाबदारीच्या तत्त्वानुसार चालते. प्रत्येक मंत्री आपल्या कारभारासंबंधी संपूर्ण मंत्रीमंडळाला जबाबदार असते व संबंध मंत्रीमंडळ संयुक्तरित्या संसदेला व राष्ट्रपतीला जबाबदार असते. लोकसभेत मंत्रीमंडळाविरुद्ध अविश्वासाचा ठराव मंजूर झाला

तर पंतप्रधानाला आपल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा द्यावा लागतो. म्हणजेच लोकसभेचा विश्वास असेपर्यंत मंत्रिमंडळ अधिकार पदावर राहू शकते. म्हणून संयुक्त जबाबदारीच्या तत्त्वानुसार मंत्रीमंडळाला आपले कामकाज करावे लागते.

## २. गोपनीयता :–

मंत्रीमंडळाचे कामकाज करीत असताना मंत्र्यांना गोपनीयता तत्त्वाचे पालन करावे लागते. गोपनीयता हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जाते. मंत्रिमंडळात एकात्मता व एकजिनशीपणा टीकवण्यासाठी गुप्ततेची आवश्यकता असते. राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीकोनातून मंत्र्यांना काही निर्णय गोपनीय ठेवावे लागतात. त्यामुळे मंत्रीपद स्वीकारताना मंत्र्यांना गुप्ततेची शपथ घ्यावी लागते.

## ३. एकनेतृत्व :–

एकनेतृत्व हे मंत्रिमंडळाचे महत्त्वाचे तत्त्व आहे. मंत्रिमंडळाचा प्रमुख पंतप्रधान असतो. एकनेतृत्वामुळे मंत्रीमंडळाच्या कार्यात तत्परता येते व वेळेचा अपव्यय टळतो. सर्व मंत्री एकनेतृत्व मान्य करुन त्याला पाठींबा देतात. प्रबळ पंतप्रधानच सर्व मंत्र्यांच्या समवेत आपला कार्यकाल पूर्ण करु शकतो आणि स्थीर व कार्यक्षम सरकार प्रस्थापित करतो.

## ४. एकजिनशीपणा :–

एकजिनशीपणा म्हणजे मंत्रीमंडळाने एकदिलाने विचार करणे व एकमुखाने मान्यता देणे होय. सर्व मंत्रीमंडळात ऐक्य व एकजीनशीपणा टिकवणे महत्त्वाचे असते. कारण मंत्रीमंडळात एखाद्या विषयावर मतभेद निर्माण झाल्यास संपूर्ण मंत्रीमंडळाला धोका निर्माण होतो. पंतप्रधान, मंत्रीमंडळाचा अध्यक्ष या नात्याने सर्व मंत्र्यात ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो. राजकीय धोरणाबाबत ऐक्य निर्माण करणे व एकसुत्रता आणणे महत्त्वाचे असते.

### ❀ भारताचे पंतप्रधान ❀

| नाव | कार्यकाल |
|---|---|
| जवाहरलाल नेहरु | १५ ऑगस्ट, १९४७–२७ मे, १९६४ |
| लाल बहादुर शास्त्री | ९ जून, १९६४–११ जानेवारी, १९६६ |
| श्रीमती इंदिरा गांधी | २४ जानेवारी, १९६६–२४ मार्च, १९७७ |
| मोरारजी देसाई | २४ मार्च, १९७७–२८ जुलै, १९७९ |
| चरणसिंग | २८ जुलै, १९७९–१४ जानेवारी, १९८० |
| श्रीमती इंदिरा गांधी | १४ जानेवारी, १९८०–३१ ऑक्टोबर, १९८४ |
| राजीव गांधी | ३१ ऑक्टोबर, १९८४–२ ऑक्टोबर, १९८९ |

| | |
|---|---|
| व्ही. पी. सिंग | २ ऑक्टोबर, १९८९–१० नोव्हेंबर, १९९० |
| चंद्रशेखर | १० नोव्हेंबर, १९९०–२१ जून, १९९१ |
| पी. व्ही. नरसिंहराव | २१ जून, १९९१–१६ मे, १९९६ |
| अटलबिहारी वाजपेयी | १६ मे, १९९६–१ जून, १९९६ |
| एच. डी. देवेगौडा | १ जून, १९९६–२१ एप्रिल, १९९७ |
| इंद्रकुमार गुजराल | २१ एप्रिल, १९९७–१९ मार्च, १९९८ |
| अटलबिहारी वाजपेयी | १९ मार्च, १९९८–१७ एप्रिल, १९९९ |
| अटलबिहारी वाजपेयी | १३ ऑक्टोबर, १९९९–२१ मे, २००४ |
| डॉ. मनमोहन सिंग | २२ मे, २००४–२६ मे २०१४ |
| नरेंद्र मोदी | २६ मे २०१४ पासून |

**स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न–३**

❒ **खालील प्रश्नांची एक–दोन वाक्यात उत्तर द्या.**

१. पंतप्रधानाची नियुक्ती कोण करतो ?

२. मंत्रिपरिषदेचा अध्यक्ष कोण असतो ?

३. मंत्रीमंडळाचा कार्यकाल किती वर्षाचा आहे ?

### ३.२.१.३ न्यायमंडळ (Judiciary) :-

प्रत्येक देशासाठी न्यायदान संस्था आवश्यक असते. किंबहुना न्यायदान संस्था ही सरकारच्या तीन शाखांपैकी एक महत्त्वाची शाखा आहे. भारतीय घटनेच्या पाचव्या व सहाव्या भागात १२४ ते १४६ कलम तसेच २१४ ते २३७ मध्ये न्यायदान व्यवस्था स्पष्ट करण्यात आलेली आहे. भारताच्या न्यायदान व्यवस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे 'एकेरी न्यायदान व्यवस्था' हे होय. भारतामध्ये मध्यवर्ती व घटक राज्यांची अशी वेगवेगळी न्यायालये नाहीत. आपण अमेरिका प्रमाणे दुहेरी न्यायव्यवस्था स्वीकारलेली नाही. भारतात न्यायमंडळाच्या शिरोभागी सर्वोच्च न्यायालय असून त्याच्या खालोखाल प्रत्येक राज्यात एक एक उच्च न्यायालय आहे व या न्यायालयाच्या खाली जिल्हा व दुय्यम न्यायालये आहेत. अशाप्रकारे भारतात केंद्र व घटक सरकारसाठी एकच न्यायदान संस्था तयार करण्यात आली आहे. आपल्या न्यायालयीन व्यवस्थेची रचना एखाद्या पिरॅमिडप्रमाणे आहे.

## अ) सर्वोच्च न्यायालय (Supreme Court) :-

१९३५ च्या भारत प्रशासन कायद्यात संघ न्यायालये निर्माण करण्यात आली. ही न्यायव्यवस्था ब्रिटीश राजवटी पासून मिळालेला वारसा आहे. १९६१ कायद्यानुसार भारतामध्ये मुंबई, मद्रास, कलकत्ता, लाहोर, अलाहाबाद, पाटणा इ. ठिकाणी उच्च न्यायालये स्थापन करण्यात आली. १९३५ च्या कायद्यानुसार 'फेडरल कोर्ट ऑफ इंडिया' ची स्थापना करण्यात आली. या कोर्टाकडे उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध अपील करता येत असे. स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतर 'फेडरल कोर्ट ऑफ इंडिया' च्या जागी 'सर्वोच्च न्यायालयाची' स्थापना करण्यात आली.

### ❀ सर्वोच्च न्यायालयाची रचना :–

राज्यघटनेच्या कलम १२४ नुसार सर्वोच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालय हे अपीलांचे निर्णय देणारे सर्वश्रेष्ठ न्यायालय होय. भारताच्या सर्वोच्च न्यायालयात एक सर न्यायाधीश आणि त्याला सहाय्य करणारे इतर एकूण ३० न्यायाधीश असतात. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधिशांची संख्या ठरविण्याचा अधिकार संसदेला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या सर्व न्यायाधीशांची नेमणूक राष्ट्रपती करतो. आवश्यकता वाटल्यास राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशांच्या हंगामी नेमणूका करु शकतो. सरन्यायाधीश सर्वोच्च न्यायालयातील निवृत्त न्यायाधिशाची हंगामी न्यायाधीश म्हणून नियुक्ती करु शकतो.

### ❀ पात्रता :–

सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश होण्यास पुढील अटी पूर्ण कराव्या लागतात.

१. तो भारताचा नागरिक असावा.

२. त्या व्यक्तीने उच्च न्यायालयात न्यायाधीशपदी पाच वर्षे काम केलेले असले पाहिजे.

३. तिने उच्च न्यायालयात किमानदहा वर्षे वकिली केलेली असली पाहिजे किंवा

४. राष्ट्रपतीच्या दृष्टीने ती व्यक्ती निष्णात कायदेपंडीत असली पाहिजे.

### ❀ कार्यकाल :–

भारतीय राज्यघटनेत न्यायाधीशांचा कार्यकाल निश्चित केलेला नाही. मात्र त्याच्या निवृत्तीचे वय स्पष्ट केले आहे. तो वयाच्या ६५ वर्षापर्यंत पदावर राहू शकतो. शिवाय स्वमर्जीने आपल्या पदाचा राजीनामा देता येतो. गैरवर्तन, भ्रष्टाचार याकारणास्तव त्याला पदावरुन काढता येते. न्यायाधीशावरील गैरवर्तनाचा आरोप संसदेच्या दोन्ही सभागृहाने एकूण सभासद संख्येच्या बहुमताने आणि ठरावा दिवशी सभागृहात उपस्थित असलेल्या सभासदांच्या दोन तृतीयांश बहुमताने पास केला

पाहिजे त्यानंतर राष्ट्रपती त्या न्यायाधीशाला पदच्युत करु शकतो. आजपर्यंत एकाही न्यायाधीशाला अशा पद्धतीने पदच्युत केलेले नाही.

### ❀ वेतन :–

सर्वोच्च न्यायालयातील सरन्यायाधीशाला दरमहा एक लाख रुपये वेतन दिले जाते व इतर न्यायाधीशांना ऐंशी हजार इतके वेतन दिले जाते. शिवाय त्यांना निवास, प्रवास, भत्ते इ. सुखसोई मिळतात. एखाद्या व्यक्तीची न्यायाधीश पदी नियुक्ती झाल्यानंतर त्यांच्या वेतनात अगर कोणत्याही भत्त्यात कपात केली जात नाही. निवृत्तीनंतर न्यायाधीशांना निवृत्तीवेतन दिले जाते. निवृत्तीनंतर चौकशी आयोगाचे सदस्य, विद्यापीठाच्या उपकुलगुरु पदी नियुक्ती केली जाऊ शकते.

### ❀ सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र :–

भारताचे सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र व्यापक स्वरुपाचे आहे. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र तीन विभागात विभागले आहे. ते पुढील प्रमाणे

### १. प्रारंभिक अधिकार क्षेत्र :–

ज्या खटल्यांची सुरवात सर्वोच्च न्यायालयामध्ये होते, इतर कोणत्याही न्यायालयात त्या खटल्याची सुरुवात होत नाही त्याचा समावेश प्रारंभिक अधिकार क्षेत्रात केला जातो. प्रारंभिक अधिकार क्षेत्रात पुढील वादाबाबतचे खटले चालविले जातात.

१. भारत सरकार विरुद्ध एक किंवा अनेक घटक राज्ये यांच्यातील संघर्ष

२. दोन किंवा अधिक घटकराज्यांतील संघर्ष

३. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभेचा सभापती व पंतप्रधान यांच्या निवडीसंबंधी वाद.

४. कोणत्याही केंद्रीय कायद्याच्या घटनात्मक वैधतेचा प्रश्न फक्त सर्वोच्च न्यायालयात प्रथम सुनावणीला येऊ शकतो.

५. भारतीय घटनेच्या ३२ व्या कलमानुसार घटनेतील मुलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी बंदीप्रत्यक्षीकरण, परमादेश, अधिकारपृच्छा, प्रतिषेध असे आदेश काढण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे.

वरील खटल्याबाबत चौकशी करुन न्यायनिवाडा करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे.

## २. पुनर्निर्णयाचे अधिकारक्षेत्र :–

भारतात एकेरी न्यासंस्था आहे. न्यायपालिकेच्या सर्वोच्च पदी सर्वोच्च न्यायालय आहे. भारतातील कोणत्याही उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर पुनर्निर्णयाचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. पुनर्निर्णय तीन प्रकारचे आहेत.

***अ) घटनेच्या अर्थासंबंधी पुनर्निर्णय देणे :*** एखाद्या घटनेच्या अर्थासंबंधी महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाल्यास त्या खटल्याच्या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अपील करता येते. परंतु अशा आशयाचे संमतीपत्र उच्च न्यायालयाने दिले पाहिजे.

***ब) दिवाणी दाव्यासंबंधी पुनर्निर्णय देणे :*** उच्च न्यायालयाने दिवाणी खटल्यासंबंधी दिलेल्या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अपील करता येते. ती पुढील प्रमाणे.

१. दिवाणी दाव्याची किंमत विस हजार पेक्षा अधिक असल्यास (दिवाणी खटल्याच्या २०,००० रुपये रकमेसंबंधीची अट ३० व्या घटनादुरुस्तीने रद्द केलेली आहे.)

२. किंवा दिवाणी दाव्यात तितक्या किमतीच्या मिळकतीचा संबंध असेल.

३. सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यासंबंधीची योग्य बाब असेल तर सर्वोच्च न्यायालयात अपील करता येते.

***क) फौजदारी दाव्यासंबंधी पुनर्निर्णय देणे :*** खालील फौजदारी खटल्यांच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालय पुनर्निर्णय देऊ शकते.

१. दुय्यम न्यायालयाने आरोपीस मुक्त केले असल्यास परंतु उच्च न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवून मृत्युदंडाची शिक्षा दिली असल्यास.

२. कनिष्ठ न्यायालयातील एखादा फौजदारी खटला उच्च न्यायालयाने स्वत:कडे चालविण्यास घेऊन आरोपीस फाशीची शिक्षा दिली असल्यास.

३. फौजदारी खटला सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यास योग्य आहे असे शिफारसपत्र उच्च न्यायालयाने दिले असल्यास फौजदारी दाव्यासंबंधी सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात बदल करण्याचा अधिकार संसदेला दिलेला आहे.

## ३. परामर्शदायी अधिकार क्षेत्र :–

कलम १४३ नुसार राष्ट्रपती आवश्यकता वाटल्यास सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला घेतो. अशा वेळी सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपतीला वैधानिक व महत्त्वाच्या प्रश्नासंबंधी सल्ला व मार्गदर्शन करणे गरजेचे असते. परंतू सर्वोच्च न्यायालयाने दिलेला सल्ला राष्ट्रपतीला बंधनकारक नसतो. उदा. गुजरात

मधील विधानसभा निवडणुक घेण्यासाठी निर्माण झालेल्या वादावर माजी पंतप्रधान डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला मागवीला होता.

### ३.२.२ घटक राज्य सरकार

घटक राज्याचे सरकार ही कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ या तीन घटकांची मिळून बनलेली असते. कार्यकारी मंडळात राज्यपाल, मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ, कायदेमंडळामध्ये विधानसभा आणि विधान परिषद व न्यायमंडळामध्ये उच्च न्यायालय समाविष्ट आहे. १९५६ साली राज्य पुनर्रचना आयोगाच्या शिफारशीनुसार भारतात राज्य आणि केंद्रशासित प्रदेश असे दोन प्रकार पाडण्यात आले. सध्या भारतात २८ घटक राज्ये आणि ९ केंद्रशासित प्रदेश आहेत. दिल्ली या केंद्रशासित प्रदेशाला राजधानी राज्य असा दर्जा देण्यात आला आहे. भारतात केंद्र सरकार आणि घटक राज्ये सरकार यांच्या कार्यासबधी तरतूद राज्यघटनेमध्ये करण्यात आली आहे. घटक राज्याची शासनपध्दती केंद्र सरकारच्या संसदीय शासनपध्दतीप्रमाणे आहे. केंद्रातील सरकार प्रमाणेच राज्यातही कायदेमंडळाला कार्यकारी मंडळ जबाबदार आहे.

भारतीय संविधान सभेने राज्यघटनेत संघराज्य पध्दतीचा स्वीकार केला आहे. भारताची संघराज्य व्यवस्था ही अमेरिका मॉडेलवर आधारित नसून कॅनडाच्या मॉडेलवर आधारित आहे. कॅनडाप्रमाणेच राज्यांचा संघ या संज्ञेचा प्रयोग केंद्रीकरणाची प्रवृत्ती म्हणजेच घटक राज्यांच्या तुलनेत केंद्राच्या हातात अधिक सत्ता. ही वैशिष्टये भारतीय संघराज्यात आपल्याला पहावयास मिळातात. कॅनडाप्रमाणेच भारताच्या घटनेत संघराज्यषासन व्यवस्था निर्माण केली असून भारताच्या घटनेत संघाची तसेच घटकराज्यांची घटना देण्यात आली आहे. घटक राज्यांची शासनाची रचना, केंद्राच्या शासन व्यवस्थेसारखीच स्वीकारण्यात आली आहे. म्हणजेच भारतात केंद्र व घटकराज्य या दोन पातळीवर समान सरकारे असल्याची दिसून येतात. केंद्रीय पातळीप्रमाणेच घटक राज्याच्या पातळीवर देखील संसदीय शासन पध्दतीचा स्वीकार केला आहे. भारतीय घटनेच्या सहाव्या भागात प्रकरण दोनमध्ये कलम १६८ मध्ये घटक राज्यांच्या विधिमंडळाची तरतूद करण्यात आली आहे. सर्व घटक राज्यांतील शासनव्यवस्थेची रचना सारखीच आहे.

#### कायदेमंडळ

भारतात केंद्रीय पध्दतीप्रमाणेच बहुसंख्य राज्यांमध्येही एकगृही कायदेमंडळ व काही राज्यामध्ये द्विगृही कायदेमंडळाची निर्मिती केली आहे. या द्विगृही कायदेमंडळापैकी एक म्हणजे विधानसभा आणि दुसरे विधान परिषद होय. प्रत्येक राज्यात विधान परिषद नाही. ज्या राज्यात विधान परिषदेची निर्मिती करण्याची गरज वाटत असेल तेथे विधान सभेत जर ठराव पास झाला तर विधान परिषदेची निर्मिती केली जावू शकते. उदा. कलम १६९ नुसार १९५७ मध्ये आंध्र प्रदेशाने विधान परिषदेची

निर्मिती केली. तर याच कलमानुसार पंजाब, पश्चिम बंगालमध्ये तसेच तमिळनाडू मध्ये विधान परिषद रद्द करण्यात आली. म्हणजेच यावरून आपणाला असे म्हणावे लागेल की, राज्यातील दुसऱ्या सभागृहाचे अस्तित्व हे प्रथम सभागृहावर अवलंबून असते. राज्यात विधानसभा हे प्रथम सभागृह असून विधान परिषद हे द्वितीय सभागृह आहे.

**विधानसभा:**

विधानसभा हे राज्याच्या कायदे मंडळाचे प्रथम सभागृह मानले जाते. जनतेकडून प्रत्यक्षरित्या निवडणूकीद्वारे निवडून आलेल्या प्रतिनिधींचा समावेश या सभागृहामध्ये होतो. सदस्यांच्या संख्येबाबतही भारतीय राज्यघटनेने काही मर्यादा घालून दिलेल्या आहेत. त्यानुसार कोणत्याही राज्याच्या विधानसभेत कमीत कमी ६० व जास्तीत जास्त ५०० सदस्य असावेत. असे असले तरी लहान राज्यामध्ये ४० किवा त्यापेक्षा कमी सदस्य आहेत. उदा. महाराष्ट्र विधानसभेत २८८ सदस्य तर गोवा ४० सदस्य आहेत. हे सर्व सदस्य प्रौढ मताधिकाराने प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडले जातात. त्यासाठीचे मतदार संघ राज्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निर्माण केले जातात. सामान्यतः बहुमताच्या तत्वाद्वारे म्हणजेच मतदार संघातील एकूण उमेदवारांपैकी ज्या उमेदवाराला सर्वाधिक मते मिळाली असतील अशा उमेदवारांची निवड केली जाते. पण प्रत्यक्षात या तत्वामुळे कित्येकवेळा मत विभाजन झाल्यामुळे अल्पमतातील उमेदवार निवडून येवू शकतो. मागास जाती जमातींच्या लोकांना देखील राजकारणात वाव मिळावा, त्यांना योग्य संधी प्राप्त व्हावी यासाठी घटनेच्या ३३२ कलमानुसार प्रत्येक राज्याच्या विधानसभेत मागास जाती जमातींसाठी राखीव जागा ठेवलेल्या आहेत. उदा. महाराष्ट्र विधानसभेत अनुसूचित जातीसाठी २९ व अनुसूचित जमातींसाठी २५ अशा एकूण ५४ जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे राज्यातल्या अँग्लो इंडियन समाजाचा एक प्रतिनिधी नेमण्याचा अधिकार राज्यपालाला आहे. या राखीव जागांची निर्मिती घटनाकारांनी सुरूवातीला फक्त १० वर्षासाठी केली होती. पण नंतर हया राखीव जागांच्या तरतुदीची मुदत वाढत आत्तापर्यंत ती कायम ठेवण्यात आली आहे.

**सदस्यांची पात्रता:**

पात्रता पुढीलप्रमाणे:

१. तो भारताचा नागरिक असावा.

२. त्याचे वय वर्षे २५ पूर्ण असावे.

३. संसदेने वेळोवेळी निश्चीत केलेल्या अटी त्याने पूर्ण केल्या असावेत.

निवडणूक आयोगाने काही अपात्रतेचे नियम घालून दिले आहेत. त्या पुढीलप्रमाणे:

१. तो शासनाच्या कोणत्याही लाभ पदावर किंवा सरकारी नोकरीत असता कामा नये.

२. फौजदारी गुन्हयाखाली एखाद्या व्यक्तिला दोन वर्षापेक्षा जास्त तुरूंगवास झाला असेल तर तुरूंगवास संपल्याच्या तारखेपासून पुढे सहा वर्षे अशा व्यक्तिला निवडणूक लढवता येत नाही.

**कार्यकाल:**

विधानसभेचा कार्यकाल पाच वर्षे निश्चीत केलेला आहे. राज्यपाल मुदतपुर्व विधानसभा विसर्जित करू शकतात. जर राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेची योग्य परिस्थिती नाही असे राज्यपालाला वाटले तर केंद्राच्या सल्ल्याने राज्यातील सरकार आणि विधानसभा विसर्जित करू शकतो. त्याप्रमाणे जर आणिबाणी परिस्थिती निर्माण झाल्यास कार्यकाल वाढू शकतो.

**गणपूर्ती:**

सभागृहाचे कामकाज चालविण्यासाठी सभागृहात सदस्यांची आवश्यक असणारी उपस्थिती म्हणजे गणपूर्ती होय. सभागृहाचे कामकाज चालविण्यासाठी किमान दहा किंवा सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या १/१० यापैकी जी संख्या मोठी असेल ती सभागृहाची गणपूर्ती मानली जाते.

**वेतन आणि भत्ते:**

विधानसभेच्या सदस्यांना विधानसभा कायद्याद्वारे निश्चीत करेल तेवढे मासिक मानधन, मतदार संघ भत्ता, स्वीय सहायकाचे वेतन, वाहन, टेलिफोन खर्च इत्यादी लाभ मिळतात.

**विधानसभेचे पदाधिकारी: सभापती, उपसभापती**

सार्वत्रिक निवडणुकीनंतर विधानसभेच्या पहिल्या बैठकीत सदस्यांकडून सभापती व उपसभापती यांची निवड केली जाते. सभापती व उपसभापती यांचे विधानसभेचे सदस्यत्व संपुष्टात आले तर त्यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागतो. सभापती व उपसभापती आपल्या इच्छेनुसार मुदतपूर्वी राजीनामा देवू शकतात तसेच त्यांना पदच्युत करण्याचा अधिकार विधानसभेला आहे. तशी रितसर पूर्व सूचना देवून १४ दिवसानंतर विधानसभेच्या बैठकीत बहुमताने तसा ठराव संमत करून सभापती व उपसभापती यांना पदच्युत करता येते. विधानसभा बरखास्त झाल्यानंतर नविन विधानसभेचे पहिले अधिवेशन भरेपर्यंत पुर्वीचाच सभापती आपल्या अधिकार पदावर राहतो. सभापतीच्या गैरहजरीत उपसभापती सभागृहाचे कामकाज पाहतो. सभापती व उपसभापती यांचे वेतन व भत्ते विधानसभा ठरविते. विधिमंडळाचा संकेत म्हणून विधानसभेचे उपसभापती पद विरोधी पक्षाला देण्याची प्रथा आहे.

**सभापतीचे अधिकार व कार्ये:**

लोकसभेच्या सभापतीप्रमाणे विधानसभेच्या सभापतीला पुढील अधिकार व कार्ये पार पाडावी लागतात.

१. सभागृहाचे अध्यक्षस्थान भूषवून सभागृहाच्या कामकाजाचे नियमन करणे.

२. विधानसभेत शांतता, सुव्यवस्था प्रस्थापित करून शिस्त राखणे.

३. सभागृहात मांडण्यात येणाऱ्या विविध ठरावांना संमती देणे.

४. सभासदांना पुरवणी प्रश्न विचारण्यास परवानगी देणे किंवा नाकारणे.

५. अयोग्य असंसदीय प्रश्नांना प्रतिबंध करणे.

६. सभासदांना भाषणासाठी परवानगी व वेळ ठरवून देणे.

७. गणसंख्या अपूर्ण असेल तर सभागृहाची बैठक स्थगित करणे.

८. सभागृहात गोंधळ माजल्यास गृहाचे कामकाज काही काळ तहकुब करणे, स्थगित ठेवणे.

९. विधानसभेच्या विविध समित्यांच्या अध्यक्षांची नेमणूक करणे.

१०. सभासदांना संरक्षण देणे, त्यांच्या अधिकाराचे रक्षण करणे.

११. सभासदांच्या विनंतीवरून विधेयकावर मत आजमावणे. अशावेळी समान मते पडल्यास स्वतःचे निर्णायक मत देणे.

१२. एखादे विधेयक धन विधेयक आहे की नाही हे ठरविणे.

सभापती संपूर्ण सभागृहाचे प्रतिनिधित्व करीत असतो. सभागृहाची प्रतिष्ठा, स्वातंत्र्य टिकविण्याची संपूर्ण जबाबदारी त्याच्यावर असते. निःपक्षपातीपणे सभागृहाचे कामकाज चालवून तो कायदे निर्मितीचे कार्य करीत असतो. थोडक्यात सभापतीचे पद हे अत्यंत महत्वाचे आणि प्रतिष्ठेचे मानले जाते. सभापतीच्या अनुपस्थित हे सर्व अधिकार उपसभापतींना प्राप्त होतात.

**विधान परिषदः**

भारतीय राज्यघटनेच्या १६८ व्या कलमानुसार घटक राज्यात द्विगृहात्मक कायदेमंडळ पध्दती स्वीकारलेली आहे. घटक राज्याच्या विधिमंडळातील वरिष्ठ गृहाला विधान परिषद असे म्हटले जाते. १६९ व्या कलमानुसार ज्या घटक राज्यात विधान परिषद आहे. ती रद्द करणे किंवा ज्या घटक राज्याला विधान परिषद निर्माण करावयाची आहे तेथे ती निर्माण करणे यासंबंधीचे अधिकार संसदेला देण्यात आलेले आहेत. सध्या भारतात उत्तर प्रदेश, बिहार, कर्नाटक, महाराष्ट्र, तेलंगणा आणि आंध्रप्रदेश या सहा राज्यांत विधान परिषद हे वरिष्ठ गृह निर्माण केलेले आहे. बाकी सर्व घटक राज्यांत एकगृही कायदेमंडळ पध्दती आढळते.

**विधान परिषदेची रचना:**

भारतीय राज्यघटनेच्या १७१ व्या कलमानुसार विधान परिषदेची सदस्य संख्या त्या घटक राज्याच्या विधानसभेच्या एकूण सदस्य संख्येच्या १/३ पेक्षा अधिक असता कामा नये. विधान परिषदेत किमान ४० सदस्य असावेत असे ठरविण्यात आले आहे. महाराष्ट्राच्या विधान परिषदेत ७८ सदस्य आहेत. उत्तर प्रदेशात ९९, कर्नाटकमध्ये ७५ अशी सदस्य संख्या इतर घटक राज्यांत आढळते. विधान परिषदेत पुढीलप्रमाणे विविध संस्थांकडून प्रतिनिधी निवडले जातात.

१. घटक राज्याच्या विधानसभेच्या सदस्यांमार्फत १/३ सभासद विधान परिषदेवर निवडले जातात.

२. स्थानिक स्वराज्य संस्था (नगरपालिका, जिल्हा परिषद इ.) मार्फत १/३ सभासद निवडले जातात.

३. पदवीधर मतदार संघाकडून १/१२ सभासद निवडले जातात.

४. माध्यमिक शाळा व उच्च शिक्षण संस्था यामध्ये तीन वर्षापासून शिक्षकाचे काम करणाऱ्या शिक्षकांच्या मतदार संघातून १/१२ सभासद निवडले जातात.

५. बाकी उरलेल्या १/६ सभासदांची नियुक्ती राज्यपालाकडून वाङ्.मय, शास्त्र, कला, समाजसेवा, सहकारी चळवळ या क्षेत्रांतील हूशार, नावाजलेल्या तज्ञ व्यक्तींतून होत असते.

वरील निर्वाचित सदस्य (१ ते ४) प्रमाणशिर प्रतिनिधीत्वाच्या एकल सक्रमणीच क्रमदेय मतदान पध्दतीने व गुप्त मतदान पध्दतीने निवडले जातात.

**विधान परिषदेच्या सभासदत्वासाठी पात्रता:**

विधान परिषदेच्या सभासदत्वासाठी उमेदवाराच्या ठिकाणी पुढील पात्रता असावी लागते.

१. तो भारताचा नागरिक असला पाहिजे.

२. त्याचे वय ३० वर्षे पूर्ण असले पाहिजे.

३. संसदेने वेळोवेळी कायदा करून ठरविलेल्या अटी त्याने पूर्ण केल्या पाहिजेत.

**अपात्रता:**

पुढील कारणांमुळे कोणतीही व्यक्ती विधान परिषदेचा सदस्य होण्यास अपात्र ठरली जाते. भारत सरकार किंवा राज्य सरकार यामध्ये नोकरी किंवा प्राप्तीचे पद धारण केलेली व्यक्ती. न्यायसंस्थेने वेडी, दिवाळखोर किंवा नादार ठरविलेली व्यक्ती. संसदेने ठरविलेल्या निवडणूक कायद्याचा भंग

करणारी व्यक्ती. सभागृहात सलग ६० दिवस परवानगीशिवाय गैरहजर राहणारी व्यक्ती. एकाच वेळी दोन्ही सभागृहाचे सदस्यत्व असणारी व्यक्ती.

**विधान परिषदेचा कार्यकाल:**

विधान परिषदेतील सभासदाचा कार्यकाल सहा वर्षाचा असतो. विधान परिषदेतील १/३ सभासद दर दोन वर्षानी निवृत्त होतात आणि तेवढेच नवीन सभासद निवडले जातात. विधान परिषद हे कायमस्वरूपी (स्थायी) सभागृह असून ते कधीही बरखास्त होत नाही. तरीपण राज्याच्या विधानसभेने 'वरिष्ठ सभागृह आम्हाला नको आहे' असा ठराव विशेष बहुमताने संमत करून संसदेकडे पाठविला तर संसद तसा कायदा करून ते वरिष्ठ गृह बरखास्त करू शकते. या पध्दतीने पश्चिम बंगाल, तमिळनाडू, पंजाब इत्यादी घटक राज्यांतील विधान परिषदा बरखास्त करण्यात आलेल्या आहेत.

**विधान परिषदेचे पदाधिकारी (सभापती व उपसभापती):**

विधान परिषदेचे सदस्य आपल्यामधून बहुमताने एक अध्यक्ष व एक उपाध्यक्ष निवडतात. तसेच त्यांच्या ठिकाणी अकार्यक्षमता आढळल्यास त्यांना विधान परिषदेचे सदस्य बहुमताने कमी करू शकतात. अर्थात, तशा आशयाचा ठराव करून १४ दिवस अगोदर नोटीस (पूर्वसूचना) द्यावी लागते. विधान परिषदेच्या सदस्यत्वाची सहा वर्षाची मुदत संपुष्टात आली तर सभापती व उपसभापती यांना अधिकार पद सोडावे लागते. तसेच सभापती व उपसभापती आपल्या इच्छेनुसार आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात.

विधानसभेच्या सभापतीप्रमाणे विधान परिषदेच्या सभापतीला अधिकार देण्यात आलेले आहेत. सामान्यतः सभापतीला पुढील कार्ये पार पाडावी लागतात.

१. विधान परिषद या गृहाचे अध्यक्षस्थान भूषवून गृहाच्या कामकाजाचे नियमन करणे.

२. विधान परिषदेत शांतता, सुव्यवस्था प्रस्थापित करून गृहात शिस्त राखणे.

३. गृहात मांडण्यात येणाऱ्या प्रस्तावांना, ठरावांना पूर्वसंमती देणे.

४. सभागृहात पुरवणी प्रश्न विचारण्यास परवानगी देणे किंवा नाकारणे. त्यांच्या भाषणाची वेळ ठरवून देणे.

५. सभागृहात राजकीय पक्षांना बसण्याची जागा ठरवून देणे.

६. गणसंख्या अपूर्ण असेल तर सभागृहाची बैठक स्थगित करणे.

७. सभागृहात गोंधळ माजल्यास सभागृहाचे कामकाज काही काळ तहकूब करणे.

८. सभागृहात एखाद्या विधेयकावर समान मते पडली तर स्वतःचे निर्णायक मत देणे.

९. सभासदांच्या अधिकारांचे संरक्षण करणे.

अशा प्रकारे सभापती सभागृहाच्या कामकाजावर नियंत्रण ठेवून गृहाची प्रतिष्ठा, दर्जा वाढविण्याचे महत्वपूर्ण कार्य करीत असतो. सभापतीच्या गैरहजेरीत उपसभापती गृहाच्या बैठकीचे अध्यक्षस्थान स्वीकारून कामकाज चालवितो.

**गणसंख्या:**

विधिमंडळाच्या प्रत्येक सभागृहाचे कामकाज सुरू करण्यासाठी एकूण सभासद संख्येच्या १/१० किंवा किमान १० सभासद हजर असणे आवश्यक मानले जाते. महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १० आणि विधानसभेत २९ सदस्य हजर असल्याशिवाय कामकाजाला सुरूवात होत नाही. गणसंख्या अपूर्ण असेल तर सभापती गृहाचे कामकाज काही वेळ स्थगित ठेवतो. मणिपूर, त्रिपुरा, नागालँड अशा राज्यांच्या विधानसभेत १० सभासदांची उपस्थिती आवश्यक मानली जाते.

**विधान परिषदेची उपयुक्तता:**

घटक राज्याच्या विधिमंडळात द्विगृही कायदेमंडळ पध्दती स्वीकारली जात असती तर सध्या फार थोडया राज्यांत द्विगृहात्मक कायदेमंडळाची पध्दती आढळते. उत्तर प्रदेश, बिहार, आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक आणि महाराष्ट्र या सहा राज्यांत वरिष्ठ गृहाचे अस्तित्व आढळते. बाकीच्या सर्व घटक राज्यांत एकगृही कायदेमंडळ पध्दती स्वीकारलेली दिसते. घटक राज्याच्या विधिमंडळात द्विगृहात्मक पध्दती असावी की नसावी याबाबत दोन मतप्रवाह आढळतात. माँटेग्यू चेम्सफोर्ड समितीने याबाबत असा निश्कर्ष काढला होता की घटक राज्यात द्विगृही कायदेमंडळ निर्माण केल्यास गंभीर स्वरूपाचे परिणाम होतील. १९३५ चा कायदा करतेवेळी द्विगृही कायदेमंडळ पध्दतीवर टीका झाली होती. भारतीय घटनाकार वरिष्ठ गृहाच्या उपयुक्ततेबाबत काही प्रमाणात साशंक होते. प्रांतिक घटना समितीचे याबाबत एकमत होवू शकले नाही. त्यामुळेच घटना समितीने वरिष्ठ गृहाची निर्मिती आणि समाप्ती यासंबंधीचे अधिकार घटक राज्याच्या विधानसभेला आणि संसद यांना दिले. भारतीय घटनेच्या १६९ व्या कलमात यासंबंधी तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतुदीनुसार पश्चिम बंगाल, पंजाब, आंध्र प्रदेश, तमिळनाडू इत्यादी घटक राज्यांच्या विधानसभांनी आणि संसदेने बहुमताने तेथील विधान परिषद हे वरिष्ठ गृह नष्ट केले.

**विधिमंडळाचे अधिवेशन:**

राज्यपाल विधान परिषद आणि विधानसभा या दोन्ही गृहांची अधिवेशने व त्यांच्या स्थगितीचे घोषणा करतो. एका वर्षात प्रत्येक सभागृहाची किमान दोन अधिवेशने भरली पाहिजेत व दोन अधिवेशनांतील काळ सहा महिन्यांपेक्षा जास्त असता कामा नये. प्रत्येक नवीन वर्षाच्या कामकाजाची

सुरूवात राज्यपालाच्या अभिभाषणाने होते. महाराष्ट्रात विधिमंडळाची उन्हाळी, पावसाळी आणि हिवाळी अशी अधिवेशने भरतात. उन्हाळी (अर्थसंकल्पीय) अधिवेशन व पावसाळी अधिवेशन मुंबई येथे तर हिवाळी अधिवेशन नागपूर येथे भरते.

**विधिमंडळाचे अधिकार व कार्ये:**

घटक राज्यांच्या विधिमंडळाच्या दोन्ही गृहांना (विधानसभा व विधान परिषद) पुढीलप्रमाणे अधिकार देण्यात आलेले आहेत.

**१) कायदेविषयक अधिकार:**

राज्यसूचीत समाविष्ट असलेल्या विषयासंबंधी कायदे करण्याचा अधिकार राज्याच्या विधिमंडळाला देण्यात आलेला आहे. राज्यसूचीतील विषयासंबंधी कायदे करण्याचा अधिकार फक्त घटक राज्याच्या विधिमंडळांनाच दिला आहे. सामाईक सूचीतील विषयासंबंधी कायदे करण्याचा अधिकार राज्याच्या विधिमंडळाला दिला असला तरी भारतीय संसद समाईक यादीतील विषयासंबंधी कायदे करू शकते. सामाईक सूचीतील एकाच विषयावर केंद्र सरकार व घटक राज्य सरकार यानी कायदा केला तर केंद्र सरकारचा कायदा प्रमाण मानला जातो. सामाईक सूचीतील एखादया विषयावर राज्याच्या विधिमंडळाने कायदा केला तर त्याच विषयासंबंधी संसद कायदा करू शकते. परंतु संसदेने सामाईक सूचीतील एखाद्या विषयासंबंधी कायदा केला तर राज्याच्या विधिमंडळाला त्याच विषयासंबंधी कायदा करता येत नाही. राष्ट्रपतीच्या संमतीने केलेला असा कायदा संसदेच्या विरोधात राहूनही प्रमाण मानला जातो.

ज्या राज्यात द्विगृही कायदेमंडळ पध्दती असते तेथे धनविषयक सोडून कोणतेही विधेयक कोणत्याही सभागृहात प्रथम मांडता येते. विधानसभेने मंजूर केलेले विधेयक विधान परिषदेत मंजुरीसाठी पाठविले पाहिजे. अशा विधेयकाला विधान परिषद मंजुरी देवू शकते किंवा त्यामध्ये दुरूस्त्या, सुधारणा सूचवू शकते किंवा नाकारू शकते. विधान परिषदेला तीन महिन्यांच्या आत ते विधेयक परत पाठवावे लागते. विधान परिषदेने सुचविलेल्या किंवा नाकारलेले विधेयक विधानसभेने पुन्हा दुसऱ्या वेळी मंजूर करून विधान परिषदेकडे पाठविले तर एक महिन्याच्या आत मंजूर करून परत पाठवावे लागते. एक महिन्याच्या आत ते विधेयक परत आले नाही तर ते विधेयक विधान परिषदेला मंजूर आहे असे समजून राज्यपालाच्या संमतीसाठी पाठविले जाते. राज्यपालाने मंजूर केलेल्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते. राज्यपालाने नामंजूर केलेले विधेयक पुन्हा मंजूर करून राज्यपालापुढे दुसऱ्या वेळी सहीसाठी आले तर राज्यपाल त्यास मंजूरी देतो. विधान परिषद एखाद्या विधेयकाच्या मंजुरीमध्ये जास्तीत जास्त चार महिने विलंब लावू शकते. कायदेनिर्मितीच्या अधिकारात विधानसभेला विधान परिषदेपेक्षा जास्त अधिकार आहेत असे म्हणता येईल.

एखाद्या विधेयकाच्या मंजुरीबाबात विधान परिषद व विधानसभा या दोहोंत मतभेद झाले तर संयुक्त अधिवेशन बोलाविण्याची घटनात्मक तरतूद नाही.

राज्य विधिमंडळाच्या कायदेविषयक अधिकारात पुढील मर्यादा घालण्यात आलेल्या आहेत.

१. काही विधेयके राष्ट्रपतीच्या संमतीसाठी राखून ठेवण्यात येतो. कर्ज उभारणी, संपत्ती प्राप्त करणे अशी विधेयके, समाईक सूचीमधील विषयासंबंधीची विधेयके राष्ट्रपतीच्या संमतीसाठी राखून ठेवली जातात.

२. काही महत्वाची विधेयके विधिमंडळापुढे मांडण्यापूर्वी त्यांना राष्ट्रपतीची पूर्वसंमती घ्यावी लागते. उदा. दोन राज्यांतील व्यापार, संचार स्वातंत्र्य इत्यादी विधेयके.

३. सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालय यांच्या कोणत्याही कामकाजाची चर्चा विधिमंडळात केली जात नाही.

४. राज्यसूचीतील एखाद्या विषयासंबंधी संसदेला कायदा करता येतो, परंतु राज्यसभेने बहुमताने तशा आशयाचा ठराव करावा लागतो.

५. आणीबाणीच्या काळात संसदेला राज्य सूचीतील सर्व विषयासंबंधी कायदे करता येतात.

**२) आर्थिक अधिकार:**

विधानसभेला विधान परिषदेपेक्षा आर्थिक अधिकार अधिक प्रमाणात दिलेले आहेत. विधान परिषदेला आर्थिक अधिकार फारसे दिलेले नाहीत. धनविधेयके प्रथम विधानसभा या गृहातच मांडली जातात. विधानसभेने मंजूर केलेली अर्थविधेयके विधान परिषदेकडे संमतीसाठी पाठविली जातात. अर्धविधेयके विधान परिषदेकडे आल्यापासून १४ दिवसांच्या आत शिफारशींसह पर विधानसभेकडे पाठवावयाचे असते. विधान परिषदेने केलेल्या शिफारशी विधानसभेने स्वीकारल्या पाहिजेत असे बंधन नसते. विधान परिषदने केलेल्या शिफारशी स्वीकारून किंवा न स्वीकारता विधानसभा ते विधेयक दोन्ही गृहांना मंजूर आहे असे समजून राज्यपालाच्या संमतीसाठी पाठविते. विधान परिषदेने अर्थविधेयक १४ दिवसांच्या आत परत पाठविले नाही तर विधान परिषदेला ते विधेयक मंजूर आहे असे समजून विधानसभा ते विधेयक राज्यपालाच्या संमतीसाठी पाठविते. विधिमंडळाने मंजूर केलेले अर्थविधेयक राज्यपाल नाकारू शकत नाही. त्या विधेयकाला त्याला मंजुरी द्यावीच लागते.

विधिमंडळाच्या दोन्ही गृहांपुढे अंदाजपत्रक मांडण्यात येते. विधानसभा व विधान परिषद या दोन्ही गृहांत अंदाजपत्रकावर चर्चा होते. परंतु अंदाजपत्रकाला मंजुरी देण्याचा अधिकार फक्त विधानसभेलाच आहे. कोणतेही विधेयक अर्थविधेयक आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार विधानसभेला असतो. तसेच विधानसभेकडून अनुमान समिती व लोकलेखा समिती नियुक्त करून

आर्थिक नियंत्रण ठेवले जाते. विधानसभेला विधान परिषदेपेक्षा आर्थिक अधिकार जास्त प्रमाणात दिलेले आहेत असे दिसून येते.

**३) कार्यकारी अधिकार:**

राज्याच्या कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवणे हा अत्यंत महत्वाचा अधिकार राज्याच्या विधिमंडळाला दिलेला आहे. भारतीय घटनेच्या १६४ व्या कलमानुसार मंत्रिमंडळ हे सामूहिकरित्या विधिमंडळाला जबाबदार राहते. विधानसभेत मंत्रिमंडळाविरूध्द अविश्वास प्रकट झाला तर मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो. त्यामुळेच मुख्यमंत्री आपल्या सर्व मंत्र्यांसह सामूहिकरित्या विधानसभेला जबाबदार राहून कार्य करीत असतो. तो नेहमी विधानसभेच्या विष्वासास पात्र राहण्याचा प्रयत्न करीत असतो. विधानसभेत तसेच विधान परिषदेत मंत्र्यांना त्यांच्या संबंधित खात्याविषयी प्रश्न–उपप्रश्न विचारून त्यांच्या कार्यावर नियंत्रण ठेवले जाते. महत्वाच्या सार्वजनिक स्वरूपाच्या तातडीच्या बाबींवर किंवा घटनेवर 'तहकुबीचा प्रस्ताव' मांडून मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवले जाते. मंत्रिमंडळाने मांडलेले अर्थविधेयक नाकारून किंवा मंत्रिमंडळाला नको असलेले विधेयक पास करून सरकारविरूध्द विरोध दर्शविला जातो. मंत्रिमंडळाच्या कामासंबंधी किंवा मांडलेल्या विधेयकासंबंधी नाराजी व्यक्त करून विरोधी पक्षाचे सदस्य कामकाजावर बहिष्कार टाकतात. विधानसभेप्रमाणेच विधान परिषदेतही मंत्रिमंडळाच्या कार्यावर नियंत्रण ठेवले जाते. विधिमंडळाचे मंत्रिमंडळावर नेहमी सातत्याने नियंत्रण असते. जेव्हा विधानसभेत मंत्रिमंडळाविरूध्द अविश्वास ठराव संमत होतो तेव्हा मुख्यमंत्री आपल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा देतो. थोडक्यात विधानसभेची अविश्वासाच्या ठरावाची टांगती तलवार मंत्रिमंडळावर सदैव असल्यामुळे मंत्रिमंडळ जागरूकपणे, जबाबदारीने काम करीत असते.

**४) घटनादुरूस्ती अधिकार:**

भारतीय राज्यघटनेच्या दुरूस्तीच्या विधेयकांना घटक राज्यांची मान्यता द्यावी लागते. संसदेने मंजूर केलेल्या घटनादुरूस्तीचे विधेयक घटक राज्यांकडे पाठविले जाते. एकूण घटक राज्यांपैकी निम्म्याहून अधिक घटक राज्यांच्या विधानसभांनी बहुमताने घटनादुरूस्तीच्या विधेयकाला मंजुरी देणे आवश्यक असते. घटनादुरूस्तीचा अधिकार विधानसभेला देण्यात आलेला आहे. विधान परिषदेला हा अधिकार दिलेला नाही.

**५) निवडणुकीसंबंधीचा अधिकार:**

राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत मतदान करणे, राज्यसभेचे प्रतिनिधी निवडणे, विधान परिषदेचे १/३ सदस्य निवडणे असे अधिकार विधानसभेला असतात, विधान परिषदेला हे अधिकार दिलेले

नाहीत. विधानसभा व विधान परिषद आपापले सभापती व उपसभापती यांची निवड करू शकतात. तसेच त्यांना अकार्यक्षमतेच्या कारणास्तव पदच्युत करू शकतात.

**६) इतर अधिकार:**

संसदेप्रमाणे राज्याच्या विधिमंडळाला सदस्यांचे सभासदत्व स्थगित करण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार दिलेला आहे. सभागृहाच्या नियमांचा भंग करणे, सभापतीविषयी अनादर व्यक्त करणे, सभागृहाच्या कामकाजात अडथळे आणणे. सभागृहात गोंधळ माजविणे अशा कारणाने एखादया सदस्याचे सभासदत्व स्थगित करणे किंवा रद्द केले जाते. एखादा सदस्य सलग ६० दिवस गृहात गैरहजर राहिला तर त्याचे सदस्यत्व रद्द करण्याचा अधिकार दोन्ही सभागृहांना देण्यात आलेला आहे. याशिवाय जनतेची गा-हाणी, तक्रारी व अडीअडचणी दूर करण्याच्या दृष्टीने महत्वाचे सार्वजनिक प्रश्न सभागृहात मांडण्याचे कार्य विधिमंडळाचे सदस्य करीत असतात.

राज्याच्या विधिमंडळाचे अधिकार अभ्यासले असता विधानसभेला विधान परिषदेपेक्षा जास्त अधिकार असलेले दिसतात. कायदेनिर्मितीत अधिकार दोन्ही गृहांना समान स्वरूपात असले तरी आर्थिक अधिकाराच्या बाबतीत विधानसभेला अधिक प्रमाणात अधिकार दिलेले आहेत. एखाद्या विधेयकाच्या मंजुरीबाबत दोन्ही गृहांत मतभेद निर्माण झाले तर त्याबाबत संयुक्त अधिकवेशन घेण्याची तरतूद नाही. विधान परिषदेकडे मांडलेले विधेयक नामंजूर झाले तर विधानसभा तेच विधेयक दुसऱ्या वेळी मंजूर करून घेवू शकते. अशा वेळी विधान परिषदेला त्या विधेयकाला मंजुरी द्यावीच लागते. राष्ट्रपतीच्या निवडणुकीत मत देण्याचा अधिकार विधान परिषदेला दिलेला नाही. राज्यसभेतील प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार विधानसभेला आहे. हा अधिकार विधान परिषदेला नाही. घटनादुरूस्तीच्या विधेयकाला विधानसभेची मंजुरी घेतली जाते. विधान परिषदेला हा अधिकार दिलेला नाही. भारतातील बहुसंख्य राज्यांत विधान परिषद हे वरिश्ठ सभागृह अस्तित्वात नाही. विधान परिषदेची ज्या राज्यांना आवश्यकता वाटत नाही. विधानसभा हे जनतेच्या प्रतिनिधींचे गृह असल्यामुळे त्याला अधिक महत्व प्राप्त झालेले आहे. विधान परिषदेतील सदस्य अप्रत्यक्ष पध्दतीने निवडले जातात. राज्यपालाने नियुक्त केलेले सदस्य कार्यक्षम, बुध्दिमान, अनुभवी असतीलच याची शाश्वती देता येत नाही.

एकंदरीत विधान परिषद हे गृह विधानसभेपेक्षा कमी महत्वाचे व अनावश्यक गृह मानले जाते. कायदेनिर्मितीस विलंब लावणारे, अनावश्यक खर्चीक गृह म्हणून विधान परिषदेकडे पाहिले जाते. आज भारतात महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा आणि बिहार ही सहा राज्ये सोडली तर बाकीच्या सर्व राज्यांत विधानसभा हे एकमेव सभागृह असलेले दिसते, तेथे विधान परिषद हे वरिष्ठ गृह नाही.

**कार्यकारी मंडळ**

राज्यपाल घटनात्मक प्रमुख असून राज्य मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार कारभार करतो. म्हणजेच राज्यपाल हे नामधारी कार्यकारी प्रमुख असतात, मात्र मुख्यमंत्री हे वास्तव कार्यकारी प्रमुख असतात तर मंत्रीमंडळ हे संयुक्तिरित्या विधानसभेला जबाबदार असतात. घटकराज्याच्या कार्यकारी यंत्रणेची तरतूद घटनेत सहाव्या भागामधील प्रकरण दोनमधील कलम १५३ ते १६७ दरम्यान करण्यात आलेली आहे. संघराज्याच्या कार्यकारी मंडळाप्रमाणेच घटकराज्याचे कार्यकारी मंडळ संसदीय लोकशाही तत्वानुसार कार्य करते. राज्याच्या कार्यकारी मंडळात राज्यपाले, मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ याबाबींचा समावेश होतो.

**राज्यपालः**

घटक राज्याच्या कार्यकारिणीमध्ये राज्यपाल, मुख्यमंत्री, मंत्रीमंडळ या प्रमुख घटकांचा समावेश होतो. राज्यपाल हे घटनात्मक प्रमुख असतात. मंत्रीमंडळ हे वास्तविक जबाबदारी पार पाडते. राज्यपालांना काही विवेकाधीन अधिकार आहेत. त्यांना हे अधिकार केंद्रसरकारचा प्रतिनिधी म्हणून मिळतात. १९६७ नंतर राज्यपातळीवरील राजकारण अस्थिर झाल्याने राज्यपालांना विषेश सक्रिय भूमिका पार पाडावी लागली म्हणून अनेक घटक राज्यात राज्यपाल पद हे वादाचे बनले. महारासष्ट्राच्या संदर्भात मात्र आत्तापर्यंत तरी फारसे गंभीर आरोप झालेले नाहीत. अजूनतरी महाराशष्ट्रामध्ये राज्यपाल आणि मंत्रीमंडळ यांच्यात संघर्ष झालेला दिसून येत नाही.

भारतात केंद्र व घटकराज्य सरकारची राज्यघटना एकच आहे. घटक राज्यात राज्यकारभार कसा चालवायचा याची तरतूद भारतीय घटनेच्या सहाव्या विभागात कलम १५२ ते १६७ मध्ये करण्यात आली आहे. केंद्र व राज्य शासनाच्या रचनेत अनेक बाबतीत सारखेपणा आहे. उदा. भारताचा राष्ट्रपती देशाचा प्रमुख आहे. तर राज्यपाल घटकराज्याचा प्रमुख आहे. सर्व घटक राज्यात एकाच प्रकारची संसदीय शासनपध्दती आहे.

राज्यपालपदाची तरतूद भारतीय संविधानात कलम १५४ मध्ये करण्यात आली आहे. त्यानुसार प्रत्येक घटकराज्याला एक राज्यपाल असतो. काही प्रसंगी दोन किंवा अधिक राज्यासाठी राज्यपाल म्हणून एकाच व्यक्तीची नियुक्ती करता येईल. भारतीय राज्यघटनेच्या १५५ व्या कलमानुसार राज्याचा राज्यपाल राष्ट्रपतीकडून नियुक्त केला जाईल. हे पद भूषविणारी व्यक्ती वेळप्रसंगी संघ सरकारला व घटक राज्यांना मंत्रीमंडळाला समज देणारी प्रतिष्ठित स्वरूपाची असावी. कारण ती त्या घटकराज्याच्या जनतेचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती आहे. प्रत्यक्ष व्यवहारात मात्र पक्षीय अधिष्ठानावरची नियुक्ती ही प्रक्रिया रूढ झाली आहे. शक्यतो तो त्या घटक राज्याचा असू नये. ही

नियुक्ती होताना षक्यतो तेथील मुख्यमंत्र्याशी विचार विनिमय करून व्हावी. राज्यपालांची नियुक्ती ही भारताच्या राष्ट्रपतीकडून होत असते.

**राज्यपाल पदासाठी पात्रता:**

राज्यपाल पदासाठी व्यक्तीला पुढील अटींची पूर्तता करावी लागते.

१. ती व्यक्ती भारतीय नागरिक असावी.

२. तिचे वय ३५वर्षे पूर्ण असावे.

३. ती व्यक्ती कायदेमंडळाच्या कोणत्याही गृहाची सदस्य नसावी. सभागृहाचे सदस्य असणाऱ्या व्यक्तीची राज्यपालपदी नियुक्ती झाली तर तिचे संबंधित गृहाचे सभासदत्व रद्द झाले असे समजण्यात येते.

४. त्या व्यक्तीला राज्यपाल पदावर असताना अन्य कोणतेही प्राप्तीचे पद स्वीकारता येत नाही.

**कार्यकाळ:**

राज्यपालांचा कार्यकाल पाच वर्ष असतो. राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत तो अधिकार पदावर राहतो. राज्यपाल स्वमर्जीने आपल्या पदाचा राजीनामा देवू शकतो. पाच वर्ष मुदत संपल्यानंतर त्याची राष्ट्रपतीकडून फेरनियुक्ती होऊ शकते. राज्यपालाच्या आकस्मित अनुपस्थितीमुळे हे पद रिकामे झाल्यास उच्च न्यायालयाचा न्यायाधीश या पदाचा भार सांभाळतो.

**शपथविधी:**

राज्यपाल अधिकारपद स्वीकारताना उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशांसमोर आपल्या कार्याशी एकनिष्ठ राहून कार्य करीन अशी शपथ घेतो.

**वेतन व सवलती:**

राज्यपालास दरमहा १ लाख १० हजार रूपये वेतन आणि इतर सेवा सवलती मिळतात. त्याला राजभवन हे मोफत निवासस्थान दिले जाते. त्याचे वेतन ठरविण्याचा अधिकार संसदेला देण्यात आला आहे. राज्यपालांचे वेतन राज्याच्या संचित निधीतून दिले जाते.

**राज्यपालाचे अधिकार व कार्ये:**

राज्यपालास वेगवेगळया क्षेत्रामध्ये व्यापक अधिकार आहेत. राज्यपाल हा घटनात्मक शासनप्रमुख असल्यामुळे त्यांनी हे अधिकार मंत्रीमंडळाच्या सल्ल्याने वापरावेत असे बंधन १९७६ साली करण्यात आलेल्या ४२ व्या घटनादुरूस्ती घातलेले आहे. ते अधिकार पुढीलप्रमाणे आहेत.

**१) कार्यकारी अधिकार:**

घटक राज्याचा कार्यकारी प्रमुख या नात्याने राज्याचे सर्व प्रशासकीय अधिकार तो स्वतः किंवा दुय्यम अधिकाऱ्यामार्फत वापरतो. भारतीय राज्यघटनेच्या १९५ च्या कलमानुसार राज्याची कार्यकारी सत्ता ही राज्यपालांकडे असते. राज्याचा सर्व कारभार त्यांच्या नावाने चालतो. त्यांना मदत करण्याकरिता मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली मंत्रीमंडळ असते. विधानसभेतील बहुमत प्राप्त पक्षनेत्याला राज्यपाल मुख्यमंत्रीपदी नेमतात. मुख्यमंत्र्याने निवडलेल्या इतर मंत्र्यांना मंत्रीपदाची शपथ देतात. राज्यपालांची इच्छा असेपर्यंत मंत्रीमंडळ अधिकारपदावर राहील अशी नोंद राज्यघटनेत असली तरी प्रत्यक्षात विधानसभेचा विश्वास असेपर्यंत मंत्रीमंडळ सत्तेवर राहते. मुख्यमंत्रीच प्रत्यक्षपणे मंत्र्यांना खातेवाटप करतो. त्याला राज्यपाल औपचारिक मान्यता देतात. जर कोणत्याच पक्षाला बहुमत मिळाले नाही तर तेथे संयुक्त मंत्रीमंडळ नेमतो.

घटकराज्यात संयुक्त मंत्रीमंडळ नेमणे अशक्य झाले किंवा संयुक्त मंत्रीमंडळ स्थिर शासन देण्यात अयशस्वी ठरले तर राज्यपाल राष्ट्रपतीला त्या घटक राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्याची विनंती करतो. घटकराज्यात महाधिवक्ता, राज्य लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष व सभासद यांच्या नेमणूका तसेच विधान परिषदेतील १२ सदस्यांच्या नेमणुका राज्यपाल करतात. उच्च न्यायालयातील न्यायमूर्तींची नेमणूक करताना राष्ट्रपती राज्यपालाचा सल्ला घेतात. अखिल भारतीय सेवेतील राज्याच्या सेवेत असणाऱ्या अधिकाऱ्याच्या बदल्या राज्यपाल करतात. मंत्रीमंडळाने घेतलेले निर्णय मुख्यमंत्री राज्यपालांना कळवितात. राज्यपालांचे अधिकार राज्यसूचीतील विषयांपुरते आहेत.

**२) कायदेविषयक अधिकार:**

राज्यपाल हा राज्याच्या विधीमंडळाचा सदस्य नसला तरी तो विधीमंडळाचा एक प्रमुख घटक मानला जातो. म्हणून त्याला कायदेविषयक अधिकार पुढीलप्रमाणे आहेत. विधिमंडळाने मंजूर केलेल्या विधेयकाला राज्यपालाची संमती मिळाल्याशिवाय त्याचे विधिनियमात रूपांतर होत नाही. असे विधेयक शिफारशीसह राज्यपाल विधीमंडळाकडे परत पाठवू शकतो. असे विधेयक जर विधिमंडळाने पुन्हा मंजूर केले तर मात्र राज्यपालांना संमती देणे भाग पडते. त्याचबरोबर विधिमंडळाने मंजूर केलेली काही विधेयके राष्ट्रपतीच्या विचारार्थ पाठविण्यासाठी राखून ठेवण्याचा राज्यपालांना अधिकार आहे. अशा स्वरूपाच्या विधेयकांना स्वीकृत न करण्याचा राष्ट्रपतींचा अधिकार अंतीम राहील.

याशिवाय राज्यपालांस विधिविषयक क्षेत्रातील पुढील निरनिराळे अधिकार आहेत. (१) ज्या राज्याचे विधिमंडळ द्वीसदनात्मक असेल त्या राज्यातील विधान परिषदेवर काही सभासद तो नियुक्त करू शकतो. (२) अँग्लो इंडियनांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले नाही असे वाटल्यास विधानसभेवर

त्यांचा एक प्रतिनिधी तो नियुक्त करू शकतो. (३) विधिमंडळाच्या कोणत्याही सभागृहाच्या विचारासाठी तो लेखी संदेश पाठवू शकतो. या संदेशावर त्या सभागृहात ताबडतोब विचार झाला पाहिजे. (४) विधिमंडळाची बैठक बोलावणे, तहकूब करणे हे अधिकार राज्यपालांना आहेत. दोन्ही सभागृहांचे संयुक्त अधिवेशन बोलावू शकतात. संयुक्त बैठकीत किंवा कोणत्याही सभागृहात ते भाषण करू शकतात. विधिमंडळाच्या बैठकीचे उद्घाटन त्यांच्या भाषणाने होते. विधिमंडळाची बैठक बोलविताना पूर्वीच्या बैठकीचा शेवटचा दिवस व नंतरच्या बैठकीचा पहिला दिवस यामध्ये सहा महिन्यापेक्षा जास्त अंतर राहू नये असे राज्यपालांवर बंधन आहे. विधानसभा विसर्जित करण्याचा अधिकार त्यांना आहे.

**३) राज्यपालांचा वटहुकूम:**

वटहुकूम काढण्याबाबतचा अधिकार हा अत्यंत महत्वूपर्ण अधिकार होय. विधिमंडळाची बैठक चालू नसेल अशा वेळी राज्यपाल आवश्यकता वाटल्यास वटहुकूम काढू शकतात. या वटहुकूमाचा दर्जा विधिमंडळाने मंजूर केलेल्या कायद्यासमान असतो. विधिमंडळाचे अधिवेशन सुरू झाल्यापासून सहा आठवडयापर्यंत हा वटहुकूम अंमलात राहतो. या अवधीत विधिमंडळाने मान्यता दिल्यास कायद्याचे स्वरूप प्राप्त होते आणि विधिमंडळाने त्यावर शिक्कामोर्तब न केल्यास तो रद्द समजला जातो. याबाबत लक्षात ठेवण्याचा मुद्दा एवढाच की, ज्या विषयावर राज्याने विधिमंडळ कायदे करू शकत असते त्याच विषयावर राज्यपाल वटहुकूम काढू शकतात. काही विषयांच्या बाबतीत राष्ट्रपतींच्या पूर्वपरवानगीशिवाय राज्यपाल वटहुकूम काढू शकत नाहीत.

**४) अर्थविषयक अधिकार:**

राजपालांच्या संमतीशिवाय कोणतेही धनविधेयक विधानसभेत मांडले जात नाही. आर्थिक वर्षाच्या प्रारंभी राज्यांचे अंदाजपत्रक राज्यपालांच्या संमतीने विधिमंडळासमोर मांडले जाते. धनविधेयक एकदा विधिमंडळाने मान्य केल्यावर मात्र राज्यपालांना त्यास संमती द्यावीच लागते. राज्याचा अनपेक्षित खर्चनिधी राज्यपालांच्या ताब्यात असतो. अनपेक्षितरित्या निर्माण झालेल्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी तो त्यातून रकमा मंजूर करू शकतो. या खर्चाला पुढे विधिमंडळाची मान्यता मिळाली लागते. ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरूस्तीनुसार राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यातील करविषयक बाबी व अनुदानविषयक तरतुदीसंबंधीची शिफारस करण्यासाठी राज्य वित आयोगाची नेमणूक राज्यपाल करतात.

**५) स्वविवेकाधीन अधिकार:**

घटनेनुसार विवेकाधीन राहून करावयाची कार्ये करण्यासाठी सोडून इतर कार्ये राज्यपालांना मदत करण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली एक मंत्रीमंडळ राहील असा स्पष्ट उल्लेख कलम १६३ मध्ये

केला आहे. याचा सरळ अर्थ असा की राज्यपालांनी सर्वच बाबतीत मुख्यमंत्री व मंत्रीमंडळाचा सल्ला घेतलाच पाहिजे असे नाही. काही कार्ये राज्यपाल स्वतःच्या अखत्यारीत सुध्दा करू शकतात. स्वविवेकाने केव्हा वागायचे व केव्हा नाही हे राज्यपालांनी स्वतः ठरवायचे आहे. पुढील बाबतीत मंत्रीमंडळाचा सल्ला न घेता राज्यपाल स्वविवेकानुसार निर्णय घेतील असे मानण्यास जागा आहे.

१. सर्वाधिक निवडणुकीनंतर विधानसभेत कोणत्याच राजकीय पक्षाला बहुमत मिळाले नसेल तर राज्यपाल आपल्या विवेक बुध्दिने निर्णय घेऊन संयुक्त मंत्रीमंडळ बनवतो.

२. विधानसभेत कोणत्याच पक्षाला बहुमत नसेल आणि तेथे संयुक्त सरकार बनविणे अशक्य असेल तर अशावेळी राज्यपाल ती विधानसभा बरखास्त करू शकतात. विधानसभेत मंत्रीमंडळाविरूध्द अविश्वास ठराव मंजूर झाला तर राज्यपाल मुख्यमंत्र्याला राजीनामा देण्यास भाग पाडतात. त्यानंतर विरोधी पक्षांची संयुक्त सरकार बनविण्याची तयारी आहे की नाही ते पाहता विरोधी पक्षांनाही मंत्रीमंडळ बनविणे अशक्य असेल तर अशा वेळी राज्यपाल आपल्या विवेकबुध्दीचा वापर करून विधानसभा बरखास्त करू शकतो.

३. राज्यात राजकीय अस्थिरता निर्माण झाली असेल आणि मंत्रीमंडळाने विधानसभेचा विश्वास गमावला असेल तर अशा वेळी राज्यपाल आपल्या सारासार विवेक बुध्दीचा वापर करून ते मंत्रीमंडळ पदच्युत करू शकतो. काही वेळा विधानसभेतील सदस्यांनी पक्षांतर केल्यामुळे मंत्रीमंडळ धोक्यात येते. तेव्हा राज्यपाल व राज्यसरकार यामध्ये तणाव निर्माण होतो. अशावेळी राज्यपाल त्या मंत्रीमंडळाला पदच्युत करू शकतो.

४. विधानसभेचे अधिवेशन चालू नसेल आणि एखाद्या कायद्याची तातडीने गरज भासत असेल तर राज्यपाल त्यासंबंधी वटहुकूम काढू शकतात.

५. घटनेच्या ३५६ व्या कलमानुसार राज्यपाल घटक राज्यात आणिबाणी घोषीत करून राष्ट्रपती राजवट लादू शकतो. राज्यात राजकीय पेचप्रसंग निर्माण होऊन अस्थिरता, गोंधळ माजला असेल तर राज्यपाल राजकीय स्थिती जाणून घेवून सारासार विचार करून राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्यासंबंधी राष्ट्रपतीला तसे निवेदन पाठवतात. राज्यपालांनी निष्पक्षपातीपणे आपल्या विवेकाधीन अधिकारांचा वापर करणे महत्वाचे असते.

**६) न्यायविषयक अधिकार:**

राज्यपालांना न्यायक्षेत्रातही फारच व्यापक अधिकार प्राप्त झाले आहेत. उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाची नेमणूक केली जात असताना, राष्ट्रपती राज्यपालांचा सल्ला घेतात. राज्याच्या कार्यकारी

अधिकार क्षेत्रात असलेल्या बाबीमध्ये जर एखाद्याला शिक्षा झाली असेल, तर ती कमी करणे, माफ करणे किंवा स्थगित करणे याबाबतचे अधिकार राज्यपालांना आहेत.

**७) इतर अधिकार:**

(अ) राज्यपाल लोकसेवा आयोगाचा अहवाल मागवून तो चर्चेसाठी विधानसभेसमोर ठेवतो.

(ब) राज्यपाल महालेखा परीक्षकांकडून राज्याच्या जमा खर्चाविषयीचा अहवाल मागवू शकतो.

(क) विविध राजकीय समारंभांना कार्यक्रमांना भेटी देणे, पारितोषिके, पदव्या, सन्मानदर्शक पदके, बक्षीसे यांचे वितरण करणे. सांस्कृतिक, कार्यक्रमांना प्रमुख पाहुणे म्हणून हजर राहणे. विदेशी पाहुण्यांचे व परराष्ट्रातून आलेल्या राजकीय प्रतिनिधींचे स्वागत करणे अशी कार्ये, राज्याचा प्रथम नागरिक म्हणून करावी लागतात.

(ड) राज्यात आणीबाणी घोषित केल्यानंतर आणि राष्ट्रपती राजवट सुरू झाल्यानंतर राज्यपालांना त्या राज्याच्या प्रशासनाची संपूर्ण जबाबदारी पार पाडावी लागते.

(इ) राष्ट्रपती काही वेळा राज्यपालांकडे केंद्रशासित प्रदेशाचा कार्यभार सोपवितात.

**राज्यपालांचे राज्यशासनातील वास्तविक स्थान:**

घटकराज्याच्या शासनव्यवस्थेत राज्यपालांचे वास्तविक स्थान काय हा एक मोठा चिकित्सेचा मुद्दा आहे. ज्या एखादया राज्यात केंद्रस्थानी सरकार असलेल्या पक्षालाच विधानसभेत निर्विवाद भक्कम बहुमत आहे, अशा वेळी राज्यपालांची भूमिका वेगळी राहील. विधानसभेत कोणत्याच पक्षाला निर्विवाद बहुमत नाही व मंत्रीमंडळाच्या सतत उलथापालथी होतात, अशा राज्यातील राज्यपालांची भूमिका वेगळया प्रकारची राहील. मद्रासचे राज्यपाल म्हणून नियुक्ती झाल्यावर श्री. प्रकाश म्हणाले, ''घटनात्मक राज्यपाल या नात्याने चिन्हांकित केलेल्या रेषेवर स्वाक्षरी करण्याचे कार्य मला करायचे आहे. असे सांगण्यात आले होते. घटना अशा घडल्या दोन दिवस असे आलेत की जेव्हा मी राज्याचा सर्वेसर्वा शासक होतो, कारण जाणारा मुख्यमंत्री मला सल्ला देण्याच्या मनस्थितीत नव्हता व नवीन मुख्यमंत्री कार्यालयात येणार होता. विख्यात विधिज्ञ श्री.एम.व्ही. पायली यांनी असे मत व्यक्त केले आहे की, 'विधानसभेला जबाबदार असलेले लोकनियुक्त मंत्रीमंडळ जोपर्यंत राज्यपालांना त्यांच्या कामात मदत करत आहे व सल्ला देत आहे, तोपर्यंत हा सल्ला धुडकावून लावण्याचा किंवा त्याविरोधी वर्तन करण्याचा राज्यपालांवर प्रसंग येण्याचे कारण नाही.'' या उलटचे मत प्रा.टी.के.टोपे यांनी व्यक्त केले आहे, ते म्हणतात, ''राज्यपाल हे घटनात्मक शासनप्रमुख राहतील, असा गेल्या काही वर्षाच्या अनुभवावरून समज झाला आहे. पण जेव्हा एक केंद्र सरकारचा राष्ट्रपतींना पाठिंबा असेल, तर राज्यपाल घटक राज्याचा खऱ्या अर्थी शासक बनू शकतो, तो केवळ घटनात्मक

शासनप्रमुख राहत नाही.'' गेल्या ५० वर्शांच्या इतिहासावरून या मतामध्ये बरेच तथ्य आहे असे दिसते. गेल्या ५० वर्षांच्या काळात राज्यपाल निरनिराळया ठिकाणी एकाच प्रकारच्या परिस्थितीत भिन्नपणे वागल्याची उदाहरणे आढळून येतात. त्यांच्या स्वविवेकाधीन अधिकारांच्या वापराच्या बाबतीत कोणतेही निश्चित संकेत रूढ झालेले नाहीत.

राज्यपालांच्या पदावर कितीही टीका करण्यात आली तरी घटक राज्यांच्या संसदीय शासनव्यवस्थेत राज्यपालाशिवाय शासनसंस्थेचे स्वरूप कसे राहीले असते? याचा विचार केला असता राज्यपालपदाची आवश्यकता कळून येते. मुख्यमंत्री व मंत्री यांची घटनात्मकरित्या का होईना, नेमणूक कोणी केली असती? घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झाल्यास खराखुरा अहवाल राष्ट्रपतींना कोणी पाठवला असता? या सर्व प्रश्नांचे उत्तर राज्यपालाच्या पदरात मिळते. अशा प्रकारे सर्व बाबींचा विचार करता राज्यपालांचे पद हे अनावश्यक/ सदोष आहे असे म्हणणे चूक ठरेल. परंतु भारताने संघराज्य पध्दती स्वीकारून घटक राज्यांना स्वायत्तता अधिकार बहाल केलेले आहेत. देशाचा संपूर्ण राज्यकारभार सुलभ आणि कार्यक्षम व्हावा आणि सर्व प्रदेशांचा समान विकास व्हावा या उद्देशाने घटक राज्यांची निर्मती केलेली आहे. केंद्र सरकार व राज्यसरकार यांच्यात सुसंवाद आणि समन्वय साधण्याचे कार्य राज्यपाल करीत असतो. घटक राज्यात शांतता, सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी, राज्याचे संरक्षण व संवर्धन करण्याची आणि केंद्र सरकारचा प्रतिनिधी या नात्याने राज्यपालाचे पद महत्वाचे आहे. अर्थात राज्यपालांनी आपल्या विवेकाधीन अधिकाराचा योग्य प्रकारे वापर करून या पदाचे महत्व, प्रतिष्ठा राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. राज्यपालांनी निपक्षपातीपणे, विवेकबुध्दीने निर्णय घेतले पाहिजेत. राष्ट्रपती किंवा केंद्र सरकार मधील वरिश्ठ नेते यांनी राज्यपालावर कोणतेही दडपण आणता कामा नये. तसेच राज्यपाल व मुख्यमंत्री यांचे संबंध चांगले राहण्यासाठी त्यांच्या कार्यात सुसंवाद आणि समन्वय राहणे आवष्यक असते. एकंदरीत घटक राज्याच्या प्रशासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्यपालांचे कायमस्वरूपी पद आवश्यक आहे.

**मुख्यमंत्रीः**

केंद्राप्रमाणेच घटक राज्यात संसदीय शासनपध्दतीचा स्वीकार करण्यात आला आहे. संसदीय शासनपध्दतीनुसार विधानसभेत ज्या पक्षाला बहुमत प्राप्त होते. त्या पक्षाचा नेता मुख्यमंत्री म्हणून नियुक्त केला जातो. त्याचप्रमाणे कोणत्याच पक्षाला बहुमत नसेल तर राज्यपाल युती व आघाडी यांचा विचार करून जो पक्ष, आघाडी किंवा युती राज्याला स्थिर सरकार देईल त्याच्या नेत्याला मुख्यमंत्रीपदाची शपथ देतात.

मुख्यमंत्री संसदीय प्रणालीप्रमाणे त्यांचे मंत्रीमंडळ विधानसभेला जबाबदार राहते. मुख्यमंत्रीपदी विराजमान होण्यासाठी राज्य विधिमंडळाचा सदस्य असण्याची अट नाही. परंतु त्याची मुख्यमंत्रीपदी

निवड झालेल्या दिवसापासून सहा महिन्यांच्या आत त्याला विधानसभा किंवा विधानपरिषद यापैकी एका सभागृहाचे सदस्यत्व मिळवावे लागते.

**मुख्यमंत्र्यांचे अधिकार व कार्ये:**

राज्याच्या कार्यकारी व्यवस्थेच्या सर्वोच्चपदी मुख्यमंत्री असतो. राज्याच्या कार्यकारी मंडळाचा वास्तविक कार्यकारी प्रमुख म्हणून मुख्यमंत्री काम पाहतो. राज्यकारभाराची सर्व सूत्रे मुख्यमंत्र्यांच्या हाती असतात. मुख्यमंत्र्याला व्यापक अधिकार मिळाले आहेत ते पुढीलप्रमाणे आहेत.

**१) मंत्रीमंडळाची निर्मिती करणे:**

घटकराज्याची कार्यकारी सत्ता ही मंत्रीमंडळाच्या हाती असते. अशा सामर्थ्यशाली व अधिकारसंपन्न मंत्रीमंडळाची निर्मिती मुख्यमंत्री करतो. आपल्या घटनेत मंत्र्यांची नेमणूक राज्यपाल करतील, असे म्हटले असले तरी राज्यपाल मंत्र्यांची नेमणूक मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्याने करतील असे म्हटले आहे. मुख्यमंत्रीच मंत्रीमंडळातील आपल्या सहकाऱ्याची निवड करीत असतो म्हणून मंत्रीमंडळाची निर्मिती हा मुख्यमंत्र्यांचा विषेशाधिकार आहे असे म्हटले आहे.

**२) मंत्रीमंडळाचे नेतृत्व करणे:**

मुख्यमंत्री हा मंत्रीमंडळाची निर्मिती करतो आणि तो मंत्रीमंडळाचे नेतृत्वही करतो. मंत्रीमंडळाचा नेता या नात्याने मंत्रीमंडळाच्या कामकाजावर नियंत्रण व देखरेख ठेवण्याचे कार्य मुख्यमंत्री करतो. मंत्र्याचे खाते वाटप करणे, निरनिराळया मंत्र्यांच्या खात्यात समन्वय निर्माण करणे, मंत्रीमंडळाच्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविणे ही मुख्यमंत्र्याचीच कामे आहेत. मंत्रीमंडळ ऐक्य, एकवाक्यता व राजकीय एकजिनसीपणा निर्माण करण्यात मुख्यमंत्री भूमिका पार पाडतो.

**३) शासनाचे धोरण ठरविणे:**

मुख्यमंत्री हा मंत्रीमंडळाचा म्हणजे पर्यायाने शासनाचा नेता असतो. तेव्हा शासनाचा नेता या नात्याने धोरण ठरविण्यात संपूर्ण मंत्रिमंडळाचा सहभाग असतो. मंत्रीमंडळाच्या बैठकीतच शासनाच्या धोरणासंबंधीचे अंतिम निर्णय घेतले जातात. तथापि मुख्यमंत्री हा मंत्रीमंडळाच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी असतो. त्यामुळे निर्णय प्रक्रियेत त्याचा महत्वाचा वाटा असतो.

**४) शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी करणे:**

शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी करणे हे देखील संपूर्ण मंत्रीमंडळाचे काम असते. मंत्रीमंडळातील प्रत्येक मंत्र्याकडे विशिष्ट खात्याची जबाबदारी सोपविलेली असते. प्रत्येक मंत्री आपल्या खात्याच्या कामकाजावर देखरेख करतो. तो आपल्या खात्याचे प्रशासन चांगल्या प्रकारे

चालविण्याकडे लक्ष पुरवितो. परंतु मंत्रीमंडळाचा नेता म्हणून सर्वच खात्यांच्या कारभारावर देखरेख ठेवण्याचे आणि शासनाच्या धोरणाची परिणामकारकरित्या अंमलबजावणी होईल हे पाहण्याचे काम मुख्यमंत्र्याला करावे लागते.

**५) कायदेमंडळाचे नेतृत्व करणे:**

मुख्यमंत्री हा राज्याचा वास्तव कार्यकारी प्रमुख असतो. त्यामुळे तो कार्यकारी मंडळाचा नेता समजला जातो. तथापि संसदीय शासन पध्दतीच्या आगळया वैशिष्ट्यांमुळे मुख्यमंत्री हा कायदेमंडळाचा नेताही मानला जातो. तो राज्य कायदेमंडळाचे प्रमुख सभागृह असलेल्या विधानसभेतील बहुमतवाल्या पक्षाचा नेता असतो. त्यामुळे तो संपूर्ण सभागृहाचा नेता म्हणूनही काम करतो. विधानसभेत शासनाच्या वतीने महत्वाची धोरणविषयक निवेदने व घोषणा मुख्यमंत्रीच करतो.

**६) पक्षाचे नेतृत्व करणे:**

मुख्यमंत्री हा संपूर्ण शासनाचा नेता असतो. शासनाचे नेतृत्व करत असतानाच, त्याला आपल्या पक्षाच्या नेतृत्वाची धुरा ही वाहावी लागते. याचे कारण असे की, तो प्रथम आपल्या पक्षाचा नेता असतो आणि त्यामुळेच तो शासनाचा नेता बनलेला असतो. विधानसभेतील बहुमतवाल्या पक्षाने आपला नेता म्हणून त्याची निवड केली असल्यानेच तो मुख्यमंत्री म्हणून नेमला जातो. तसेच जोपर्यंत राज्याच्या विधानसभेत बहुमताचा पाठिंबा असेल तोपर्यंतच तो आपल्या पदावर राहू शकतो. साहजिकच विधानसभेतील आपले बहुमत टिकविण्यासाठी त्याला आपला पक्ष एकसंघ ठेवण्याकडे लक्ष द्यावे लागते. त्यादृष्टीने पक्षाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी त्याची असते.

**७) विधिमंडळ व मंत्रीमंडळ यांना जोडणारा दुवा:**

मुख्यमंत्री विधिमंडळात कोणती विधेयके केव्हा मांडायची हे ठरवितो. कोणत्या विधेयकावर मतदान घ्यावयाचे हे मुख्यमंत्री ठरवत असतो. विधिमंडळात झालेली चर्चा, निर्माण झालेले वादविवाद त्यावर मंत्र्यांची उत्तरे स्पष्टीकरण व त्यातून दोहोत समन्वय साधण्याचे काम मुख्यमंत्री करतो.

**८) राज्यपाल आणि मंत्रीमंडळ यांना जोडणारा दुवा:**

मुख्यमंत्री राज्यपालांना मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयाची माहिती कळवितो. राज्यपालांना सल्ला देणे, सहकार्य करणे हे मुख्यमंत्र्याचे कार्य असते. तसेच तो राज्यपालांनी दिलेला सल्ला आणि आदेश मंत्रीमंडळापर्यंत पोहचवितो. अशाप्रकारे राज्यापाल आणि मंत्रीमंडळ यांना जोडणारा दूवा म्हणून मुख्यमंत्री कार्य करतो.

**९) राज्यपालांना सल्ला देणे:**

राज्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्याच्या संदर्भात मुख्यमंत्री राज्यपालाला सल्ला देतो.

**१०) जनतेचा नेता:**

मुख्यमंत्र्याला एकाच वेळेला कार्यकारी मंडळाचा नेता, कायदेमंडळाचा नेता, त्याच्या पक्षाचा नेता तसेच जनतेचा नेता म्हणूनही जबाबदारी पार पाडावी लागते. मुख्यमंत्री व त्याचे मंत्रीमंडळ हे जनतेच्या तक्रारी, अडीअडचणी, प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत असतात. तो विधिमंडळात जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम करत असतो. मुख्यमंत्री हा जनतेचा नेता असतो.

**मुख्यमंत्र्यांचे स्थान:**

घटकराज्याच्या प्रशासनासाठी मुख्यमंत्र्याचे पद हे महत्वाचे व आवश्यक आहे. मुख्यमंत्री हा वास्तववादी सत्ताप्रमुख असतो. राज्यपालाचे त्याच्यावर काही प्रमाणात नियंत्रण असले तरी ही स्पष्ट बहुमत पाठीशी असणारा मुख्यमंत्री राज्याला स्थिर शासन देण्यात यशस्वी होऊ शकतो. मुख्यमंत्र्याला विविध भूमिका पार पाडाव्या लागतात. मुख्यमंत्री हा मंत्रीमंडळाचा नेता, सत्तारूढ पक्षाचा नेता, विधानसभेचा नेता, जनतेचा नेता असतो. मंत्रीमंडळात त्याचे स्थान महत्वाचे असते. तो सर्व मंत्र्यांत 'समानातील प्रमुख' असतो. 'मंत्रीमंडळाच्या कमानीची मध्यशिला' किंवा 'ग्रहमालेतील सूर्य' असे त्याचे वर्णन केले जाते. मुख्यमंत्री सत्तारूढ पक्षाचा नेता असतो. तो आपल्या पक्षाचे हित पाहतो. जनमानसात आपल्या पक्षाची प्रतिमा आणि महत्व वाढविण्याचा तो प्रयत्न करीत असतो. मुख्यमंत्री राज्यात सुव्यवस्था व शांतता प्रस्थापित करून स्थिर शासन निर्माण करू शकतो. अर्थात मुख्यमंत्री पदावर असणारी व्यक्ती कार्यक्षम, कर्तव्यदक्ष, निस्वार्थी असावी. थोडक्यात घटक राज्याच्या कारभारात मुख्यमंत्र्याचे स्थान अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे व प्रतिष्ठेचे असते.

**घटकराज्याचे मंत्रीमंडळ:**

भारतीय राज्यघटनेच्या कलम १६३ (१) नुसार राज्यपालांना त्यांच्या कार्यात मदत करण्यासाठी आणि सल्ला देण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली एक मंत्रीमंडळ असेल अशी तरतूद करण्यात आली आहे. घटकराज्य पातळीवर संसदीय शासन पध्दती स्वीकारलेली आहे. राज्यपाल मुख्यमंत्र्यांची नेमणूक करतील आणि मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्याने ते मंत्रीमंडळातील मंत्र्यांच्या नेमणूका करतात.

**मंत्रीमंडळाची निर्मिती:**

राज्यपाल मंत्रीमंडळाची निर्मिती करताना विधानसभेत बहुमत प्राप्त केलेल्या राजकीय पक्षाच्या नेत्याला सरकार स्थापन करण्यासाठी पाचारण करतात व त्याची मुख्यमंत्री म्हणून नेमणूक करू

शकतात. मुख्यमंत्र्याची नेमणूक झाल्यानंतर त्यांच्या सल्ल्यानुसार सर्व मंत्रीमंडळ सदस्यांची नेमणूक राज्यपाल करतात.

राज्यघटनेमध्ये मंत्रीमंडळातील मंत्र्यांच्या संख्येविषयी काही उल्लेख केलेला नाही. मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली एक मंत्रीमंडळ असेल एवढाच उल्लेख घटनेत आहे. नवीन ९७ व्या घटनादुरूस्तीप्रमाणे विधिमंडळाच्या कनिष्ट सभागृहातील एकूण सभासद संख्येच्या १५ टक्के मंत्री असावेत. यापेक्षा जास्त असू नयेत. या शासनपध्दतीमध्ये मंत्रीमंडळातील सदस्य संख्या किती असावी हे मुख्यमंत्री निर्धारीत करतात.

**मंत्रीमंडळाची रचना:**

१. मुख्यमंत्री आपल्या मंत्रीमंडळातील मंत्र्यांची नेमणूक करतो.

२. मुख्यमंत्री आपल्या पक्षातील ज्येष्ठ, अनुभवी व हुशार व्यक्तींची मंत्री म्हणून नेमणूक करतो.

३. राज्यातील सर्व भागांचा आणि जातीजमातींचा विचार करून तो मंत्र्यांची निवड करतो.

४. मंत्री विधानसभा किंवा विधानपरिषद यापैकी कोणत्याही एका गृहाचा सदस्य असावा लागतो. विधीमंडळाचा सदस्य नसणाऱ्या व्यक्तींची मंत्री म्हणून नियुक्ती झाली तर त्याला नेमणूक झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत कोणत्याही एका सभागृहात सदस्य म्हणून निवडूण यावे लागते.

५. एखाद्या मंत्र्याची अकार्यक्षमता आढळून आल्यास मुख्यमंत्री त्या मंत्र्याला बडतर्फ करू शकतो. त्याला राजीनामा देण्यास सांगतो.

**मंत्र्यांचे प्रकार**

**१) कॅबिनेट मंत्री:**

मंत्रीमंडळाच्या रचनेतील कॅबिनेट मंत्री हा एक प्रकार आहे. कॅबिनेट दर्जाचा मंत्री म्हणजे मुख्यमंत्र्यानंतरचा त्या मंत्र्याचा दर्जा असतो. कॅबिनेटच्या बैठकीस केवळ कॅबिनेट मंत्रीच उपस्थित राहतात. या बैठकीला राज्यमंत्र्यांना उपस्थित राहता येत नाही. कॅबिनेट मंत्रीमंडळामध्ये घेतलेले निर्णय अत्यंत महत्वाचे व गोपनीय समजले जातात. हा निर्णय बाहेर जाहीर केल्यास त्याविषयी तक्रार आल्यास मंत्रीमंडळातून बडतर्फ केले जाते.

**२) राज्यमंत्री:**

या मंत्र्यांचा दर्जा कॅबिनेट मंत्र्यांच्या खालील असतो. कॅबिनेट बैठकीस या मंत्र्यांना उपस्थित राहता येत नाही. कॅबिनेट मंत्र्यांच्या मदतीसाठी या मंत्र्यांची नेमणूक केली जाते. एका खात्यात

एकापेक्षा जास्त राज्यमंत्री नेमले जावू शकतात. तसेच काही खात्यांना फक्त राज्यमंत्री म्हणून स्वतंत्र कार्यभार दिला जातो.

**३) उपमंत्री :**

मंत्रीमंडळातील तिसऱ्या प्रकारच्या मंत्र्यांना 'उपमंत्री' हा दर्जा असतो. राज्यमंत्र्यांना मदत करण्यासाठी या मंत्र्यांची नेमणूक केली जाते. त्यांच्याकडे कोणत्याही खात्याची स्वतंत्रपणे जबाबदारी सोपविली जात नाही. वरील प्रकारच्या मंत्र्यांव्यतिरिक्त मंत्र्यांना मदत करण्यासाठी सांसदिय सचिव नेमण्याची प्रथा आहे. त्याचे काम मंत्री व राज्यमंत्री यांना सहाय्य करण्याचे असते.

**मंत्रीमंडळाचा कार्यकाल:**

मंत्रीमंडळाचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो. राज्यपाल मुदतीपूर्वी मंत्रीमंडळ बरखास्त करू शकतो. विधानसभेचा विश्वास असेपर्यंत मंत्रीमंडळ सत्तेवर राहते. विधानसभेत मंत्रीमंडळाविरूध्द अविश्वीसाचा ठराव मंजूर झाला तर मुख्यमंत्र्यांना मंत्रीमंडळाचा राजीनामा द्यावा लागतो. मुख्यमंत्री हे मंत्रीमंडळाचे प्रमुख असतात. मंत्रीमंडळाच्या रचनेतील मुख्यमंत्र्याचे स्थान सर्वात वरचे असते. म्हणजेच सर्व मंत्र्यावर मुख्यमंत्र्याचे पूर्ण नियंत्रण असते. यामुळेच मुख्यमंत्र्याचा राजीनामा म्हणजे सर्व मंत्रीमंडळाचा राजीनामा होय.

**वेतन व भत्ते:**

मंत्र्याचे वेतन व भत्ते ठरविण्याचा अधिकार राज्याच्या विधिमंडळाला असतो. मंत्र्यांना निवास, टेलिफोन, वाहन अशा सुखसोयी दिल्या जातात.

**शपथविधी:**

राज्यघटनेच्या तिसऱ्या परिशिष्टात सांगितल्याप्रमाणे मंत्रीमंडळाला पदभार स्वीकारताना गोपनीयतेची शपथ घ्यावी लागते. राज्यपाल मंत्रीमंडळातील सर्व मंत्र्यांना शपथ देतात.

**मंत्रीमंडळाची वैशिष्टये:**

**१. संयुक्त जबाबदारीचे तत्व:** मुख्यमंत्री आपल्या सर्व मंत्र्यांसह संपूर्णरित्या विधानसभेला जबाबदार राहतो. विधानसभेचा विश्वास असेपर्यंत मंत्रीमंडळ अधिकार पदावर राहून कार्य करू शकते. परंतु विधानसभेत मंत्रीमंडळाविरूध्द अविश्वासाचा ठराव मंजूर झाला तर मुख्यमंत्र्यांना राजीनामा समजला जातो. मुख्यमंत्री आपल्या सर्व मंत्र्यांना विश्वासात घेवून कार्य करीत असतो. मुख्यमंत्री वेळोवेळी मंत्रीमंडळाची बैठक घेऊन निर्णय घेत असतो. कोणतेही धोरण ठरवायचे असेल किंवा निर्णय घ्यायचा असेत तर तो मंत्रीमंडळाच्या बैठकीपुढे आपले मत मांडून सर्व मंत्र्यांचा विश्वास

व पाठींबा मिळवितो. मुख्यमंत्री सातत्याने सर्व मंत्र्यांमध्ये ऐक्य प्रस्थापित करून संयुक्तरित्या विधानसभेला जबाबदार राहतो. अशा वेळी मुख्यमंत्री त्या मंत्र्यांला राजीनामा देण्यास सांगतो. मुख्यमंत्र्यांना सर्व मंत्र्यांना विश्वासात घेवून निर्णय घ्यावे लागतात.

२. **गोपनीयता:** मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात येणारे निर्णय, ठराव यासंबंधी गुप्तता पाळावी लागते. प्रत्येक मंत्री पदग्रहण करते वेळी गुप्ततेची शपथ घेत असतो. मंत्रीमंडळाच्या बैठका गुप्त असतात. मुख्यमंत्र्यांनी निर्णय घोषित केल्याशिवाय त्यासंबंधी बोलू नये असे गुप्ततेचे बंधन प्रत्येक मंत्र्यावर असते.

३. **एकजिनसीपणा:** मंत्रीमंडळातील मंत्री एकाच राजकीय पक्षातील असतात. त्यामुळे त्यांच्यात एकजिनसीपणा, ऐक्य आढळून येते. सर्व मंत्री मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एकत्र येवून एकमुखी निर्णय घेतात. परस्परांचे सहकार्य, सहमत याद्वारे प्रत्येक निर्णय एकमताने घेतला जातो. त्यामुळे मंत्रीमंडळाच्या कार्यात ऐक्यभाव व एकजिनसीपणा निर्माण होतो. सामुहिक जबाबदारीने कार्य करण्यासाठी आणि विधानसभेचा विश्वास संपादन करण्यासाठी एकजिनसीपणा आवश्यक असतो.

४. **एकनेतृत्व:** मंत्रीमंडळ हे बहुमत प्राप्त झालेल्या एका राजकीय पक्षाचे असते. त्या राजकीय पक्षाचा नेता म्हणून मुख्यमंत्री कार्य करीत असतो. सर्व मंत्री मुख्यमंत्र्यांचे नेतृत्व मान्य करून त्यांना पाठींबा देतात. एकनेतृत्वाच्या पध्दतीमुळे मुख्यमंत्री सर्व मंत्र्यांना विश्वासात घेवून स्थिर व कार्यक्षम सरकार प्रस्थापित करीत असते. निर्णयाबाबत एकमत निर्माण करणे आणि स्थिर शासन प्रस्थापित करणे हे मुख्यमंत्र्यांचे महत्वाचे कार्य मानले जाते.

५. **संमिश्र मंत्रीमंडळ (आघाडी सरकार):** जेव्हा विधानसभेत कोणत्याच पक्षाला बहुमत नसेल अशा वेळी विविध राजकीय पक्षांचे मिळून आघाडी सरकार स्थापन केले जाते. आघाडी सरकारमध्ये सामील झालेल्या राजकीय पक्षात एकजूट, एकजिनसीपणा असेल तरच ते सरकार दीर्घकाळ टीकते.

६. **वास्तववादी सत्ताप्रमुख मुख्यमंत्री:** घटकराज्याचा घटनात्मक कार्यप्रमुख राज्यपाल असतो. राज्यपाल हा मंत्रीमंडळाच्या बाहेर असतो. प्रत्यक्षात मुख्यमंत्री व त्यांचे मंत्रीमंडळ सर्व निर्णय घेत असतात. राज्यपाल हे नामधारी प्रमुख असतात तर मुख्यमंत्री हे वास्तववादी प्रमुख असतात. मुख्यमंत्र्यांचे नेतृत्व आणि कार्यक्षमता हे मंत्रीमंडळाचे एक वैशिष्ट्य मानले जाते.

**मंत्रीमंडळाचे अधिकार, कार्ये व भूमिका:**

राज्यमंत्रीमंडळ संसदीय शासनपध्दतीने असल्याने राज्यपाल हा नामधारी असतो आणि वास्तववादी प्रमुख मुख्यमंत्री असतो. त्यामुळे मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ यांच्यामार्फत राज्यकारभार

चालतो. राज्यपाल घटनात्मक प्रमुख असले तरी प्रत्यक्षात त्यांचे सर्व अधिकार मुख्यमंत्रीच वापरत असतात. सामान्यतः मंत्रीमंडळाला पुढील कार्ये पार पाडावी लागतात.

**१. धोरण निर्मिती:** शासनाचे धोरण ठरविणे किंवा धोरणाची निर्मिती करणे हे मंत्रीमंडळाचे प्रमुख कार्य आहे. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासनसंस्थेला कोणती उद्दिष्टे गाठावयाची आहेत हे ठरवण्याचे कार्य मंत्रीमंडळालाच करावे लागते. तसेच ठरविलेली उद्दिष्टे योजना कोणत्या मार्गाने वाटचाल करून यशस्वी होतील यासंबंधी निर्णय घेणे, विविध उपाययोजना करणे अशी कामे मंत्रीमंडळाला करावी लागतात.

**२. कायदेविषयक कार्ये:** जरी विधीमंडळ कायदे निर्मितीचे कार्य करीत असले तरी त्या कार्यात मंत्रीमंडळाला काही प्रमाणात जबाबदारी पार पाडावी लागते. विधीमंडळामध्ये संबंधीत मंत्र्यांकडून महत्वाची विधेयके मांडली जातात. कारण विधिमंडळात मंत्रीमंडळाच्या पक्षाचे बहुमत असते. त्यामुळे मंत्र्यांनी मांडलेली विधेयके संमत होतात. सामान्यतः मंत्रीमंडळ आपणाला राज्यकारभार योग्यप्रकारे करता यावा आणि आपली ध्येयधोरणे यशस्वी करता यावीत या दृश्टीने आवश्यक असणारे कायदे निर्माण करून विधीमंडळाकडून त्यांना मंजूरी मिळवित असते. विधीमंडळातील नव्वद टक्के विधेयके सरकारी असतात. म्हणजेच ती मंत्रीमंडळाने तयार केलेली असतात आणि संबंधीत मंत्र्यांकडून विधिमंडळात मांडली जातात. मंत्रीमंडळ कायदेमंडळाला नेहमी जबाबदार असते. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासाच्यावेळी संबंधीत मंत्र्यांना त्यांच्या खात्यातील प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतात. तसेच विधीमंडळात होणाऱ्या चर्चेला उत्तर देण्याचे कार्य मंत्र्याला करावे लागते.

**३. अंमलबजावणी विषयक कार्ये:** मंत्रीमंडळाकडून सरकारी धोरणे आणि योजना यांची अंमलबजावणी केली जाते. मुख्यमंत्री मंत्र्यांना खातेवाटप करतो. प्रत्येक मंत्र्यावर त्यांच्या संबंधीत खात्याच्या कामाची अंमलबजावणी सोपविण्यात येते. विविध खात्यांचा समन्वय साधून परस्परांच्या सहकार्याने प्रशासन कार्य स्थिर व यशस्वी करण्याचे कार्य मंत्रीमंडळाला करावे लागते, प्रशासकीय कार्याच्या यशावरच मंत्रीमंडळाचे स्थैर्य व भवितव्य अवलंबून असते. विधीमंडळाने संमत केलेल्या कायद्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी करणे ही महत्वाची जबाबदारी मंत्रीमंडळाला पार पाडावी लागते.

**४. अर्थविषयक कार्ये:** राज्याचे आर्थिक धोरण ठरविण्याचे कार्य मंत्रीमंडळाला करावे लागते. अर्थमंत्री अर्थखात्याकडून वार्षिक अंदाजपत्रक मांडतो. विधीमंडळाने संमत केलेल्या आर्थिक धोरणांची व अर्थसंकल्पाची अंमलबजावणी मंत्रीमंडळाकडून होत असते. केंद्र सरकारकडून अनुदान मागणे, कर्ज उभारणे, कर आकारणीचे धोरण ठरविणे, कर्जाची परतफेड करणे, वस्तूंच्या किंमतीवर

नियंत्रण ठेवणे, राज्याच्या सुरक्षित निधीतून खर्चाचा प्रस्ताव मांडणे, खर्चाचा अहवाल विविध खात्याकडून मागविणे इ. अर्थविषयक कार्ये मंत्रीमंडळाला पार पाडावी लागतात.

**५. नेमणुकीसंबंधीचे अधिकार:** प्रशासनातील आणि राजकीय क्षेत्रातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्याचा अधिकार घटनेनुसार राज्यपालांना प्राप्त झालेला असला तरी प्रत्यक्षात मुख्यमंत्री व त्याचे मंत्रीमंडळ हा अधिकार वापरते. राज्य लोकसेवा आयोगांचे अध्यक्ष व सदस्य इत्यादींची नेमणूक राज्यपाल मंत्रीमंडळाच्या सल्यानेच करीत असतो. परंतु या नेमणुकांमध्ये मुख्यमंत्र्यांची भूमिका महत्वाची असते.

**६. शातता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे:** मंत्रीमंडळाला राज्यात कायदा, सुव्यवस्था आणि शांतता प्रस्थापित करण्याचे कार्य करावे लागते. राज्यात अशांतता निर्माण होणार नाही याविषयी मंत्रीमंडळाला दक्षता घ्यावी लागते. राज्यात कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्याचे कार्य मंत्रीमंडळाला करावे लागते. राज्यात जातीय, धार्मिक, भाषिक संघर्ष निर्माण होतात तेव्हा असे संघर्ष मिटविण्याचे आणि शांतता प्रस्थापित करण्याचे कार्य मंत्रीमंडळालाच करावे लागते. जे मंत्रीमंडळ नागरिकांच्या स्वातंत्र्याची हमी देते, हक्काची हमी देते, त्यांच्या अंमलबजावणीसाठी शांतता, सुव्यवस्था प्रस्थापित करते ते सरकार स्थिर व यशस्वी होवू षकते.

**७. इतर कार्ये:** मंत्रीमंडळ आपल्या कामकाजाचा अहवाल दर १५ दिवसांनी राज्यपालांकडे पाठविते. न्यायाधिशांच्या नियुक्तीसंदर्भा मंत्रीमंडळ राज्यपालाला सल्ला देते. मंत्रीमंडळ आवश्यकतेनुसार चौकशी आयोग निर्माण करून प्रश्नांची चौकशी करते. राज्यातील विकास कार्यक्रम, विकास योजना राबविणे, पालकमंत्री या नात्याने जिल्हयाच्या विकासात लक्ष घालणे, परकीय पाहुण्यांचे स्वागत करणे, वृत्तपत्रांना, वृत्तवाहिण्यांना राज्यकारभारासंबंधी, ध्येयधोरणासंबंधी माहिती देणे इत्यादी कार्ये मंत्रीमंडळास करावी लागतात.

**न्यायमंडळ**

भारतामध्ये एकेरी न्यायव्यवस्था स्वीकारली असून हे आपल्या राज्यघटनेचे आगळे वेगळे वैशिष्ट्य आहे. कनिष्ठ न्यायालयापासून वरिष्ठ सर्वोच्च न्यायालयापर्यंत विविध स्तर असलेली साखळी असून प्रत्येकाचा अधिकार क्षेत्र ठरवून दिले आहे. न्यायपंचायत, तालुका न्यायालये, जिल्हा न्यायालये, उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालय अशी रचना आहे.

**उच्च न्यायालय**

राज्यघटनेतील कलम २१४ प्रमाणे प्रत्येक राज्यासाठी उच्च न्यायालय निर्माण करण्याची तरतूद आहे. भौगोलिक रचना आणि कामाचा व्याप्ती पाहून उच्च न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात दोन राज्ये किंवा केंद्रशासित प्रदेशांचा समावेश केला जाऊ शकतो. पंजाब आणि हरियाणा या दोन राज्यासाठी

एक उच्च न्यायालय आहे. तर देशात एकूण १८ उच्च न्यायालये आहेत. भौगोलिक क्षेत्र आणि खटल्यांची वाढती संख्या पाहून एका उच्च न्यायालयाच्या क्षेत्रात दोन तीन खंडपीठ स्थापन केले जातात. उदा. मुंबई उच्च न्यायालयाच्या क्षेत्रात औरंगाबाद, मुंबई, नागपूर येथे खंडपीठ आहेत.

**उच्च न्यायालयाची रचना :-**

प्रत्येक उच्च न्यायालयात एक मुख्य न्यायाधीश आणि राष्ट्रपती वेळोवेळी ठरवतील तितके इतर न्यायाधीश असतात. त्यांच्या नेमणूक राष्ट्रपती करीत असतात. या प्रक्रिया राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाशी आणि त्या संबंधित राज्याच्या राज्यपालाच्या सल्ल्याने करीत असतात. खटल्याचा निकाल लवकर लावण्याच्या दृष्टीने दोन दोन वर्षासाठी तात्पुरती न्यायाधीश नियुक्त करण्याची प्रथा आहे. उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या बदल्या दुसऱ्या राज्यात होऊ शकतात.

**पात्रता:-**

१. ती व्यक्ती भारताचे नागरिक असले पाहिजे.
२. त्याने भारतातील कोठेही किमान दहा वर्षे कनिष्ठ न्यायालयात न्यायाधीश म्हणून कामाचा अनुभव असावा किंवा
३. उच्च न्यायालयात वकिली करण्याचा दहा वर्षाचा अनुभव असावा.

**पगार व भत्ते:-**

उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश व इतर न्यायाधीशांना संसदेने केलेल्या विहित अटीनुसार होतो. याशिवाय इतर भत्ते आणि शासकीय निवासस्थान असते. तसेच निवृतीवेतन दिली जाते. आर्थिक आणीबाणी हा अपवाद वगळता त्यांच्या पगारात कमी करता येत नाही.

**न्यायाधीशांचा कार्यकाल:-** न्यायाधीश सेवेचा कार्यकाल ६२ वर्षे पूर्ण होईपर्यंत पदावर काम करू शकतात. त्यापूर्वी ते स्वइच्छेने राजीनामा देऊ शकतात. गैरवर्तणुक व अकार्यक्षमता या आधारे एखाद्या न्यायाधीशास बडतर्फ करता येतो तसा ठराव संसदेने दोन तृतीयांश बहुमताने मंजूर केल्यावर राष्ट्रपतीं त्यांना बडतर्फ करतात.

**उच्च न्यायालयाचे कार्यक्षेत्र व अधिकार**

**१. प्रारंभिक अधिकार क्षेत्र**

काही दावे खटले थेट उच्च न्यायालयात दाखल करता येतात. त्यास प्रारंभिक अधिकार क्षेत्र म्हणतात. मूलभूत अधिकार त्यावरील अतिक्रमणबद्दलचे दावे, रिट अर्ज, विवाह, घटस्फोट, संपत्ती विषयक दावे स्वीकारणे, चालविणे आणि निर्णय देणे, संसद राज्य विधिमंडळाच्या

निवडणुकीसंबंधीची दावे चालवणे, निर्णय देणे, बंदिप्रत्यक्षिकरण, प्रतिवेध, अधिकारपृच्छा, परमादेश इत्यादीचे अर्ज स्वीकारून निर्णय देणे याचा समावेश प्रारंभिक अधिकार क्षेत्रात होत असतो. हे दावे दिवाणी आणि फौजदारी स्वरूपाचे असू शकतात.

**२. पुनर्निर्णयाचे अधिकार क्षेत्र:–**

राज्यातील जिल्हा न्यायालयातील निकाला विरुद्ध उच्च न्यायालयात दावा दाखल करता येते. उच्च न्यायालये अशा खटल्यावर दाखल करून पुर्ननिर्णय देत असतात. दाव्याचे स्वरूप गंभीर असल्यास किवा पाच हजार पेक्षा जास्त रुपयाचा दावा असल्यास कनिष्ठ न्यायालयातून अपील दाखल करता येते. अपिलाचे स्वरूप दिवाणी आणि फौजदारी दोन्ही असू शकते.

**३. पुनर्विलोकनाचे अधिकार:–**

घटक राज्यातील विषयावर कायदे करण्याचा अधिकार राज्य विधिमंडळला आहे. हे कायदे करताना कायद्याच्या प्रक्रियेचे पालन केले किंवा नाही तसेच घटनात्मक तरतुदी प्रमाणे केले आहे काय कायदे योग्य की अयोग्य हे तपासून पाहण्याचा अधिकार उच्च न्यायालयाला दिले आहेत. या अधिकाराला पुनर्विलोकनाचे क्षेत्र असे म्हणतात.

**४. दाखला देण्याचे अधिकार:–**

काही बाबतीत उच्च न्यायालयाच्या निकालाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येते. परंतु त्यासाठी उच्च न्यायालयाची परवानगी लागते. अशा आशयाचे प्रमाणपत्र देण्याचा अधिकार उच्च न्यायालयाला असतो.

**५. प्रशासकीय स्वरूपाचे अधिकार क्षेत्र:–**

जिल्हा आणि कनिष्ठ न्यायालयाच्या न्यायालयीन प्रक्रियेवर देखरेख, नियंत्रण ठेवणे, कार्यक्षम कारभारासाठी नियम तयार करणे. कनिष्ठ न्यायालयातील आवश्यक नोकर भरती करणे, त्याच्यावर देखरेख, बदली, बढती हे काम बघणे. कनिष्ठ न्यायालयातील कामकाजाची, प्रक्रियेची माहिती मागविणे. काही खटले किंवा एका कनिष्ठ न्यायालयातून दुसऱ्या कनिष्ठ न्यायालयाकडे, स्वतःकडे वर्ग करून घेणे. कनिष्ठ न्यायालयाचे रेकॉर्ड तपासणी करणे. इत्यादी प्रशासकीय कामे करावी लागतात.

**उच्च न्यायालयाचे महत्व**

कलम २२६ प्रमाणे भारतातील कोणतीही व्यक्ती किंवा अधिकारी यास अनुलक्षून विविध प्रकारचे आदेश देण्याचे अधिकार उच्च न्यायालयास आहे. त्यामुळे एकेरी न्यायव्यवस्थेच्या रचनेत उच्च न्यायालयाला महत्त्वाचे स्थान आहे. उच्च न्यायालयाचे निर्मिती राज्यघटनेनुसार झालेली असते.

त्यामुळे ही न्यायालये घटनात्मक तरतुदीनुसार काम करतात. त्यांच्या कार्य ते पूर्ण स्वायत्त आहेत. न्याय प्रक्रिया चूक ठेवण्यात उच्च न्यायालयाचा सिंहाचा वाटा आहे. उच्च न्यायालयावर सर्वोच्च न्यायालयाचे नियंत्रण असते. तरीही उच्च न्यायालयाचे अधिकार हे सर्वोच न्यायालयापेक्षा जास्त आहेत कारण सर्वोच्च न्यायालय फक्त मुलभूत अधिकारावर आक्रमण झाल्यास निर्णय किवा आदेश देते. पण उच्च न्यायालय मात्र मुलभूत अधिकार व कायदेशीर हक्क या दोन्हीवर आक्रमण झाल्यास आदेश देऊ शकते.

**उच्च न्यायालय अभिलेख न्यायालय आहेत:–** सर्वोच्च न्यायालयाप्रमाणे उच्च न्यायालय सुद्धा अभिलेख न्यायालय आहे. त्याची कारणे पुढील प्रमाणे

१. उच्च न्यायालयाने दिलेले निर्णय लिखित स्वरूपात असतात आणि ते अभिलिखित करून ठेवलेले असतात.

२. या अभिलिखित निर्णयाचा उपयोग भविष्यात दिल्या जाणाऱ्या दावे खटल्यांच्या निकालाच्या वेळी केली जाते.

३. उच्च न्यायालयाचे निर्णय राज्याच्या कार्यक्षेत्रातील कायद्यासारखे असते. काही निर्णयाचे रूपांतर कायद्यात केले जाते.

४. उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान करता येत नाही. निर्णय अमान्य करणाऱ्यांना शिक्षा, दंड होऊ शकतो.

**कनिष्ठ न्यायालये किंवा दुय्यम न्यायालये**

प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा व सत्र न्यायालय असते. तसेच तालुका पातळीवरही न्यायालये असतात. तेथे त्याच्या कार्यक्षेत्राप्रमाणे खटले चालतात. या न्यायालयामध्ये दिवाणी फौजदारी दोन्ही दावे चालवले जातात. खटल्यांच्या स्वरूपावरून काही दावे थेट जिल्हा न्यायालयात दाखल होतात. या सर्व कनिष्ठ न्यायालयावर उच्च न्यायालयाचे नियंत्रण असते.

न्यायाधीशांची नियुक्ती-राज्यपाल घटकराज्याच्या उच्च न्यायालयाचा सल्ला घेऊन जिल्हा पातळीवरील न्यायाधीशांची नेमणूक करतो.

पात्रता- जिल्हा पातळीवरील सात वर्षे वकिलीचा अनुभव असणाऱ्या व्यक्तीला उच्च न्यायालयाच्या शिफारशीने राज्यपाल न्यायाधीशांची नियुक्ती करतो. तालुकास्तरीय न्यायाधीशाची नियुक्ती लोकसेवा आयोगाद्वारे होते.

**लोक अदालत**

जनतेच्या तक्रारी, वाढती लोकसंख्या त्यातून निर्माण होणारे दावे, खटले याची संख्या वाढू लागली. परंतु त्या प्रमाणात न्यायालये आणि न्यायाधीशांची संख्या वाढत नाही. निर्णय लवकर लागत नाही, त्यातून मार्ग काढण्यासाठी आणि खटल्याचा निकाल लवकर लागण्यासाठी लोकअदालत कल्पनेची निर्मिती झाली.

लोकअदालत हे एकेक स्वयंसेवी संस्था आहे. अनौपचारिक पद्धतीने खटले निकाली काढण्याचे सरकारमान्य व्यासपीठ आहे. दोन्ही पक्षकाराने एकत्र बोलावून चर्चा वाटाघाटी करून दोघातील भांडण, संघर्ष, मतभेद, मिटवण्याचा प्रयत्न लोक आदालतीद्वारे केला जातो.

**स्वयं अध्ययन प्रश्न–४**

**खालील प्रश्नांची एक–दोन वाक्यात उत्तरे द्या.**

१. भारतीय राज्यघटनेच्या कोणत्या कलमानुसार घटकराज्यमंत्रिमंडळाची निर्मिती करण्यात आली आहे.

२. घटक राज्यशासनामध्ये वटहुकुम काढण्याचा अधिकार कोणास आहे.

३. उच्च न्यायालयातील न्यायाधीशाची नेमणूक कोण करतो?

## ३.२.३ अ) न्यायालयीन पुनर्विलोकन :–

न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार ही अमेरिकेने राज्यशास्त्राला दिलेली देणगी आहे. मार्बल विरुद्ध मेडीसन खटल्याचा निकाल देताना इ.स. १८०३ साली तत्कालीन न्यायाधीश जॉन मार्शल यांनी न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकारास मान्यता दिली. न्यायालयीन पुनर्विलोकन म्हणजे

''कायदे मंडळाने केलेला कायदा घटनेशी सुसंगत आहे की नाही यासंबंधी निर्णय देण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा अधिकार होय.''

न्यायालयीन पुनर्विलोकनाला न्यायालयीन सिंहावलोकन असेही संबोधले जाते. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार आहे. मात्र अमेरिकेच्या तुलनेत फारच कमी आहे. एखाद्या वेळेस राजकीय पक्ष त्यांच्याकडे असलेल्या सत्तेचा गैरवापर करुन विरोधकांवर दडपण आणून आपल्या सोयीनुसार कारभार करते अशावेळी लोकशाही धोक्यात येऊ नये यासाठी लोकशाहीतील घटनेला समर्थ संरक्षणाची गरज असते. यासाठी भारतीय घटनेने न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या तत्त्वाचा स्वीकार केलेला आहे. भारतीय संसद व भारताची न्यायदान संस्था यांच्यात

अनेक वेळा संघर्ष झालेला आहे. संसदेच्या श्रेष्ठत्वाच्या सर्वोच्च न्यायालयाने १९६७ पर्यंत पुरस्कार केला होता व आपल्या न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकारावर मर्यादा मान्य केल्या होत्या. काही कायदे मुलभूत हक्कांवर नियंत्रण अणतात या कारणासाठी सर्वोच्च न्यायालयाने अवैध ठरविले तेंव्हा घटना दुरुस्ती करुन संसदेने सर्वोच्च न्यायालयाच्या पुनर्विलोकनावर मर्यादा घातल्याचे आढळून आले. १९६७ साली गोलकखनाथ खटल्याच्या संदर्भात न्यायालयाने असा निर्णय दिला की संसदेला मुलभूत हक्क काढून घेण्याचा अधिकार नाही. त्यामुळे मुलभूत हक्काच्या प्रकरणात दुरुस्ती करता येणार नाही असे जाहीर केले. या निर्णयामुळे संसदेच्या श्रेष्ठत्वाला धक्का बसला, संसदेने आपले श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी घटनेत अनेक दुरुस्त्या केल्या.

१९७३ साली केशवानंद भारती खटल्या संदर्भात संसदेला घटनेच्या कोणत्याही कलमात दुरुस्ती करण्याचा अधिकार आहे ही गोष्ट मान्य केली. पण घटनेच्या मुळ चौकटीला बाधा येईल अशी दुरुस्ती संसदेला करता येणार नाही. हे न्यायालयाने स्पष्ट केले. १९७६ साली ४२ व्या घटनादुरुस्ती द्वारे संसदेने राज्यघटनेच्या कोणत्याही कलमाला दुरुस्ती करण्याचा आपला अधिकार आहे हे सिद्ध केले व मार्गदर्शक तत्त्वाची अंमलबजावणी करत असताना मार्गदर्शक तत्त्वावर गदा जरी आली तरी नागरिकांना न्यायालयात जाता येणार नाही अशी तरतुद करण्यात आली.

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने १९५० साली प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेचा कायदा (मिसा) अवैध ठरविला जमीनदारी निर्मुलनाचा कायदाही निकालात काढून संसदेला धक्का दिला. म्हणून संसदेने १९५१ ला घटनेत पहिली दुरुस्ती केली व ३१ अ या कलमान्वये मालमत्तेचा ताबा घेण्याचा अधिकार संसदेला मिळाला.

## ब) न्यायालयीन सक्रियता (Judicial Activism) :-

कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ आपली जबाबदारी व्यवस्थीत पार पाडत नाही. अशावेळी न्यायव्यवस्था कार्यामध्ये हस्तक्षेप करुन निर्णय देते त्यामुळे त्यांना न्यायालयीन सक्रियता असे म्हणतात. न्यायालयात सक्रियता ही संकल्पना अलिकडच्या काळात कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यांच्या निष्क्रीयतेतून उदयास आलेली आहे. १९८० नंतर भारतीय शासन प्रक्रियेमध्ये याचा उदय झालेला आहे. राजकीय प्रक्रियेमध्ये भ्रष्टाचार मूल्यहिनता गुन्हेगारी यासंबंधी न्यायालयाने दिलेले निर्णयातून ही सक्रियता महत्त्वपूर्ण जाणवते.

### ❀ न्यायालयीन सक्रियतेचा विकास :–

गणराज्य शासन व्यवस्थेचे लोकांना सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय उपलब्ध करुन देणे हे महत्त्वपूर्ण काम असून गेल्या काही वर्षामध्ये या जबाबदारी पासून राजकीय व्यवस्था दूर जात असल्याचे दिसून येते, भारतीय राज्यघटनेने कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ या तिन्ही

ही व्यवस्थांना अधिकार बहाल केले असून त्यांच्यात सत्ता संतुलन निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु संसदेचा खालावलेला दर्जा शासन कारभारात आलेली दिरंगाई लोकशाही मूल्यांचा होत असलेला ऱ्हास यामुळे नागरिकांच्या कार्याकडे दुर्लक्ष होऊ लागले होते व त्याच दरम्यान सामान्य नागरिकांनी आपल्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी न्यायालयाकडे दाद मागू लागले त्यावेळी न्यायालयानेसुद्धा आपल्या तांत्रिक गोष्टी बाजूला ठेऊन जनहितार्थ दृष्टिकोनातून निर्णय दिले. यातूनच भारतीय राजकारणात न्यायालयीन सक्रियतेचा उदय झाला.

१९९३ साली न्यायालयीन सक्रियतेसंबंधी जैनबंधू डायरी प्रकरण न्यायालयासमोर आले व या केसमध्ये न्यायालयाने निर्णय देताना सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांचा नाकर्तेपणावर टिकास्त्र सोडून नागरिकांच्या बाजूने निर्णय दिला, हवालाकांडाच्या केसमध्ये भ्रष्टाचारासंबंधी न्यायालयाची सक्रियता अधिक दिसून आली तर अलिकडे टू जी स्प्रेक्ट्रम घोटाळ्यामध्ये कोळसा खाण वाटप या प्रकरणामध्ये न्यायालय आक्रमकरित्या दिसून आले व जनतेचा पैसा अशा पद्धतीने वाया घालवू शकत नाही या संबंधी शासनावर ताशेरे ओढले एक प्रकारे न्यायालयीन सक्रियता वाढत असलेली दिसून येते.

❀ **न्यायालयीन सक्रियतेची आवश्यकता :**

राज्यघटनेने नागरिकांना दिलेल्या अधिकाराचेही संरक्षण करणे तसेच कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ यांच्या दुर्बलतेमुळे नागरिकांच्या होणाऱ्या हक्काचे संरक्षण करण्याची जबाबदारी न्यायालयामुळे मिळाली दुर्बल गरीब घटकांना जनहित याचिकेच्या माध्यमातून न्याय मिळण्याची आशा न्यायालयीन सक्रियेतून वाढली यातून व्यवस्थेमध्ये सुधारणा होऊन कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाच्या अनियमीत मंडळावर नियंत्रण ठेवले.

न्यायालयीन सक्रियतेच्या माध्यमातून दिलेल्या निर्णयांची पूर्तता होईल असे सांगू शकत नाही. तसेच या न्यायालयीन सक्रियतेचा प्रभाव जास्त दिसून येतो. तसेच न्यायव्यवस्थेचे अवास्तव हस्तक्षेप वाढल्याने सत्ता संतूलनांना धोका निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. न्यायालयीन सक्रियतेत काही मर्यादा असल्या तरी न्यायालयीन सक्रियेत लवचिकता आलेली आहे. तसेच दुर्बल घटकांना ही न्याय मिळू शकतो. अशी अशा निर्माण झाली आहे.

## क) जनहित याचिका (Public Interest Citigation) :-

न्यायालयीन व्यवस्थेमध्ये गेल्या काही दोन दशकात महत्त्वपूर्ण बदल घडत आहे. न्यायालयीन प्रक्रिया अधिक व्यापक व सामाजिक संरक्षणाच्या रुपात सक्रिय होताना दिसते. या सक्रियतेचे प्रतिबिंब जनहित याचिकेत दिसून येते.

भारतीय संविधानाच्या कलम ३२ नुसार जर व्यक्तीच्या मुलभूत अधिकारावर आक्रमण झाले असेल तर त्याला न्याय मिळू शकतो. पण या कलमाचा अधिक विस्तार न्यायालयाने आपल्या निर्णयाद्वारे करुन कलम ३२ च्या नुसार कोणती संस्था किंवा व्यक्तीच्या वैधानिक अधिकारावर आक्रमण झाले असल्यास तो कलम ३२ नुसार अर्ज करु शकतो. तसेच जर तो व्यक्ति किंवा घटक न्यायालयात अर्ज करण्यास सक्षम नसेल तर त्याच्या वतीने केलेला अर्ज ग्राह्य धरला जाईल.

थोडक्यात जनहितार्थ याचिका ही न्यायालयाने अनुसरलेली अशी प्रक्रिया आहे. कि ज्या मध्ये दुर्बल घटकांच्या वतीने किंवा सार्वजनिक दृष्ट्या महत्त्वाच्या विषयासंबंधीचा अर्ज न्यायालयात सादर केलेला अर्ज न्यायालय स्वीकारते या न्यायालयीन प्रक्रियेत लवचिकपणा दिसून येतो. तसेच अर्ज हे नाममात्र शुल्क किंवा नि:शुल्क ही स्वीकारले जातात.

जनहित याचिका ही ज्या प्रकारणाचा प्रभाव जनमाणसावर पाडू शकतो.

दारिद्र्य, अज्ञान दुर्बल अशा विविध कारणांनी आपले संरक्षण करण्यास न्यायालयात जावू न शकणारे घटकांच्या हितासाठी जनहित याचिका दाखल करु शकतो.

जनहित याचिकेमध्ये व्यक्तिपेक्षा समुहाला अधिक महत्त्व दिले आहे. यात सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचा अधिक विस्तार करण्यात आला आहे. या जनहित याचिकेसंदर्भातील काही खटले :

**१. आग्रा प्रोटेशन होमकेस :** आग्रा प्रोटेशन होम मध्ये ७०-८० मुली राहत होत्या. या संदर्भात इंडियन एक्सप्रेसने या मुलींना मिळणारी अमानवीय वागणूक विषयी बातमी वृत्तपत्रात दिले होते. त्यावेळी या विषयाचे याचिका दोन वकिलांनी न्यायालयात दाखल केली.

२. मुंबई मधील पादचाऱ्याच्या मार्गासंबंधी केस यामध्ये पादचाऱ्याच्या सुरक्षासंबंधी न्यायालयाने आदेश दिले इत्यादी.

जनहित याचिका संदर्भातील केस दाखल करण्याची संख्या वाढत आहे. न्यायालय यामाध्यमातून व्यक्तीचे जीवित स्वातंत्र्य, पर्यावरण संरक्षण, शिक्षण अधिकार असे नाविन्यपूर्ण अधिकार प्रस्थापित करत आहे. असे असले तरी या प्रक्रियेतून न्यायालयाच्या कायदेमंडळाच्या अधिकारावर आक्रमणता निर्माण झाले आहे. तसेच खटल्याचे विलंबता वाढत आहे.

**स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-५**

❐ **खालील प्रश्नांची एक-दोन वाक्यात उत्तर द्या.**

१. कोणत्या कलमानुसार सर्वोच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली आहे?

२. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाचे निवृत्ती वय किती?

३. सर्वोच्च न्यायालयाचे पहिले सरन्यायाधीश कोण?

## ३.३ सारांश

भारताच्या कायदेमंडळ हे द्विगृही पध्दतीचे असून लोकसभा व राज्यसभा हे दोन सभागृह आहेत. कायद्याची निर्मिती या सभागृहात होते. तसेच शासन चालवणारे व कायद्यासंबंधीची अंमलबजावणी करणारे कार्यकारी मंडळ असून ते शासन कारभार चालवतात. याचप्रमाणे समाजात न्यायदानाचे कार्य करण्यासाठी न्यायालयीन व्यवस्था निर्माण केली असून यामार्फत न्यायदानाचे काम गतीशील पध्दतीने होते.

## ३.४ पाभिाषिक शब्द व शब्दार्थ

**१. धन विधेयक :** आर्थिक विधेयक

**२. आकस्मिक निधी :** तत्कालीन खर्चासंबंधी तरतूद

**३. महाभियोग :** भ्रष्टाचार, राष्ट्रविरोधी कृत अशा गंभीर आरोपावरुन भारताच्या राष्ट्रपतीविरुध्द चालवलेला घटल्याला महाभियोग म्हणतात.

## ३.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

☛ **स्वयं–अध्ययन प्रश्न–१ ची उत्तरे**

१) २५ वर्षे. २) १/१० सदस्य संख्या.

३) वरिष्ठ सभागृह. ४) लोकसभा.

☛ **स्वयं–अध्ययन प्रश्न–२ ची उत्तरे**

१) ५२ ते ६२ कलम २) लोकसभा, राज्यसभा व राज्यांचे विधानसभाचे सदस्य

३) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन ४) ५ वर्षे.

☛ **स्वयं–अध्ययन प्रश्न–३ ची उत्तरे**

१) राष्ट्रपती २) पंतप्रधान. ३) ५ वर्षाचा.

☛ **स्वयं–अध्ययन प्रश्न–४ ची उत्तरे**

१) १६३ २) राज्यपाल ३) राज्यपाल

☛ **स्वयं–अध्ययन प्रश्न–५ ची उत्तरे**

१) कलम १२४. २) ६५ वय. ३) हरीलाल केनिया.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

**अ) टिपा लिहा.**

१. पंतप्रधानांचे कार्य

२. उपराष्ट्रपती

३. मुख्यमंत्र्याची कार्ये

४. उच्चन्यायालयाचे प्रारंभिक अधिकार

५. सभापतीचे अधिकार व कार्ये

**ब) सविस्तर उत्तरे लिहा.**

१. लोकसभेचे कार्य व अधिकार स्पष्ट करा.

२. सर्वोच्च न्यायालयाचे कार्य व अधिकार स्पष्ट करा.

३. विधानसभेची रचना व कार्ये स्पष्ट करा.

४. घटक राज्यशासनातील राज्यपालाच्या स्थानाविषयी सविस्तर चर्चा करा.

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

१. **ऑस्टिन ग्रॅन व्हील :** *''भारतीय राज्यघटना राष्ट्राची कोनशीला''*, मराठी अनुवाद भारती केळकर, डायमंड पब्लिकेशन पुणे २०१३

२. **भारत व विधी न्याय मंत्रालय :** *''भारताचे संविधान''*, भारत व विधी न्याय मंत्रालय, मुद्रण व लेखन महाराष्ट्र शासन प्रकाशित २००६

३. **बी. बी. पाटील :** *''भारताचे शासन आणि राजकारण''*, फडके प्रकाशन, कोल्हापूर – २०१२.

❑❑❑

### सत्र १ : घटक ४

# घटनात्मक प्राधीकरणे

(Constitutional Bodies)

अनुक्रमणिका


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ घटनात्मक प्राधीकरणे

४.२.१.१ नियंत्रक व महालेखापरीक्षक

४.२.१.२ वित्त आयोग

४.२.१.३ निवडणूक आयोग व निवडणूक प्रक्रिया

४.२.१.४ केंद्रीय लोकसेवा आयोग

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

४.५ स्वयं अध्ययन प्रश्न–उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ४.० उद्दिष्ट्ये

- भारतीय राजकीय व्यवस्थेमध्ये निर्माण केलेल्या घटनात्मक प्राधीकरणाचा अभ्यास करणे.
- नियंत्रक व महालेखापरीक्षक या घटनात्मक प्राधीकरणाचे स्वरूप व कार्ये जाणून घेणे.
- निवडणूक आयोग, वित्त आयोग केंद्रीय लोकसेवा आयोग या प्राधीकरणाचे स्वरूप व कार्ये समजावून घेणे.

## ४.१ प्रास्ताविक

भारतीय राज्यघटनेमध्ये विविध घटनात्मक प्राधीकरणाची तरतुद केली असून ही प्राधीकरणे स्वायत्त असून त्याचे कामकाज घटनात्मक तरतुदीनुसार पार पाडले जाते. त्यांना त्याच्या कार्यक्षेत्रात स्वायत्तता दिली असल्यामुळे ती स्वतंत्र व निर्भीडपणे कामकाज करू शकतात. देशातील लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी त्याची नितांत गरज आहे. या प्राधीकरणाच्या माध्यमातून राज्य घटनेतील तत्त्वाची अंमलबजावणी व संरक्षण केले जाते.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ घटनात्मक प्राधीकरणे

भारतीय राज्यघटनेतील तरतुदीनुसार राज्यकारभाराच्या व प्रशासकीय सोयीसाठी विविध घटनात्मक प्राधीकरणाची निर्मिती करण्यात आलेली आहेत. ही प्राधीकरणे शासकीय कार्याना पुरक व्यवस्था म्हणून कार्यरत आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात त्याची उपयुक्तता व्यवहार्यता सिद्ध झाली आहे.

#### ४.२.१.१ नियंत्रक व महालेखापरीक्षक

संसदीय लोकशाही कायदेमंडळाचे कार्यकारी मंडळावरील नियंत्रण प्रभावी करण्यासाठी कार्यकारी मंडळाच्या कार्यावर लक्ष ठेवणे आवश्यक असते. शासनाच्या ध्येय धोरणांची आणि कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याचे कार्य सनदी सेवकांकडून केले जाते. विविध योजना आणि कार्यक्रमावरील खर्च कार्यकारी मंडळाकडून केला जातो. कार्यकारी मंडळातील जमा-खर्चाच्या तांत्रिक बाबी तपासण्यासाठी, सार्वजनिक हिशोब आणि आर्थिक व्यवहार योग्य आहेत काय? विभागवार खर्च केला आहे काय? इत्यादी तांत्रिक बाबींचा हिशोब तपासण्याचे कार्य नियंत्रक व महालेखापरीक्षकाकडून केले जाते. स्वच्छ कार्यक्षम प्रशासन आणि भ्रष्टाचार मुक्त लोकशाहीसाठी महालेखापरीक्षकाचे पद लोकशाहीचा आधारस्तंभ मानला जातो. कायदेमंडळातील मंत्र्यांना तांत्रीक बाबींचे पुरेसे ज्ञान नसते, यासाठी शासनाचे आर्थिक व्यवहार कार्य योग्य प्रकारे होते की नाही, हे पाहण्याचे कार्य नियंत्रक व महालेखापरीक्षकाच्या सहाय्याने केले जाते. भारतीय राज्यघटनेच्या १४८ ते १५१ या कलमात नियंत्रक १ महालेखापरिचक याची नेमणूक व कार्ये याविषयी तरतुदी केल्या आहेत त्याची नेमणूक राष्ट्रपतीकडून केली जाते. त्याचे वेतनभत्ते, सेवाशर्ती संसद ठरवते. गिरीशचंद्र मुर्मु हे मे २०१३ पासून नियंत्रक व महालेखापरीक्षक पदावर कार्यरत आहेत.

❐ **नियंत्रक व महालेखापरीक्षक पदाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-**

इंग्लंडमध्ये शासकीय लेखा परीक्षण करण्यासाठी नियंत्रक व महालेखापरीक्षक पद निर्माण करण्यात आले होते. सन १८५७ साली लॉर्ड कॅनिंगच्या काळात मुंबई, मद्रास आणि बंगाल या

प्रांतातील लेखांकन कार्यालयांना एकत्रित करण्यात आले आणि त्यावेळी महालेखापालाचे नवीन पद निर्माण करण्यात आले. त्या काळात जमीन महसुलीवरील खर्च जिल्हाधिकाऱ्यामार्फत होत असे व हिशेब ठेवण्याचे कार्य रेखांकन विभाग करीत असे. लॉर्ड कॅनिंगच्या काळात लेखा परीक्षणाच्या कार्यात कांही सुधारणा करण्यात आल्या.

सन १८६० साली अंदाजपत्रकाची तपासणी करण्यासाठी एक लेखापरीक्षण मंडळ स्थापन करण्यात आले. या मंडळाचे दोन सदस्य असत. महालेखापाल व सैन्य वित्त विभागातील प्रमुख हे ते दोन सदस्य होय. प्रशासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी विनियोजन विधेयकाची तपासणी करण्याचे कार्य हे मंडळ करीत असे. सन १८६१ साली इंपेरिअल सैन्य लेखांकन विभाग निर्माण करण्यात आला. त्यामुळे वरील मंडळ बरखास्त करण्यात आले. याच वेळी महालेखापालाचे पदाचे नूतनीकरण करून त्यास लेखानियंत्रक म्हणून संबोधण्यात येऊ लागले. या विभागाला खालील कार्य देण्यात आले. १ सार्वजनिक कर्जाची व्यवस्था पहाणे. २. विविध कोषागाराच्या हिशेबावर देखरेख ठेवणे. ३. केंद्रीय लेखांकन विभागाची प्रशासकीय जबाबदारी सांभाषणे. सन १८७६ साली कागदी चलनाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी टाकसाळ विभागातून लेखांकन विभागाकडे सोपविण्यात आली. सन १८८० साली पुन्हा या विभागाचे नाव बदलून नियंत्रक व महालेखापाल असे करण्यात आले. लेखा परीक्षण विभागाचे स्वातंत्र्य राखण्यासाठी त्याला कायदेशीर मान्यता सन १९१९ च्या कायद्यांतर्गत महालेखापाल हा स्वतंत्र अधिकारी संबोधला जाऊ लागला. महालेखापालाची नियुक्ती सेक्रेटरी ऑफ स्टेट इन कॉन्सिल करीत असे. राज्याच्या मर्जीत असेपर्यंत तो कार्य करीत असे. महालेखापालाचा पगार, अधिकार, कर्तव्ये, नोकरीच्या शेवाशर्ती सेक्रेटरी ऑन स्टेटस् निश्चित करीत असे. महालेखापालाद्वारे वार्षिक विनियोजन अहवाल तयार केला जात असे.

१९१९ चा भारत प्रशासन कायदा किंवा माँटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा कायद्यानुसार या पदाची निर्मिती करण्यात आली होती. भारत मंत्र्याच्या नियंत्रणाखाली नियंत्रक व महालेखापरीक्षक कार्य करीत असे. ब्रिटीश राजवटीत तत्कालीन आर्थिक व्यवहारांची तपासणी करुन गव्हर्नर जनरल मार्फत तो आपला जमा-खर्चाच्या हिशोबाचा अहवाल भारतमंत्र्याकडे पाठवत असे. त्यावेळी नियंत्रक व महालेखापरीक्षकावर गव्हर्नर जनरलचे नियंत्रण होते. परंतु १९३५ च्या भारत प्रशासन कायद्यानुसार भारतमंत्र्यांचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांवर नियंत्रण कमी करण्यात आले आणि हे पद स्वतंत्र ठेवण्यात आले. महालेखापालाच्या कार्यात सन १९३५ च्या कायद्याद्वारे आणखी बदल करण्यात आला. या कायद्या अंतर्गत महालेखापालाची नियुक्ती 'हीज मॅजेस्टी' करीत असे. ज्या तरतुदीद्वारे फेडरल कोर्टाच्या न्यायमूर्तींना काढण्यात येत असे. या तरतुदीमुळे महालेखापालाला जास्त स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यानंतर महालेखापालाच्या कार्यात वाढ करण्यात आली. भारतीय घटनेत त्याच्या नियुक्तीचा आणि कार्याचा उल्लेख करण्यात आला आहे.

## ❒ नियंत्रक व महालेखापरीक्षकाचे वेतन :–

नियंत्रक व महालेखापरीक्षकाचे वेतन आणि इतर नोकरीच्या अटी संसद कायदा करून ठरवू शकते. नियंत्रक व महालेखापरीक्षकाचे वेतन सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांच्या वेतना इतके म्हणजे दरमहा १,००,०००/- (एक लाख रुपये) इतके आहे. याशिवाय निवास आणि भत्ते दिले जातात. नियंत्रक व महालेखापरीक्षकाचे वेतन भारताच्या संचित निधीतून दिले जाते.

## ❒ नियंत्रक व महालेखापरीक्षकाची नियुक्ती :–

भारतीय संविधानातील कलम १४८ नुसार राष्ट्रपतीच्या सल्ल्याने नियंत्रक व महालेखापरीक्षकाची नियुक्ती सहा वर्षासाठी केली जाते. कार्यकारी मंडळात नियंत्रक व महालेखापरीक्षकाचा समावेश केला आहे. परंतु नियंत्रक व महालेखापरीक्षक पद कायदेमंडळाच्या नियंत्रणापासून स्वतंत्र ठेवण्यात आले आहे. वयाच्या ६५ वर्षापर्यंत त्याना पदावर राहता येते. त्याचा दर्जा सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाच्या समकक्ष असतो. निवृत्तीनंतर त्यांना केंद्र किंवा राज्यसरकारचे लाभाचे पद स्विकारता येत नाही.

## ❒ नियंत्रक व महालेखापरीक्षकाची पदच्युती :–

भारताच्या नियंत्रक व महालेखापरीक्षकाला त्याच्या पदावरुन दूर करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशासाठी वापरण्यात येणारी, म्हणजे संसदेच्या दोन्ही सभागृहात उपस्थित राहून मतदान करणाऱ्या २/३ सभासदांच्या बहुमताने एकूण सभासदांच्या बहुसंख्य संमतीने ठराव मंजूर झाल्यास राष्ट्रपती नियंत्रक व महालेखापरीक्षकाला पदच्युत करु शकतो.

## ❒ नियंत्रक व महालेखापरीक्षकाची कामे :–

१. केंद्र सरकार आणि राज्य सरकार आणि इतर संस्थांच्या व मंडळाच्या हिशोबासंबंधी नियंत्रक व महालेखापरीक्षकाचे कार्य व अधिकार कायद्याने ठरविण्याचा अधिकार देण्यात आला आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारचे हिशेब कोणत्या पद्धतीने ठेवावेत. यासंबंधी राष्ट्रपतीला नियंत्रक व महालेखापरीक्षकाच्या सल्ल्यानुसार नियम करून ठरविता येतात. नियंत्रक व महालेखापरीक्षकाला आपले अधिकार ग्रहणापूर्वी राष्ट्रपतीसमोर शपथ घ्यावी लागते.

२. संसदेने किंवा राज्यातील कायदेमंडळांनी संमत केलेल्या सार्वजनिक पैशाचा खर्च कार्यकारी मंडळ किंवा सनदी नोकरांकडून योग्य प्रकारे केला जातो की नाही यासंबंधी परीक्षण करणे.

३. केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या सार्वजनिक हिशोबांची तपासणी करणे.

४. शासकीय खर्चासंबंधीच्या आर्थिक नियमांचे पालन होते की नाही यासंबंधी पाहणी आणि तपासणी करणे.

५. केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या खर्चाच्या काटकसरीच्या दृष्टीकोनातून हिशोब तपासणे आणि फाजील किंवा गैरखर्चाच्या बाबी कायदेमंडळाच्या लोक लेख समितीसमोर उपस्थित करणे.

६. केंद्र सरकारच्या जमा-खर्चाच्या हिशोबाचे अहवाल राष्ट्रपतीला सादर करून राष्ट्रपतीकडून अहवाल संसदेपुढे ठेवला जातो.

७. घटक राज्याच्या हिशोबाचे अहवाल संबंधीत राज्याच्या राज्यपालांना सादर करतो आणि संबंधीत अहवाल घटक राज्याच्या राज्यपालांमार्फत विधीमंडळापुढे ठेवला जातो.

८. राज्य विधीमंडळाच्या सार्वजनिक हिशेब समित्यांना सल्ला आणि मार्गदर्शन करण्याचे कार्य नियंत्रक व महालेखापरीक्षकाकडून केले जाते.

### ४.२.१.२ वित्त आयोग (Finance Commission)

भारतीय शासन व्यवस्था संघराज्य पद्धतीची असून केंद्र व राज्य यांच्यात अधिकारांची विभागणी केलेली आहे. भारतीय संघराज्य व्यवस्थेत भारतीय राज्यघटनेतील कलम २४६ नुसार केंद्र व राज्यामध्ये तीन प्रकारच्या अधिकारांची विभागणी केली आहे. त्यात केंद्र व राज्यामध्ये केंद्रसूची, राज्यसूची व समवर्ती सुचीच्या मध्ये विषयांची विभागणी केली आहे व त्याचप्रमाणे राज्यघटनेतील विविध कलमाअंतर्गत प्रशासकीय, वित्तीय व इतर अधिकारांची विभागणी केलेली आहे. यातच वित्तीय अधिकार प्रामुख्याने राज्यघटनेच्या कलमांतर्गत विवेचन करुन त्या संबंधीच्या समस्या सोडवण्यासाठी २८० कलमानुसार वित्त आयोगाची निर्मिती करण्यात आली आहे.

❒ **स्थापना :-**

भारतीय राज्यघटनेत केंद्र व राज्य शासनाचे वित्तीय अधिकार स्पष्ट केले आहेत. यात संघराज्याची व्यवस्थेची व्यवस्थित व सुदृढ वाटचाल होण्यासाठी केंद्र व राज्याच्यात करांची विभागणी न्याय पद्धतीने होणे आवश्यक असते. त्या दृष्टिने वित्त आयोगाची स्थापना केली जाते.

भारतीय संघ राज्य आर्थिकदृष्ट्या प्रबळ होत असले तरी राज्याच्या केंद्रांवर आर्थिक बाबतीत अवलंबून असते यात महसुलाचा वाटा महत्त्वपूर्ण असून केंद्र व राज्याच्यात या कराचा वाटा योग्य पद्धतीने वितरीत करणे आवश्यक असते. भारतातील तीव्र स्वरुपाचा प्रादेशिक असमतोलामुळे या कराचे वाटप योग्य व शास्त्रीय पद्धतीने होणे आवश्यक असल्यामुळे भारतीय राज्यघटनेतील २८० व्या कलमानुसार घटक राज्यांना वित्तीय वाटपाचे निकष ठरवण्यासाठी वित्त आयोगाची स्थापना केली जाते.

## ❐ भारतातील संघराज्यात्मक वित्तव्यवस्थेचा विकास

१८३३ साली 'चार्टर ॲक्ट'प्रमाणे भारतात ब्रिटिशांचा एकछत्री अंमल सुरू झाल्यापासून १८७० पर्यंत केंद्र व प्रांतांमधील वित्तीय संबंध हे संघराज्यात्मक वित्तव्यवस्थेच्या तत्त्वांना अनुसरून नव्हते. पुढे लॉर्ड मेयो यांनी प्रांतांना काही दुय्यम कार्ये सोपवून त्यासाठी काही ठराविक निधी त्यांना उपलब्ध करून दिला. १८७७ मध्ये लॉर्ड लिटन यांनी ठराविक निधीऐवजी काही विवक्षित उत्पन्नाच्या बाबी प्रांतांना दिल्या. १९०४ साली केंद्राच्या एकूण उत्पन्नापैकी काही प्रतिशत हिस्सा प्रांतांना देण्याचे व त्यात मागास प्रांतांना अधिक वाटा देण्याचे तत्त्व मान्य करण्यात आले. १९१९ च्या भारत सरकार कायद्याने वित्तीय बाबतीत प्रांतांना पूर्वीपेक्षा अधिक स्वायत्तता मिळाली, १९२० मध्ये मेस्टन निवाड्याद्वारे प्रांतांच्या करक्षमतेनुसार त्यांनी केंद्राला द्यावयाचा हिस्सा निश्चित करण्यात आला. केंद्र व राज्ये यांच्यात उत्पन्नाचे विभाजन करण्याबाबत विचार करण्यासाठी १९३१ मध्ये नेमलेल्या पील समितीने आयकराचे वाटप केंद्र व राज्यांमध्ये व्हावे व निगम कराचे उत्पन्न मात्र केंद्राने स्वतःकडे ठेवावे, असे सुचविले. आयकराचे वाटप प्रत्यक्षात कसे करावे हे ठरविण्यासाठी १९३२ मध्ये पर्सी समिती नेमण्यात आली. पुढे तर ऑटो नेमियर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने प्रांतांची स्वायत्तता वाढवत असतानाच केंद्राची वित्तीय स्थिरता कशी कायम राहील, याचा विचार केला. आयकराचा निम्मा वाटा राज्यांना मिळावा, अशी महत्त्वाची शिफारस नेमियर यांनी केली.

१९३५ च्या भारत सरकार कायद्यान्वये वित्तीय संसाधनांचे वाटप प्रांत व केंद्र यांच्या दरम्यान कशा प्रकारे व्हावे, ते निश्चित करण्यात आले. त्यानुसार वित्तीय संसाधनांची विभागणी (अ) केवळ केंद्र सरकारच्या आधीन असलेली वित्तीय संसाधने, (आ) केवळ प्रांतिक सरकारांच्या उपयोगासाठी असलेली वित्तीय संसाधने, (इ) केंद्र सरकारने आकारावयाचे व जे केंद्रानेच गोळा करावयाचे; परंतु ज्यापासून मिळणारे सर्व उत्पन्न प्रांतांनाच मिळेल असे कर व (३) केंद्र सरकार व प्रांतिक सरकार यांच्यात विभाज्य असलेले कर-उत्पन्न अशी करण्यात आली. उपर्युक्त कर-उत्पन्न-विभाजनाची व्यवस्था ही स्वतंत्र भारताच्या संविधानाला मार्गदर्शक ठरली.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राज्यांच्या सीमा व लोकसंख्या यांत बदल झाल्याने आर्थिकदृष्ट्या घटकराज्यांच्या उत्पन्नाच्या वाटपाबाबत फेरविचार करणे आवश्यक ठरले. घटना समितीने एन्. आर्. सरकार यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या तज्ज्ञ समितीने आयकर, ताग-निर्यात शुल्क व केंद्रीय उत्पादन कराच्या वाटपाबाबत काही सूचना केल्या व मुख्य म्हणजे ऑस्ट्रेलियाच्या 'कॉमनवेल्थ ग्रँट कमिशन'च्या धर्तीवर भारतात वित्त आयोगाची स्थापना होईपर्यंत आणि फाळणीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार व घटकराज्यांच्या संबंधांत सुधारणा सुचविण्याच्या दृष्टीने १९४९ मध्ये सी.डी. देशमुख समितीची नेमणूक केली गेली. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी नेमियर समितीने सुचविलेल्या शिफारशींशिवाय काही नवीन सुधारणा देशमुख समितीने सुचवावयाच्या होत्या. त्यानुसार त्या समितीने आयकरातील राज्यांचा वाटा व त्यांना द्यावयाची मदत-अनुदाने यांबाबत केलेल्या शिफारशी राज्यांचे समाधान करणाऱ्या नव्हत्या, तथापि प्राप्त परिस्थितीत केंद्राने त्या स्वीकारल्या.

एन. आर. सरकार समितीने सुचविल्याप्रमाणे ऑस्ट्रेलियातील कॉमनवेल्थ ग्रँट कमिशनचा अभ्यास करण्यासाठी भारत सरकारने बी. के. नेहरू व बी. पी. आडारकर या दोघांच्या समितीस ऑस्ट्रेलियाला पाठविले, त्यांनी दिलेल्या अहवालावर घटना समितीच्या बैठकांमध्ये चर्चा होऊन वित्त आयोगाच्या स्थापनेचा समावेश भारतीय संविधानात करण्यात आला व 'फायनॅन्स कमिशन (मिसलेनियस प्रोव्हिजन्स) ॲक्ट १९५१ नुसार पहिला वित्त आयोग १९५१ मध्ये स्थापन करण्यात आला.

## ❒ रचना :-

वित्त आयोगाची नेमणूक दर ५ वर्षांनी राज्यघटनेतील कलम २८० नुसार होते. राष्ट्रपतीना आवश्यक वाटल्यास पाच वर्षाच्या कालावधीपूर्वीही नवा वित्त आयोग अस्तीत्वात येऊ शकतो.

वित्त आयोगाचे एक अध्यक्ष व ४ सदस्य असून यांची नियुक्ती राष्ट्रपती मार्फत होत असते. सदस्यांच्या निवडीसाठी अर्हता काय असावी व हे सदस्य कशा प्रकारे निवडले जावेत हे संसदेला कायद्याद्वारे निर्धारित करता येईल असे भारतीय संविधानाच्या कलम २८० (२) मध्ये नमूद करण्यात आले आहे. १९५५ मध्ये ह्या संदर्भात संमत झालेल्या एका कायद्यानुसार वित्त आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्य ह्यांच्या अर्थतेबाबत काही निश्चित तत्त्वे स्पष्ट करण्यात आली. त्यानुसार वित्त आयोगाचा अध्यक्ष हा सार्वजनिक जीवनातील अनुभव असणारा पाहिजे, तसेच आयोगाचा सदस्य हा उच्च न्यायालयाचा न्यायाधीश होण्याच्या पात्रतेचा असला पाहिजे, सरकारी वित्तव्यवहार व लेखापद्धती ह्यांचे त्याला ज्ञान हवे व प्रशासनाचा दीर्घनुभवही हवा आणि त्याला विशेषतः अर्थशास्त्राचे ज्ञान असले पाहिजे.

पहिला वित्त आयोग भारतीय संविधानाच्या प्रारंभापासून दोन वर्षाच्या आत स्थापन होईल, असे त्या संविधानाच्या उपर्युक्त कलम २८० मध्ये नमूद करण्यात आला. त्यानुसार पहिला वित्त आयोग १९५९ साली स्थापन करण्यात आला. २००५ सालापर्यंत एकूण अकरा वित्त आयोग झाले. १२ व्या वित्त आयोग २००५ ते २०१० या कालावधीचा असून याचे अध्यक्ष सी. रंगराजन होते तसेच १३ वा वित्त आयोग २०१० ते २०१५ या कालावधीचा होता. या आयोगाचे अध्यक्ष हे विजय केळकर हे होते. तर १४ व्या वित्त आयोग २०१५ ते २०२० या आयोगाचे अध्यक्ष वाय. एस. रेड्डी होते तर १५ वा वित्त आयोग २०२०-२०२५ या कालावधीसाठी निर्माण केला असून या आयोगाचे अध्यक्ष एन. के. सिंग हे आहेत.

### ❒ पात्रता :-

वित्त आयोगाचा अध्यक्ष नियुक्त करताना त्या व्यक्तीस सार्वजनिक क्षेत्रातील अनुभव आवश्यक आहे. तसेच इतर सदस्यांना मध्ये १) उच्च न्यायालयाचा न्यायाधीश असावा किंवा किमान पात्रता असावी २) शासनाचा वित्तीय व्यवहार व लेखा विषय ज्ञान असणारा असावा. ३) वित्तीय बाबी व प्रशासनाचा अनुभव असावा ४) अर्थशास्त्राचा ज्ञानी असावा ही पात्रता इतर सदस्यांना लागू होतो या ४ पात्रते नुसार इतर ४ सदस्यांची निवड करुन नियुक्त केले जाते.

### ❒ सेवा शर्ती :-

वित्त आयोग हा घटनात्मक पद असल्याने त्याच्या सेवा शर्ती त्याच्या पदाला हानीकारक ठरेल अशी तरतूद करत नाहीत. वित्त आयोगाला घटनात्मक संरक्षण देवून स्वतंत्र ठेवले गेले आहे.

### ❒ वित्त आयोगाचे स्वरूप :-

संघराज्यात्मक वित्तव्यवस्थेला आधारभूत असलेली तत्त्वे व या व्यवस्थेची काही वैशिष्ट्ये यांद्वारे आयोगाचे स्वरूप व कार्यपद्धती निर्धारित होते.

संघराज्यात्मक वित्तव्यवस्थेतील विविध घटकांच्या बाबत कार्य क्षेत्राची असणारी विभागणी, केंद्र व राज्य यांच्यात सामायिक असणारी उत्पन्नाची काही साधने, केंद्राचे वित्तव्यवस्थेत असणारे वर्चस्व व त्यामुळे प्राप्त होणारा हस्तक्षेपाचा अधिकार, कर-आकारणीबाबत परस्पर-सहकार्य, घटनेचे सार्वभौमत्त्व इ. संघराज्यात्मक वित्तीय व्यवस्थेची काही प्रमुख वैशिष्ट्ये सांगता येतील. त्याचप्रमाणे या व्यवस्थेत स्वतंत्रता, समन्यायता, पर्याप्तता, हस्तांतरण इ. मार्गदर्शक तत्त्वे अनुस्यूत आहेत. स्वतंत्रतेच्या तत्त्वानुसार प्रत्येक घटकाला कर लावण्याचा, कर्ज उभारण्याचा व उत्पन्नातून खर्च करण्याचा पूर्ण अधिकार असतो. समन्यायतेच्या तत्त्वानुसार व संसाधनांचे वाटप होताना पक्षपात होऊ नये हे अभिप्रेत असते. पर्याप्ततेच्या तत्त्वानुसार वित्तीय साधनांपासून मिळणाऱ्या उत्पन्नात पुरेशी

लवचिकता असावी, हस्तांतरणाच्या तत्त्वानुसार सधन घटकांकडील संपत्तीचा वाटा निर्धन घटकांकडे वितरित करावा, हे अपेक्षित असते.

संघराज्यात्मक वित्तव्यवस्थेच्या वरील स्वरूपामुळे वित्तीय समायोजनात काही अडचणी निर्माण होतात आणि वित्त आयोगासमोर त्या आव्हाने उभी करतात.

## ❑ अधिकार व कार्य :–

१. केंद्र व राज्यांमध्ये करांचे वाटप करणे.

२. केंद्र शासनाच्या संचित निधितील निधीतून राज्याला दिल्या जाणाऱ्या अर्थसाह्यांचे निकष ठरवले जाणे.

३. पंचायत राज्य व्यवस्थेच्या संशोधनास साहाय्य पुरविण्यासाठी घटक राज्यांच्या संचित निधीत भर घालण्यासाठी आवश्यक असे उपाय योजने.

४. नागरी स्वराज्य संस्थामधील निधि संदर्भात घटक राज्यांना उपाययोजना सांगणे.

५. वित्तीय प्रशासनातील कार्यक्षमता वाढवण्यासाठी राष्ट्रपतीला शिफारशी करणे.

६. वित्तीय अहवाल राष्ट्रपतीला सादर करणे.

७. केंद्र व राज्यांच्या वित्तीय समस्या संदर्भात शिफारशी सुचवणे.

८. राज्यांना विविध वित्तीय संसाधनासंबंधी उपाययोजना सुचवणे.

प्रत्येक घटकराज्याचा आकार, लोकसंख्या, भौगोलिक परिस्थिती, आर्थिक व सामाजिक प्रश्न हे विभिन्न असतात. त्यामुळे सर्व राज्यांना एकच एक समान वाटपाचे तत्त्व लावता येत नाही. अशा परिस्थितीत वित्तीय विभाजनाचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

संघराज्यात्मक वित्तव्यवस्थेत केंद्राचा वरचष्मा असणे हे क्रमप्राप्त असल्याने केंद्राची उत्पन्नाची बहुतांशी साधने विपुल व लवचीक असतात; तशी ती राज्यांची नसल्याने केंद्राकडे आर्थिक शक्तीचे केंद्रीकरण होण्याची शक्यता असते.

विविध राज्यांतील प्रादेशिक असमतोलामुळे उत्पन्नाच्या न्याय्य वाटताचा प्रश्न निर्माण होतो, त्यातच केंद्रस्थानी एका पक्षाचे व राज्यांमध्ये अन्य पक्षांची सरकारे सत्तेवर असल्यास संघर्षाचे प्रसंग निर्माण होण्याची शक्यता असते.

उत्पन्न करांची विभागणी केंद्र व राज्यांमध्ये करण्यासाठी काही तत्त्वे ठरविली जातात. उदा. पहिले तत्त्व म्हणजे लोकसंख्या–तत्त्व. देशातील एकूण किती टक्के लोकसंख्या त्या राज्यात आहे,

त्यानुसार त्या प्रमाणात वाटपयोग्य करनिधीची विभागणी ठरविणे. दुसरे म्हणजे संकलन-तत्त्व. एखाद्या राज्याने जितका कर गोळा केला असेल, त्या प्रमाणात त्या राज्यास एकूण निधीतून वाटा देणे. लोकसंख्या-तत्त्व सर्व राज्यांना साधारणपणे न्याय देणारे आहे. जास्त लोकसंख्या असणाऱ्या राज्यास स्वाभाविकपणे अधिक निधी यामार्फत मिळू शकतो. एखाद्या राज्याने भरपूर करनिधी गोळा केला, तर त्यालाही या सर्व यंत्रणेत प्रोत्साहन मिळावे म्हणून संकलन-तत्त्व वापरले जाते. उदा. महाराष्ट्राची लोकसंख्या देशातील एकूण लोकसंख्येच्या जेमतेम १० टक्के आहे. तथापि एकूण उत्पन्न करापैकी सु. ४० टक्के वाटा महाराष्ट्रातून येतो. येथे जर फक्त लोकसंख्या-तत्त्व वापरले, तर महाराष्ट्र, पंजाब, गुजरात अशा राज्यांवर अन्याय होईल. जर संकलनानुसार निधी वाटायचा ठरवला, तर ओरीसा, बिहार, राजस्थान अशा राज्यांवर अन्याय होईल. कारण तेथील सापेक्षतेने कमी दरडोई उत्पन्नामुळे तेथील करसंकलन कमी आहे, म्हणजे ज्यांना निधीची अधिक गरज आहे त्यांनाच नेमका कमी वाटा मिळेल. यांसाठी दोन्ही तत्त्वे एकाच वेळी वापरली जाऊन ही त्रुटी दूर करण्याचे प्रयत्न विविध वित्त आयोग करीत असतात.

अशा प्रकारे राज्यांना वित्तीय सहकार्यासंबंधी महत्त्वपूर्ण कार्य वित्त आयोग करत असते. वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र व राज्यामध्ये महसूल वाटणी करून त्या संबंधीचे वितरण केले जाते.

### ४.२.१.३ निवडणूक आयोग (Election Commission)

भारतीय संविधानाने संसदीय लोकशाहीचा स्विकार केलेला आहे. संसदीय लोकशाहीत दर पाच वर्षांनी पार पाडणाऱ्या सार्वत्रिक निवडणूका पार पाडण्याची जबाबदारी स्वतंत्र निर्माण केलेल्या निवडणूक आयोगाची असते. खुल्या आणि स्वतंत्र वातावरणात निवडणूका पार पाडणे ही निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे. १८ वर्षे पूर्ण असणाऱ्या सर्व भारतीय स्त्री-पुरुषांना प्रौढ मतदानाचा अधिकार दिलेला आहे. भारतात सुरुवातीला संयुक्त मतदारसंघ होते, त्यानंतर एक प्रतिनिधी मतदारसंघ निर्माण करण्यात आले. मतदारसंघाची रचना लोकसंख्येवर आधारीत असते, मतदारसंघाची पुर्नरचना करण्यासाठी मतदारसंघ पुर्नरचना किंवा परीसिमन आयोग नेमला जातो, निवडणूक आयोगाकडून पंचवार्षिक निवडणूका पार पाडणे, मध्यवर्ती निवडणूका पार पाडणे, पोट निवडणूका घेणे, मतदारसंघाची पुर्नरचना करणे, मतदार याद्या तयार करणे, मतदानाची ओळखपत्रे तयार करणे, मतदानाची प्रक्रिया ठरिवणे, मतमोजणी करणे, निवडणुकांवरील खर्चावर नियंत्रण ठेवणे, निवडणूकीचे हिशोब तपासणे इत्यादी कामे निवडणूक आयोगाकडून केली जातात.

### ❐ निवडणूक आयोगाचा संविधानात्मक दर्जा :-

भारतीय संविधानाच्या भाग पंधरामध्ये निवडणूक आयोगाला संविधानात्मक दर्जा दिलेला आहे. भाग पंधरामधील कलम ३२४ नुसार ''या संविधानाखाली घेतल्या जाणाऱ्या संसदेच्या व

प्रत्येक राज्याच्या विधीमंडळाच्या सर्व निवडणूकीकरीता मतदार याद्या तयार करणे, राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या पदांच्या निवडणूकांचे संचलन करणे आणि या कामावर देखरेख, मार्गदर्शन व नियंत्रण करण्याचा अधिकार एका आयोगाच्या ठिकाणी निश्चित केलेला आहे अशी तरतूद केली आहे.''

संविधानसभेत निवडणूका पार पाडण्यासाठी कायम स्वरूपाचे निवडणूक मंडळ असावे की, राष्ट्रपतीकडून वेळोवेळी निवडणूक मंडळ नियुक्त करावेत असे दोन पर्याय भारतीय संविधान सभेतील सदस्यांपुढे होते. या सर्व घटकांचा सर्वांगीण विचार करून कायमस्वरुपी निवडणूक आयोग स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली. तसेच केंद्र आणि घटकराज्याच्या कायदेमंडळासाठी एक निर्वाचन आयोग राहील त्याचा प्रमुख मुख्य निवडणूक आयुक्त असेल आणि त्यांना मदत करण्यासाठी घटक राज्य स्तरावर प्रादेशिक आयुक्त असेल अशी तरतूद करण्यात आली आहे.

### ❒ निवडणूक आयोगाची रचना :–

भारतीय संविधानाच्या कलम ३२४ (२) नुसार निवडणूक आयोग हा मुख्य निवडणूक आयुक्त आणि राष्ट्रपतीने वेळोवेळी एखादी संख्या निश्चित केल्यास तेवढे इतर निवडणूक आयुक्त मिळून बनलेला असेल आणि मुख्य निवडणूक आयुक्त व इतर निवडणूक आयुक्त यांची संसदेने त्या संबंधात केलेल्या कायद्यानुसार राष्ट्रपतीकडून होईल. १९९३ पासून भारतात एक मुख्य निवडणूक आयुक्त आणि त्यांना सहाय्य करण्यासाठी दोन उपआयुक्त आहेत. २०१८ पासून सुनिल अरोरा हे मुख्य निवडणूक आयुक्त आहेत.

### ❒ निर्वाचन किंवा निवडणूक आयुक्ताचा कार्यकाल :–

मुख्य निर्वाचन आयुक्ताचा आणि उपआयुक्तांचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो. वयाच्या ६५ वर्षापर्यंत ते आपल्या पदावर राहू शकतात.

### ❒ मुख्य निर्वाचन आयुक्ताचे वेतन :–

मुख्य निर्वाचन आयुक्ताचे वेतन ठरविण्याचा अधिकार भारताच्या राष्ट्रपतींना आहे. मुख्य निर्वाचन आयुक्ताला दरमहा १,००,०००/– (एक लाख रुपये) वेतन, भत्ते आणि निवास इत्यादी सवलती देण्यात येतात.

### ❒ निर्वाचन आयुक्ताची पदच्युती :–

भारतीय संविधानाच्या ३२४ व्या कलमानुसार भारताच्या निवडणूक किंवा नर्वाचन आयुक्तांना अकार्यक्षमता गैरवर्तन या कारणावरुन पदावरुन कमी करता येते. निर्वाचन आयुक्तांना पदच्युत

करण्याचा ठराव संसदेच्या दोन्ही सभागृहात मांडून एकूण सभासद संख्येच्या बहुमताने आणि उपस्थित असणाऱ्या सदस्यांच्या दोन तृतीयांश बहुमताने तो ठराव संमत झाला. तर राष्ट्रपती निर्वाचन आयुक्ताला पदच्युत करू शकतो आणि मुख्य निर्वाचन आयुक्ताच्या शिफारशीवरून राष्ट्रपती इतर निर्वाचन आयुक्तांना पदच्युत करू शकतो. १९७९ साली मुख्य निर्वाचन आयुक्त शकधर यांच्या शिफारशीवरून उपायुक्त श्रीनिवास मुर्ती यांना पदावरून काढण्यात आले होते. निर्वाचन आयोग किंवा निवडणूक आयोग स्वतंत्र असला तरी, निवडणूका पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगाकडे स्वतंत्र कर्मचारी वर्गाची नियुक्ती केली जात नाही, निवडणूका पार पाडण्यासाठी त्या-त्या घटकराज्यांनी आपल्या सनदी नोकरांना निवडणूक कालावधीमध्ये निर्वाचन आयोगाच्या कामासाठी वर्ग करावे लागते. निवडणूकीच्या काळात नोकरवर्गाला राज्यशासनाची जबाबदारी राहात नाही. तर तो निर्वाचन आयोगाला जबाबदार राहून कार्य करीत असतो आणि निवडणूकीनंतर सरकारी किंवा सनदी नोकर पुन्हा आपल्या सरकारी कामावर रूजू होतो.

## ❐ निवडणूक आयोगाचे कार्य आणि अधिकार :-

भारतीय संविधानाच्या ३२४ व्या कलमामध्ये निवडणूक आयोगाचे अधिकार आणि कामांची तरतुद केली आहे. १९५० चा लोकप्रतिनिधी कायदा आणि १९५१ चा लोकप्रतिनिधी कायदा, १९५२ चा राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतीच्या निवडणूकीचा कायदा आणि १९६३ चा केंद्रशासीत प्रदेशाच्या शासनाचा कायदा १९६६ चा दिल्ली प्रशासनाचा कायदा इत्यादी कायद्यामुळे निर्वाचन आयोगाच्या अधिकारात नियमांची भर पडलेली आहे. सर्वसाधारणपणे निवडणूक आयोगाला पुढील कामे करावी लागतात.

### १. मतदारांच्या अद्यावत याद्या तयार करणे :-

सार्वजनिक निवडणूकीतील महत्त्वाचा भाग म्हणजे निवडणूकीचे वेळापत्रक आणि मतदानाची तारीख जाहीर होण्यापूर्वी मतदारांच्या अद्ययावत याद्या तयार करणेचा असतो. संविधानाच्या ३२६ व्या कलमानुसार जी व्यक्ती भारतीय नागरिक आहे आणि ज्या व्यक्तीचे वय १८ वर्षे पूर्ण असून कायदेशीर बाबी पूर्ण करणाऱ्या नागरिकाला मतदानाचा अधिकार दिला जातो. तसेच कायदेमंडळाने केलेल्या कायद्यानुसार जी व्यक्ती गुन्हेगार भ्रष्टाचारी अनिवासी आहे. अशांना मतदानाचा अधिकार दिला जात नाही. मतदार नोंदणी अधिकाऱ्याकडून, मतदार नोंदणीची कार्य केले जाते. भारतात नऊ लाख मतदन केंद्र, संसद आणि राज्यविधीमंडळ मिळून पाच हजार लोकप्रतिनिधी, विखुरलेले मतदार व निवडणूक कर्मचारी भारताची प्रचंड लोकसंख्या ही निवडणूक आयोगापुढील मोठी आव्हाने आहेत.

## २. निवडणूका पार पाडणे :–

सार्वत्रिक निवडणूका पार पाडण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची असते. निवडणूकीची पूर्व तयारी करणे, निवडणूक कार्यावर नियंत्रण ठेवणे, सत्तारूढ पक्ष–विरोधी राजकीय पक्ष, प्रभावी दबावगट आणि गुंड व्यक्तींच्याकडून निवडणूकीच्या काळात गैरमार्गाचा वापर होऊ नये यासाठी निर्वाचन आयोगाला दक्ष रहावे लागते.

## ३. निवडणूक आचार संहिता तयार करणे :–

निवडणूका स्वच्छ आणि खुल्या वातावरणात पार पाडण्यासाठी राजकीय पक्ष, मतदार यांच्यासाठी निवडणूक आचार संहिता तयार करावी लागते. निवडणूकीमध्ये प्रचार कशाप्रकारे करावा, पोस्टर्स लावणे, योग्य प्रचार करणे, जातीय, धार्मिक भाषणांवर बंधने, प्रक्षोभक विधाने, निवडणूकीतील खर्चाचा हिशोब देणे, तो सादर करणे इत्यादी संबंधी काही नियम केले आहेत आणि या आचारसंहितेचा भंग केल्यास शिक्षा होते आणि उमेदवाराला अपात्र म्हणून घोषित केले जाते.

## ४. राजकीय पक्षांना चिन्हांचे वाटप करणे :–

भारतात निवडणूकीसाठी मतदान करणाऱ्या मतदारांची संख्या अधिक आहे. भारतात निरक्षर मतदारांची संख्या जास्त असल्याने मतदारांना चिन्हांचे वाटप केले जाते. मतपत्रिकेतील उमेदवाराचे नाव वाचता आले नाही तरी चिन्हापुढील बटण दाबून मतदान करता यावे अशी त्यापाठीमागील भूमिका आहे. राष्ट्रीय, प्रादेशिक राजकीय पक्ष, स्वतंत्र तसेच अपक्षांना निवडणूक चिन्हांचे वाटप करण्याचे महत्त्वाचे कार्य निवडणूक आयोगाला करावे लागते.

## ५. फेर निवडणूका, पोट निवडणूका घेणे :–

लोकसभा किंवा विधानसभा यांच्या रद्द झालेल्या निवडणुका पुन्हा पार पाडण्याचे कार्य निवडणूक आयोगाला करावे लागते. मतदान केंद्रावर गैरप्रकार घडणे, मतपेट्या पळविणे, हिंसाचार, दहशतीचा मार्ग अवलंबून निवडणूका झाल्या तर अशा निवडणूका रद्द करून पुन्हा त्या निवडणूका घेण्याचा अधिकार निवडणूक आयुक्तांना आहे. तसेच काहीवेळा लोकप्रतिनिधीचा मृत्यू झाल्यास अथवा अन्य कारणामुळे लोकसभा किंवा विधानसभा मतदार संघातील जागा रिक्त असेल तर त्या जागेसाठी पोटनिवडणूक घेतली जाते. सदर निवडणूका सहा महिन्याच्या आत पार पाडाव्या लागतात. मुख्य निवडणूक आयुक्तांच्या सल्ला आणि मार्गदर्शनानुसार राज्य निवडणूक आयुक्त अशा निवडणूका पार पाडीत असतो.

## ६. नामांकन पत्रांचे परिनिरीक्षण करणे :–

निवडणूकीचे संचालन, मार्गदर्शन, नियंत्रण करण्याचा एक भाग म्हणजे उमेदवारांनी भरलेल्या अर्जांची छाननी करणे, निवडणूक अर्ज भरणाऱ्या उमेदवारांचे अर्ज छाननीत तपासले जातात.

मालमत्तेचा तपशील, उमेदवारांची वैयक्तिक माहिती चुकीची अथवा दिशाभूल करणारी असेल, अथवा अपूर्ण अर्ज भरलेला असेल तर असे अर्ज छाननीत बाद केले जातात.

७. **उमेदवारांना अपात्र ठरविणे :–**

निवडणूकीस पात्र असलेल्या उमेदवारांनी निवडणूक पार पाडल्यानंतर १९५१ च्या लोकप्रतिनिधी कायद्यानुसार आपल्या निवडणूक खर्चाचे वितरण जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडे मुदतीत भरून दिले नाही तर अशा उमेदवारांना अपात्र ठरविण्याचा अधिकार निर्वाचन आयोगाला आहे.

८. **संसद सदस्य आणि विधानसभा सदस्यांना अपात्र ठरविण्याचा अधिकार :–**

संसदेच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्य (Member of Parliment) अथवा विधानसभा सदस्य (Member of Legislative Assembly) यांना अपात्र ठरविताना राष्ट्रपती निवडणूक आयोगाचे मत विचारात घेताता आणि संविधानाच्या कलम १०२ प्रमाणे एखादा सदस्य अपात्र ठरत असेल १९५१ च्या लोकप्रतिनिधी कायद्यानुसार संसद सदस्यांना पुढील कारणामुळे अपात्र ठरविले जाते.

१. सर्वोच्च न्यायालयाने उमेदवाराला दोषी ठरवून दोन वर्षाची तुरुंगवासाची शिक्षा दिल्यास अपात्र ठरविले जाते. निकालानुसार दोन वर्षे तुरुंगवासाची शिक्षा झालेल्या लोकप्रतिनिधीना निवडणूक लढविण्याची बंदी घातली आहे.

२. निवडणूक आयोगाने लोकप्रतिनिधी अथवा उमेदवाराला भ्रष्टाचाराबाबत दोषी ठरविल्यास.

३. लोकप्रतिनिधींनी निवडणूक खर्च हिशोब योग्य वेळेत आणि आयोगाच्या नमुन्यात सादर न केल्यास.

४. लोकप्रतिनिधी अथवा उमेदवाराला निवडणूकीपूर्वी भ्रष्टाचार, लाचलुचपत या कारणाने सरकारी सेवेतून कमी केले असल्यास अशा लोकप्रतिनिधी किंवा उमेदवारांना अपात्र ठरविले जाते.

५. परकीय नागरिकत्व असणारी व्यक्ती, वेडसर, दिवाळखोर, भ्रष्टाचारी अथवा सरकारी नोकरीत असणाऱ्या व्यक्तीला निवडणूक आयोगाकडून अपात्र ठरविले जाते.

## ४.२.१.३ निवडणूक प्रक्रिया

**प्रस्तावना :** भारतातील निवडणूक प्रक्रियाही भारतीय लोकशाहीकडे साशंक वृत्तीने पाहणाऱ्यांना एक सणसणीत उत्तर असून ! धर्म, वंश, जात किंवा लिंग यांच्या पलीकडे जात जनता या निवडणूक प्रक्रियेत सहभागी झाली. जगाच्या लोकसंख्येच्या एक – पंचमांश हिस्सा असलेल्या प्रचंड

आकाराच्या देशात निवडणुका घेण्याचा कोणताही पूर्वानुभव नसताना एवढ्या प्रचंड लोकसंख्येसाठी निवडणुकांचे आयोजन करणे, म्हणजे एक प्रकारे भारतीय लोकशाहीची तग धरण्याच्या क्षमतेची अग्नी परीक्षा म्हणावी लागेल. निवडणूक आयोगाने हे आव्हान स्वीकारले आणि १९५१-५२ मध्ये लागोपाठ लोकसभा आणि विधानसभा निवडणुका घेऊन, स्वतंत्र भारताने कोणताही भेदभाव न बाळगता २१ वर्षांवरील सर्वांना सार्वत्रिक प्रौढ मताधिकार प्रदान केला. सुमारे १७.३२ कोटी, म्हणजेच भारताच्या एकूण लोकसंख्येच्या (जम्मू आणि काश्मीर वगळून) ४९ टक्के जनता या निवडणूक प्रक्रियेत सहभागी झाली होती. ८ जानेवारी १९४९ रोजी सुरू झालेली मतदार याद्या पुर्नरीक्षण (अद्ययावतीकरण) प्रक्रिया आजतागायत सुरू असून, ही प्रक्रिया युवा पिढीला निवडणूक प्रक्रियेत सहभागी व्हायला सक्षम करते. १९८९ मध्ये, युवा पिढीला मतदान प्रक्रियेविषयी प्रोत्साहित करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने मताधिकार बजावण्याची किमान वयोमर्यादा २१ वर्षांवरून १८ वर्षे करण्यात आली. आज ही अद्ययावतीकरणाची प्रक्रिया ही सुरू असून या मतदार याद्यांतील मतदार संख्या जवळपास ९६ कोटींच्या पुढे गेली आहे. यापुढेही ती सुरूच राहणार आहे.

**निवडणुकांचे (कार्यक्रम) वेळापत्रक**

निवडणुकीचे संपूर्ण संचालन ही निवडणूक आयोगावरील जबाबदारी असल्याने पाच वर्षांचा कालावधी संपल्यानंतर किंवा विधिमंडळ विसर्जित केल्यानंतर व नव्या निवडणुका घोषित केल्यावर निवडणूक आयोग निवडणुका घेण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवतो. विसर्जित लोकसभेचे शेवटचे सत्र आणि नवीन लोकसभेचे सत्र यामध्ये सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधी असता कामा नये असे राज्यघटनेत म्हटले आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया तोपर्यंत पूर्ण व्हावी लागते. औपचारिक प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी काही आठवडे आयोग एका मोठ्या पत्रकार परिषदेत निवडणुकांच्या वेळापत्रकाची घोषणा करतो. अशा घोषणेनंतर लगेचच राजकीय पक्ष व उमेदवार यांना आदर्श आचारसंहिता लागू होते. ' मतदारांनी सभागृह सदस्य निवडावा या आवाहनाच्या सूचनापत्राने निवडणुकीची औपचारिक प्रक्रिया सुरू होते. सूचनापत्र जारी केल्यावर लगेच ज्या मतदारसंघातून निवडणूक लढवावयाची आहे त्या मतदारसंघात उमेदवार त्यांचे निवडणूक अर्ज सादर करू शकतात. अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिवस संपल्यावर साधारणपणे एका आठवड्यात संबंधित मतदारसंघाचा रिटर्निंग ऑफिसर अर्जांची छाननी करतो. छाननी पूर्ण झाल्यावर दोन दिवसात निवडणुका वैध उमेदवार आपला अर्ज मागे घेऊ शकतात. प्रत्यक्ष मतदानाच्या तारखेपूर्वी उमेदवारांना राजकीय प्रचारासाठी किमान दोन आठवडे मिळतात. कामाच्या प्रचंड व्यापामुळे व मतदारांच्या मोठ्या संख्येमुळे राष्ट्रीय निवडणुकासाठी मतदान विविध दिवशी घेतले जाते. मतगणनेसाठी स्वतंत्र दिवस ठरविला जातो. प्रत्येक मतदारसंघाचा निकाल संबंधित मतदारसंघाचा रिटर्निंग ऑफिसर जाहीर करतो. आयोग निवडून आलेल्या सदस्यांची संपूर्ण सूची तयार करतो आणि गृहाच्या स्थापनेसाठी योग्य ते सूचनापत्र जारी करतो. याबरोबरच

निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होते. लोकसभेच्या बाबतीत राष्ट्रपती आणि विधानसभेच्या बाबतीत संबंधित राज्यांचे राज्यपाल त्या त्या गृहाचे सत्र बोलावू शकतात.

**वचनबद्धता**

निवडणूक आयोगाने अधिकार दिलेल्या अधिकाऱ्यासमोर उमेदवाराने शपथ घेणे किंवा आपली वचनबद्धता मांडणे आवश्यक आहे. एखाद्या विशिष्ट निवडणुकीसाठी मुख्यतः मतदारसंघाचा रिटर्निंग ऑफिसर किंवा असिस्टंट रिटर्निंग ऑफिसर या अधिकाऱ्यांना असा अधिकार दिला जातो. जर उमेदवार तुरुंगात बंदी असेल किंवा प्रतिबंधक स्थानबद्धतेत असेल तर तुरुंगाचा अधीक्षक किंवा स्थानबद्धतेत ठेवलेल्या शिबिराचा मुख्याधिकारी किंवा ज्याच्या अधिकारात तो स्थानबद्धतेत असेल तो अधिकारी शपथ देऊ शकतो आणि जर आजारपणामुळे किंवा इतर कारणामुळे उमेदवार रुग्णालयात किंवा इतरत्र अंथरुणाला खिळलेला असेल तर रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकाला किंवा त्याच्यावर उपचार करणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकास हा अधिकार दिला जातो. जर उमेदवार भारताबाहेर असेल तर संबंधित देशातील भारताचा वकील किंवा उच्चायुक्त किंवा त्याने अधिकार सोपविलेला वकिलातीतील अधिकारी शपथ देऊ शकतो. अर्ज दाखल केल्यावर लगेच पण कुठल्याही परिस्थितीत अर्जाची छाननी करण्याच्या अगोदरच्या दिवसापर्यंत उमेदवाराने व्यक्तिशः शपथपत्र किंवा वचनबद्धता सादर केली पाहिजे.

**निवडणुकीचा प्रचार**

प्रचाराच्या कालावधीत आपल्या उमेदवाराला व पक्षाला लोकांनी मत द्यावे, या उद्देशाने राजकीय पक्ष त्यांचे उमेदवार आणि त्यांचे विचार लोकांपुढे मांडतात. अर्ज दाखल करण्यासाठी उमेदवारांना एक आठवड्याचा कालावधी दिलेला असतो. रिटर्निंग ऑफिसर त्याची छाननी करतो. तो अर्ज नियमाप्रमाणे नसेल तर थोडक्यात म्हणणे ऐकून घेऊन फेटाळला जातो. अर्जाच्या छाननीनंतर वैध उमेदवार दोन दिवसांच्या कालावधीत अर्ज मागे घेऊ शकतात. प्रचाराचा अधिकृत कालावधी उमेदवारांची सूची बनविल्यापासून किमान दोन आठवडे असतो व मतदान संपण्याच्या ४८ तास अगोदर अधिकृतरीत्या समाप्त होतो. प्रचाराच्या कालावधीत राजकीय पक्षांनी आणि निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी राजकीय पक्षांच्या संमतीने निवडणूक आयोगाने विकसित केलेल्या आदर्श आचारसंहितेनुसार वागणे अपेक्षित आहे. प्रचाराच्या कालावधीत राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी काय करावे, याबद्दल आदर्श आचारसंहितेत मार्गदर्शक तत्त्वे आहेत.

निवडणूक प्रचार निरोगी वातावरणात व्हावा, राजकीय पक्ष व त्यांच्या समर्थकांमध्ये चकमकी व विवाद होऊ नयेत आणि प्रचाराच्या कालावधीत व निकाल जाहीर होईपर्यंत शांतता व सुव्यवस्था खात्रीशीररीत्या राखली जावी, हा याचा उद्देश असतो. केंद्रातील किंवा राज्यातील सत्तारूढ

पक्षांसाठीसुद्धा आदर्श आचारसंहितेत मार्गदर्शक तत्त्वे आहेत. सर्वांना समान न्याय मिळावा आणि सत्तारूढ पक्षाने आपल्या सत्तेचा निवडणूक प्रचारासाठी वापर केला, अशी तक्रार करण्यास जागा राहू नये, याची खात्री देणे हा त्यामागील उद्देश आहे. निवडणूक जाहीर झाल्यानंतर पक्ष आपला जाहीरनामा घोषित करतात. यामध्ये निवडून आल्यास ते कोणते कार्यक्रम अमलात आणतील, त्यांच्या नेत्यांच्या जमेच्या बाजू व विरोधी पक्ष त्यांच्या नेत्यांचे अपयश मांडतात. पक्ष आणि मुद्दे यासाठी घोषणा / घोषवाक्य बनवितात व मतदारांना प्रचारपत्रके व जाहिराती वाटतात. समर्थकांचे मत वळविण्यासाठी त्यांना खूष करण्यासाठी व प्रोत्साहित करण्यासाठी तसेच विरोधकांवर टीका करण्यासाठी संपूर्ण मतदारसंघात मेळावे व सभा घेतात. शक्य तितक्या भावी समर्थकांवर प्रभाव पाडण्यासाठी संपूर्ण मतदारसंघात फिरून सुधारणा करण्याचे आश्वासन देतात व व्यक्तिगत विनंती करतात.

**मतदानाचे दिवस**

सुरक्षा दलांना व निवडणुकीवर देखरेख करणाऱ्यांना कायदा व सुव्यवस्था राखता यावी व मतदान योग्य रीतीने होत आहे, हे सुनिश्चित करता यावे, यास्तव सामान्यतः विविध मतदारसंघात निरनिराळ्या दिवशी मतदान घेण्यात येते.

**मतपत्रिका आणि चिन्हे :**

अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रिटर्निंग ऑफिसर निवडणुका लढविणाऱ्या उमेदवारांची यादी बनवितो आणि मतपत्रिका छापल्या जातात. मतपत्रिकेत उमेदवारांची नावे (निवडणूक आयोगाने ठरविलेल्या भाषेत) आणि प्रत्येक उमेदवाराला दिलेली चिन्हे असतात. मान्यताप्राप्त पक्षाच्या उमेदवारांना त्यांच्या पक्षाला दिलेले चिन्ह दिले जाते.

**मतदान प्रक्रिया :**

मतदान गुप्त मतदान पद्धतीने होते. शाळा व सार्वजनिक सभागृहे अशा सार्वजनिक संस्थांमध्ये मतदान केंद्रे असतात. शक्य तितक्या मतदारांना मतदान करता यावे, यासाठी मतदान केंद्र प्रत्येक मतदाराला दोन कि.मी. अंतराच्या आत असेल व प्रत्येक मतदान केंद्रावर १,५०० पेक्षा जास्त मतदार असणार नाहीत, हे निवडणूक आयोगाचे अधिकारी सुनिश्चित करतात. निवडणुकीच्या दिवशी प्रत्येक मतदान केंद्र किमान आठ तास उघडे असते.

मतदान केंद्रात गेल्यावर मतदाराचे नाव मतदार यादीतून तपासले जाते. खात्री पटल्यावर त्याला मतपत्रिका दिली जाते. मतदान केंद्रात बनविलेल्या बंदिस्त मतदान कक्षामध्ये मतदार मतपत्रिकेत त्याच्या निवडीच्या उमेदवाराच्या चिन्हावर किंवा चिन्हाजवळ रबरी ठसा उमटवून मत देतो. त्यानंतर

मतदार मतपत्रिकेची घडी घालतो आणि मुख्य मतदान अधिकारी व उमेदवारांचे निवडणूक प्रतिनिधी यांना पूर्णपणे दिसेल अशा प्रकारे ठेवलेल्या सर्वांसाठीच्या मतपेटीत घडी घातलेली मतपत्रिका टाकतो. या ठसा उमटविण्याच्या पद्धतीमुळे मतदान केंद्रातून मतपत्रिका चोरणे / पळविणे किंवा मतपेटीत न टाकणे याची शक्यता नाहिशी होते. सन १९९८ पासून आयोगाने मतपेट्यांऐवजी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा वाढत्या प्रमाणावर वापर सुरू केला आहे. सन २००३ मध्ये सर्व राज्य निवडणुका आणि पोट निवडणुका इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे वापरून घेतल्या गेल्या. यातून प्रोत्साहन घेऊन सन २००४ मधील लोकसभा निवडणुकीत फक्त इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे वापरण्याचा ऐतिहासिक निर्णय आयोगाने घेतला. या निवडणुकीत १० लाखांपेक्षा जास्त इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे वापरण्यात आली.

**इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र**

पारंपरिक मतदान पद्धतीत वापरल्या जाणाऱ्या मतपत्रिका आणि मतपेट्या यांच्या ऐवजी मत मतपत्रिका एकाच मतपेटीत टाकण्याची पद्धत १९६० च्या दशकात सुरू झाली. त्यानंतर यामध्ये बदल होऊन २००४ पासून ईव्हीएमद्वारे मतदानास सुरुवात झाली आणि ईव्हीएमद्वारे केलेल्या मतांची पडताळणी करण्यासाठी २०१७ नंतर VVP-T (Voter Verified Paper -Udit Trail) वापर सुरू झाला. यामुळे मतामध्ये अधिक गुप्तता येऊन निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि मजबूत झाली. या सर्व सुधारणा प्रक्रियेमध्ये 'मत' सर्वोच्च राहिले. कागदावरील (मतपत्रिकेवरील) मतदान प्रक्रिया ते मतदान यंत्रावरील निवडणूक प्रक्रिया या बदल वेगवान आणि अचूक मतमोजणी होऊन, कमी वेळेत निवडणुकांचे निकाल लावणे शक्य झाले. यामुळे नाकारलेल्या (बाद झालेल्या) मतांची संख्या कमी झाली. तसेच, मतदान केंद्रे ताब्यात घेणे, मतपेट्या खोट्या मतपत्रिकांनी भरणे, असे गैरप्रकार कमी झाले. मतमोजणीसाठी दीर्घकाळ चालणारा आटापिटा, मोजणीबाबत वादविवाद आणि निकाल जाहीर करण्यास होणारा विलंब, यांवरही यंत्राधारित मतदान प्रक्रियेमुळे मात करता आली. त्याचबरोबर, भारतीय निवडणूक प्रक्रिया पर्यावरण स्नेही होण्यास मदत झाली. मागील दोन दशकांपासून भारत हा देशी तंत्रज्ञानावर आधारित मतदान यंत्र (ईव्हीएम) यशस्वीरीत्या वापरणारा एकमेव देश ठरला आहे. असंतुष्ट पराभूत उमेदवार आणि राजकीयदृष्ट्या प्रेरित गटांनी वेळोवेळी या यंत्राधारित निवडणूक निकालांना आव्हान दिले असले, तरीही भारत निवडणूक आयोगाने अभिरूप मतदानाच्या पारदर्शक प्रक्रियेचा स्वीकार करून लोकांचा या यंत्राधारित मतदानावरील विश्वास पुन्हा प्रस्थापित करण्यात यश मिळवले आहे. नोंदविण्यासाठी वापरले जाणारे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र हे साधे इलेक्ट्रॉनिक उपकरण आहे.

**निवडणुकांवर देखरेख :**

प्रचार योग्य पद्धतीने होत आहे आणि लोक त्यांच्या निवडीप्रमाणे मत देण्यास स्वतंत्र आहेत, हे सुनिश्चित करण्यासाठी निवडणूक आयोग अनेक निरीक्षकांची नेमणूक करतो. निवडणूक खर्चीक ठरते. निरीक्षक संबंधित पक्ष व उमेदवार निवडणुकीसाठी करीत असलेल्या खर्चावर लक्ष ठेवतात. सर्व राजकीय पक्षांसाठी, सर्व राजकीय पक्षांना सोबत घेऊन, सुस्थापित आदर्श आचारसंहिता तयार करणारा, भारत हा जगातील मोजक्याच देशांपैकी एक देश असावा. या आचारसंहितेसाठी कोणताही वैधानिक आधार नसला, तरीही सर्व राजकीय पक्ष याचे पालन करतात, निवडणुकीच्या मैदानात उतरलेल्या सर्वच पक्षांना समान पातळीवर ठेवण्यासाठी आचारसंहितेची अंमलबजावणी सुरू झाली. ही आचारसंहिता कालानुरूप बदलत गेली आहे आणि ती भारतीय निवडणूक आयोगाला मुक्त व न्याय्य वातावरणात निवडणुका आयोजित करण्यास साहाय्यभूत ठरली आहे. निवडणुकांच्या घोषणेबरोबरच आचारसंहिता प्रत्यक्षात लागू होते; आणि निवडणूक प्रक्रियेवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे अनावश्यक प्रभाव टाकणाऱ्या कोणत्याही कायदेशीर किंवा बेकायदेशीर कृतीला प्रतिबंध करते. नवनवीन क्लृप्त्यांद्वारे राजकीय पक्ष आचारसंहितेचे उल्लंघन करण्यासाठी मार्ग शोधतात. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भारत निवडणूक आयोग प्रयत्नशील असतो

**मतमोजणी :**

मतदान संपल्यानंतर रिटर्निंग ऑफिसर व निवडणूक आयोगाने नेमलेले निरीक्षक यांच्या देखरेखीखाली मतमोजणी केली जाते. मतमोजणी संपल्यानंतर ज्या उमेदवाराला सर्वांत जास्त मते मिळाली आहेत त्याला रिटर्निंग ऑफिसर विजयी झाल्याचे आणि मतदारसंघातून संबंधित गृहामध्ये निवडून गेल्याचे घोषित करतो. 'सर्वांत जास्त मते मिळवील तो विजयी' या पद्धतीवर लोकसभेच्या निवडणुका घेतल्या जातात. मतदार संघ असे संबोधले जाणारे देशाचे भौगोलिक विभाग पाडले जातात. प्रत्येक मतदाराला एक मत असते व तो कोणत्याही उमेदवाराला ते देऊ शकतो आणि सर्वांत जास्त मते मिळविणारा उमेदवार विजयी होतो. राज्य विधानसभेच्या निवडणुका लोकसभेच्या निवडणुकीच्या पद्धतीनेच घेतल्या जातात. राज्ये व संघराज्य प्रदेशांचे एक सदस्यीय मतदार संघात भाग पाडले जातात व 'सर्वांत जास्त मते मिळवील तो विजयी' ही पद्धत वापरली जाते.

**प्रसारमाध्यमांची भूमिका :**

निवडणूक प्रक्रियेमध्ये शक्य तितकी पारदर्शकता आणण्यासाठी प्रसारमाध्यमांना प्रोत्साहन दिले जाते कारण प्रसारमाध्यम हा लोकशाहीचा चौथा स्तंभ नेहमीच भारत निवडणूक आयोगाशी मैत्रीपूर्ण आणि सहयोगी भावनेने जोडला गेला आहे. प्रसारमाध्यमे आयोगाचे डोळे आणि कान होऊन निवडणूक प्रक्रियेमध्ये आवश्यक ते सर्व सहकार्य देतात आणि निवडणुकांविषयी बातम्या देण्यासाठी

सोयी सुविधा दिल्या जातात. अर्थात, मतदान गुप्त राहील, हे सुनिश्चित केले जाते. निवडणुकीच्या बातम्या देण्यासाठी प्रसारमाध्यमांच्या कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रात जाण्यासाठी आणि प्रत्यक्ष मतमोजणीच्या वेळी मतमोजणी केंद्रात जाण्यासाठी विशेष पास दिले जातात. निवडणूक विनंत्या : निवडणुकीदरम्यान गैरप्रकार होत आहे, असे वाटल्यास मतदार किंवा उमेदवार निवडणूक विनंती दाखल करू शकतो. ही विनंती म्हणजे नेहमीचा दिवाणी खटला नसतो, तर ज्यामध्ये सर्व मतदार संघाशी संबंध आहे, असा विवाद मानला जातो. संबंधित राज्याचे उच्च न्यायालय अशा विनंत्या हाताळते आणि जर त्या योग्य आढळल्या, तर प्रसंगी मतदारसंघात फेरनिवडणूकही घेतली जाते.

**निवडणूक उत्सव उपक्रम:**

मतदारांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाने २००९ पासून स्वीप (SVEEP) नावाचा मतदार जागृतीचा व्यापक कार्यक्रम हाती घेतला आहे. मतदार नोंदणीपासून ते मतदान करण्यापर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावरील प्रक्रिया सुलभ आणि जलद व्हावी यासाठी आयोगाकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी तंत्रज्ञानाची मदत घेतली जात आहे. ऑनलाइन मतदार नोंदणीसाठी Voter helpline या ॲपची आणि NVSP या संकेतस्थळाची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच, दिव्यांग मतदारांच्या नाव नोंदणीसाठी मतदानाच्या दिवशी त्यांना चाकाची खुर्ची, वाहन इ. सुविधा सहज उपलब्ध करून देता याव्यात यासाठी खास PWD ॲप तयार करण्यात आले आहे. मतदानाच्या दिवशी दिव्यांग मतदारांसहित सर्व प्रकारच्या मतदारांना मतदान केंद्रांवर पुरेशा सुविधा देण्यात येत आहेत.

**सारांश :**

भारताच्या लोकशाहीच्या दिशेने होणाऱ्या वाटचालीत निवडणुकांचा फार मोठा वाटा आहे. निवडणुका आणि प्रतिनिधित्व या लोकशाहीशी संबंधित अत्यंत महत्त्वाच्या प्रक्रिया असून निवडणुकीच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी निवडले जातात 'एकही मतदार वंचित राहता कामा नये' निवडणुकीसंबंधी काही वाद निर्माण झाल्यास ते सोडवण्याची जबाबदारी निवडणूक आयोगावर असते. त्यानुसार एखाद्या मतदारसंघात पुन्हा निवडणुका घेणे अथवा उमेदवाराची अपात्रता घोषित करणे ही कामे निवडणूक आयोगाची आहेत. मतदार नोंदणीसाठी विशेष मतदार जागृती मोहीम आखण्यात येते मतदान करणे हे आपले कर्तव्य आहे आणि जबाबदारीही आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या सक्षमीकरणासाठी भारतीय न्यायव्यवस्थेने आणि सुधारणांसाठी नेहमीच साहाय्य केले आहे. राजकीय पक्षांना त्यांच्या उमेदवारांचे गुन्हेगारी पूर्वचरित्र जाहीर करण्यास अनिवार्य करणे किंवा ईव्हीएम - व्हीव्हीपॅट यांच्या वापरास व सचोटीला पाठिंबा देणे, याबाबत न्यायव्यवस्थेने आयोगाला मदत केली आहे. तसेच, सेवा मतदार (संरक्षण खात्यातील मतदार), ज्येष्ठ

व दिव्यांग नागरिक यांच्यासाठी मतदान प्रक्रिया सुलभ करण्याकरता आयोगाने सुरू केलेल्या 'टपाली मतदान' व्यवस्थेच्या प्रयोगाचे न्यायव्यवस्थेने कौतुक केले आहे. तसेच, संसदेनेही आयोगाला वेळोवेळी साहाय्य केले आहे. निवडणुकीसंदर्भात विविध वैधानिक तरतुदी आणि आवश्यक कायदे करण्यासाठी संसद घटनात्मक जनादेशाची परिपूर्ती करण्याच्या कार्यात भारतीय निवडणूक आयोगाला मदत करते. संसदेद्वारे अलीकडेच अशा दोन तरतुदी करण्यात आल्या आहेत. एक म्हणजे, आधारकार्ड मतदार यादीशी संलग्न करणे, यामुळे बनावट मतदारांची नोंदणी टाळता येईल. दुसरी तरतूद म्हणजे, वाढत्या महागाईसोबत सुसंगत होईल अशा प्रमाणात उमेदवाराची निवडणूक खर्चाची मर्यादा वाढवणे. या प्रकारे संसद देशातील निवडणूक प्रक्रिया सुधारण्यासाठी वेळोवेळी पाठिंबा देत आली आहे.

**निवडणूक प्रक्रिया**

निवडणुकांचे (कार्यक्रम) वेळापत्रक

↓ ↓

मतदार याद्या निश्चिती — मतदारसंघाची निर्मिती

↓

शपथ किंवा वचनबद्धता

↓

उमेदवारांकडून नामांकन पत्र व छाननी

↓

मतपत्रिका आणि चिन्हे :

↓

मतदानाचे दिवस

↓

प्रत्यक्ष मतदान

↓

मतमोजणी

↓

निवडणुकांचे निकाल

↓

निवडणुकीसंबंधीच्या वादांचे निराकरण

**रिकाम्या जागा भरा.**

१) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमध्ये मतदाराची पडताळणीला -------------असे म्हटले जाते.

२) भारत निवडणूक आयोगाने २००९ पासून -------------नावाचा मतदार जागृतीचा व्यापक कार्यक्रम हाती घेतला आहे

**उत्तरे**

१) व्हीव्हीपॅट, VVP-T (Voter Verified Paper -udit Trail)

२) स्वीप (SVEEP)

**टीपा लिहा**

१) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र

२) निवडणूक प्रक्रिया आणि माध्यमांची भूमिका

**सविस्तर उत्तरे लिहा.**

१) भारतीय निवडणूक प्रक्रियावर सविस्तरपणे लिहा.

**आधिक वाचनासाठी संदर्भ:**

१) पवार दीपक, २०२२, (संपा) 'लोकशाही समजून घेताना' मुख्य निवडणूक अधिकारी मुंबई, महाराष्ट्र राज्य मंत्रालय,

२) Election commission of india भारत सरकारचा निवडणूक आयोग.

## ❒ निवडणूक सुधारणा :–

भारतात १९५२ मध्ये पहिली सार्वजनिक निवडणूक पार पाडली आणि २००९ ते २०१४ मध्ये पंधराव्या लोकसभेचा कार्यकाल संपल्यामुळे २०१४ मध्ये सोळाव्या लोकसभेसाठी सार्वत्रिक निवडणूका पार पाडल्या गेल्या. बासष्ट वर्षाच्या कालखंडात निवडणूक आयोगाने आपली संविधानात्मक जबाबदारी यशस्वीपणे पार पाडलेली आहे. तरीसुद्धा निवडणूकीसंबंधी सुधारणा झाल्या पाहिजेत, भरमसाठ खर्चावर नियंत्रण ठेवले पाहिजे असा विचार पुढे आलेला आहे. निवडणूक सुधारणा संबंधी सी. राजगोपालचारी यांनी असे म्हटले आहे की, निवडणूकीत धन–बल, भ्रष्टाचार या मार्गाचा अवलंब करू नये आणि निवडणूक खर्चावर प्रतिबंध घालण्यात येऊन मतदान केंद्र स्थापन्यावर भर देण्यात यावा. तसेच जयप्रकाश नारायण यांनी Citizens for Democracy संघटनेमार्फत १९७४ मध्ये निवडणूक सुधारणे संबंधी एक समिती नेमली होती. या समितीचे अध्यक्ष

बी. एस. तारकुंडे होते. तारकुंडे समितीने ९ फेब्रुवारी १९७५ मध्ये सादर केलेल्या अहवालात निवडणूक सुधारणेसाठी पुढील शिफारशी केल्या होत्या.

१. मतदाराचे वय १८ वर्षे असावे.

२. राजकीय पक्षांनी निवडणूक खर्चाचा ताळेबंद ठेवावा.

३. मतदारांना ओळखपत्र देण्यात यावे.

४. राजकीय पक्षांना रुपये एक हजार देणगी दिल्यास देणगीदाखला त्याच्या उत्पन्न करारातून सुट देण्यात यावी.

५. निवडणूकीच्या काळात मंत्रीमंडळाच्या सदस्यांनी सरकारी खर्चाने यात्रा, दौरा, प्रवास करू नये.

❒ **निवडणूक सुधारणासाठी निवडणूक आयोगाचा कार्यक्रम :–**

१. इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटच्या नियमानुसार सर्व राजकीय पक्षांनी पक्षाकडे असणाऱ्या पैशाबाबत रेकॉर्ड ठेवावे.

२. राजकीय पक्षासाठी दिला जाणारा निधी पक्षाच्या बँक अकौंटवरच जमा करण्यात यावा आणि हे अकाऊंट वेळोवेळी अपडेट केले जावे.

३. पक्षाच्या निवडणूकीच्या प्रचारासाठी किंवा इतर कामासाठी खर्च होणारा पैसा बँकेच्या माध्यमातून नेणे आणि कार्यकर्त्यांपर्यंत पोहचविण्यात यावा.

४. पैसे कार्यकर्त्यांना देताना ते अकाऊंट–पे चेक किंवा ड्रफ्टच्या स्वरूपातच द्यावेत.

५. निवडणूकीच्या काळात पक्षाचा पैसा रोख स्वरूपात बाळगुन त्याचे वाटप करू नये.

६. प्रत्येक आर्थिक वर्षातील जमा खर्चाच्या ताळेबंद विशिष्ट आर्थिक कार्य संपल्यानंतर तातडीने नोंदविला जावा आणि त्याची एक प्रत ३० सप्टेंबर पर्यंत निवडणूक आयोगाकडे देण्यात यावी.

### ४.२.१.४केंद्रीय लोकसेवा आयोग (Union Public Service Commission)

शासनव्यवस्थेला स्थिरता प्रदान करण्याचे प्रमुख कार्य प्रशासकीय व्यवस्था करते त्यामुळे शासन व्यवस्थेतील विविध राजकीय पक्षाची सरकारे बदलले तरी शासन व्यवस्थेच्या कार्यात सातत्य राहत असते. भारतात लोकसेवा आयोग लोकशाहीचा आधारस्तंभ समजला जातो. या संघ लोकसेवा आयोगाच्या मार्फत कार्यकारी मंडळाला राजकीस व प्रशासकीय व्यवस्थाच्या मध्ये संतुलन ठेवण्यास साह्य मिळते. संघ लोकसेवा आयोग ही सल्ला देणारी संस्था असली तरी या संस्थेने केलेल्या

शिफारशी नाकारता येत नाहीत. या आयोगामार्फत प्रशासनामध्ये कार्यक्षम व गुणवत्तापूर्ण अधिकाऱ्यांची निवड करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले जाते.

## ❐ केंद्रीय लोकसेवा आयोग रचना :–

संघ लोकसेवा आयोगाची तरतूद भारतीय राज्यघटनेतील ३१५ व्या कलमात करण्यात आलेली आहे. त्यामुळे या आयोगाला घटनात्मक संरक्षण प्रदान झाले आहे. संघ लोकसेवा आयोगाच्या विविध सेवा शर्ती व इतर अधिकाराबाबतच्या तरतूदी संदर्भात निर्णय घेण्याचा अधिकार संसदेतील राज्यसभेला घटनेने प्रदान करण्यात आलेला आहे.

संघ लोकसेवा आयोगामध्ये एक अध्यक्ष व इतर ८ सदस्य असतात. यामध्ये सध्या या आयोगाचे सुकुमार सेन हे अध्यक्ष आहेत.

## ❐ नेमणूक व बडतर्फी :–

संघ लोकसेवा आयोगाच्या अध्यक्ष व इतर सदस्याची नेमणूक राज्यघटनेतील कलम २१६ नुसार राष्ट्रपती मार्फत होत असते. अध्यक्ष व सदस्याचा कार्यकाल हा ६ वर्षाचा असतो किंवा ६५ वर्षे यापैकी जे आधी असेल तो निर्धारित केला जातो.

संघ लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षाला तसेच इतर सदस्यांना राज्य घटनेतील कलम ३१७ नुसार खालील कारणाने राष्ट्रपती बडतर्फी करू शकतो.

१. तो व्यक्ती दिवाळखोर घोषीत करण्यात आल्यास.
२. तिच्या कार्यकाळात कोणतेही कार्य जर पदाचा दुरुपयोग करुन केले असल्यास.
३. राष्ट्रपतीच्या मते मानसिक वा शारीरिक असमतोलामुळे ती व्यक्ती पदावर राहण्यास अयोग्य असल्यास.
४. गैरवर्तनाच्या कारणावरुन ही राष्ट्रपती त्याला पदमुक्त करु शकतो पण अशा वेळी सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला महत्त्वपूर्ण असतो.

## ❐ वेतन व सेवा शर्ती :–

आयोगाचे अध्यक्ष व सदस्याच्या सेवा व शर्ती संबंधी अधिकार राष्ट्रपतीला देण्यात आले आहेत. याच्या सेवा शर्तीत बदल केला जात नाही. पण ज्या वेळी आयोगाचा अध्यक्ष पदमुक्त होईल त्यावेळी त्याला भारतीय संघाच्या अंतर्गत कोणत्याही संस्थावर त्यांची निवड करता येत नाही. पण तो राज्याच्या लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष बनू शकतो.

## ❐ केंद्रीय लोकसेवा आयोगातील घटनात्मक तरतूदी :–

2 कलम ३१५ – केंद्र व राज्यासाठी लोकसेवा आयोग.

2 कलम ३१६ – सदस्यांची नियुक्ती व कार्यकाल.

2 कलम ३१७ – बडतर्फी.

2 कलम ३१८ – सेवाशर्ती.

2 कलम ३१९ – आयोगाच्या सदस्याचे सदस्यत्व समाप्त झाल्यावर इतर पदे स्विकारण्यास मनाई.

2 कलम ३२० – लोकसेवा आयोगाचे अधिकार.

2 कलम ३२१ – आयोगाच्या कार्याचा विस्तार.

2 कलम ३२२ – आयोगाचा खर्च.

2 कलम ३२३ – अहवाल.

या प्रकारे संघ लोकसेवा आयोगाचे संदर्भात राज्यघटनेतील कलमात तरतूदी दिसुन येतात.

❒ **संघलोकसेवा आयोगाचे कार्य :–**

भारतीय राज्यघटनेतील कलम ३२० मध्ये त्याचे कार्य व अधिकार स्पष्ट केले आहेत.

१. केंद्र व राज्याच्या सेवांच्या पदाबाबतच्या नियुक्ती संदर्भात परिक्षांचे आयोजन करणे.

२. जर दोन किंवा त्यापेक्षा राज्यानी संघ लोकसेवा आयोगाला भरती संबंधी आग्रह धरल्यास त्याचे नियोजन करणे.

३. नागरी सेवाच्या बढती, बदल्या व नियुक्ती संबंधी तत्त्वे निर्धारीत करणे.

४. नागरी सेवकाच्या शिस्त, त्याच्या संबंधीतची कारवाई याविषयी सल्ला देणे.

५. नागरी सेवेतील भरती पद्धतीत विविध टप्प्यांचे नियोजन करणे. यात लेखी, मुलाखत पद्धतीने भरती करणे.

६. नागरी सेवाबाबत निर्माण होणाऱ्या समस्याबाबत केंद्र सरकार व राष्ट्रपतीला सल्ला देणे.

७. आयोगाचा आपल्या कार्याविषयी राष्ट्रपतीला अहवाल सादर करणे.

या प्रकारे केंद्रीय लोकसेवा आपले कार्य करत असते. केंद्रीय लोकसेवा आयोग देशाच्या धोरणात्मक दृष्ट्या नागरी सेवकांची निवडीचे कार्य करुन महत्त्वपूर्ण कार्य पार पाडत असते.

## स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न–१

❒ **अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. १४८ व्या कलमात कशाची तरतूद आहे?

२. मुख्य निर्वाचन आयुक्त कोण आहेत?

३. संघ लोकसेवा आयोगाची तरतूद कोणत्या कलमात आहे?

❒ **ब) रिकाम्या जागा भरा.**

१. ३२४ कलम ........................ संबंधीत आहे.

२. वित्त आयोगाची तरतूद ...................... कलमात आहे.

## ४.३ सारांश

राज्यघटनेतील तरतुदी आधारे देशात विविध घटनात्मक प्राधिकरणांच्या निर्मितीद्वारे सुव्यवस्था प्रस्थापनेचा प्रयत्न झालेला आहे. महालेखापरिक्षक, महान्यायवादी, निवडणूक आयोग, केंद्रीय लोकसेवा आयोग, वित्त आयोग यांच्या कायदेशीर निर्मितीद्वारे या व्यवस्था स्वतंत्र बनवून त्यांना आपआपल्या कार्यक्षेत्रात कार्य करण्याची स्वायत्तत्ता प्रदान केली आहे. त्यामुळे आयोगाच्या स्वतंत्र व निर्भिडपणे कार्य करताना आढळतात. भारतातील लोकशाही यशस्वीतेमध्ये त्यांचे मोलाचे योगदान आहे.

## ४.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. **महालेखापरिक्षक :** शासनाच्या खर्चाचे नियंत्रण ठेवणारा पदाधिकारी

२. **आचारसंहिता :** योग्य पध्दतीने काम करणाऱ्यासाठीची योग्य नियमावली

३. **वित्त आयोग :** केंद्र राज्य यांच्या करांची विभागणी करणारी संस्था.

## ४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**अ)** १) निरिक्षक व महालेखापरिक्षक

२) सुकुमार सेन

३) ३१५.

**ब)** १) निवडणूक आयोग.

२) २८० कलम.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

**अ) टिपा लिहा.**

१. महालेखा परिक्षक.

२. केंद्रीय लोकसेवा आयोग.

३. निर्वाचन आयुक्त.

**ब) सविस्तर उत्तरे लिहा.**

१. नियंत्रक व महालेखा परीक्षकावर चर्चा करा.

२. भारतातील निवडणूक आयोगावर भाष्य करा.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. **डॉ. दुर्गादास बसू :** *''भारत का संविधान : एक परिचय''*, दसवा प्रकाशन, २०१३.

२. **डॉ. भास्कर भोळे :** *''भारताचे शासन व राजकारण''*, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, २००८.

३. **डॉ. सुमंत यशवंत :** *''भारतातील राजकीय प्रक्रिया''*, आनंद पब्लिकेशन, २००८.

४. **भारत सरकार :** *''भारताचे संविधान''*, भारत सरकार विधि व न्याय मंत्रालय, (२६ सप्टेंबर २००६ पर्यंत फेरबदल) मराठी आवृत्ती, पृ. १३८.

५. **विजय तुंटे, संदीप नेरकर :** *''भारतीय राज्यव्यवस्था''*, प्रशांत पब्लिकेशन, जळगांव.

६. **प. ल. जोशी :** *''भारतीय संविधान शासन व राजकारण''*, विद्या प्रकाशन, नागपूर.

७. **बी. बी. पाटील :** *''भारताचे शासन आणि राजकारण''*, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०१२.

८. **B. L. Fadia** : *"Indian Government and Politics"*, Sahitya Bhawan, Agra, 2012.


❑❑❑